# पीएच्. डी. (आयुर्वेद)

करिता

# शोधप्रबंध

कै. वैद्य पु. ग. नानल आयुर्वेद विभाग
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
यांसी सादर

**–:: विषय ::–**

## आयुर्वेद पत्रिकेत प्रसिद्ध झालेल्या विविध वैद्यक परंपरांचा अभ्यास विशेष संदर्भ – वेणीमाधवशास्त्री जोशी परंपरा व नानल परंपरा


**अभ्यासकर्ती**

**वैद्य रजनी गोखले**
आयुर्वेदाचार्य

**मार्गदर्शक**

**वैद्य. दिलीप प्र. गाडगीळ**
एम.डी. (आयुर्वेद), पीएच्. डी (आयुर्वेद)
एम्.फिल् (संस्कृत), पुणे

# DECLARATION

**विषय**
**आयुर्वेद पत्रिकेत प्रसिद्ध झालेल्या विविध**
**वैद्यक परंपरांचा अभ्यास**
**विशेष संदर्भ –**
**वेणीमाधवशास्त्री जोशी परंपरा व नानल परंपरा**

This is to declare that references collected from other sources are duly acknowledged and remaining part of the present study is original contribution of myself to the thesis

***Vd. Rajani Gokhale***

# CERTIFICATE

Certified that the work incorporated in the thesis

**आयुर्वेद पत्रिकेत प्रसिद्ध झालेल्या विविध**
**वैद्यक परंपरांचा अभ्यास**
**विशेष संदर्भ –**
**वेणीमाधवशास्त्री जोशी परंपरा व नानल परंपरा**

submitted by ***Vd. Rajani Gokhale,*** Nashik was carried out by the candidate under my guidance. The material obtained from other sources has been duly acknowledged in the thesis.

**Vd. Dilip Gadgil**

Date :

**Guide**

## ॥ श्री धन्वंतरये नमः ॥



# मनोगत

॥ श्री दत्त प्रसन्न ॥



कोणतेही कार्य हाती घेणे आणि ते पूर्णत्वास नेणे यातील आनंद खरोखर अवर्णनीयच ! आणि तोच आनंद  आज मी अनुभवते आहे. त्यातही पीएच.डी. सारखे क्लीष्ट काम पूर्ण होणे याची अनुभूती काही औरच.

खरे तर केवळ 'कंपलसरी' अभ्यास होईल या हेतूने पीएच.डी. विचार केला आणि विचार व चर्चा मंथनातून एक उत्तम विषय समोर आला.

अनेकांची मदत, सहकार्य, सल्ला, यामुळे विषय पुढे पुढे सरकत गेला. माझे मार्गदर्शक वैद्य दिलीप गाडगीळ यांनी शिष्य म्हणून माझा स्वीकार केला. वेळोवेळी उपयुक्त मार्गदर्शन केले. म्हणून सर्व प्रथम मी त्यांची ऋणी आहे.

पीएच्.डी चा विषय सर्वप्रथम कमिटीपुढे गेला त्या कमिटीत वैद्य रमेश नानल, वैद्य दादा गुजर होते. तो विषय नाकारला गेला. खरे तर माझ्यावर उभयतांचे उपकारच झाले असे म्हणायला हवे. कारण मी आयुर्वेद पत्रिकेतील सर्व परंपराचा अभ्यास, असा विषय पूर्वी निवडला होता ! दोन परंपरांचा अभ्यास करता करता माझी झालेली अवस्था मीच जाणो. पूर्वीचा विषय असता तर माझे काय झाले असते कोण जाणो ?

वैद्य रमेश नानल यांची मदत तर माझ्यासाठी अनमोल आहे. विषयाची व्याप्ती, विषयाचा विचार कसा करावा. कोणा कोणाला भेटावे त्यांची नांवे, पत्ते, फोन नं इ. माहिती, संदर्भ ग्रंथांची यादी, पुस्तके आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नानल परंपरेचे मोठे दालन माझ्यासाठी खुले केले.

वैद्य शुभदाताई पटवर्धन यांनी वेणीमाधवशास्त्री बद्दल मुक्त हस्ते दिलेली माहिती, त्यांचे अनुभव, वेणीमाधव शास्त्रींचे साहित्य यामुळे माझ्या अभ्यासाला दिशा मिळाली. याबद्दल मी शुभदाताईंचीही ऋणी आहे.

विषयाचा अभ्यास सुरु झाला तरी त्याची मांडणी कशी करावी ? लेखन कसे करावे याची नेमकी कल्पना येत नव्हती. अशावेळी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील प्रा. डॉ. रमेश वरखेडे यांनी हे चित्र नेमकेपणाने स्पष्ट केले  व माझे तारु मार्गस्थ झाले. वेळोवेळी केलेले मार्गदर्शन माझ्यासाठी अनमोल आहे.

विषयाची रूजवात करण्यापासून ते कार्य पूर्ण होईपर्यंत माझे हितचिंतक वैद्य विजय कुलकर्णी यांनी

केलेली मदत अविस्मरणीय आहे. त्याचबरोबर आयुर्वेद पत्रिका विभाग तेथील कर्मचारी यांचे योगदानही अमूल्य आहे.

कामाला जसजशी गती येऊ लागली तश्या अडचणी वाढू लागल्या. माझ्या अनेक फ्रॅक्चर्सची सिरीज सुरु झाली. काम पूर्ण होईल की नाही याची काळजी वाटू लागली. परंतु माझी विद्यार्थिनी वैद्य प्राजक्ता ढेवरे हिने मला लेखन सहाय्य केल्याने हे कार्य पूर्णत्वास आले. तिचे सहकार्यही मोलाचे आहे.

माझे पती व मुले यांनीही वेळोवेळी मला सांभाळले. त्यांची मी कृतज्ञ आहे.

मुकेश काळे यांनी काम पूर्ण होण्यासाठी केलेली सर्वतोपरी मदत अभिनंदनीय आहे. इतरही ज्ञात, अज्ञात व्यक्ती ज्यांचे मला सहकार्य लाभले त्या सर्वांप्रती मी कृतज्ञ आहे.

ज्या उद्देशाने हे कार्य सुरु केले होते तो उद्देश पूर्ण झाल्याचे समाधान आज आहे. आयुर्वेद क्षेत्रातील या दोन परंपरांनी प्रचुर लेखन व विपुल कार्य केले आहे. त्याचा अभ्यास करण्याची संधी मला या निमित्ताने मिळाली हे माझे महत् भाग्यच ! इतकी वर्षे केवळ आयुर्वेदाच्या ज्ञानगंगेच्या काठावर असणारी मी आज त्या प्रवाहात उतरले आहे. अपेक्षा एकच आहे. हा प्रवाह असाच वाहत राहो व अनेकानेक वैद्यांपर्यंत जावो.

॥ श्रीपाद श्रीवल्लभांचा जयजयकार असो ॥

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | विषय ओळख (Introduction) | ८ |
| २ | साहित्याचे परिशीलन (Review of Literature) | ९ |
| ३ | प्रयोजन आणि उद्दिष्ट (Aims and Objects) | १६ |
| ४ | संदर्भ साहित्य व अभ्यासपद्धती (Materials and Methods) | १८ |
| ५ | निरीक्षणे (Observation)<br>✳ वै. वेणीमाधवशास्त्री परंपरेतील लेखनशैली<br>✳ वै. वेणीमाधवशास्त्रीची चिकित्साद्दष्टी<br>✳ वै. नानल परंपरेतील लेखनशैली<br>✳ वै. नानल परंपरेतील चिकित्साद्दष्टी | १२६ |
| ६ | उपलब्धी (Results)<br>✳ वै. वेणीमाधवशास्त्री परंपरेचे योगदान<br>✳ वै. नानल परंपरेचे योगदान | १३१ |
| ७ | चर्चा (Discussion) | १४७ |
| ८ | निष्कर्ष (Conclusion) | १५६ |
| ९ | संदर्भ साहित्य (References & Bibliography) | १५७ |
| १० | परिशिष्ट (Annexure) | १६६ |

# १ विषयाची ओळख (Introduction)

आयुर्वेद अतिशय प्राचीनशास्त्र आहे. यावरचे अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. परंतु खरे तर हे ज्ञान परंपरेच्या आधारे वृद्धींगत झाले. या परंपरेत वैद्यांच्या वंशातील मुले किंवा त्यांचे शिष्य अशी ही परंपरा वाढत गेली. एका पिढीतील ज्ञान पुढच्या पिढीत हस्तांतरित होत गेले. ज्याप्रमाणे गायकीची वैशिष्ट्यपूर्ण घराणी आढळतात, त्याप्रमाणे वैद्यकीची सुद्धा आढळतात. प्रत्येकाची चिकित्सापद्धती, दोषदूष्यांबद्दलची विचार सरणी, निदानपद्धती, वापरात असलेली औषधे, इ. अनेक गोष्टीत वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आढळते. आजही ही परंपरा अस्तित्वात असल्याचे जाणवते. उदा. वै.वेणीमाधवशास्त्री परंपरा, वै.नानल परंपरा, वै.करमरकर परंपरा, वै.बिंदुमाधवशास्त्री पंडित परंपरा, वै. बागेवाडीकर परंपरा, वै. वडोदकर परंपरा, वै. मा.वा. कोल्हटकर परंपरा, इ. अनेक उदाहरणे देता येतील. या सर्व परंपरा आयुर्वेद पत्रिकेत लेखरूपाने प्रतिबिंबित होतात. यांनी शास्त्राचे उपबृंहण केले आहे. ज्ञान संक्रमण प्रक्रियेत परंपरांचा सहभाग खूप मोठा आहे. यामुळेच खडतर परिस्थितीतही आयुर्वेदटिकून राहिला. ज्ञान संक्रमण होतांना अनेकदा हे ज्ञान जसेच्या तसे पुढे संक्रमित होते तर अनेकदा इतर परंपरांचा त्यावर प्रभाव पडतो. कारण शिष्यवर्ग एकापेक्षा अधिक गुरूंकडे जाऊन अभ्यास करतांना आढळतो. साहजिकच त्यांच्या व्यवसायात विविध परंपरांचे मिश्रण आढळते.

अनेकदा या परंपरांमध्ये बदलत्या काळानुसार किंवा बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळेही काही बदल आढळतात. काही परंपरा मात्र नंतर खंडित झालेल्या आढळतात. आज अनेकांना त्या परंपरा किंवा त्यांचे वैशिष्ट्य माहितही नाही. आयुर्वेद क्षेत्रातील ही पोकळी भरून निघण्यासाठी त्यांचा अभ्यास होणे आवश्यक वाटते. या प्रकारचा अभ्यास यापूर्वी झाल्याचे आढळत नाही.

परंपरांच्या अभ्यासामुळे दोन परंपरांमधील किंवा तत्कालीन वैद्यांमधील परस्पर संबंध कसे होते ? एकमेकांना पूरक होते कां ? एखाद्या परंपरेत परिस्थितीनुरूप बदल आढळल्यास इतर परंपरांमध्येही तसे घडले का याचाही अभ्यास होतो.

परंपरामुळे इतिहासाचाही अभ्यास होतो. आणि इतिहास हा मार्गदर्शक असतो.

आयुर्वेद पत्रिका हे नियतकालिक नाशिकच्या आयुर्वेद सेवा संघ या संस्थेच्या वतीने १९४७ पासून अखंडितपणे प्रकाशित होत आहे. यात अनेक परंपरेतील व्यक्तींनी लेखन केले आहे. त्यांच्या या लेखांमधून त्या त्या परंपरेची विचारसरणी, वैशिष्ट्ये या बद्दलची माहिती प्रतिबिंबित होते. तसेच काळानुरूप परिस्थितीनुरूप झालेले बदलही त्यांच्या लेखांतून स्पष्ट होतात.

आयुर्वेद पत्रिकेतील अनेक परंपरांपैकी प्रतिनिधीक स्वरूपात दोन परंपरांचा, लेखांच्या संदर्भाने विश्लेषणात्मक अभ्यास या शोध प्रबंधात केला आहे. या दोन परंपरा म्हणजे वै.वेणीमाधव शास्त्रीजोशी परंपरा आणि वै.नानल परंपरा.

# १ साहित्याचे परिशिलन (Review of Literature)

## आयुर्वेद पत्रिका

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी सुमारे महिनाभर आधी नाशिकमधील आयुर्वेद सेवा संघ या सार्वजनिक संस्थेतर्फे 'आयुर्वेद पत्रिका' हे नियतकालिक सुरु झाले. कै. वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित हे या आयुर्वेद पत्रिकेचे संस्थापक. या दूरदृष्टीच्या वैद्यराजांनी खरं तर त्या वेळेच्या अनरजिस्टर्ड वैद्यांचे प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने उपयुक्त व्हावे या उद्देशाने या नियतकालिकाची मूहूर्तमेढ १८ जुलै १९४७ साली रोवली. त्यावेळी नोंदणीची आजच्यासारखी स्थिती नव्हती. आयुर्वेदीय शिक्षणही देशभरात विविध पद्धतींनी सुरु होते. अशा परिस्थितीत सुरु झालेली आयुर्वेद पत्रिका १९५७ सालांपर्यंत पाक्षिक स्वरुपात आणि त्यानंतर आजतागायत मासिक स्वरुपात अत्यंत नियमितपणे प्रकाशित होत आहे.

सुमारे ६० वर्षांपूर्वी एका वेगळ्या पार्श्वभूमीवर सुरु झालेली आयुर्वेद पत्रिका आज मात्र ज्ञानसंक्रमणाचे एक महत्वपूर्ण साधन झालेले आहे. सुरुवातीच्या वर्षात या मासिकाची असलेली ४/- रूपये वार्षिक वर्गणी ६० वर्षात सुमारे ६० पट झाली आहे. सुरुवातीला बऱ्याच अंकांत देशी वैद्य बोर्ड, त्यांच्या निवडणुका, त्यांच्या मतदार यादीत नांव नोंदवण्यासाठी वैद्यमंडळींना केलेला आग्रह अशा स्वरुपाचे संपादकीय लेखन बिंदुमाधवशास्त्रींनी केलेले आहे. महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ या वैद्यांच्या तत्कालीन संघटनेबद्दलही बरीच माहिती सुरुवातीच्या अंकात आहे. आयुर्वेद पत्रिकेच्या स्थापनेनंतर सुरुवातीची काही वर्षे वैद्यांची संघटना बळकट करण्यासाठी पत्रिकेने फार मोठा हातभार लावला. अर्थात, वैद्यक व्यावसायिकांना उपयुक्त ठरतील असे ज्ञानवर्धक, शास्त्रीय, अनुभवसंपन्न असे लेखनही पत्रिकेत सुरुवातीपासूनच प्रसिद्ध होत आहे.

बिंदुमाधवशास्त्रींनी १६ जून १९५७ पर्यंत म्हणजे सुमारे १० वर्षे संपादकपदाची धुरा सांभाळली. या काळातील त्यांची संपादकीय टिप्पणी त्या काळच्या आयुर्वेदाच्या स्थितीची साक्ष देतात. अर्थात त्यांनी केवळ संपादकीय लेखन न करता अनेक रुग्णानुभव, त्यांचे व्यवसायातील अन्य अनुभव, द्रव्यांबद्दलची माहिती असे विपूल लेखन केले. स्वत: कष्ट करुन आयुर्वेद पत्रिका टिकवली, वाढवली. आयुर्वेद क्षेत्रातील समस्यांना वाचा फोडली, त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला. संघटनाही मजबूत केली. शास्त्रीय लेखन केले. आयुर्वेदीय आहार संकल्पनांचा आग्रह धरला. समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत आयुर्वेदाचे सिद्धांत पसरावेत, असा आग्रह त्यांनी धरला. अगदी शालेय स्तरावरही आयुर्वेदाचा समावेश करावा, हा त्यांनी धरलेला आग्रह आजही अनुकरणीय आहे. आयुर्वेद प्रचार प्रसाराचे असे विविधांगी कार्य आयुर्वेद पत्रिकेच्या माध्यमातून बिंदूमाधवशास्त्री पंडित यांनी अन्य अनेक वैद्यांच्या साहाय्याने केले.

यानंतर वैद्य श्या.धों. कुलकर्णी यांनी २ वर्षे पत्रिकेची धुरा सांभाळली. स्वत: औषधीकरण तज्ज्ञ असल्याने त्या काळात पारद संशोधन, आयुर्वेदीय औषधीकरण अशा विषयांना त्यांनी पत्रिकेतून प्राधान्य दिले.

१ ऑगस्ट १९५१ पासून १५ मार्च १९४१ अशी सुमारे १० वर्षे कै. वैद्य ग.के.कामत यांनी पत्रिकेचे ३ रे संपादक म्हणून कार्य केले. वैद्य कामत हे संशोधन दृष्टीने वैद्य होते. त्यांनी शास्त्रीय लिखाण, तसेच संशोधनपर लेख पत्रिकेतून लिहिले.

कै. वैद्य वि.म. गोगटे यांनी वैद्य कामतांनंतर १९७४ पर्यंत पत्रिकेचे यशस्वी संपादन करुन अनेक नवीन संकल्पना प्रत्यक्षात आणल्या. प्रत्येक पानाच्या शेवटी तळटीपा लिहिण्याची उपयुक्त संकल्पना वि.म. गोगटेंचीच. शैलीदार लेखन, दृढ शास्त्रनिष्ठा, अत्यंत सोपी लेखनशैली ही वैद्य गोगटे यांची लेखन वैशिष्टये. वैद्य गोगटे यांच्या कारकीर्दीतच आयुर्वेद पत्रिकेचा रौप्यमहोत्सव संपन्न झाला. त्यानिमित्ताने रौप्य महोत्सवी विशेषांकही प्रकाशित झाला. या काळात शंका समाधान, अन्य शासकीय लेख यांना पत्रिकेतून प्रसिद्धी मिळाली. याच दरम्यान वैद्य गोगटे यांच्या पुढाकाराने लेखक संमेलनही आयोजित करण्यात आले.

वैद्य वि.म. गोगटे यांचे नंतर कै. वैद्य श्री. कृ. करमरकर यांनी १९७४ पर्यंत पुढे १० वर्षे आयुर्वेद पत्रिकेचे संपादन केले. या काळात त्यांनी विशेषकरुन आयुर्वेदीय शिक्षणाबद्दल आपले विचार संपादकीयातून मांडले. त्यांच्या कारकीर्दीत आयुर्वेद पत्रिकेत पुस्तक परीक्षणे, रुग्ण चिकित्सा, महाविद्यालयीन वृत्ते, संमेलन चर्चा, आयुर्वेद सेवा संघातील विविध विभागांची चर्चा, रुग्णालयातील अनुभव यावर विशेष भर होता. त्यांच्यानंतर वैद्य स्वानंद पंडित यांनी १२ वर्षे म्हणजे एप्रिल १९९६ पर्यंत पत्रिकेचा कार्यभार सांभाळून अनेक नवीन आयाम दिले. अनेक नवीन तरुण लेखक याच काळात तयार झाले. पत्रिकेचे स्वरुप अधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न केला. ती अधिकाधिक सर्वस्पर्शी कशी होईल याचा सतत विचार करुन तो प्रत्यक्षात आणला.

त्यानंतर म्हणजे १ मे १९९६ पासून वैद्य विजय कुलकर्णी यांनी आजपर्यंतची वाटचाल यशस्वी करण्यास अनेकांचे सहकार्य घेत पत्रिका विभाग पुढे नेला. वर्गणीदार,जाहिरातदार वाढवले, नवीन सदरे सुरु केली. संपादक मंडळ पुनर्रचित करुन सक्रिय केले. वैद्य रजनी गोखले, वैद्य आशुतोष यार्दी, वैद्य. एकनाथ कुलकर्णी आदींचे सातत्याने सहकार्य त्यांना लाभत आहे. आयुर्वेद पत्रिकेचे स्वरुप पूर्वीपेक्षाही अधिक आकर्षक या काळात झाले. प्रतिनिधी योजना सुरु केली. अनेक आयुर्वेद वार्तांना प्रसिद्धी दिली. संपादकीयांतून अनेक कायदेशीर बाबी, सार्वजनिक आरोग्य सेवा इ. विषय हाताळले जात आहेत.

**सेवाव्रती संपादक :** आयुर्वेद पत्रिकेचे आजवरचे सर्वच संपादक सेवाव्रत घेतलेले सेवाव्रती म्हटले पाहिजेत. निरपेक्ष वृत्तीने आयुर्वेदाची सेवा करण्याचेच कार्य या सर्वांनी केले आहे.

**प्रचंड ज्ञान भांडार :** अशा या सर्व संपादकांच्या एकूण ६० वर्षाच्या कारकीर्दीत आयुर्वेद पत्रिकेत आजवर ५ हजाराहून अधिक लेख प्रकाशित झाले असून पाचशेहून अधिक लेखकांनी त्यामध्ये आपले योगदान दिले आहे. रुग्णानुभव, पंचकर्म, रोगनिदान, व्याधी, चिकित्सा, शरीरक्रिया, शरीररचना, स्वस्थवृत्त, स्त्रीरोग, औषधीकरण, बालरोग, शस्त्रकर्म, क्षारकर्म, अग्निकर्म, सिद्धांत, पदार्थविज्ञान, कायदे, आयुर्वेद संबंधीराजकीय घडामोडी, आयुर्वेद वार्ता, अशा विविध विषयांचे लेख प्रकाशित झाले आहे. त्यामध्ये आयुर्वेद क्षेत्रातील अनेक मान्यवर वैद्यांवरील लेखांचाही समावेश आहे. जेणेकरुन या वैद्यांची चिकित्सेची पद्धती निदानाची पद्धती वाचकांना कळावी.

आयुर्वेद क्षेत्रात स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातही कार्य केलेल्या अनेक मान्यवर वैद्यांनी पत्रिकेत लेखन केले आहे. त्यामध्ये वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी, वैद्य श्री. कृ. करमरकर, वैद्य म. पु. नानल, वैद्य भा. पु.

नानल, वैद्य रमेश नानल, वैद्य भि. के. पाध्येगुर्जर, वैद्य भा. वि. साठ्ये, वैद्य सुभाष रानडे, वैद्य सुभाष साठे,वैद्य अविनाश लेले, वैद्य वि. म. गोगटे, वैद्य त्र्यं. म. गोगटे, वैद्य महेश ठाकूर, वैद्य दि. प्र. गाडगीळ, वैद्य मा. वा. कोल्हटकर, वैद्य देवपुजारी, अशा अनेकांचा नामानिर्देश करता येईल, वैद्य सुभाष रानडे, वैद्य महेश ठाकूर यांना आयुर्वेद पत्रिकेनेच घडविल्याचे ते सांगतात. सध्याचे संपादक वैद्य विजय कुलकर्णी त्यांचे सर्व सहकारी वैद्य रजनी गोखले, वैद्य एकनाथ कुलकर्णी, वैद्य आशुतोष यार्दी हेदेखील पत्रिकेमुळे लिहिते झाले.

**अनेक परंपरांचा सहयोग :** विशेषत: महराष्ट्रातील अनेक वैद्यकपरंपरांनी या आयुवैद पत्रिकेत आपले लेखन योगदान दिले आहे आणि हा सगळा ज्ञानप्रवाह अखंडितपणे सुरु ठेवला आहे. ही ज्ञानज्योत तेवत ठेवलेली आहे.

गेल्या ६० वर्षातील आयुर्वेद पत्रिका म्हणजे आयुर्वेदाच्या या कालखंडातील एकूण इतिहासाचेही प्रतिबिंब म्हणवे लागेल. आयुर्वेद क्षेत्रात शिक्षण, संशोधन, व्यवसाय, अध्ययन, अध्यापन, औषधीकरण या सर्वच बाबतीत होत गेलेले कालानुरुप बदल आयुर्वेद पत्रिकेने वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले आहे. आयुर्वेद पत्रिका म्हणजे एक मोठा ज्ञानस्त्रोत असून त्यामध्ये आजच्या काळातही सर्वथा उपयुक्त अशी प्रचंड ज्ञानसामग्री साठवलेली आहे. अनेक परंपरा, आयुर्वेदाच्या शिक्षण, संशोधन, अध्यापन, व्यवसाय, औषधीकरण या सर्वच क्षेत्रातील मान्यवर यांनी केलेले हे ज्ञानसंक्रमण म्हणजे आयुर्वेदीय वाङमयातील एक मोठी ठेव आहे. हा ठेवा जतन करणे, तो पुढे संक्रमित करणे, भावी वैद्यांना त्याची जाणीव करुन देणे, त्यातील वेचक लेखरुपी मोती वेचून ते अधिक प्रसारीत करणे ही काळाची गरज आहे. आयुर्वेदाच्या अत्यंत प्रतिकूल काळातही ही आयुर्वेद पत्रिका टिकून राहिली ही त्यातील ज्ञानाच्या भांडारावर आणि संस्थेच्या आधारावर आणि लेखक, संपादक, वाचक यांच्या पाठिंब्यामुळे व सहयोगामुळे.

**विविध विशेषांक :** आयुर्वेद पत्रिकेने आतापर्यंत ७० हून अधिक विशेषांक प्रकाशित केले. त्यामध्ये वैद्य त्र्यं.म.गोगटे, वैद्य वि. म.गोगटे, वैद्य बागेवाडीकर, वैद्य करमरकर, वैद्य आ.वा. दातार, वैद्य सांबारे, वैद्य कोल्हटकर, वैद्य विद्याताई जळूकर, इ. व्यक्तिविशेषांक प्रसिद्ध केले, तर सुवर्णकल्प, बस्ति, वमन, पंचकर्म, धातुयोग, संशोधन, आयुर्वेदीय साहित्य, शालेय अभ्यासक्रमात आयुर्वेद, आयुर्वेदीय अभ्यास, हृद्रोग, इ. विविध विषयांवर पत्रिकेने विशेषांक प्रकाशित करुन ज्ञानदानाचे मोठे कार्य केले आहे.

**ज्ञानसंक्रमणाचे कार्य :** आयुर्वेदशास्त्र हे खूप व्यापक शास्त्र आहे. या ज्ञानाचे संक्रमण करण्याचे महत् कार्य आयुर्वेद पत्रिका करीत आहे. त्यामुळे मान्यवर वैद्यांच्या निदानपद्धतीचे, चिकित्सेचे, त्यांच्या विचार करण्याच्या क्षमतेचे, यथार्थ प्रतिबिंब त्यांच्या लेखनातून आयुर्वेद पत्रिकेच्या माध्यामातून उमटत असते. आयुर्वेद शास्त्रावर होणाऱ्या गुप्ततेच्या आरोपाला छेद देणारे असे हे आयुर्वेद पत्रिकेचे कार्य आहे. त्यामधून आलेल्या शेकडो रुग्णानुभवांतून, कल्पांवरील लेखातून मोठ्या संख्येने प्रेरणा घेऊन पूर्वीची व आजचीही वैद्यमंडळी रुग्णसेवा करीत आहे. अशा प्रकारे एकूण आयुर्वेद क्षेत्राला आयुर्वेद पत्रिकेचे फार मोठे योगदान आहे.

## आयुर्वेदीय ज्ञान संक्रमण

परंपरांचा अभ्यास म्हणजेच इतिहासाचा अभ्यास.

## इतिहास म्हणजे काय ?

इतिहासाच्या जवळचा शब्द म्हणजे इतिवृत्त. इतिवृत्त म्हणजे केवळ नोंदी, तर इतिहास म्हणजे त्यावरील भाष्य / मिमांसा.

इतिहास म्हणजे जे घडले ते, आणि त्याची तर्काने पण साधार मीमांसा. इतिहास म्हणजे काळानुसार झालेले परिवर्तन किंवा जीवन पद्धतीत प्रधानपूर्वक किंवा जाणीवूपर्वक होणारी स्थित्यंतरे. आणि इतिहास म्हणजे केवळ कालक्रमिक घटनांचा पट नव्हे तर भविष्याला जोडण्यासाठी वर्तमानकाळात घेतलेला शोध होय किंवा दुर्लक्षित, अपांरपरिक संप्रदाय-प्रवाहांना मध्यवर्ती धारेशी जोडण्याचे साधन (संदर्भ - **What is History** अनुवाद प्रा. वि.गो.लेले, १११०).

## इतिहास अभ्यासाचे महत्व :

- ✳ इतिहास वस्तुनिष्ठ असतो. त्यामुळे मानवनिर्मित्त गोर्ष्टींचे खरेखुरे व परिपूर्ण आकलन होऊ शकते.
- ✳ इतिहासात घटनांचे सूत्र, साचा असतो. याच्या अभ्यासाने वर्तमान तसेच भविष्याचे परिणाम समजतात.
- ✳ परंपरेच्या संदर्भात बधितले तर पंरपरांची आजची स्थिती, त्या परंपरेचा लय झाला की, वर्धन झाले याचे ज्ञान इतिहासाच्या अभ्यासाने होते.
- ✳ पूर्वीच्या काळचे विविध संदर्भ इतिहासाच्या अभ्यासाने कळतात. मागील पिढीतील ज्ञानाचा वारसा पुढील पिढीमध्ये संक्रमित होण्यास मदत होते.

## इतिहासाची साधने :

मागे उल्लेखित पुस्तकांमध्ये इतिहासाची साधने सांगतांना सर्व प्राचीन, अर्वाचीन, लिखित अलिखित, समकालीन उत्तरकालीन, सर्वकालीन विशिष्टकालीन संदर्भाचा विचार करण्यास सांगितले आहे.

प्रस्तुत शोधनिबंध तयार करतांना आयुर्वेढीय लेखनाचा इतिहास, ज्या नियतकालिकातून हे लेखन झाले त्याचा इतिहास, लेखकाचा इतिहास असे विषय अभ्यासले गेले आहेत. आयुर्वेदाच्या इतिहासाच्या अभ्यासाचा

**परम् + पर = परम्पर - अशारितीने लागलेली मालिका म्हणजे परंपरा. 'In regular succession'.**

परंपरा म्हणजे काय ? मागच्या मानवी पिढीकडून पुढील पिढीस प्राप्त झालेली पद्धत म्हणजे परंपरा किंवा जुन्या पिढीकडून नव्या पिढीकडे जतन करण्यासाठी दिलेला ठेवा म्हणजे परंपरा.

प्रत्येक मनुष्याची विशिष्ट प्रकृती असते. पण तेवढ्यावर जीवनार्थ कलहात मानव यशस्वी होऊ शकत नाही म्हणून नवे गुण, ज्ञान, कला कौशल्य, आचरणपद्धती तो आत्मसात करतो. हे सर्व संपादित गुणविशेष पुढील पिढीला मिळतात. यांची एक ठराविक चौकट बनते, विशिष्ट प्रणाली बनते. डॉ. राधा कृष्णन् म्हणत की काळाची शेकडो वर्षे गेल्यानंतर इतिहास बनतो. इतिहासाची शेकडो वर्षे गेल्यानंतर परंपरांचा जन्म होतो.

ही रुढ आचारांची विशिष्ट प्रणाली एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सांस्कृतिक वारसा या रुपाने संक्रमित होत असते. यालाच परंपरा म्हणतात.

भौगोलिक व आर्थिक स्थित्यंतरे, अन्य समाजाशी संपर्क, दळणवळण, इ. कारणांनी परंपरेत बदल होतात पण हे बदल म्हणजे नव्याची जुन्याशी सांगड घातली जाते व समन्वयही साधला जातो.

अनेक क्षेत्रात या परंपरा आपल्याला आढळतात. उदा. धार्मिक क्षेत्र, विविध समाजातील चालीरिती, विविध देशातील संस्कृती, इ. कला, साहित्य, शिक्षण क्षेत्रातही या परंपरा आढळतात. संगीत, नृत्य, यातील घराणीही परंपरेचेच प्रतीक आहेत.

परंपरा या School of thoughts आहेत. आयुर्वेदाच्या क्षेत्रातही अशा अनेक परंपरा आढळतात. देशरचना,

उपलब्ध द्रव्ये, तेथील लोकांची गरज यानुसार प्रत्येक परंपरेतील चिकित्सापद्धती, औषधीकरण संकल्पना, औषधे या मध्ये काही वैशिष्ट्ये आढळतात.

आयुर्वेदाचे अवतरण किंवा प्रकटन परंपरेच्या स्वरुपात झालेले आढळते. यात दैवी परंपरा, लौकिक परंपरा आढळते. लैकिक परंपरेत पुढे आत्रेय धन्वंतरी, भास्कर आदी संप्रदाय आढळतात. संप्रदाय म्हणजेही परंपराच होत. त्या त्या विशिष्ट संप्रदायात वैशिष्ट्यपूर्ण चिकित्सापद्धती किंवा विचारसरणीचे एक सूत्र आढळते.

## ज्ञानसंक्रमणाच्या पद्धती :

ज्ञानाचा प्रसार होणे, एका व्यक्ती कडून दुसऱ्या व्यक्तीपर्यंत ज्ञान पोहोचणे म्हणजे ज्ञानसंक्रमण. परंपरा टिकून राहण्याचे कारण म्हणजे योग्यपद्धतीने झालेले ज्ञानसंक्रमण. म्हणूनच ज्ञानसंक्रमणाच्या पद्धती कोणकोणत्या आहेत यांचा आढावा येथे घेतला आहे. ज्ञानसंक्रमणाच्या दोन प्रमुख पद्धती आढळतात. १) मौखिक, २) लिखित

**I) मौखिक :** सूत्र रुपात, मंत्र स्वरुपात पठण करणे, मार्गदर्शन करणे व नियमित पठण करुन ते लक्षात ठेवणे. मौखिक प्रकारात प्रत्यक्ष मार्गदर्शन आढळते. मौखिक ज्ञानसंक्रमण अनेक मार्गांनी होतांना आढळते.

**अ) गुरुकुलपद्धति :** पूर्वीच्या काळी ऋषिंच्या आश्रमातच विद्यार्थी शिकण्यासाठी जात. त्यांना ऋषिकुल किंवा आश्रम कुल म्हणत असत. येथे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष गुरु द्धारे मार्गदर्शन मिळत असे. नियमित मंत्रपठण, सुक्तांचे पठण होत असे व गुरु सर्व ज्ञान विद्यार्थ्यांना या स्वरुपात देत असत.

सर्ववेद हे पाठांतरामुळेच किंवा मौखिक ज्ञानसंक्रमणामुळेच सुरक्षित आहेत. म्हणून ऋग्वेद, अथर्ववेद इ. ची रचना अष्टके-अध्याय-वर्ग अशी आढळते. यातील मंडलांची रचना सूक्त व मंत्र पद्धतीने आहे. क्रमपाठ, घनपाठ, जटापाठ यात आढळतात.

वेदांमध्येही सूक्तात किंवा ऋचांमध्ये आयुर्वेदातील अनेक सूत्रे, वर्णने आढळतात शरीररचना, क्रिया, व्याधी, संरचना, इ. चे वर्णन आढळतो. चरक आदी ग्रंथाची रचना ही सूत्ररुप असत याचे आढळतो.

**ब) परिभ्रमण पद्धति :** विविध देश प्रदेशात भ्रमण करुन ज्ञानाचा प्रसार करणे म्हणजे परिभ्रमण पद्धति अनेक विद्धान पूर्वीच्याकाळी संपूर्ण हिंदुस्तान तसेच त्या बाहेरील प्रदेशातही भ्रमण करीत. विद्यार्थी विद्धानांना शिकवत व एकाठिकाणचे शिक्षणाचे कार्य संपले की पुढील प्रदेशात जात. चरक संप्रदायातील व्यक्ती अशा प्रकारे ज्ञानाची देवाणघेवाण करीत असे उल्लेख ग्रंथात सापडतात.

बौद्धभिक्षू धर्माच्या प्रसारासाठी देशोदेशी भ्रमण करीत. धर्मप्रसारासहच त्यांनी भारतीय चिकित्साशास्त्राचा प्रचार केला.

सध्याच्या काळात अनेक वैद्य परदेशांत जाउन ज्ञानार्जन करतात. तेही याच पद्धतिअंतर्गत समाविष्ट होते.

**क) विद्यापिठे :** गुरुकुल पद्धतीनंतर विविध शिक्षण संस्था निर्माण झाल्या. खूप मोठ्या स्तरावर यांत शिक्षणाचे कार्य चाले. हजारोविद्यार्थी यांत शिक्षणघेत अनेक शिक्षक-गुरु येथे मार्गदर्शन करीत. तक्षशिला, नालंदा, उदात्तपुरी, मिथिला, काशी, इ. विद्यापीठे त्याकाळात अस्तित्तवात होती. प्रत्यक्ष शिक्षण विद्यार्थ्यांना येथे मिळत असे. आजच्या काळातही अनेक विद्यार्थी किंवा युनिव्हर्सिटीज ज्ञानसंक्रमण करीत आहेत.

**ड) परिसंवाद :** अनेक तज्ञवैद्यांनी एकत्र येऊन चर्चा करणे मार्गदर्शन करणे म्हणजे परिसंवाद. ज्ञानसंक्रमणाचे एक महत्वाचे साधन आहे.

आयुर्वेदाचे अवतरण पृथ्वीवर होण्यासाठी हिमालयाच्या पायथ्याशी तत्कालीन ऋषितुल्य शास्त्रज्ञांनी शास्त्रीय परिसंवाद आयोजित केल्याचे उल्लेख आढळतात.

तद्विद्यसंभाषा म्हणजे परिसंवादच. शास्त्र बृंहणासाठी याचे नियमित आयोजन होत असल्याचा उल्लेख आढळते.

हल्लीच्या काळातही विविध विषयावर परिसंवादांचे आयोजन होतांना आढळते व त्यामार्फत ज्ञानसंक्रमण होतांना दिसते. संहितांमध्ये उत्तम शास्त्रीय ज्ञान व प्रत्यक्ष व्यवहारातील उपयोग विषद केले आहेत.

**II) लेखन :** ज्ञान संक्रमणाचे शाश्वत साधन म्हणजे लेखन. लेखन क्षेत्रात भूर्जपत्र - कागद ते ई लेखन आणि हस्तलिखित, छापखाना ते अत्याधुनिक मशिनद्वारे प्रिटींग अशी क्रांती होत गेली आणि ज्ञानसंक्रमण ही अधिक व्यापक आणि वेगाने होऊ लागले.

आयुर्वेदाच्या ज्ञानसंक्रमणात लेखनाचा विचार करतांना अनेक प्रकरच्या लेखनसहित्याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

**अ) संहिता लेखन :** आयुर्वेदाच्या पंरपरेत विविध संप्रदाय आढळतात. उदा. आत्रेय संप्रदाय, धन्वंतरी संप्रदाय, काश्यप संप्रदाय, इ. या संप्रदायात विशिष्ट विचार सरणीं, चिकित्सापध्दती आढळते. त्या त्या शाखेमार्फत त्या विचारानुसार ग्रंथरचना झाल्याचे आढळते. संहितांमध्ये उत्तम शास्त्रीय ज्ञान व प्रत्यक्ष व्यवहारातील उपयोग विषद केले आहेत. त्या काळात शाखांना अतिशय महत्व होते. या शाखामार्फत जे ग्रंथ रचले जात त्यांना त्या त्या शाखेचे नाव दिले जात असे. उदा. कंठशाखेमध्ये जे उपनिषद तयार झाले त्याचे नाव 'कंठोषनिषद' दिले गेले. अग्निवेश तंत्राचे संस्करण चरकाने व त्याच शाखेतील दृढबलाने केले त्याला 'चरक' हे नाव दिले. काश्यपसंहितेचे लेखन वृद्धजीवकाने केले तर त्याचे संस्करण त्याच संप्रदायातील वात्स्यायनाने केले. म्हणजे संहिता लेखन क्षेत्रात परंपरेमुळे ग्रंथाला पूर्णत्व आलेले आठळते. शास्त्रपूरण झालेले आढळते. हि परंपरा गुरुशिष्य या स्वरुपात आढळते.

नंतरच्या काळातील संहिता लेखनात वडिल-मुलगा किंवा आजोबा चालू अशी वंशपरंपराही आठळतो. उदा. अष्टांगसंग्रह कर्ता वृद्धवाग्भट व त्यांचा नातू वाग्भट द्वितीय (लघुवाग्भट) यांनी अष्टांग हृदयाची रचना केली.

शोढलनिघंटू कारांनी गदनिग्रहाची रचना केली व शोढलचा मुलगा शारंगदेव याने शारंधरसंहिता रचली, ज्यावर गदनिग्रहाचा प्रभाव आढळतो.

**ब) टीकाकार :** संहितांमधील सूत्रांचा मतितार्थ अधिक स्पष्ट करणे, सोप्या पद्धतीने विषद करण्याचे कार्य टिकाकारांनी केले.

सरळ, सुबोध भाषेत ज्ञानसंक्रमणाचे कार्य टिकाकारांनी केले. जवळ जवळ सर्व संहितांवर अनेक टीका लिहल्या गेल्या आहेत.

प्रामुख्याने संहिता रचना कालाच्या पुढील कालखंडात संहितामधील गुढा उकलून ज्ञानाचा विस्तार टीकांमार्फत झाला.

**क) अनुवाद :** आजच्या कालखंडात भिन्न-भिन्न भाषा अस्तित्वात आल्यानंतर संहिता समजणे, त्यांचा अर्थ लावणे कठीण होऊ लागले. अशावेळी विविध भाषांतील संहितांचे अनुवाद झाले व ज्ञान संक्रमणाचे कार्य पुढे चालू राहिले.

म्हणून ज्ञानसंक्रमणाचा इतिहास बघतांना या अनुवादीत ग्रंथांचा आढावा घेणेही आवश्यक ठरते.
(उदाहरणे द्यावीत का ?).

केवळ देशातच नव्हे तर परदेशी भाषां मध्येही संहितांचे अनुवाद झाले. उदा. इंग्रजी, लॅटिन, अरबी, जर्मन, तिबेटी, आणि त्यामुळे ज्ञानाचा प्रसार अधिक व्यापक झाला.

**ड) समकालीन इतर साहित्य :** प्रत्येक कालखंडातील इतर साहित्यरचनेमध्ये सुद्धा आयुर्वेदातील सूत्रे व त्यांचे विवेचन आठळते. उदा. ऋग्वेद, अथर्ववेद आदी वेद, उपनिषदे, महाभारत, रामायणादी ग्रंथ, गीता यांतही आयुर्वेदाबद्दल माहिती आढळते. बौद्धजातक ग्रंथातही आयुर्वेदासंबंधी बरीच माहिती आढळते. बौध्दधर्माचा अभ्यास करतांनाच भारतीय आरोग्य शास्त्राचाही अभ्यास केला. त्यांच्या लेखनातही त्याचे प्रतिबिंब आढळते. त्यांच्या प्रसारासहच या शास्त्राचाही प्रसार झाला.

विविध देशातून अनेक प्रवासी व्यापार, शिक्षण, पर्यटनाच्या दृष्टीने भारतात येत. त्यांनी लिहलेल्या प्रवासवर्णनातही भारतीय आरोग्यशास्त्राची माहिती आढळते. उदा. फाह्यायान, ह्युएनसंग, युवान चंग या चीनी प्रवाशांच्या प्रवासवर्णनात याचे उल्लेख आठळते. सम्राट अशोकाच्या सिमालेखातही अनेक आरोग्य योजनांची माहिती आढळतात.

आजच्या काळातही अनेक पर्यटक, भारतात आल्यावर येथील आरोग्यशास्त्रही अभ्यासतात, त्यांची माहिती घेतात व त्यांच्या लेखनात ते प्रतिबिंबित होते.

अधिकात अधिक सामान्यलोकांपर्यंत हे ज्ञान पोचण्याचे कार्य या इतर साहित्याच्या माध्यमातून झालेले आढळते.

**इ) इतर संस्कृतीमधील साहित्य :** हिंदू संस्कृती व्यतिरिक्त इतर संस्कृती म्हणजे मिस्त्र, बॅबिलोन, यूनानी अथवा ग्रीस, रोमन, फारसी, अरबी यांच्या साहित्याचा आढावा घेतल्या नंतर त्या संस्कृतीतही भारतीय औषधशास्त्राचा मोठा प्रभाव असल्याचे आढळते. अनेक सिद्धांत, वनस्पती, वैद्यकशाखा, चिकित्सा पद्धती, शस्त्रकर्मांची वर्णने यात खूपसाम्य आढळते. म्हणजे इतर संस्कृती मध्येही ज्ञानसंक्रमण मोठ्या प्रमाणावर झाल्याचे आढळते.

ज्ञानसंक्रमण प्रामुख्याने व्यापारानिमित्त आलेल्या व्यक्ती, युद्धासाठी आलेल्या राजांनी आपल्यासह त्यांच्या देशात नेलेले चिकित्सक किंवा सैनिकांनी भारतीयांशी प्रस्थापित केलेले विवाह इ. सामाजिक संबंध यामुळे झालेले आढळते.

अनेक संस्कृतीमधील साहित्यात तर केवळ भारतीय औषधशास्त्राच्या अभ्यासासाठी प्रतिनिधी पाठवल्याचेही उल्लेख आढळतात.

**फ) आयुर्वेदयीय वृत्तपत्रे व मासिके :** नंतरच्या काळात आयुर्वेदाचे सामाजिकीकरण करण्यात यांचा वाटा मोठा आहे.

✲❖✲❖✲

# ३ प्रयोजन आणि उद्दिष्टे (Aims and Objects)

आयुर्वेद पत्रिकेत प्रसिद्ध झालेल्या वैद्यक परंपरांचा अभ्यास

विशेष संदर्भ वै. वेणीमाधवशास्त्री जोशी परंपरा आणि नानल परंपरा

या शोध प्रबंधाचे मुख्य प्रयोजन म्हणजे आयुर्वेद क्षेत्रातील परंपरांचे वैशिष्ट्य जतन करणे, त्यातील विचारांचे आदान प्रदान करणे.

सदर विषय निवडतांना अनेक उद्देश समोर होते –

## १) वैद्यक परंपरांचा चिकित्सक अभ्यास करणे :

आयुर्वेदाच्या क्षेत्रात अनेक परंपरा आढळतात. त्या प्रत्येक परंपरेत स्वत:ची अशी अभ्यासपद्धती, विचारपद्धती तसेच चिकित्सापद्धती आढळते. या श्रेष्ठ परंपरां पैकीच वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी व नानल परंपरा होत. या परंपरेतील वैद्यांनी आयुर्वेद पत्रिकेत विविध विषयांवर विपुल लेखन केले आहे. हे ज्ञान केवळ आयुर्वेद पत्रिकेतच न राहता इतर सर्व चिकित्सक, विद्यार्थी, शिक्षक यांच्यापर्यंत पोहचावे या हेतूने हा अभ्यास केला आहे.

वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांनी आपल्या स्थापनेच्या काळापासून १९४८ पासून ३५ ते ४० वर्षे सातत्याने लेखन केले आहे. त्यांची कन्या वै. शुभदा पटवर्धन तर अजूनही पत्रिकेत लिहित आहेत.

याच प्रमाणे वै. म. पु. नानल यांनी १९६१ पासून लेखन केले. तर वैद्य रमेश नानल १९७५ पासून आजपर्यंत सातत्याने लेखन करीत आहेत. एक मोठा कालखंड या परंपरा आयुर्वेद पत्रिकेतून मार्गदर्शन करीत आहेत. त्यांचे अनुभव, चिकित्सापध्दती, औषधी करणपद्धती, पंचकर्म संबंधी दृष्टीकोन अशा विविध विषयांवर त्यांनी लेखन केलेले आहे. (त्यांचे हे विचार सर्वापर्यंत संकलित स्वरूपात पोहचावे, उपयोगी व्हावे या हेतूनेच हा अभ्यास केला आहे).

## २) वैद्यक परंपरेतील प्रयोग, संशोधन, अनुसारण यांचा मागोवा घेणे :

आयुर्वेद पत्रिकेत केलेल्या लेखनात विविध विषयांवर लेखन केलेले आढळते. यात चिकित्सा, औषधीकरण इ. क्षेत्रात केलेले विविध प्रयोग, संशोधन अनेक नवीन कल्पना या बद्दलही लेखन आहे. परंपरेत आढळणारे हे वैशिष्ट्यपूर्ण प्रयोग, संशोधनच त्या परंपरेला एका विशिष्ट परंपरेचा दर्जा देत असतात. त्यामुळे या सर्व प्रयोगांचा अभ्यास करणे, त्यांचा मागोवा घेणे हा उद्देश ही या अभ्यासामागे आहेच.

## ३) वैद्यक परंपरांनी वैद्यकीय ज्ञान संक्रमणासाठी केलेल्या प्रयोगांचा अभ्यास करणे :

परंपरा चालू राहणे म्हणजे ज्ञानसंक्रमण घडत राहणे. लेखन हे ज्ञान संक्रमणाचे एक प्रमुख साधन आहे. आयुर्वेद पत्रिका गेली ६० वर्षे सातत्याने प्रकाशित होत आहे. या सर्व लेखकांचे लेख म्हणजे आयुर्वेद पत्रिकेची 'अमूल्य ठेव' आहे. कोणतेही लेखन हे चिरकाल, शाश्वत आहे. आणि आजच्या वैद्यांना उपयुक्त ठरणारे 'आप्त'

आहे. (त्यांचे हे विचार..). त्यामुळे या लेखनाचा अभ्यास करणे हा या शोधाचा एक भाग आहेच परंतु त्याच बरोबर इतर समकालीन वैद्यांशी, त्या परंपरेशी संबंधित वैद्य किंवा इतर वैद्यांशी चर्चा करणे, त्याची माहिती घेणे ही या शोधाचा एक भाग आहे. कारण ज्ञानसंक्रमण अनेक पद्धतीने होत असते.

१) गुरु शिष्य परंपरा,
२) वांशिक परंपरा,
३) ग्रांथिक लेखन,
४) इतर नियतकालिकात केलेले लेखन,
५) वृत्तपत्रात केलेले लेखन,
६) विविध परिसंवादात केलेले भाषण, व्याख्याने, इ.

एखाद्या परंपरेचे परिपूर्ण आकलन होण्यासाठी सर्वांगिण अभ्यास होण्यासाठी या ज्ञानसंक्रमणाच्या इतर साधनांचा अभ्यास होणेही आवश्यक आहे.

## ४) वैद्यक परंपरेचे संचित पुढे नेण्यासाठी उपक्रम सुचविणे :

या परंपरेतील वैद्यांनी विविध विषयांवर विपुल लेखन केले आहे. त्यांचे हे विचार केवळ आयुर्वेद पत्रिकेतच न राहता इतर सर्व चिकित्सक विद्यार्थी, शिक्षक यांच्यापर्यंत पोहचावे, या हेतूने हा अभ्यास केला आहे.

या परंपरांच्या अभ्यासामुळे आयुर्वेदातील एका कालखंडाचा इतिहासही उलगडला जाणार आहे. या अनुषंगाने आयुर्वेदात झालेली स्थित्यंतरे, समकालीन वैद्यावर त्याचा पडलेला प्रभाव, परंपरांमध्ये आपसात झालेले विचारांचे आदानप्रदान, याचेही ज्ञान होणार आहे. एक मोठे ज्ञानाचा संशोधक पद्धतीने अभ्यास करून ‘उपकमोपसंहारो’ या पद्धतीने मांडणी करून शोधप्रबंध सादर होणार आहे. त्यामुळे शोधकर्त्याप्रमाणेच इतर वैद्यांनाही हे ज्ञान उपयुक्त, मार्गदर्शक ठरणार आहे.

हा अभ्यास करतांना त्या परंपरेतील वैद्य तसेच त्यांचे गुरू, शिष्य, समकालीन वैद्याच्या चर्चा यांच्या लेखनाचा ही आढावा घेतला गेला आहे.

शोधप्रबंधातील मांडणी केवळ संकलन रूपातील नसून त्याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्नही येथे केला आहे. त्याचबरोबर हे पंरपरेतील संचित पुढे नेण्यासाठी काही उपक्रमही सुचविले आहेत. त्यामुळे एकुणच या अभ्यासाचा उपयोग, विद्यार्थी, व्यावसायिक, शिक्षक आणि औषधीकरणक्षेत्र या सर्वांनाच होईल अशी अपेक्षा आहे.

✲❖✲❖✲

# ४ अभ्यासाची साधने व संशोधन पद्धती (Materials and Methods)

## अभ्यासाची साधने

१) सदर शोधप्रबंधासाठी दोन्ही परंपरेतील लेखकांच्या आयुर्वेद पत्रिकेतील लेखांचा मुख्यत: अभ्यास केला गेला.

२) या लेखकांनी इतर ही समकालीन नियतकालिकां मधून लेखन केले आहे. तसेच काही स्वतंत्र लेखन, ग्रंथनिर्मिती ही केली आहे.

३) त्यांचा ही अभ्यास केला गेला. त्यांच्या काही शिष्यांची मुलाखत घेउन प्रत्यक्ष चर्चा केली.

## वै.वेणीमाधवशास्त्री जोशी परंपरा –

वै. वेणीमाधवशास्त्रींनी आयुर्वेदाचा सखोल अभ्यास करून त्यावर चिंतन, मनन करून अनेक विचार मांडले आहेत. आयुर्वेदीय संकल्पना सोप्या करून बहुतांशी विचार लेखबद्ध केले आहेत.

**कालखंड :** आयुर्वेद पत्रिकेच्या सुरवातीपासून १९४८ पासून ते १९८४–८६ पर्यंत त्यांनी लेखन केले. जवळ जवळ ४० वर्षांच्या एका मोठ्या कालखंडात एका शास्त्रीय मासिकात हे लेखन आहे. त्यांच्या कन्या व शिष्य वै. शुभदाताई पटवर्धन यांनी प्रथम वै. वेणीमाधवशास्त्रींसह लेखन करून स्वतंत्रही लेखन केले आहे. १९७७ पासून ते आजपर्यंत त्या लेखन करीत आहेत. सदर अभ्यासाठी १९९९ पर्यंतच्या लेखनाचा अभ्यास केला. या परंपरेतील आयुर्वेद पत्रिकेतील एकुण ९७ लेखाचा अभ्यास केला.

## लेखांचे वर्गिकरण :

**अ) लेखकांनुसार वर्गिकरण**

* वै. वेणीमाधव शास्त्री ८६ लेख
* वै. शुभदाताई पटवर्धन ११ लेख

**ब) विषयांनुसार लेखांचे वर्गिकरण :**

* द्रव्यगुण/वनस्पती विषयक – १४ लेख
* व्याधी विषयक – ३५ लेख
* अनुभूत चिकित्सा – ४ लेख
* सिद्धांत विषयक – १६ लेख
* पंचकर्म – २ लेख
* संशोधन – ४ लेख
* इतर – ७ लेख
* स्वस्थवृत्त – ४ लेख

**क) लेखमाला स्वरूपात लेखन :**

* ज्वर – ११ लेख
* टायफॉईड – ३ लेख
* आंबा – ६ लेख
* घर्षण चिकित्सा – ५ लेख
* प्रीती – २ लेख
* अभयाहरितकी – २ लेख
* वनस्पती गुणकर्म अभ्यासाचे मुद्दे – २ लेख
* पांढरे कोड – २ लेख
* आयुर्वेद औषधी यासंशाधन – ३ लेख

## वै. नानल परंपरा

**कालखंड :** आयुर्वेद पत्रिकेत १९६१ पासून नानल परंपरेतील लेखन आढळते. वै.म.पु. नानल यांनी १९६१ मध्ये प्रथम लेखन केले. नंतर वै.भा.पु. नानल वै.विलास नानल यांचेही लेखन आढळते. १९७७ पासून वै.र.म. नानल यांनी लेखन सुरू केले. ते आजही लिहीत आहेत. त्यांचे चिरंजीव वै. सत्यव्रत नानलही लिहीत आहेत. सदर अभ्यासासाठी **जुलै १६६१ ते डिसें. २००३** पर्यंतच्या कालखंडातील लेखांचा अभ्यास केला. नानल परंपरेतील आयुर्वेद पत्रिकेत सुमारे ११८ लेख आहेत.

## लेखांचे वर्गिकरण

**अ) लेखकांनुसार वर्गिकरण :**

* वै.म.पु. नानल – १० लेख
* वै.भा.पु.नानल – ४ लेख
* वै. विलास नानल – १ लेख
* वै. रमेश नानल – १०३ लेख

**ब) विषयांनुसार वर्गिकरण :**

* अनुभविक चिकित्सा – ६ लेख
* द्रव्यगुण विषयक – १० लेख
* सैद्धांतिक – १३ लेख
* स्वस्थवृत्त – ११ लेख
* निदानपंचक विषयक – ४५ लेख
* इतर – २८ लेख
* संशोधन – १ लेख
* पंचकर्म – २ लेख

**क) लेखमाला**

**वै.म.पु. नानल**

* अनुभविक चिकित्सा – १० लेख

**वै.र.म.नानल**

| | | | |
|---|---|---|---|
| ✳ | आयुर्वेदीय अध्यापन पद्धती | – | ६ लेख |
| ✳ | आम्लपित्त हेतुस्कंध | – | ३ लेख |
| ✳ | आरोग्य चाचणी विनामूल्य सुलभ निर्धोक पद्धती | – | २ लेख |
| ✳ | नवीन रोगोंका विचार | – | २ लेख |
| ✳ | प्रभावी औषधे व आत्ययिक चिकित्सा | – | २ लेख |

सदर परंपरेतील लेखकांच्या लेखनाच आयुर्वेदातील उपविभागानुसार वर्गिकरण केले. उदा.

१) सैद्धांतिक लेखन

२) द्रव्यगुणविषयक लेखन

३) निदान चिकित्सा विषयक लेखन

४) पंचकर्म विषयक लेखन

५) औषधीकल्प विषयक लेखन

६) अनुभविक लेखन

७) संशोधन विषयक लेखन

८) इतर लेखन – व्यक्ती विषयक, शिक्षण विषयक, प्रबोधन विषयक इ.

**सदरविषयांचे पुढील मुद्यांनुसार विवेचन केले.**

१) लेखन शास्त्रपूत आहे की मन:पूत

२) लेखनात ग्रंथसंदर्भ आहेत का अनुभविक लेखन आहे ?

३) लेखनात सुसूत्रता आहे का ? उदा. लेखमाला आहे का ?

४) कोणत्या प्रकारचे लेखन अधिक आहे ? ग्रांथिक, अनुभविक, औषधीकरण ?

५) लेखनातून चिकित्सेची नेमकी दृष्टी प्रतिबिंबित होते का ?

६) विशिष्ट कल्प किंवा अप्रचलित औषधी निर्माण आहे का ?

७) औषधीकरणाची नेमकी/वैशिष्ट्यपूर्ण पद्धत.

८) औषधीमात्रा देण्याची पद्धत.

९) औषधी सेवन काल, पथ्यापथ्य, विशिष्ट पथ्य पद्धती.

१०) चिकित्सा पद्धतीत विशिष्ट परंपरेचे पालन किंवा परंपरांचा समन्वय दिसतो का ?

११) लेखनातून विशिष्ट संकलन प्रतिबिंबित असल्यास त्याचे निरीक्षण.

१२) विशिष्ट रोगांवरील संशोधनात्मक उपचार आहे का ?

१३) अनुक्त व्याधी / पदार्थां विषयी उल्लेख आहे का ?

१४) लेखनातून विशेष विचार प्रकट झाले आहेत का ?

१५) विशिष्ट संशोधन

१६) लेखनामुळे शास्त्रास मिळालेले योगदान ?

१७) लेखनातील सूत्र पुढील पिढीत आढळतात का ? हे विचार संक्रमित होतांना बदल आढळतात का ?

## परंपरेतील विचार धारा

### वेणी माधवशास्त्री परंपरा

#### वनस्पती शास्त्र संदर्भात

वेणीमाधवशास्त्री यांनी वनस्पती गुणकर्म या विषयावर विपुल लेखन केले आहे.

वनस्पतींच्या गुणकर्मांच्या अभ्यासाची आवश्यकता का आहे, त्यांचा अभ्यास कसा करावा? कोणते मुद्दे विचारात घ्यावे याचे दिग्दर्शन केले आहे. आणि उदाहरणा दाखल काही वनस्पतींचे विवेचन आहे. त्यात विशेष करून अभया म्हणजे (हरीतकी) आणि आंबा या दोन वनस्पतींचा उल्लेख करावा लागेल. हरीतकीच्या संदर्भात दोन विस्तृत लेख आहेत तर आंबा या वनस्पतीवर सहा लेख आहेत. ग्रंथात किंवा इतर वनस्पती विज्ञानाच्या पुस्तकांमध्ये जिथे आंब्याबद्दल अतिशय त्रोटक माहिती आढळते तिथे वेणीमाधवांनी सहा विस्तृत लेख लिहिले आहेत. यावरुनच त्यांच्या विस्तृत ज्ञान कक्षेची याची कल्पना येते.

वनस्पतींचा अभ्यास कसा करावा याबद्दल १९५६ मध्ये अध्यापक चर्चा परिषदेत सर्व अध्यापकांसाठी वेणीमाधवशास्त्रींनी माहितीपर व्याख्याने दिलेली होती. त्या व्याख्यानांचा सारांशही आयुर्वेद पत्रिकेत संकलनात्मक लेख स्वरूपात प्रसिध्द झाला आहे. ज्यात प्रत्यक्ष वनस्पतींचे उदाहरण देऊन अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन केले होते. द्राक्षा व पिंपळी हे दोन लेख म्हणजे त्यांच्या व्याख्यानांचे विवेचन होय.

''वनस्पतींचा अभ्यास आवश्यक का ?'' याचे महत्त्व सांगतांना ते म्हणतात की मानव हाच चिकित्सेचे अधिकरण आहे, तर सर्व सृष्टी त्याच्या जीवनाचे उपकरण आहे. त्याच्या आरोग्य अनारोग्याचे उपकरण आहे.

सर्व उपकरणांची गुणकर्मे ग्रंथात वर्णित आहेत ती मानव शरीराच्या सापेक्ष आहेत. तसेच येथे तरूण मानव अधिकरण म्हणून गृहीत आहे. असे ते म्हणतात.

रस व वीर्याबद्दलची संकल्पना किंवा स्पष्टीकरण हे नवीन आहे. ते म्हणतात - शरीरात द्रव्य गेल्यानंतर पचनानंतर रस हा गुण बदलतो. पण जे गुण पचनानंतरही बदलत नाहीत ते म्हणजे वीर्य. (सं. - आ.प. जाने. १९५६; वनस्पती गुणकर्म विज्ञानाचे मुद्दे)

कोणत्याही द्रव्याचे घटक महाभूत ओळखतांना त्याचे रस, वीर्य, विपकादी गुण; दीपन, पाचन, लेखनादी कर्मे यांची कारक महाभूते कोणती, हे पहावे. द्रव्याच्या बाल, तरूण, पक्यावस्थेनुसार ही महाभूते बदलतात. संस्कारीत द्रव्य असल्यास त्यातही काय बदल झाला ते पहावे.

उपकरण द्रव्यांवर भूमि,जल,वायू, काल व चंद्रनक्षत्रे प्रकाश, अंध:कार यांचे काय परिणाम होतात ते लक्षात घेणे आवश्यक आहे.

आजच्या काळात जेव्हा वेगवेगळया ठिकाणी वनस्पती लागवड केली जाते; हिमालयातील वनस्पती, अरब स्थानातील वनस्पती यांची एकाच ठिकाणी लागवड केली जाते. तेव्हा त्यांच्या गुणकर्मात काही बदल होतो का हे बघणे आवश्यक वाटते.

कोणत्याही वनस्पतींचा अभ्यास करतांना कोणते मुद्दे विचारात घ्यावे याचे मार्गदर्शन करतांना ५० मुद्दयांचे वर्णन केले आहे. ते जसेच्या तसे बघणे उपयुक्त ठरेल. (सं. - आ.प. १ फेब्रु. ५६ पेज ४७२-४७३)

यांतही अनेक मुद्दयांमध्ये नवीन विचार आढळतो. उदा. -

१) वनस्पतीचे फळ व फळाव्यतिरिक्त त्वचादी अवयव मानवी अवयवांशी समानगुणभूयिष्ठ आहेत की विपरीत गुणी.

२) उपयुक्त होणारे वनस्पतीचे त्वक् मांसादी धातू त्या वनस्पतीचे दृष्टीने सार आहेत की असार/मध्यमसार.

३) वनस्पतीची वाढ होतांना त्यात एकाच रसाचा परिपोष होत होता की अनेक रसांचा? त्यांचा क्रम, न्यूनाधिक्याचा विचार, इ.

४) यामध्येच अग्निकार्य वर्णन करतांना अग्नीवर एखाद्या द्रव्यांचे कार्य कसे होते याचे सोदाहरण स्पष्टीकरण देतात. उदा. हिंगू, चित्रक – साक्षात कार्यकारी; पेया, विलेपी – परंपरेने कार्यकारी; लंघन – साक्षात कार्यकारी; व्यायाम – परंपरेने दीपन, पाचन कार्यकारी.

५) त्याचप्रमाणे रसायन कार्य करते म्हणजे द्रव्य नेमके कसे काम करते. उदा. धात्वाग्नि वाढवून, धात्वंश पुरवून, स्त्रोतोरोध नाशन करुन, धातुबल वाढवून.

६) शुध्दी केल्याने (रसोन, बचनाग इ.) काय होते? शोधन होते की तद् द्रव्यगुण संस्कार होतात (सं. – आ.प. फेब्रु. ५६; वनस्पती विज्ञानाचे मुद्दे).

वनस्पतींच्या गुणकर्माचा विस्तार कसा करावा यासाठी द्राक्षा व पिंपळी यांचे उदाहरण दिले आहे. द्राक्षा या द्रव्याचे वर्णन करतांना ते म्हणतात की निघंटूत द्रव्यांचे गुणकर्म दिलेले असले तरी ते सूत्ररूपाने असतात, त्यांचा विस्तार आपण करावा.

जसे. द्राक्षाचे सप्तधातू – फळाची साल ही त्वचा; बुळबुळीत गर – रस,रक्त, मांस; बी – अस्थि; बीच्या आत – मज्जा; या प्रमाणे

द्राक्षा वृष्य कशी ? तर खलेकपोत न्यायाने वृष्य. धातूंची जनन शक्ती वाढवून वृष्य कार्यकर्ते.

द्राक्षाशीत असूनही वातशामक कशी ? तर शीत व स्निग्ध परंपरेने वातशमन. (तीळ – उष्ण स्निग्धाने साक्षात वातशमन).

स्वरभेद जर अतिश्रमजन्य अती उच्च स्वरात बोलण्याने असेल तर त्याचा नाश द्राक्षा करेल. परंतु त्याने मेदोवृध्दीजन्य स्वरभेद नाहीसा होणार नाही. (सं. आ.प. १ ऑगस्ट ५६; द्राक्षा द्रव्यांच्या गुणकर्माचा अभ्यास).

याच प्रमाणे 'पिंपळी' च्या लेखात पिंपळी सर कशी तर ती आंत्र व पुरीषाचे ठिकाणी क्लेद निर्माण करते, त्यामुळे मल क्लिन्न होऊन सहज सुटतो. कासतही याच गुणाने पिंपळी उपयुक्त ठरते.

१९५६ मधील 'पिंपळी' या लेखातच द्रव्यगुण शिकवण्याचे २० मुद्दे हरीतकीला लावून दाखवले आहेत. पुढे १९७५ मध्ये हरितकीवर दोन विस्तृत लेख सौ. शुभदा पटवर्धन व पुष्पा नम्र यांचे सहयोगाने लिहीलेले आहेत. हे दोन्ही लेख म्हणजे वनस्पतीच्या अभ्यासाचा उत्कृष्ट नमूना आहे. आयुर्वेदाची विचारसरणी किती विस्तारशः व प्रत्यक्षपर अभ्यासावी हे सांगणारा लेख. या लेखाच्या माध्यमातून द्रव्यगुण शास्त्रातील अनेक अस्पष्ट कल्पनांचे विस्तृत विवेचन केलेले आढळते. उदा. रस कल्पना, वीर्य, समानप्रत्ययारब्ध, विचित्र प्रत्ययारब्ध, इ. वनस्पतींच्या रसवीर्य विपाकादींची निश्चिती करतांना आद्य ऋषींनी कसा विचार केला असेल याची स्पष्ट कल्पना यामुळे मिळते.

हरितकी बद्दल ते म्हणतात की अभया पंचरसात्मक आहे. यात

१) रसविचार

✳ कषाय रस उत्कट आहे. कारण हिरडा तुरट लागतो. कफनाशन हे तुरट रसाचे कार्यही तोंडात दिसते. पण शरीरात पचनानंतर हा रस टिकत नाही.

● कारण कषायरसाचा विपाक कटु पण हिरडा मधूर विपाकी.

● कषाय रस गुरू व शीत पण हिरडा लघु व उष्ण.

● कषाय रस रूक्ष म्हणून वातकर पण हिरडा वातानुलोमी.

● कषाय रस स्तंभन पण हिरडा सारक व रेचक.

यावरून कषायरस कार्याक्षम नाही. प्रमाणाने अधिक असला तरी अकार्यकारी आहे.

✳ अम्ल रस – कषाय रसाच्या खालोखाल व्यक्त होणारा. कषायांच्या मानाने अधिक कार्य दिसते. उदा. बुध्दींद्रियबलप्रद, नेत्र्य, मेध्य, स्मृतिवर्धक. असे हिरड्याचे गुणधर्म आहेत. चरकाचार्यांनी अम्लरसाचे कार्य मनोबोधर्याति, इंद्रियाणि दृढीकरोति, बलंवर्धयामि.

✳ मधुररस – आमाशयात व्यक्त होतो. किंवा तोंडात पाण्याशी मिसळल्यास व्यक्ती होतो. तुरट रसापेक्षा कमी असला तरी बलवान आहे. पचनात नाहीसा होत नाही. विपाकही मधूर होतो. म्हणून हरितकीचा आत्मरस मधुर, मधुरपाक व उष्णवीर्य आहे.

तिक्तरस – वातवर्धन नाही पण पित्तशमन करतो.

कटूरस – पित्तवर्धन नाही पण कफनाशन.

पाच रसाची द्रव्ये मिश्र करून घेतल्यास बाधक होतात. हरीतकी पंचरसात्मक असली तरी शरीरास विरूध्द/त्रासदायक नाही कारण त्या रसांचा जो कारण तो त्या झाडाचा आहार रस एकच. ते परस्परांना सहकार्य करून मर्यादेत कार्य करतात.

हिरडा लवणवर्जित पंचरसात्मक आहे. म्हणून सैधवासह घेतल्यास षड्रसाचे फायदे मिळतात. हा श्रेष्ठयोग ठरतो.

२) विपाक – विपाकाचे कार्य ग्रहणीनंतर पक्काशयापासून सुरू होते. असेमत ते मांडतात. हरीतकीचा वीपाकमधुर आहे. म्हणजे पृथ्वी + आप, अधोगामिच भयिष्ठं भूमितोय गुणाधिकं । म्हणून अपानशमन, अपान स्थानांतील दोषांचे अनुलामन म्हणूनच कषायरस प्रधान असूनही मधुर विपाकाने वृष्य आहे.

३) वीर्य – वीर्याचे अणू शरीराच्या संपर्कात येताच कार्यकारी होतात व शरीरातून जाईपर्यंत कार्य करतात. कशी व्याख्या ते करतात. हरितकीचे वीर्य उष्ण.

४) धातू गामित्व – हरितकी मांसगामी कारण हरितकीचे जे अंग वापरतो ते मांसप्रधान.

५) प्रभाव – रेचक.

उष्ण, दीपक, पाचक म्हणून ग्राही हवी. पण ती रेचक आहे. हे कार्य प्रभावानेच होते.

६) प्रत्यय = कारण – द्रव्यादी आरंभक कारण महाभूते व रसादी गुणांचे महाभूत एकच असेल तर समानप्रत्ययारब्ध. उदा. गहू, दूध–वातशमन, गहू, दूध यांचे आरंभक महाभूत पृथ्वी + आप, मधुररस, गुरूगुणांचे महाभूतही पृथ्वी + आप.

आरंभक महाभूत व रसादी गुणांचे महाभूत भिन्न असेल तर विचित्र प्रत्ययारब्ध.

उदा. जव

● वातकर – आरंभक महाभूत वायू;

● रसवीर्य – मधुर गुरू; महाभूत – पृथ्वी + आप.

असमान गुणाची महाभूते एकत्र येऊन परस्पर विपरीत गुणकर्मांची उत्पत्ती करतात.

त्याच प्रमाणे 'आंबा' या विषयावर १९७८ मध्ये ६ लेखांची लेखमाला आहे. त्यात आंबा, अपक्व आम्र, क्षुद्राम्र (रान आंबा) पक्वाम्राचे असे लेख आहेत. उदा. यातील वैशिष्ट्य म्हणजे रस विचार. संयोगज रस म्हणजे लाळेत संयोग झाल्यानंतर व निर्माण झालेला रस; बीज, मूल, त्वक्, पत्र, पुष्प, कोय यांचा रस असा विस्तृत विचार केलेला आढळतो. उदा. बी, मूल, त्वक्, पत्र या सर्वांमध्ये कषायरस प्रधान आहे. कोयही कषाय पण बाठ किंवा कोयीतील कषायरस उत्तम प्रतीचा कारण तो उत्तरोत्तर पचन होऊन तयार झालेला असतो.

बीज, मूळ, पाने, फुले या प्रत्येकाचा रसविचार, त्याचे दोषकार्य, वीर्य, वीपाक यांचे विवेचन या लेखांतून केले आहे. हे मांडतांना काही संकल्पनांचे विस्तृत विवेचन केलेले आढळते. उदा.रसाचे कार्य पक्वाशयापर्यंत होते. त्यापुढे म्हणजे पक्याशय, पुरीषाशय, गुद व सभोवतालचे शुक्राशय, मुत्राशय यांवर विपाकाचे कार्य होते.

अपक्व आम्राच्या बाबतीत आम्लरसावर पचन संस्कार होऊन आम्लविपाक निर्मिती झाल्याने हे आम्लत्व आम्लरसापेक्षा उच्चप्रतीचे होय असा विचार ते मांडतात. या आम्लविपाकाने गुद, पक्वाशय, मूत्राशय येथील वातवृध्दी नाहिशी होईल. पण आम्लविपाक शुक्रनाशक असल्याने शुक्रनाशन हे कार्य सुद्धा होईल.

झाडाची उत्पत्ती होतांना तेथील ऋतु, बीज, वातावरण, भूमि यांच्या महाभूताचा विचारही तसेच या प्रत्येकाचे प्रत्ययारब्धाचा विचार हीं आवश्यक असल्याचे ते म्हणतात.

उदा. वातावरण प्रत्यय – समुद्राजवळील हवा (वातावरण) लवण. पण तेथील आंबा मधुर आणि म्हणून वातावरणाच्या दृष्टीने आंबा विचित्र प्रत्ययारब्ध द्रव्य ठरते.

बालाम्राचे शरीरावरील कार्य स्पष्ट करतांना ते सांगतात की यातील रसादी गुण, दोष यांचा परिपोष चांगला झालेला नसतो, ते कनिष्ट दर्जाचे असतात. म्हणून ते शरीराला गुणकर न होता धातूप्रदूषक होऊन दोषवर्धन करतात. म्हणून सर्वच बालफल दोषवर्धक होतात. अपवाद– बालबिल्वफल.

बालफळे काढून ठेवल्यास ती सडू लागतात. पण तीच जर योग्य वेळी काढली तर पिकू लागतात. फळ पिकतांना त्यातील स्नेहाचा अग्नि फळातील घटकांचे पाचन करून ते घटक उच्च दर्जाचे बनवित असतो. आणि मग ते घटक मानवी शरीरात उच्च प्रतीचे होतात.

बालफळात स्वघटकांचे पाचन अग्निव्दारा करण्याचे सामर्थ्य निर्माण झालेले नसते. बाह्यनिसर्गातीलच अग्नि, जल, वायू यांचे आक्रमण होऊन फळाचा अग्नि नष्ट होतो आणि फळ सडते. (सं. – आ.प. जाने. ते जुलै ७८; आंबा).

आयुर्वेदात वनस्पती ओळखणे किवा तिचे वर्णन ग्रंथात आहे का? हे तपासण्याची वेळ अनेकदा येते. हे करत असतांना संभ्रमावस्थाही असते. अशावेळी काय करावे याचे दिशादर्शनच त्यांनी केले आहे. (सं. – आ.प. डिसें. ५३; ही नील ज्योती आहे)

पारद संस्कारावर काम चालू असतांना तृणज्योती वनस्पतीचा शोध चालू होता. अशावेळी मिळालेली वनस्पती

कोणती आहे. हे ग्रंथातील प्रत्येक शब्दाचा अर्थ स्पष्ट करून तपासले व त्यामुळे हे सिध्द झाले की ती वनस्पती नीलज्योती आहे. एकाच गटातील औषधी शोधतांना या पध्दतीचे मार्गदर्शनउपयोगी ठरते. उदा. तृणज्योती– रात्री चमकणारी वनस्पती. याच गटातील इतर वनस्पती म्हणजे नीलज्योती, उर्वशी, हेमवल्लिका.

वनस्पती नाम निश्चिती करतांना केवळ बाह्य वर्णनच नव्हे तर तिचे रस, वीर्य, विपाक पडताळणे, त्यासाठी व्यक्तींवर प्रयोग करून अनुभव घेणे. याप्रकारे पूर्ण तपासणी करूनच अंतिम निर्णय घेणे, हे विशेषत्व लक्षात येते. (सं. – आ.प. डिसें. ७३; ही नील ज्योती आहे)

''वनस्पतीसत्व लोक'' ही एक नवीन संकल्पना त्यांनी मांडली आहे. केवळ वनस्पतीज आहारावरच राहणाऱ्या व्यक्ती या वनस्पती प्रमाणेच हालचाल न करणाऱ्याच,एकाच ठिकाणी खूप काळ बसणाऱ्या केवळ आहार पानाकडे त्यांचे लक्ष असते. बुध्दीचा उहापोह करणे, विचार करणे, स्मरणशक्ती चांगली असणे ही अंगे त्यांना नसतात. धर्म, अर्थ, कामादी कोणतीच महत्त्वाकांक्षा नसते, सत्वगुण अल्प असतो. आणि या वनस्पतीसत्व लोकांमध्ये माती खाण्याची प्रवृत्ती असते. त्यांच्यात रस व अस्थि असारता व क्षीणता आढळते. (सं. – आ.प. ऑक्टो. ७०; भाजलेल्या पांढऱ्या मातीचे गुण)

एकंदर वनस्पचतींचा विचार करतांना वै. वेणीमाधव मुख्यत: वनस्पतीच्या प्रत्येक अंगाचा पर्ण, पुष्प, फल, त्वक्, मूल इ. चा रसविचार, विपाक विचार, त्यांचे प्रत्ययारब्ध व यानुसार दोष, धातू, मलांवर होणारा परिणाम असा विचार करतांना आढळतात. यावरूनच त्यांची गुण,कर्मे निश्चित होतात.

औषधी योजना करतांना ही विचारसरणी अधिक उपयुक्त आहे. यामुळे वनस्पतीचे नेमके कोणते अंग वापरावे, कोणत्या अवस्थेत वापरावे याची स्पष्ट कल्पना येते, औषध चपखल लागू पडू शकते.

वनस्पतीचा एखादा भाग उपलब्ध नसेल तर त्याऐवजी पर्याय म्हणून कोणते अंग वापरावे याचाही विचार यामुळे करता येऊ शकतो.

तसेच नवीन/अनुक्त वनस्पती किंवा द्रव्यांचे गुणकर्म निश्चिती करतांना हे मार्गदर्शन उपयुक्त ठरू शकेल.

अव्यक्त वनस्पतीचे गुणधर्म ठरवितांना पिंडी ते ब्रम्हांडी – निसर्गात ती वनस्पती कसे कार्य करते यावरून शरीरातील कार्याचा विचार त्यांनी केलेला दिसतो.

पानफुटी या अनुक्त द्रव्यचे गुणकर्म व त्यामागचा विचार त्यांनी येथे दिलेला आहे.

पानफुटी हे वनस्पतीचे पान आहे. पाने म्हणजे वनस्पतीचे फुफ्फुसच. पानफुटीची पाने जाड असतात. स्वत:चे पोषक धातूही ती संचित करातात आणि ती आम्लरसाची आहेत. आम्लरस हृद्य म्हणून पानफुटी हृद्बल्य म्हणून उपयुक्त

पानफुटीच्या पानांत जनन सामर्थ्य आहे. कारण केवळ पान लावून नवीन वनस्पती निर्माण होते. म्हणूनच येथेही हृदय व फुफ्फुसात जी हानी झाली असेल ती भरून काढून नवीन घटक तयार करण्याची क्षमता त्यात आहे. (सं. – आ.प. फेब्रु. ८०; असाध्य हृद्रोगी)

या लेखनात शास्त्रीय कल्पनांचा विस्तार चांगल्या प्रकारे केलेला आढळतो. त्या संकल्पना स्पष्ट समजतात. विद्यार्थ्यांसाठी तर हा अभ्यास वनस्पतीशास्त्राची गोडी वाढवण्यासाठी, या विषयाचे आयुर्वेदातील महत्त्व पटण्यासाठी, व अभ्यास सुलभ होउन त्याला एक उत्तम दिशा मिळण्यासाठी निश्चितच होईल.

## औषधी कल्प आणि अनुभूत योग

## अ) औषधी कल्प

वैद्य वायवारू म्हणजे वेणीमाधवशास्त्रींचे गुरू. धातूपाचक काढे त्यांच्या वापरात होते. वेणीमाधव शास्त्रीजी सुध्दा धातूपाचक योग वापरीत असत.

' ज्वरपंचक कषाय' वापरण्यामागची भूमिका ग्रंथातील संदर्भासह त्यांनी वर्णन केली आहे. त्याचप्रमाणे औषधी योजना काल, मात्रा यांचे ही विवेचन केले आहे.

ते म्हणतात की या पंचक कषायातील सर्व द्रव्ये कडू रसाची, दोषांचे पाचन व आमाचे पाचन करणारी, अग्निदीपन करणारी आहेत. धातूगत दोषांचे पाचन आणि धात्वग्नी प्रदीपन करण्याचे सामर्थ्य या द्रव्यांमध्ये असल्याने ती धातूगत ज्वरात - विषमज्वरांत उपयुक्त ठरतात.

✳ या योगातील औषधीद्रव्यांचे प्रमाण काय असावे हा प्रश्न ही नेहमी पडतो. मांसगत ज्वराचे विवेचन करतांना शास्त्रीजींनी **लक्षणानुसार विशिष्ट द्रव्याचे प्रमाण ठरवावे** असा उल्लेख केला आहे. उदा. मांसगत ज्वरात तृष्णा हे लक्षण प्रबळ असेल तर पटोल, निंब, त्रिफळा, मनुका, मुस्ता, कुडा या द्रव्यांपैकी मनुकांचे प्रमाण दुप्पट करावे. तर तृष्णा व पिंडिकोद्वेष्टन हे लक्षण प्रबळ असेल तर मनुका व त्रिफळा ही द्रव्ये दुप्पट प्रमाणात घ्यावीत. **म्हणजेच इतर वेळी ही द्रव्ये समप्रमाणात घ्यावीत असा अर्थ होतो.**

✳ त्याचप्रमाणे **लक्षणानुसार हव्या त्याच औषधांचा वापरही करू शकतो.** उदा. ओकारी अधिक असेल तर त्रिफळा व मनुका एकत्र कुटुन त्यांच्या गोळ्या चघळाव्या असा उल्लेख आढळतो.

✳ या धातूयोगांचे **केवळ काढेच नाहीत तर इतरही औषधी कल्पना करून वापरता येतात,** असा ही उल्लेख आढळतो. मांसगत ज्वरात त्यांनी याच्या गोळ्या करून वापराव्यात असा उल्लेख आहे तर अस्थिगत ज्वरात चंदन व सुंठ यांचा अवलेह करून वापरावा असा उल्लेख आहे. अवलेह करतांना त्यात कापूर घालावा असाही उल्लेख आढळतो. मज्जापाचक ज्वरातही अवलेह करून वापरावा असा उल्लेख आढळतो.

✳ व्याधी लक्षणे व व्याधी स्थानानुसार औषधी कालविचार करण्यास त्यांनी सांगितला आहे.

✳ वेणीमाधव शास्त्रींनी मेदोगत ज्वर व अस्थिगत ज्वरातील द्रव्ये समान केली आहेत. काडेचिरायत, गुळवेल, चंदन व सुंठ. तर मज्जागत ज्वर त्यांनी वेगळा धरला आहे. त्यात उपयुक्त द्रव्ये म्हणजे आवळा, मुस्ता, गुळवेल, मध. काही परंपरांमध्ये अस्थि व मज्जागत यांमध्ये समान द्रव्ये वापरण्याचा प्रघात आढळतो. पण शास्त्रीजी मेदोगत व अस्थिगत ज्वरासाठी समान द्रव्ये वापरीत असे आढळते.

✳ चरकादींनी वर्णन न केलेल्या शुक्रगत ज्वराचाही ते उल्लेख करतात.

हे पंचकषाय अग्निदीपन, दोषपाचन व मलशोधन असल्याने धातुदुष्टीची लक्षणे असतांना वापरता येतात असाही उल्लेख ते करतात. (सं. - मधुजीवन जुलै २००३; ज्वरपंचक कषाय)

✒ धातुपाचक कषाय ही वैद्य वायवारूंनी वापरलेली नवीन संकल्पना. याच संकल्पनेत वेणीमाधवशास्त्रींनी अजून भर घालून त्यातील मात्रा, काल, औषधी कल्पना, व फलश्रुती या कल्पना सुस्पष्ट केलेल्या आहेत.

औषधीकल्पांचे विवेचन त्यांनी प्रामुख्याने चिकित्सेतच, त्या त्या संबंधित व्याधीमध्ये कसे आहे, या स्वरूपात केलेले आढळते. विवेचन करतांना औषधींचे मूळ घटक द्रव्यांचे शरीरावर कार्य कसे होते या पध्दतीने

विचार केलेला आढळतो. त्यातही 'गुणविचार' अधिक केलेला दिसतो. उदा. रसपर्पटी मधील घटक द्रव्ये म्हणजे पारा आणि गंधक. यापैकी पारा भौतिकशास्त्र दृष्ट्या गुरू आहे. त्याचे वीर्य ही गुरू आहे. वेणीमाधवांच्या विचार पध्दतीत नेहमी अष्टविध वीर्याचा विचार केलेला आढळतो. वीर्य म्हणजे जे गुण, पचनानंतरही तसेच कायम राहतात. केवळ शीत, उष्णवीर्य हा विचार न करता गुरू, लघू, मंद, इ. चाही विचार केला आहे. वंग भौतिकदृष्ट्या गुरू आहे पण त्याचे वीर्य लघु आहे असे अजून एक उदाहरणही त्यांनी दिले आहे.

पारा गुरू असूनही चल आहे. पारा शुक्रस्वरूप, कफस्वरूप पण चंचल आहे मग शरीरात स्थिर कसा होणार ? म्हणजे द्रवत्व हा त्याचा दोष आहे. येथेच अष्टविध संस्कारांचे महत्त्वही ते सांगतात. सुरवातीचे, पातनापर्यंतचे संस्कार हे द्रवत्व हा दोष काढण्यासाठी, पारा स्थिर होण्यासाठी आहेत तर त्यापुढील संस्कार शरीरास उपयुक्त होण्याच्या दृष्टीने आहेत. रसपर्पटीतील दुसरा घटक म्हणजे गंधक. गंधक दृढसंघातवान नाही. पित्तवर्धक आणि लघु आहे. गंधक आग्नेय तर पारद सौम्य आहे. पण कज्जली हे संयुग उष्ण नाही, शीतही नाही. यात पारा गंधकाने बध्द होऊन तो लघु आणि आशुकारी होतो.

पर्पटीची ग्रहणीतील उपयुक्तता स्पष्ट करतांना ते म्हणतात - अग्नि संस्कारामुळे पर्पटीत स्थिरत्व येते त्यामुळे अधिक काळपर्यंत व अधिक कार्य घडते. गंधकामुळे अग्निस्थानावर कार्य होते. व हे कार्य साक्षात बल देणे या स्वरूपाचे आहे.

पर्पटी रसायन कार्य करणारी आहे. म्हणून अनशापोटी द्यावी. (सं. - आ.प. १६ ऑगस्ट ४६; रसपर्पटी व गंधक रसायन)

म्हणजे औषधीकल्पांचा विचार करतांना त्यातील मूळ घटक द्रव्यांचे गुण, संस्कारानंतर निर्माण झालेले त्या मिश्रणाचे किंवा संयुगाचे गुण, त्या गुणांमुळे होणारे कार्य असा विचार ते करतात. तसेच त्या औषधाचे कार्यक्षेत्र कोणते? आणि कोणत्या स्वरूपाचे कार्य करणारा या नुसार त्याचा निश्चित केलेला औषधीकल्प हा चिकित्सेच्या दृष्टीने उपयुक्त असलेला विचार आढळतो.

गंधक रसायन या कल्पाच्या विवेचनातही मूळ घटकाचे गुण, भावना द्रव्यांचे गुण, दोन्ही द्रव्यांचे कार्यक्षेत्र म्हणजे कोणत्या धातूवर, कोणत्या व्याधीत कार्य होते हा विचार आढळतो.

उदा. गंधक आग्नेय, त्यातील भावना म्हणजे गंधकाच्या प्रत्येक अणूवर भावना द्रव्यांचे केलेले संस्कार होत. जसे दूधाच्या जीवनीय गुणाचे, इतर द्रव्यांच्या विविध धातूउपधातूंवर कार्य करणाऱ्या गुणांचे इ.

या संस्कारानंतर तयार झालेले गंधक रसायन हे मुख्यत: अग्निदीपक किंवा धात्वग्नि दीपक कार्य करते. त्याचबरोबर स्त्रोतोरोध नाहिसा करून धातूक्षय घालवून पोषक कार्य ही करते.

आणि म्हणून प्रमेहातही गंधक रसायन उपयुक्त ठरेल कारण प्रमेहात आप्यघटकांचे पचन बिघडलेले असते. तर कुष्ठातही अनेक धातूंचे पचन बिघडलेले असते. येथे अग्निवर कार्य अपेक्षित असल्याने ते समान काळी द्यावे, असे शास्त्रींजी सांगतात. (सं. - आ.प. १६ ऑगस्ट ४६; रसपर्पटी व गंधक रसायन)

## ब) अनुभूत योग

✳ अर्णशुक्ती - रसरक्तविकार, कॅन्सर

✳ शठ्यादी - दम्यावर

* अश्वगंधादी – सौंदर्यवर्धनासाठी
* बडिशेप + जिरे + ओवा + वेलची + लवंग + केशर – व्यान उदानकाली sorbitrate ऐवजी वापरीत.
* हिंग्वाष्टक + गंधर्व हरीतकी – समानकाली
* गुडहरितकी – शोथावर
* पानफुटीरस – रसधातू पोषक + हृदयावर – समानकाली.
* कासिसभस्म – नेत्र व केस रोगांवर.
* डिंक + ४ खडे रात्री भिजवून सकाळी दूधासह natural calcium म्हणून व सुका खोकला असतांना.
* मज्जायोग – कासीस भस्म १ भाग+ मुस्ता ४ भाग + आमलकी ४ भाग + गुळवेल सत्व ४ भाग – (शिर:शूलासाठी) सामुद्गकाली सघृत
* तिळतेल व दालचिनी, ओवा तैलाची दुग्धशर्करा गरम पाण्यात मिसळून बस्ति देणे. (सं. – आ.प. मार्च ६४)

**वेणीमाधवशास्त्रीच्या इमर्जन्सी किट मधील औषधे :**

* महायोगराज गुग्गुळ
* शंखवटी, अभया स्त्रोतोशोधक
* बृहत्वात चिंतामणी
* सुवर्णसूत – पक्षाघातात सुवर्णसूत + अभया + आलेरस
* सुमावसंत
* वसंतकुसूमाकर
* महालक्ष्मी विलास
* लक्ष्मीनारायण
* हेमगर्भ

**टायफॉईड व उपद्रवांची आहारीय व अनुभूत चिकित्सा :**

● **टायफॉईड**

* तांदूळ व जव,पिंपळी, आवळा यांची तूपाची फोडणी दिलेली पेज द्यावी.
* अतिसार असल्यास पेजेत सुंठ व मध घालून द्यावे.
* अनिद्रा असल्यास पेजेत आवळा, सूंठ, खडिसाखर दयावे.
* आवळारस, मनुकापाणी, नारळपाणी, कांदयाचा रस / सूप द्यावा.

● **प्रलाप**

प्रलाप वर निद्राजनक उपचार करावेत असे ते सांगतात.

वातज प्रलापात महावात विध्वंस पेक्षा समीरपन्नगाचे तुळस/आले व विड्याच्या पानांच्या रसातील चाटण अधिक उपयुक्त ठरल्याचा अनुभव ते नमूद करतात.

तर पित्तज प्रलापांत चंद्रकला कांदयाच्या रसात उगाळून ते चाटण उपयोगी ठरते.

● प्रलाप आणि रक्तस्त्राव या दोन्ही उपद्रवात कांदा अतिशय उपयुक्त असल्याचे ते सांगतात. त्याचे काही योग.

प्रलापात –

✳ पिंपळमूळ कांद्या रसासह.

✳ कांदयाचे सूप.

✳ कांदयाच्या रसाचा कपाळाला लेप.

✳ कांद्यारसात कापूर – कापड भिजवून ठेवावे.

रक्तस्त्राव –

✳ चंद्रकला भाजक्या कांदयाच्या रसासह

✳ भाजक्या कांदयाचा रस २-२ चमचे.मसूर व कांदयाचे सूप

● रक्तस्तंभक अशी आत्ययिक चिकित्सा.

✳ चंद्रकला दूर्वारसासह

✳ मौक्तिक युक्त कामदुधा तूपासह मात्रा-६-६ गुंजा.

✳ मोचरस किंवा वडाचे कोंब सिध्द घृत

✳ ताक, दूध, नारळाचे पाणी गरम न करता वरील पाण्यात कापूर मिश्र करून एनिमा

✳ यानंतर खोबरेल तेल किंवा तूप, राळ, पाणी यांचा बस्ति.

✳ उंबराच्या मुळाचे पाणी, केवड्याच्या गाभ्याचे पाणी १-१ चमचा.

✳ महातिक्तघृत, शतावरीघृत.

✳ चंदन तांदळाचे धुवणात उगाळून मध, साखरेसह.

✳ शेळीचे दूध

✳ काळेतीळ कल्क १ भाग + साखर ५ भाग + शेळीच्या दूधासह घेतल्यास त्वरीत रक्तस्त्राव थांबतो.

● शेवटच्या अवस्थेत उत्तेजक, बल्य आत्ययिक चिकित्सा.

भल्लातक एरंडतैल यांत सिध्द हिंगूळ

विड्याच्या पानांचा रस, आलेरस व तुळशीच्या पानांच्या रसातून चाटवावा.

याशिवाय रसायन द्रव्यांसह हीरक भस्म, नवरत्न रसही वापरावे.

**● शुभदाताईंच्या वापरातील सुवर्ण कल्प**

सुवर्णकल्पांचा वापर त्या सुवर्णसिध्दजल किंवा सुवर्णवर्ख खडिसाखरेसह असा केलेला आढळतो.

गर्भिणींमध्ये वजनवाढ करण्यासाठी, गर्भिणीला ५ व्या महिन्यात गर्भाची बुध्दी वाढण्यासाठी तसेच अपुनर्भव चिकित्सा, सोरीयासिस सारखे त्वचाविकार, मुखदूषिका, मेध्यकर म्हणून केलेला आढळतो.

## औषधी काल

वेणीमाधवशास्त्री व शुभदाताई यांनी 'औषधीकाल' या विषयावर लेखन केले आहे. या निमित्ताने औषधी द्रव्याचा गुणविचार, पचनोत्तर कार्य, आहाराचे गुण व त्यांचा पचनोत्तर विचार केला आहे.

येथे द्रव्याच्या गुणांची बदलणारे गुण म्हणजे रस, विपाक आणि न बदलणारे गुण म्हणजे वीर्य अशी विभागणी त्यांनी केली आहे.

विपाकाचे विश्लेषण करतांना ते म्हणतात की आंबट रसाचा विपाक जरी आंबटच असला तरी त्याच्या रचनेत फरक असतो. शरीराला अनुरूप घटना येथे झालेली असते. थोडक्यात विपाकानंतर त्याची रासायनिक घटना बदललेली असते असे त्यांना म्हणावयाचे आहे. कारण येथे त्यांनी मधुर रसाच्या परिवर्तनाचे, ग्लायकोजेन व ग्लुकोज चे उदाहरण दिले आहे.

✳ अष्टविद्य वीर्य कल्पना ते मानतात असे दिसते. गुरू लघु, मृदु तीक्ष्ण, स्निग्ध-रूक्ष, उष्ण-शीत.

✳ द्रव्याचे = औषधीद्रव्याचे कार्यक्षेत्र पांचभौतिक घटनेनुसार असते. याचे विश्लेषण त्यांनी केले आहे. उदा. अग्नि व वायू महाभूत प्रधान द्रव्ये उर्ध्वभागात कार्य करतात तर पृथ्वी व अंबू महाभूत प्रधान द्रव्ये अधोभागी कार्य करतात. ''द्रव्यं उर्ध्वगमंतत्र.... पण आहार द्रव्यांच्या गती नेमक्या उलट असतात असा विशेष विचार त्यांनी मांडला आहे. त्याचे विश्लेषणही उत्तम केले आहे. उदा. ''ते **व्यापिनोऽपि....**

म्हणजे आमाशय व वरचा भाग कफप्रधान, नाभी व त्याखालचा वातप्रधान तर हृदय व नाभी पित्तप्रधान असतो. याचाच अर्थ पचनानंतर पृथ्वी व आप प्रधान घटक उर्ध्वभागात जातात. तर अग्नि व वात प्रधान द्रव्ये अधोभागात जातात. या अर्थाच्या श्लोकाची रचनाही त्यांनी केली आहे.

**द्रव्यभूर्ध्वगमं युक्तं भूमितोयगुणाधिकं**
**अधोगामिच भूयिष्ठं प्रायोऽग्नि पवनोत्कटम् ।**

ज्यावेळी आहाराशी संबध्द औषधे दिली जातात. त्यांच्या गती पुन:भिन्न होतात. आणि हेच दशविध औषधीकालाचे वैशिष्ट्य आहे. औषधाचे कार्य नेमके कुठे हवे आहे. ते प्रथम ठरवून नंतर योग्य कालाची निवड करावी म्हणजे ते फलदायी होते.

✳ विविध कालांत दिलेले औषध कोणत्या स्थानावर कार्य करते, कोणत्या दोषांवर कार्य करते, हे उदाहरणे देऊन स्पष्ट केले आहे. येथे त्यांनी सुश्रुतोक्त औषधी कालांचा व वाग्भटाचार्यांच्या स्वप्न कालाचा विचार केला आहे.

**प्राग्भक्त** कालाला श्रेष्ठ काल म्हंटलेआहे.कारण याचे पचन शीघ्र होते. येथे वेणीमाधवशास्त्रींनी बर्फाच्या गोळ्याची उपमा देऊन विषय स्पष्ट केला आहे. जसे लाल सरबत बर्फाच्या गोळ्यावर त्वरीत पसरते तसे आमाशयाच्या अंत:स्त्वचेतून स्त्रवणाऱ्या पित्ताने औषध व अन्न ग्रासले जाते.

✳ व्याधी स्थान विचाराचे महत्त्व वेणीमाधवशास्त्रींनी येथे विषद केले आहे. स्थानिक दोष त्या स्थानाचा प्राकृत स्थितीत रक्षक असतो, त्याची पुष्टी करणारा असतो. स्थानिक दोष विकृत झाला तरच इतर स्थानाचे दोष त्या स्थानात विकार निर्माण करतात.

म्हणून आजार कोणत्याही दोषाचे असले तरी ज्या वायूच्या क्षेत्रात असतात त्या वायूच्या काळांत औषधे दयावी.

**सभक्त कालीन –** औषध पोषणासहच दोषनाशनाचे कार्य करते. विशेषत: सर्व शरीरगत रोगांवर या काळी औषध दयावे असे वेणीमाधवशास्त्री सांगतात. उदा. ज्वरातील औषधसिध्द पेया. याचप्रमाणे शुक्रधराकला सर्व शरीर व्यापी आहे. अती व्यवायाने क्षीण झालेल्या रूग्णांनाही सान्न वृष्य औषधे दयावी असा नवीन विचार वेणीमाधवशास्त्रींनी मांडला आहे.

येथे शरीराची झीज भरण्याची प्रक्रिया कशी होते याचे वर्णन केले आहे. ते सांगतात की, अन्न दोन प्रकारे शरीराची झीज भरते. १) नवीन घटकांचे जनन करून २) कृश घटकांचे पोषण करून.

**सग्रास कालच्या** विवेचनात वेणीमाधवशास्त्री म्हणतात की, सुश्रुताने वाजीकर औषधे सग्रास सांगितली आहेत. याचा अर्थ सग्रास औषध शुक्रधातूवर कार्य करते.

गव्हाचे पीठ/ उडीद पीठासह कवचबीजाच्या पुऱ्या हे सग्रास चे उदाहरण होय.

**स्वप्नकालाचे** – विवेचन करतांना वेणीमाधवशास्त्रींनी दोन मुद्दे मांडले आहेत.

१) निद्रावस्थेत डोके शरीराच्या समपातळीत असते. रसरक्तादिकांचा पुरवठा अधिक होतो. तसेच शरीरकर्मे बंद असल्याने मेंदूची झीज कमी होते व पोषण अधिक होते.

२) येथे मधमाशांवरील प्रयोगाचे उदाहरण दिले आहे की मधमाशांच्या मेंदूच्या पोकळ्या सायंकाळी रिकाम्या असतात तर सकाळी निझल्स ग्रॅन्यूल्स या द्रवाने भरलेल्या असतात. अशीच क्रिया मानवी मेंदूतही घडते. इंद्रिय कार्यात खर्च होणारे 'ओज', झोपेच्या काळात पोकळ्यामध्ये भरले जाते.

इंद्रिय विकृतीत ओज विकृत होते अशावेळी स्वप्नकालीन औषध ते विकृत ओज निर्मल करून पोकळ्यांत भरते.

येथे वेणीमाधवशास्त्रींची इतर संशोधनांचे वाचन, त्यांचे मनन व आपल्या शास्त्राला ते पुरक ठरेल अशा रितीने चिंतन करण्याची वृत्ती आढळते. (सं. – आ.प. जाने. ७७; औषधीकाल)

## सिद्धांत

### अ) शारीर रचना व क्रिया संदर्भात :

शरीर रचना व क्रिया, त्यातील सिध्दांतांचे विवेचन यांवर वेणीमाधवशास्त्रींचे खास प्रभुत्व. क्रियेचा विचार करतांना रचना विचार, त्याचे वैशिष्ट्य काय ? हा विचारही आवश्यक आहे आणि या आधारावरच अनेक सिध्दांतांचे त्यांनी सूक्ष्म आणि स्पष्ट विवेचन त्यांच्या लेखांच्या माध्यमातून केले आहे.

**स्त्रीशारीर व गर्भशारीर :**

यामध्ये स्त्रीशारीर त्याचे वैशिष्ट्य, गर्भशारीर, त्या आधारे 'सुप्रजा' ही संकल्पना यांवर लेखन केलेले आढळते. त्याचप्रमाणे प्रीती, वात्सल्य, स्तन्यप्रिती या मानसभावांवरही विस्तृत विवेचन पूर्वक लेखन केले आहे. या सर्वांबरोबरच शास्त्रीजींचे वैशिष्ट्य म्हणजे सप्तधातू कल्पना ! त्यांच्या चिकित्सेतही धातूविचाराला त्यांनी नेहमीच महत्त्व दिलेले आहे. धातूंचा स्थूल व सूक्ष्म विचार, त्या मागची संकल्पना यावर विस्तृत तीन लेख त्यांनी आयुर्वेद पत्रिकेत लिहिले आहेत, या संकल्पनांचा उपयोग रोगनिदान व चिकित्सेत कसा होऊ शकतो याचे उत्तम मार्ग दर्शन या लेखांच्या माध्यमातून मिळते.

त्यांनी मानवी 'स्त्री' ला श्रेष्ठत्व दिलेले आहे. त्यासाठी उदाहरणपूर्वक शास्त्रीय दृष्ट्या विवेचन ही केले आहे. जसे रसादी सप्तधातू स्त्री व पुरूष दोहोंत आहेत परंतु रज व स्तन्य हे दोन घटक आणि ते घटक निर्माण करणारे अवयव स्त्रीशरीरात आहेत. पुरूष शरीरात या अवयवांची न्यूनता आहे.

❖ संतान परंपरेच्या दृष्टीने अधिक जबाबदारीचे कार्य स्त्री करते.

❖ पुरूष शरीरात कोट्यावधी पूं बीजांची निर्मिती होऊन उपयुक्त मात्र एक दोनच होतात; तर स्त्री शरीरात

मुळातच १-२, पण कार्यक्षम बीजांची उत्पत्ती होते.

- ❖ गर्भावस्थेत गर्भपोषक रसधातूव्द्वारा आणि बाळाच्या जन्मानंतर त्याच रसधातू पासून स्तन्यनिर्माण होऊन तेव्हाही पोषण स्त्रीच करते.
- ❖ स्त्रीशरीराची वाढ सोळाव्या वर्षीच पूर्ण होते तर पुरूष शरीराची पंचविसाव्या वर्षी होते. असे तुलनात्मक मुद्दे मांडले आहेत. यात त्याची सूक्ष्मनिरीक्षण व विवेचन दृष्टी दिसते.

धातूसारत्वाचे आणि त्यानुसार निर्माण होणाऱ्या मानसभावांचे स्पष्टीकरण अतिशय सुंदर रितीने केले आहे. शरीराचा प्रत्येक धातू जितका सारवान असेल तितके त्या धातुला अनुरूप असे मानस भावही बलवान, विकसित असतात.

पुरूष शरीरात अस्थि धातू सारवान असल्याने उत्साह, सतत कर्म करण्याची शक्ती, मनोनिग्रह या गोष्टी उत्कृष्ट असतात. तर स्त्री शरीरात मज्जा धातू सारवान असतो. प्रिती किंवा प्रेम हा मज्जा धातूचा धर्म आहे. ही प्रिती तीन प्रकारची आहे शुक्रप्रिती, मज्जाप्रिती आणि रसप्रिती. असा विशेष विचार त्यांनी मांडला आहे. यावरच पुढे त्यांनी १९७१ मध्ये या विषयावर विस्तृत लेखनही केले आहे. सामाजिक प्रेम, राष्टीय प्रेम, विश्वबंधुत्व या मज्जा प्रीतीच्याच वाढत्या कक्षेतील व उत्कट प्रेमाचे प्रकार होय, असे ते म्हणतात. (सं. - आ.प. सप्टें.७६ जीवोत्तमा मानवी युवती)

गर्भ शारीरच्या वर्णनात एका महत्त्वाच्या प्रश्नाचे विवेचन त्यांनी ग्रंथांतील सूत्रांच्या आधारे स्पष्ट केले आहे.

गर्भसंभवाच्या वेळीच जर प्रकृती ठरते तर गर्भिणी अवस्थेतील आहार विहाराने प्रकृती बदलता येते काय ? यावर चरक वि.अ. मधील 'मातु: आहारविहारप्रकृतिं गर्भशरीरमपेक्षते ।' तसेच जन्मानंतरही सांगितलेली 'प्रकृति स्थापनी' चिकित्सा यांचा संदर्भ देऊन गर्भावस्थेत मातेच्या आहारविहाराने बालकाची प्रकृती बदलता येते व जन्मानंतरही ती 'सम' करता येते, असे शास्त्रीजी स्पष्ट करतात.

प्रकृती बदलल्यास रिष्ट लक्षण मानावे असे वाग्भटाने सांगितले आहे. पण हे जर स्वभावत: झाले तर रिष्ट लक्षण मानावे येथे चिकित्सेने प्रकृती बदललेल्या आहे, म्हणून हे रिष्ट लक्षण होत नाही, असा खुलासा ते करतात.

**'पुंसवनाचे कार्य'** याचे विवेचन करतांना ते म्हणतात, एकच वनस्पती वेगळ्या स्थानी टाकल्याने कार्य ही बदलते. उदा. औषध एकच, पण उजव्या नाकपुडीत टाकल्यास पुरूष आणि डाव्या नाकपुडीत टाकल्यास स्त्रीगर्भ निर्मिती होते. म्हणजे **याला कारणीभूत द्रव्य नाही तर स्थान आहे.** या स्थानाचा कार्यकारणभाव स्पष्ट करतांना ते सांगतात उजवी अंगे मोठी असतात, उदा. उजवे फुफ्फुस, यकृत, इ. उजव्या नाकांत औषधाचे पचन झाल्यास पुरूषीभाव अधिक वाढतात, अस्थिभाव अधिक निर्माण होतात.

सम आणि विषम दिवसाच्या संकल्पनेबाबत ते म्हणतात सम दिवशी स्त्रीबल कमी असते तर विषम दिवशी स्त्रीबल जास्त असते. याचवेळी त्यांनी स्तन्योद्भव ज्वर, स्त्रीशुक्राचे कार्य, शुक्रवृध्दीची लक्षणे आर्तव आणि रज संकल्पना. सूतिकावस्था, मासानुमासिक औषधे यांचेही विवेचन केले आहे. (सं. - आ.प. जाने. १९७७; अध्यापक चर्चा परिषदेत)

वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांनी सुप्रजा निर्मितीसाठी कोणकोणत्या गोष्टींचा विचार करावा याचे अतिशय

उत्तम पध्दतीने व ससंदर्भ विवेचन केलेले आढळते. प्रजा चांगली होणे अपेक्षित असेल तर त्यासाठी आदर्श स्त्री पुरूषांनी एकत्र येणे आवश्यक आहे कारण ज्याचे सर्व धातू उत्तम सारवान आहेत तो आदर्श मानव. तो दीर्घायुषी, आरोग्यसंपन्न, बलसंपन्न, गुणसंपन्न असतो. सुप्रजेसाठी वाङ्.निश्चयापूर्वीच परिक्षण करावे. जोडीदार निवडतांनाच त्याचा विचार करावा, यासाठी परीक्षाचे काही मुद्दे त्यांनी सांगितले आहेत. यात प्रामुख्याने धातूपरीक्षणावर भर आढळतो.

ज्या महिन्यात ज्या धातुंची वृद्धी निर्सगत: होते त्यांची निकोप वाढ व्हावी म्हणून मासानुमासिक औषधं घ्यावी. वंशातील कुलजविकार व वैगुंण्य नाहिशी करण्यासाठी हा अमृतसिद्धी योग होय.

**बालक परिक्षण –**

बालक परिक्षणाचे टप्पे व त्या टप्प्यांत करावयाचे विशिष्ट परिक्षण व उपचार यांचे नेमके विश्लेषण वैद्य वेणीमाधवशास्त्री यांनी केलेले आढळते. (सं. – आ.प. जुलै ७१; सुप्रजोत्पादन का व कसे) 'सुप्रजा' या विषयावर वेणीमाधवांनी पुस्तक ही लिहले आहे. नानल यांनी ते प्रकाशित केले आहे. आणि याचे परीक्षण आचार्यांचे शिष्य वैद्य करमरकर यांनी आयुर्वेद पत्रिकेत केले आहे. 'सुप्रजा' यासाठी एक चिकित्साकेंद्रही मुंबई येथे सुरू केले होते.

बालकांच्या योग्य वाढीसाठीही त्यांचे नियमित परिक्षण करणे आवश्यक आहे असे ते म्हणतात. हे परिक्षण केव्हा व कसे करावे याचेही मार्गदर्शन पुढील प्रमाणे केले आहे.

१) जन्मल्यानंतर प्रथम धातू सारासारत्व परिक्षण करावे. जे असार घटक असतील त्यांच्या वाढीची औषधे मातेने सेवन करावी किंवा धुरीतून द्यावी.

२) यानंतर अन्नाद कालाचे वेळा म्हणजे ६–८ म.चे वेळी परिक्षण करावे. यावेळी प्रकृती परिक्षण करावे व प्रकृतीला अनुसरून अन्न सुरू करावे.

३) दंतोद्भव कालात वैगुण्ये/विकार असतील तर ते नाहीसे करण्यासाठी प्रयत्न करावेत. तारूण्यापूर्वी (मुले १४–२० वर्षे, मुली १०–१६ वर्षे) परिक्षण करावे. या काळात बुध्दी, धारणाशक्ती, विचार शक्ती व शरीरावयवांचे परिक्षण करावे. त्यानुसार आहार व औषधाची निवड करावी. या काळांत अत्यंत काळजीने वैगुण्ये व रोग नाहिसे करण्यासाठी कसोशीचा प्रयत्न करावा. योग्य व्यायाम, आहार, योग्य अभ्यास, कर्तव्याची जाणीव या दृष्टीने शिक्षण व्यवस्था व्हावी. थोडक्यात सुप्रजेसाठी वयाच्या विविध टप्प्यावर परीक्षण करून त्यानुसार आहार, परीचर्या व औषधे यांचा उपयोग ते सांगतात.

**मानसभाव :**

वेणीमाधवांनी प्रिती, वात्सल्य आणि स्तन्यप्रिती यावर लेखांची मालिका लिहिली आहे. आयुर्वेदातील शरीरक्रियेचे अत्युत्तम विवेचन व त्याची चिकित्सेतील उपयुक्तता या दृष्टीने या लेखांचे महत्त्व अनन्यसाधारण म्हणावे लागेल. मानसभावांचे योग्य विश्लेषण केल्यास त्याचा उपयोग धातूंचे सारासारत्व ठरविणे, दोषांची वृध्दीक्षयादी अवस्था ठरविणे, धातूंची, मलांची वृध्दीक्षयादी अवस्था ठरवून चिकित्सेसाठी कसा उपयोग करून घेता येईल. हा नवीन विचार त्यांनी मांडला आहे.

उदा. प्रिती म्हणजे आवड याचा संबंध इंद्रिय व मनाशी असतो. हा आत्म्याचा विशेषत: अंतरात्म्याचा गुण आहे. शरीराला ज्याची गरज असते त्याबद्दल प्रिती निर्माण होते. प्रिती धातूंजन्य असते. उदा. धातूक्षयामुळे,

दोषवृध्दीमुळे, धातूच्या सारअसारत्वामुळे.

❖ यापैकी धातूक्षयज व दोषवृध्दीमुळे होणारी प्रिती नैमित्तिक असते. तर धातूसारअसारत्व जन्य प्रिती जन्मापासून असते.

❖ धातूक्षयातील व दोषवृध्दीतील प्रिती आहारद्रव्य निष्ठ असते.

❖ सुश्रुतांनी धातूंची कर्मे सांगतांना मज्जा आणि शुक्र धातूचे कर्म प्रिती सांगितले आहे. या प्रिती जर चिकित्सकाला समजल्या तर चिकित्सेचा अचूक मार्ग याने मिळतो. याचेच विस्तृत स्पष्टीकरण वेणीमाधवांनी त्यांच्या लेखनातून केले आहे. (सं. – आ.प. १९ ऑगस्ट ७१; प्रीती)

शुक्रप्रिती ही जीवाच्या जीवनात महत्त्वाची आहेच पण रोगांच्या चिकित्सेतही महत्त्वाची कशी हा नवीन विचार त्यांनी मांडला आहे.

❖ बाल, तरूण, वृध्द या सर्व अवस्थेत शुक्रस्थितीचेही परीक्षण प्रत्येक रूग्णात करावे.

❖ कोणत्याही आजारात शुक्रक्षीणता ही असेल तर रोगचिकित्सेसह शुक्रवर्धक चिकित्साही करावी. अन्यथा यश येत नाही.

❖ दोष किंवा जंतु त्यांच्या तेजाने धातूंना क्षीण करतात. त्यांना विरोध करण्यासाठी शरीरघटकांची संख्या व बल वाढणे आवश्यक आहे त्यासाठी वृष्यचिकित्सा करावी.

❖ शुक्र अव्यक्त असणे – उदा. वार्धक्यात किंवा बालवयात म्हणजे शुक्रक्षीण होणे नव्हे.

❖ शुक्रक्षीण झाल्यास कटी– सक्थि शूल, पिंडिकोद्वेष्टन आढळते. स्मृती, बुध्दी कमी होते, आत्महत्त्येची प्रवृत्ती वाढते. कारण जिजीषुवृत्ति हा जीवाचा धर्म आहे तो शुक्रक्षीणतेत कमी होतो.

❖ शुक्रक्षीणता म्हणजे जननाची अक्षमता तसेच घटक नाश होण्याचे प्रमाण अधिक असणे. याचा परीणाम शरीर, जननेंद्रिय व मनावरही होतो. (सं. – आ.प. सप्टें. ७१; प्रीती)

स्तन्यप्रीती म्हणजेच वात्सल्य याबद्दल ते सांगतात की स्तन्यप्रीति स्तन्यामुळे उत्पन्न होते. स्तन्याचा जनक रज सर्व शरीरव्यापी आहे. ही प्रिति शुक्रप्रिति पेक्षाही बलवत्तर आहे. कारण ती निरपेक्ष प्रिति आहे. स्तन्य रसधातूचा उपधातू आहे. म्हणून पुरूषांत स्तन्य नसले तरी रसधातूमुळे वात्सल्य येते. व्यवहारात आई व मुलाचे प्रेम किंवा बंधुप्रेम ही वात्सल्याची उदाहरणे होत. (सं. – आ.प. ऑक्टो. ७१; स्तन्यप्रिती) प्रत्येक मानव दुसऱ्या मानवापासून आपल्या धातूसारत्वामुळे उत्पन्न होणाऱ्या मानसभावांमुळे भिन्न आहे याचे मार्गदर्शन आचार्यांनी या माध्यामातून केले आहे.

रज आणि आर्तव या संज्ञा ग्रंथात अनेक ठिकाणी आहेत परंतु त्यांचा नेमका अर्थ स्पष्ट नाही. अनेकदा त्या समानार्थी आहेत असा संभ्रम निर्माण करतात. वेणीमाधवांनी या दोन्ही संज्ञांचे अभ्यासपूर्ण स्पष्टीकरण केले आहे व गर्भोत्पादनात त्यांचे महत्त्व ही वर्णन केले आहे.

रज – म्हणजे स्त्रीशरीरातून तीन ते पाच दिवस होणारा स्त्राव.

**रजाचे कार्य :** स्त्री शरीर शुध्दी, गर्भाचे रक्षण, गर्भस्थापना, गर्भपोषण आणि जन्मोत्तरपोषण.

आर्तव – म्हणजे शुक्र. परंतु ग्रंथात अनेकदा रज व शुक्र दोघांना आर्तव शब्द वापरलला आढळतो. यांचा भेद स्पष्ट करतांना ते सांगतात की,

- ❖ रज आर्तव हे रक्तलक्षण आर्तव आहे तर शुक्र आर्तव गर्भकृत् आर्तव आहे.
- ❖ रक्तलक्षण आर्तव रसाचा उपधातू आहे तर शुक्रार्तव हा मज्जेनंतर व मज्जेपासून तयार होणारा मुख्यधातू आहे.
- ❖ रसापासून रक्तार्तव ७ व्या दिवशी बनते तर शुक्रार्तव १ महिन्याने बनते.

म्हणजेच थोडक्यात आर्तव गर्भनिर्मितीकर आहे तर रज गर्भपोषक आहे.

चिकित्सेच्या दृष्टीने याचा उपयोग म्हणजे गर्भधारणेपुर्वी प्रथम रजोदोषहर व नंतर शुक्रशोधक उपचार करावेत. गर्भधारणेच्या वेळी पुरूष शुक्र बाहुल्याने पुरूषगर्भ तर स्त्रीशुक्र बाहुल्याने स्त्रीगर्भ होतो. येथे बाहुल्य म्हणेज बलबाहुल्य असा अर्थ घ्यावा असे आचार्य सांगतात.

रज हे गर्भजननासाठी आवश्यक नसून गर्भपोषणासाठी आवश्यक आहे. आणि गर्भधारणेच्या वेळी त्याचे प्रमाण जितके कमी तितके गर्भोत्पादन चांगले होते असे नवीन मत आचार्य मांडतात. याचे स्पष्टीकरण देतांना ते सांगतात की ऋतुकाल ४ ते १२ वा दिवस पर्यंतचा असला तरी सुरवातीच्या काळांत निर्माण झालेला गर्भ विकृत होतो आणि हे रजाच्या अधिक्याने होते. तर जसजसे रजाचे प्रमाण कमी होते म्हणजे १२, १४ वा दिवस त्या काळातील गर्भ उत्तम सारवान निर्माण होतो. रजाच्या प्रमाणावर गर्भाचे बलवीर्यादी अवलंबून असतात ही एक वैशिष्ट्यपूर्ण दृष्टी त्यांनी येथे दिलेली आहे. सुप्रजेसाठी संभोग केव्हा करावा यासाठी हा विचार महत्त्वपूर्ण आहे. (सं. - आ.प. ऑक्टो. ८०; गर्भोत्पादनातील रजाचा वाटा)

शुभदाताईंच्या लेखनातही वेणीमाधवांचा प्रभाव आढळतो. रजोनिवृत्त काळात शुक्र क्षीण होत असल्याने रस, रसादी धातूंवर परिणाम होतो. तसेच शुक्र क्षीणतेने तेजही क्षीण होऊन त्याचा परिणाम मनावर होतो. म्हणून चिकित्सा करतांना प्रथम शुक्र क्षीणतेचा विचार करावा असे त्या म्हणतात. (सं. - आ.प. एप्रिल २०००; रजोनिवृत्ती काल)

योग्यचिकित्सेसाठी प्राकृत शरीर क्रिया समजणे अतिशय आवश्यक आहे आणि ही आयुर्वेदीय शरीरक्रिया यातील अस्पष्ट किंवा धूसर संकल्पना त्यांनी अधिक स्पष्टपणे आणि नेमक्या उलगडून दाखवण्याचे मोठे कार्य केले आहे.

## धातू संकल्पना :

**धातू संकल्पना** हे वेणीमाधवशास्त्रींचे वैशिष्ट्य. आयुर्वेदीय शरीररचना व त्या अनुषंगाने क्रिया यांचा संबंध अतिशय उत्तम पध्दतीने मांडलेला आहे.

- ❖ प्रत्येक धातूला स्वत:चे अस्तित्व, स्वत:चे वैशिष्टय असले तरी तो सप्तधातूघटितच असतो.
- ❖ तो धातू सार्वदेहिक जरी असला तरी स्थानानुसार त्यात इतर धातूंचा प्रभाव आढळतो.
- ❖ क्षेत्रभेदाने धातूंची मलेही भिन्न असतात.

येथेच ते रसधातू व शुक्रधातूच्या उत्पादनक्षमत्वाबद्दलही विवेचन करतात. रसधातूत सर्व धातू-उपधातू-मल निर्माण करण्याची क्षमता आहे. शुक्रधातू ही सर्व शरीरउत्पादक आहे. पण यात रसधातू हा पोषण कार्य करणारा तर शुक्र निर्मिती कार्य करणारा आहे. अवयव क्षीण होणे किंवा धातूक्षीणता म्हणजे सूक्ष्म घटक आकाराने कमी होणे किंवा संख्येने कमी होतो. यांपैकी रसक्षीणतेत धातू आकाराने कमी होतो तर शुक्रक्षीणतेत संख्या कमी होते. (सं. - आ.प. नोव्हें. ७१; प्रत्येक स्थूल धातूचे सूक्ष्मधातूघटकत्व)

सार्वदेहिक धातूंचे स्थानपरत्वे / क्षेत्रभेदाने बदलणारे कार्य दाखवण्यासाठी त्यांनी मांसधातूचे उदाहरण दिले आहे. येथे 'मांस' शब्द मांस, स्नायू या दोघांबद्दल त्यांनी वापरला आहे. कारण मांस धातु हा धातुदृष्ट्या स्वतंत्र असला तरी तो स्नायू, शिरा, धमनी स्त्रोतसांच्या विशेषत: स्नायूंच्या आश्रयाने राहतो.

- ❖ मांसाचे कार्य म्हणजे मेदो धातुची पुष्टी, अवयवांना विभकत्व , रेखीवपणा देणे. पण क्षेत्रभेदाने त्याचे कार्यही बदलते. उदा. वृषण, शिस्न, स्तन, योनी, ओष्ठ, गाल येथील मांस शुक्र धातू घटक घटित आहेत.
- ❖ संधीवरील मांसात मज्जा धातु घटक अधिक आहेत.
- ❖ पाय, हात, तळवे यांचे मांस स्नायू, अस्थि घटकाधिक युक्त आहे.
- ❖ ग्रंथी इ. मध्ये जरी मांस असले तरी त्यात मेदोधातु घटकाधिक आहे.
- ❖ जिव्हा मांसल आहे पण तरीही यात रक्तसारघटक अधिक आहे.
- ❖ तालू, अन्ननलिका, गालाचे आतील मांस हे रक्तघटक प्रधान आहे.
- ❖ मुखावरील स्नायू ओज घटकांनी घटित आहेत.
- ❖ येथेच अजून एक विचार त्यांनी मांडला आहे – जी त्वचा ज्या धातूघटकांनी युक्त असते त्या खालचे मांसस्नायू ही त्याच धातु घटकांनी घटित असतात.
- ❖ ''मांसस्य खमल: ।'' सर्व ख मले मांसाचीच असली तरी, याप्रमाणे क्षेत्रभेदाने मांसधातूचा 'मल' ही भिन्न भिन्न आहे.
- ❖ जननेंद्रियाचा मल शुक्रधातुघटित मांसाचा आहे.
- ❖ नेत्रमल मज्जा धातू घटित मांसाचा मल आहे.
- ❖ कर्णमल अस्थि धातुघटित मांसाचा मल आहे.

येथेच अजून एक नवीन विचार त्यांनी मांडला आहे की हातापायाचे तळव्याचे स्नायू व अस्थिबध्द मांसाचे पचन, विभजन, सात्मीकरण कार्यात उत्पन्न होणारे मल कानावाटे बाहेर पडतात. पण यास प्रमाणभूत वचन/युक्ती/प्रत्यक्ष प्रयोग आवश्यक आहे. यावरून प्रत्येक विचाराला ग्रंथोक्त संदर्भ शोधणे किंवा प्रयोगाने ते सिध्द करणे ही वृत्ती दिसून येते.

जिव्हा दंतास्यज मल हे तिन्ही जरी मुखात उत्पन्न होत असले तरी प्रत्येकाचा मल भिन्न आहे. उदा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दंतमल | – | अस्थिचा मल होय. | जीभेचा मल | – | रक्तघटक घटित मांसमल. |
| हिरड्या | – | कफरक्तघटक घटित मांसमल. | नाकातील मल | – | मांसाचा आहे. |
| आस्य मल | – | रसमल होय. | | | |

प्राणवायू रक्तासह शरीरभर फिरतांना त्यात जे मल येतात. तो ही 'ख' मल आहे असे वेणीमाधवशास्त्री म्हणतात हा विचार ग्रंथात नाही. हा सर्व शरीरधातूंचा खमल आहे, असे ते म्हणतात. (सं. – आ.प. ऑगस्ट ८०; स्थूल धातूंचे सूक्ष्म धातू घटकत्व).

या प्रमाणेच अवयव किंवा उपअवयव अनेकदा स्थूल दृष्टीने एका धातूच्या घटकाचा दिसतो. परंतु शास्त्र दृष्टीने तो अन्य धातूघटक घटित असतो. उदा. डोळा स्थूल दृष्टीने मांसघटक प्रधानवाटला तरी तो मज्जा धातूच्या प्रसादरूप घटकांनी युक्त आहे. असा विचार शास्त्रीजींनी मांडला आहे.

शरीराच्या अंगप्रत्यंगाचे शारीर त्यांच्या विशिष्ट कार्याच्या दृष्टीने इतरापासून भिन्न असते. उदा. डोळा या मध्ये पापणी केस, पापणी, अश्रुग्रंथी हे सर्वच संरक्षक अवयव होत. पण,

| | | |
|---|---|---|
| पापणी केस | – | अस्थिवत् कठिण, पार्थिव धातूचा, वातघटित आहे. |
| पापणी | – | मृदु, स्नायू या उपधातूने घटित – कफदोष घटित आहे. |
| अश्रुग्रंथी | – | कफ, रस, मज्जा घटित आहे. |

नेत्रपटले ही धात्वाश्रित आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम पटल | – रसरक्त घटित. | व्दितीय पटल | – मांस घटित. |
| तृतीय पटल | – मेद घटित. | चतुर्थ पटल | – अस्थि घटित. |

चिकित्सा करतांना हा विचार महत्त्वपूर्ण ठरतो.

❖ नेत्ररोगांत प्रत्येक लक्षणाचा संबंध मज्जा धातू पचन, विभजन, वृध्दीक्षय, व्यापद, इ. शी लावून चिकित्सा करावी. उदा. व्दितीयपटलाच्या व पित्तदोष प्रधान व्याधीत पित्तशामक, मज्जासमान व मांस पोषक चक्षुष्य द्रव्य वापरावे. द्रव्यगुणाचाही अशा पध्दतीने वर्गीकरणात्मक अभ्यास करावा असे ते म्हणतात. मांस धातू प्रमाणेच त्वचा संदर्भात विचार मांडला आहे. सर्व त्वचा एकच असली तरी क्षेत्र भेदाने तिचे कार्य व धातूघटकत्व बदलते. उदा.

| | | | |
|---|---|---|---|
| शुक्रधरा त्वचा | मज्जाधरा त्वचा | अस्थिधरा त्वचा | मेदोधरा त्वचा |
| रक्तधरा त्वचा | रसधरा त्वचा | मांसधरा त्वचा | ओजोधरा त्वचा, इ. |

त्वचेचे शारीर स्पष्ट करतांना शास्त्रीजी लिहितात की, सर्व इंद्रियांमध्ये त्वचा इंद्रियाच्या आत जाऊन अंत: त्वचा बनून पुन्हा बाह्य त्वचेला मिळते. फक्त डोळ्याची त्वचा आत न जाता नेत्रगोलकावर चढते.

❖ इतर धातूंच्या त्वचेचे प्रथम वर्णन करून शेवटी मांसधरा त्वचेचे वर्णन आहे. कारण त्वचा मांसाचा उपधातू आहे. आणि इतर धातूं प्रमाणेच मांस घटकही त्वचेत असले पाहिजे. पण ग्रंथात विशिष्ट स्थानीय मांस त्वचेचे वर्णन नाही. यावरून इतर धातूंच्या त्वचा सोडून उरलेली सर्व त्वचा मांसधरा त्वचा समजावी, असे ते म्हणतात.

(सं. – आ.प. ऑगस्ट ८०; स्थूल धातूंचे सूक्ष्म धातू घटकत्व)

जी त्वचा मांसाप्रमाणे दिसते परंतु त्यात त्वचा घटक अधिक आहेत अशी त्वचा मांसधरा त्वचा असावी असे वेणीमाधवशास्त्रींना वाटते यासाठी पोटाच्या स्नायूचे उदाहरण त्यांनी दिले आहे.पोटाचे स्नायू आधुनिक शास्त्राने जरी मसल्स/ स्नायू म्हंटले असले तरी आयुर्वेदाने ( सुश्रुताने ) त्यालाच मांसधरा त्वचा म्हटले आहे. यासाठी सुश्रुतातील संदर्भ दिले आहेत –

१) जलोदरात सप्त त्वचा वेधन केल्या पाहिजेत तर पाणी निघते. येथे abdominal muscles चे वेधन केल्यावरच पाणी निघते.

२) दुसरे म्हणजे आयुर्वेदाने जे १०० स्नायू वर्णन केले आहेत. त्यात abdominal muscles चा उल्लेख नाही. उदा. पृष्ठ, इ. चे स्नायू आहेत, पक्याशय, बस्ति यांचे स्नायू प्रकार वर्णित आहेत पण abdominal muscles नाहीत कारण ते त्यांनी मांसधरा त्वचा धरले आहेत.

हे विवेचन अधिक सूक्ष्म व शास्त्र दृष्टी ठेऊन केलेले आहे असे आढळते. चिकित्सेच्या दृष्टीनेही हे महत्त्वाचे

आहे.

पोटाच्या स्नायूंची चिकित्सा करतांना, ती स्नायू म्हणून न करता त्वचा समजून करावयाची आहे, ही विशेष दृष्टी शास्त्रीजींनी मांडली आहे. (सं. – आ.प. ऑगस्ट ८०; प्रत्येक स्थूल धातूंचे सूक्ष्म धातू घटकत्व)

देवकृत छिद्रांबद्दल विस्तृत विवेचन केले आहे. (सं. – आ.प. एप्रिल ७७; अॅक्यूपंक्चर)

## क्रिया शारीर :

यात अनेक पारिभाषिक शब्द, सूत्र यांचा अर्थ स्पष्ट केला आहे. व्यायामाचा कार्यकारणभाव सांगितला आहे. जसे –

१) शब्दासहिष्णूता – रसक्षीणतेने श्रोत्रेंद्रियाचे पोषण कमी होते म्हणून बल कमी होऊन मोठा शब्द ग्रहण करवत नाही, सहन होत नाही. याप्रमाणेच ज्वरलक्षणांचे जसे प्रकाशासहिष्णूता, रसासहिष्णूता, स्पर्शासहिष्णूता, इ. याप्रकारे सूत्रांचा विस्तार करावा.

२) व्यायामाचा कार्यकारणभाव –

✳ **लाघव –** व्यायामाने संधी इ. अवयवात घर्षण सुरू होते, तेथील अग्नि वाढतो, कफादींचे पचन होते. निर्माण झालेले मल निरनिराळ्या मलायनांकडे पाठविले जातात. कफ व मेदाचा मल त्वचेवाटे स्वेदवह स्त्रोतातून, वात स्वभावीमल श्वसनातून म्हणून लाघव हे चिन्ह दिसते.

✳ **दीप्ताग्नि –** औषधांनी होणारी दीप्ती आमाशय, ग्रहणी यांचेशी साक्षात संपर्काने होते तर व्यायामामुळे होणारी दीप्ती परंपरेने मांसमेद धातूंचे पचन वाढवते, मल कमी होतात, त्यांच्या अग्निची दीप्ती होते आणि कायाग्निला मांसमेदादीकांच्या अग्निचे जे अंश ते दीप्त होतात म्हणून भूक लागते.

✳ **व्यायामाने कोष्ठातील दोष शाखेत येतात कारण** अग्नि प्रतिबंधक असे अंत:कोष्ठातील घटक बाहेर गेल्याने अग्निवर्धन होते.

✳ **मेदस:क्षय –** मेदासहच इतर धातूंचाही क्षय व्यायामाने होत असतो. परंतु पोषक आहाराने त्यांचे पोषण होत असते. अती व्यायामाने मात्र त्यांचा क्षयही दृग्गोचर होतो.

✳ **विभक्त घनगात्रत्व –** मेदाचा उपधातू स्नायू. व्यायामाने मेदाचा क्षय पण स्नायूचे पोषण होते, – शिथिलता जाते म्हणून स्पर्शाला घन लागतात. यासह सिरांचेही पोषण होते.

## ब) निदान, संप्राप्ती व चिकित्सा संदर्भात

संप्राप्ती म्हणजे रोग निर्माणातील महत्त्वपूर्ण प्रक्रिया तसेच रोगनाशनातही तिचे महत्त्व आहे. कारण संप्राप्तीभंग हेच चिकित्सेचे ध्येय असते. संप्राप्तीबद्दल वेणीमाधवशास्त्रींनी ऑक्टों. ८१ च्या अंकात अतीशय सोप्या, सुटसुटीत भाषेत विश्लेषण केले आहे. संप्राप्तीतील प्रत्येक अवस्थेचे विवेचन केले आहे.

येथे त्यांनी अंतरात्मा, बहिरात्मा अशी परिभाषा वापरली आहे. व्याधी बरा होण्यासाठी शरीराकडून केले जाणारे प्रयत्न किंवा निर्माण होणाऱ्या इच्छा या अंतरात्म्याच्या इच्छा तर मिथ्याचरण करणारा तो बहिरात्मा.
रोगाच्या रूपावस्थेत निर्माण होणारी लक्षणे दोन प्रकारची असतात असा विशेष विचार त्यांनी येथे मांडला आहे. एक म्हणजे आक्रमकाची चिन्हे तर दुसरी अंतरात्म्याची प्रतिकाराची चिन्हे यांचे योग्य विश्लेषण करून नंतर चिकित्सा करावी असे ते म्हणतात. उदा. कामलेतील डोळे पिवळे होणे, मल जड होणे, काळसर होणे, दोषाची आक्रमकाची

चिन्हे आहेत. तर भूक न लागणे, तोंडाला पाणी सुटणे, अन्न घशाशी येणे, ओकारी वाटणे ही अंतरात्म्याने बहिरात्म्याला केलेली प्रतिकारात्मक चिन्हे होत.

यातही भूक न लागणे, अन्न नकोसे वाटणे, बेचव होणे ही रक्षणात्मक चिन्हे आहेत. दोषांचा पुरवठा होऊ नये यासाठी आहेत अशावेळी लंघन द्यावे. तर तोंडाला पाणी सुटणे, ओकारी वाटणे ही आक्रमक दोष काढून टाकण्याचा अंतरात्म्याचा प्रयत्न होय. अशावेळी उलटीचे औषध देऊन तो दोष काढण्याची चिकित्सा करावी.

व्याधी संप्राप्ती विचार करातांना व्याधीस्थान, त्याचे कार्य, संबध्द धातू त्याचा धात्वाग्नि असा विचार केलेला आढळतो.

## विकार संप्राप्ती :

कोणता अवयव दूषित झाला हे बघावे. त्या अवयवाची ओळख, त्या अवयवाची प्रकृती, कार्य, इतर अवयवांशी संबंध, कलांचा संबंध इतर शरीरघटकांचा संबंध हे स्पष्ट करून ग्रंथातील चिन्हांचा क्रम ठरवावा.

संप्राप्ती कोठे सुरू झाली आणि कशी व्यापक होत गेली हे बघावे. शरीर रचनानुसार व गुणधर्म शारिर दृष्ट्या संप्राप्ती बघावी.

उदा. शकृत् रोध हे कर्म (हेतू) सतत घडल्यास –

- दूषित अवयव – पुरीषाधान / पक्वाधान
- पक्वाधानची प्रकृती – वातप्रधान
- कला – मलधरा कला, अस्थिधराकला; अपानवायू हा घटक

## अ) संप्राप्ती – रचना शारीरानुसार :

वेगविधारण – (प्रथम संज्ञा होते पण ती प्रवृत्ती दाबली जाते. यामुळे संज्ञा अजून तीव्र होते. नंतर थांबते.) यामुळे वेग थांबतो. अपान व सहकारी व्यान यावर अनिष्ट परिणाम होतो. पुरीषाचे पक्वाधानातील वास्तव्य अधिकाअधिक होते. नवपुरीष निर्मिती चालूच रहाते म्हणून पुरीष वृध्दी होते. म्हणून नि:सरणातील जी विश्रांती मिळते ती मिळेनाशी होऊन सतत त्रास होतो.

त्यामुळे – अपानवृध्दी (चय) होते.

पुरीष तेथेच राहिल्याने अग्निने शुष्क होऊन शल्यवत् होतो. वायूनिर्मिती होऊन १) शकृतवातसंग हे स्थानिक चिन्ह निर्माण होते. तर २) परिकार्तिका हे दुसऱ्या अवयवात गुदात होणारे चिन्ह निर्माण होते. ३) अनाह व स्थूलांत्रात संग वाढत जातो. ४) उदावर्त – हा संग वरवर उदरापर्यंत जातो. ५) अग्निवध – यामुळे मूत्रसंग होऊन उर्ध्ववायू होतो व हृदयावरोध हे लक्षण दिसते.

## ब) गुणधर्म शारीरदृष्ट्या संप्राप्ती

- अग्निवध – पचनविकृतीमुळे रसधातूदुष्टी होऊन हृद्‌गौरव होतो.
- रक्तदुष्टी – यामुळे शिरोरूजा
- मांसदुष्टी – मांसदृष्टीमध्ये पिंडिकोद्वेष्टन हे उपलक्षण तर अंगभर्द हे लक्षण आहे.
- प्रतिश्यायातील स्त्राव हा मांसाचा मल तर वातगुल्य – दिर्घकालीन मलांच्या संचयामुळे व मांसधातु अबलत्वाने होतो.

■ मज्जाधातू – दृष्टीवध

तसेच असार धातूची दुष्टी प्रथम होण्याची शक्यता असते.

रोगचिन्हांचे दोषचिन्ह, धातूचिन्ह असे ? वर्गिकरण करावे. उदा. चिन्हांचे प्रकार

■ दोषचिन्ह ---> दाह – पित्त

■ अवयव चिन्ह ---> वांती – आमाशय

■ धातू चिन्ह – पिंडिकोद्वेष्टन मांसधातू चिन्ह (सं. – आ.प. ऑक्टो. १९६०; आयुर्वेदीय ग्रंथ)

ज्वरातील संप्राप्तीची अवस्था स्पष्ट सांगून त्यांचे विस्तारपूर्वक आणि नेमके विश्लेषण केले आहे. उदा. आमाशयात दोष का व कोठून येतात, स्त्रोतसे कोणती वृद्ध होतात, स्वस्थीस्थानातून अग्नीला बाहेर कोण काढते, ज्वरोष्मा म्हणजे नेमके काय.

स्त्रोतसांचे दोन वेगळे प्रकार सांगीतले आहे.

१) अंतर्मुख – अवयवाकडे येणारी २) बर्हिमुख – अवयवाकडून जाणारी

स्त्रोतस वृद्ध होणे स्त्रोतसाच्या अंत: वरणाला आलेला शोथ. येथे धातूव्यानाच्या सहाय्याने अग्नी बाहेर आणतात. हा नवीन विचार मांडलेला आहे. (सं. आ.प. ऑगस्ट १९६३; ज्वर)

१९५१ साली शास्त्रीजींनी टायफॉईड चे निदान व चिकित्सा यावर लेखमाला लिहिली आहे. तीन लेख या लेखमालेत आहे.

यात एक महत्त्वाचा विचार त्यांनी मांडला आहे, की निदान ॲलोपॅथीक असले आणि आयुर्वेदीय औषधे वापरली म्हणजे आयुर्वेदीय चिकित्सा होत नाही, आयुर्वेदीय दृष्टीने निदान व अवस्था यांचा विचार करणे आवश्यक आहे. आधुनिक व्याधींची आयुर्वेदीय दृष्ट्या निदान पद्धती यात मांडली आहे.

**नवीन विचार –** यात जंतूंची प्रकृती त्यांनी सांगितली आहे. जसे,

| | | |
|---|---|---|
| बॅसिलाय | – | वातपित्तप्रकृतीचे |
| कोकाय | – | कफपित्तप्रकृतीचे |
| spiral bacilli | – | वातप्रकृतीचे – उदा. syphillis, Titanus |

**टायफॉईड –** bacillus ने होतो. म्हणजे वातपित्तज याचे उपप्रकार लक्षणांनुसार सांगितले आहेत.

१) मलावरोध हे लक्षण व इतर वातभूयिष्ठ लक्षणे असलेला ज्वर.

२) अतिसार हे लक्षण व इतर पित्तात्मक लक्षणे असलेला ज्वर.

३) शिर:शूल, नासागत रक्तस्त्राव, पुरळ, यकृत प्लीहावृध्दी इतर रक्तदुष्टीकर लक्षणे असतात.

या ज्वराचे स्थान ग्रहणी – यातील लघ्वंत्र याचा शेवटचा भाग हे पित्ताचे स्थान व बृहद् आंत्राचा सुरवातीचा भाग हे वाताचे स्थान. हा ज्वर भूतजन्य ज्वर, आगंतू आहे. पण नंतर दोषांचा संबंध येऊन निजागंतु असा मिश्र ज्वर होतो.

आयुर्वेदाप्रमाणे व्याधीचे स्वरूप ठरवून मग चिकित्सा कशी करावी याचे वर्णन केले आहे.

उदा. आगंतु ज्वर असल्यास धातू चिकित्सा करावी म्हणजे रक्त प्रसादक, निज असल्यास पित्त प्रधान चिकित्सा करावी.

पुढे त्यांनी व्याधींची लक्षणे सांगितली आहेत. यात अलोपॅथीची लक्षणे दोषचिन्हे,धातूचिन्हे, अवयवचिन्हे अशी वर्गिकरण स्वरूपात मांडली आहेत.

उदा. – प्रलाप – दोषचिन्ह – वाताचे

रक्तपित्त– धातूचिन्ह – रक्तधातूचे

नेफ्रायटिस अवयवचिन्ह मूत्रपिंडाचे

यात रक्तधातू संबंधी ज्वर असेल तर अंगावर मोत्यासारखा पुरळ येतो असे वर्णन केले आहे.

व्याधी निदान करण्यापूर्वी आमनिराम दोषचिन्हे, मलचिन्हे, धातूचिन्हे, अवयवचिन्हे यावरून ज्वराचे स्वरूप ठरवावे व लंघन सुरू करावे हे सूत्र ते सांगतात. बाह्य साधनांवाचून निदान अडवू नये. (सं. – आ.प. ५१; टायफॉईड)

## आवृत वात :

आवृत वात याचे विवेचन करतांना प्राणवृत व्यानाचे उदाहरण दिले आहे.

उदा. प्राणावृत व्यान म्हणजे प्राणाने व्यानाचे आवरण केले आहे. प्राण आवरक तर व्यान आवार्य आहे.

भूमितीचे प्रमेय सिध्द करावे तसे मुद्देसुद स्पष्टीकरण येथे आढळते.

चिकित्सा करतांना प्रथम आवरकाची चिकित्सा करावी. त्याचे स्थानाची चिकित्सा करावी असे ते सांगतात. उदा. येथे आवरक प्राण आहे. म्हणून प्राणाचे स्थान मूर्ध = शिरस्थानाची चिकित्सा म्हणजे नस्य, कर्णपूरण, इ. करावे.

येथे आवृतत्व ही संकल्पना व त्यातील लक्षणांमागील कार्यकारणभाव स्पष्ट केला आहे.

विशिष्ट हेतू सेवन जन्य आक्षेपकाचे वर्णन केले आहे. याची संप्राप्ती वर्णन केली आहे.

❖ अती कटू रस सेवनाने वाताचा तीव्र प्रकोप होतो. येथे मिरची या कटू रस व कटू विपाकी द्रव्याने तीव्र वातवृध्दी होऊन शिरस्थ धमनी दुष्टी होऊन आक्षेपक होतो.

❖ वात प्रकोप होतांना केवळ व्यानाची दुष्टी असेल तर फक्त कंप हे लक्षण दिसते. पण प्राण व व्यान दुष्टी असेल तर संज्ञानाश व सकष्ट श्वसन ही लक्षणे आढळतात. ही कल्पना अधिक सुस्पष्ट वर्णिली आहे.

❖ तसेच स्थान विचार करतांना शिरस्थान हे वायूच्या दृष्टीने प्राणाचे व धातूच्या दृष्टीने रक्तमज्जेचे स्थान आहे ही अंशांश कल्पना चिकित्सेची दिशा ठरवण्यास उपयुक्त आहे. (सं. – मार्च ६४; ''मिरचीच्या अतिसेवनाचा अनिष्ट परीणाम आक्षेपक'')

## व्याधी वर्गीकरण :

वेणीमाधवशास्त्रींनी व्याधींचे वर्गिकरण नवीन दृष्टीने केलेले आहे.

१) शोधनात्मक व्याधी – रक्तपित्त, अतिसार,इ. ज्यात शरीरच शोधन करीत असते. अशा व्याधीत रक्तमोक्षणाची आवश्यकता नसते.

२) संचयात्मक – विसर्प, विद्रधी, गुल्म यांत विशिष्ट स्थानात दोष संचित होतात. यांत रोगस्थानातूनच रक्तमोक्षण करावे.

३) सर्व शरीर व्यापी – यातही रक्तमोक्षण उपयोगी ठरते. (सं. – आ.प. ऑगस्ट ७२; रक्तमोक्षणाची)

### निदान संदर्भात :

शरीर वचनांचा निदान चिकित्सासाठी उपयोग करावा हे सोदाहरण स्पष्ट केले आहे. उदा. 'मेदसः स्नेहमादाय सिरास्नायुत्वमाप्नुयात्'

अर्थ – वायू मेदाच्या स्नेहापासून सिरा स्नायू उत्पन्न करतो.

निदानात उपयोग – नाडी परीक्षेने निदान करण्यासाठी ?

स्थूल व्यक्तीत मेदोवृध्दी अधिकाअधिक कोऊन स्त्रोतोरोध होतो. पूढील धातूंची निर्मिती सम्यक होत नाही. उपधातू म्हणजे स्नायू सिरा यांचेही पोषण होत नाही.

स्त्रियांमध्ये, मृदुपाकी सिरांचे अस्तित्व स्नायूंपेक्षा अधिकाअधिक असते. पण सिरा अबल झाल्या तर शोथ विकार होतो. अशावेळी चिकित्सा म्हणून सुंठ द्यावी. यामुळे मेदोपचन, होऊन स्त्रोतोरोध नाहीसा होतो.

### चिकित्सा :

वेणीमाधवशास्त्री यांनी प्रथम चिकित्ससेचे अधिष्ठान जो 'पुरूष' त्याचा विचार कसा करावा याचे मुख्यतः मार्गदर्शन केले आहे.

१) षड् धातुक पुरूष   २) एकधातुज – चेतनाधातु पुरूष   ३) चतुर्विंशतिक पुरूष.

नवीन विचार –

१) प्रत्यक्ष चिकित्सा करतांना, कोणत्या प्रकारची चिकित्सा देतांना कोणत्या पुरूषाचा विचार करावा हे मार्गदर्शन त्यांनी केले आहे. उदा. दोषवैषम्यज किंवा धातूवैषम्यज विकारांत षड्धातुक पुरूष विचार करावा. तर महाप्रकृती विकार म्हणजे मानसदोषप्रकृती विकार, असार धातुचिकित्सेत आणि नैष्ठिकी चिकित्सेत चतुर्विशतिक पुरूष विचार करावा. (आ.प. मार्च ७१; चिकित्साधिष्ठान पुरुष).

२) चिकित्सेने नेमके काय कार्य घडते याचे स्पष्टीकरण ही नवीन आहे. उदा.प्रकृती स्थापनी चिकित्सेने शरीर दोषांचे जन्मतः असलेले वैषम्य नष्ट होते दोषसाम्य होतो. पण मानस दोषांचे वैषम्य तसेच राहते. या मानसदोष प्रकृती म्हणजेच महाप्रकृती. षड्धातुक पुरूषात पंचमहाभूतांना अधिक महत्त्व येते, तर चतुर्विशतिक पुरूषात मन, इंद्रिये, इ. ना अंशात्मक महत्त्व अधिक असते म्हणून हा विचार.

३) चिकित्सादेण्यापूर्वी व्याधी स्थानिक आहे की सार्वदेहिक व्याधी अवस्था आहे की नाही हा विचार केला आहे.

४) चिकित्सेमध्ये स्थान विचाराला महत्व दिले आहे. पथ्य व अनुपान, औषधकाल यासाठीही स्थानविचार प्राधान्याने केला आहे.

५) पंचकर्मातही स्थान विचार प्राधान्याने केला आहे. उदा. रक्तमोक्षणात दूषितस्थानातून रक्तमोक्षण केले आहे.

६) चिकित्साक्रम पुढील प्रमाणे आढळतो –

१) प्रथम स्त्रोतो शोधन  २) दोषपाचन  ३) धातूपोषण  ४) रसायन

७) आवृतवायूच्या चिकित्सेत प्रथम आवरकाची व नंतर स्थान चिकित्सा करावी असे म्हणतात (सं. – आ.प. मे ८४, आवृत वायू..... शंका)

८) प्रकृती स्थापनी चिकित्सेने धातू सम होतात पण उत्तम सार होत नाहीत त्यासाठी रसायनी चिकित्सा करावी.

चिकित्सेत दोष साम्या सहच असार धातूंना सारत्व प्राप्त करून देणे, त्यासाठी रसायन चिकित्सा करणे हा विचार आढळतो. रसायनाचे कार्यही ते स्पष्ट करतात. रसायन हे केवळ भौतिक अंशांपेक्षा अभौतिक अंश जसे मेधा, स्मृति, बल, वाक्‌सिध्दी, इ. भावही वाढवते.

देशविचाराचे महत्त्व विशद करणारा लेख. चिकित्सा करतांना देशविचार करून रूग्णाचा व्याधी बरा होण्याच्या दृष्टीने योग्य देश सुचविणे आवश्यक आहे असे ते म्हणतात. जसे क्षयाच्या रूग्णांसाठी पांचगणी, तळेगाव; मधुमेहासाठी नगर, सोलापूर, अकोला, इ.

## चिकित्सा

चिकित्सा विषयावर वेणीमाधव शास्त्रींनी विपुल लेखन केलेले आहे. त्यांचे एकंदर २२ लेख आहेत. यांपैकी टायफॉर्डच वर तीन लेख आहेत तर ज्वरावर १० लेखांची मालिकाच आहे. यात हेतू–संप्राप्ती ते निदान लक्षणे असा पूर्ण विचार केलेला आहे. त्याचप्रमाणे शुभदाताईंचेही सहा लेख आहेत. त्यांनीही 'कॅन्सर' विषयावर मालिका लिहली आहे.

टायफॉईडची चिकित्सा ही लक्षणांनुसार करावी हे सूत्र त्यांनी सांगितले आहे.

ॲलोपॅथीच्या काही द्रव्यांचा समावेश बाह्यत: केलेला दिसतो.

उदा. आभ्यंतर रक्तस्त्रावात पोटावर चंदन कापूर मिश्रित पाण्याची घडी ठेवावी. यात पाण्यात स्पिरीट किंवा कोलन वॉटर ही टाकावे.

- Tenderness, gargaling इ. परीभाषांचाही वापर आढळतो.
- आहारीय चिकित्सेवर (आहार + औषधे) भर दिलेला आढळतो.

उदा. सामान्यत: ज्वरात मोसंबीरस दिला जातो. पण विषमज्वरात मोसंबी देऊ नये. कारण ती गुरू आहे. (सं. – आ.प. नोव्हें. ५१; टायफॉईड)

व्याधीतील चिन्हांना ते शरीराची सांकेतिक भाषा म्हणतात. त्यांचा अर्थ समजला तर योग्य चिकित्सा होते. येथे नाकाला आर्द्रता मापक यंत्राची उपमा दिली आहे. तसेच नाकाला मलद्वार म्हंटले आहे त्याव्दारे वायूरूप आणि द्रवरूप मल बाहेर टाकला जातो. मांसधातू दूषित असेल किंवा मांसाग्नि दुर्बल असेल तर वारंवार पडसे येते. तर चिकित्सा देतांना स्थानिक, सार्वदेहिक; व्याधीअवस्था असतांना, व्याधी नसतांना करावयाची चिकित्सा असाही विचार आढळतो. आहारीय द्रव्यांचा वापरही औषधांच्या जोडीला आढळतो. उदा. आम्ल व मीठ घातलेले पदार्थ अधिक घ्यावेत. (तेजो गुण भूयिष्ठ म्हणून यांचा वापर सांगितलेला असेल असे वाटते). हरबरायूष, कोवळा मुळा, कुळीथ यूष प्रक्षेपासह, गूळ, फुटाणे, मिरे अशी द्रव्ये, जव, गहू यांचा आहारात वापर ते सांगतात. धुम्रपान, नस्य याचा वापरही चिकित्सेत आढळतो. धूमंपानासाठी नवसागराचा प्रयोग सांगितला आहे. हा प्रयोग नवीन आहे. वमनाचा उल्लेख आहे पण ते रूग्णास घरीच पाणी पिऊन वमन करण्यास सांगतात किंवा ryles tube ने आमाशयधावन करावे असा सल्ला देतात. शास्त्रोक्त वमन केलेले आढळत नाही. सद्य:स्नेहन मात्र केलेले आढळते. (सं. – आ.प. मार्च ४८; ''वारंवार येणारे पडसे'')

व्याधीचे साध्या साध्यत्व ठरवतांना धातुगत दुष्टीचा विचार केलेला आढळतो. (पांढरे कोड यात) रक्तगत पेक्षा मांसगत आणि मांसगत पेक्षा मेदोगत कुष्ठ कष्टसाध्य ठरते. तसेच एकमेकांना जोडून नसलेले डाग लवकर बरे

होतात. उपचारात शोधन चिकित्सा वमन, विरेचन आणि विशेषत: रक्तमोक्षणावर भर आढळतो. शमन चिकित्सेत लंघन, बावची व खैर यांचा अन्नपानात वापर सांगितला आहे. (सं. आ.प. ऑक्टो.४८; पांढरे कोड)

सिध्दौषधींमध्ये सुवर्णमक्षिक भस्म, कासीस भस्म, रौप्य भस्म ही ग्रंथोक्त चिकित्सा सांगितली आहे. रौप्य वापरतांना पारद कल्पांसह रससिंदूर किंवा कज्जलीसह द्यावे तसेच चिरकालीन रोगात रौप्य उपयुक्त आहे हेही शास्त्रवचन ते सांगतात. नाग रसायन, श्वित्रारी रस, खगेश्वर रस वापरला जातो.

यात त्यांचे अनुभव ही त्यांनी सांगितले आहेत जे वैद्यांना प्रॅक्टिस मध्ये उपयुक्त ठरतील -

१) खगेश्वर खल्वी पध्दतीने न करता कुपीपक्व पध्दतीने करावे. यात गलस्थ रससिंदूर व तलस्थ कासिस भस्म तयार होते. या कासीसाने मळमळत नाही. कासीस व रससिंदूर एकत्र खलून वर्धमान प्रयोगाने रसाप्रमाणे वापरावे हा हमखास गुणकारी नवीन योग त्यांनी वर्णिला आहे.

२) श्वित्रात बाह्य लेप टाळावेत. त्याने विकार अधिक क्षुब्ध होतो. तसेच रक्त स्त्रुति न कराता लेप लावल्यास व्याधी वाढतो. असे त्यांनी मुद्दाम नमूद केले आहे.

३) धातुगतत्व व दोषानुसार औषधी निवड कशी करावी हेही विशेष आहे.

- ✳ खैर मेदोगत आणि रक्तगत कुष्ठावर पित्तज कुष्ठात उपयुक्त आहे.
- ✳ बावची मांसगत व वातज कुष्ठात उप. योगी रक्तगत व पित्तज. कुष्ठात वापरू नये.
- ✳ मलबध्दता असेल तर सुरवारी हिरडा/ गोमूत्र वापरावे. (सं. - आ.प. ऑक्टो. ४८; पांढरे कोडे)

मिरची सेवन जन्य आक्षेपकाच्या चिकित्सेत पथ्य व अनुपान विचार करतांना दोषप्राधान्य व स्थानविचार केलेला दिसतो.

उदा. १) महायोगराज गुग्गुळ - व्यान व उदान काली - वातनाशन व बलवर्धक रसायन कल्प.

२) दालचिनी + लवंग + ओवा + पुस्कर मूळ - प्राणकाल - तूपसाखरे सह यात दालचिनी, लवंग- शिर: शूल नाशक, शिरस्थ वातनाशक आहे.

३) आरोग्य वर्धिनी मल शूध्दीकर, पित्तशामक - स्वप्न काली दिली; तिक्तरस स्वप्न काली दिला तर शिरस्थानावरही कार्य होते व रक्तदुष्टी कमी होते.

उपशय-अनुपशयावरून चिकित्सेत बदल कसा करावा याचेही मार्गदर्शन त्यांनी केले आहे.

सदर रूग्णेत अल्प उपशय असल्याने अपानवायूची मूळ विकृती होती म्हणून प्रथम अपान चिकित्सा केली. यात पुढील नवीन कल्पाचे वर्णन आहे.

१) तिळतेल व दालचिनी, ओवा तैलाची दुग्धशर्करा गरम पाण्यात मिसळून बस्ति दिला.

२) मज्जायोग या अनुभविक कल्पाचेही वर्णन - कासीस भस्म १ भाग+ मुस्ता ४ भाग + आमलकी ४ भाग + गुळवेल सत्व ४ भाग - (शिर:शूलासाठी) सामुद्गकाली सघृत. (सं. - आ.प. मार्च ६४; मिरची अतिसेवनाचा परिणाम आक्षेपक)

## हृद्रोग :

या संदर्भातील एका लेखात १६ वर्षाच्या मुलीची केस वर्णित आहे. तिला छातीत कळ येणे, श्रम, श्वास,अपस्मार अनियमित रज:प्रवृत्ती अशी लक्षणे होती. (सं. - आ.प. १५ फेब्रु. ८०; असाध्य हृद्रोग)

या मध्ये प्रथम अपस्माराची चिकित्सा व नंतर हृद्रोगाची चिकित्सा दिली आहे. एकंदर सगळा चिकित्साक्रम बघितला तर प्रथम स्त्रोतोशोधक नंतर दोषपाचक नंतर धातूपोषक मग रसायन असा क्रम आढळतो. उदा. अपस्मार चिकित्सेसाठी –

✳ प्रथम पुरीष शोधक व रजः शुध्दीसाठी –

कृमिकुठाररस + काळाबोळ अनशापोटी सकाळी कोष्ण जलासह.

✳ दोषपाचक म्हणून – विडंग + हरीतकी + ब्राम्ही + शंखपुष्पी + गुडुची + यष्टी + काडेचिरायत + चंदन, विश्व आमलकी मुस्ता + पळसपापडी. यांचा काढा घृतासह दिला.

यांत हिरडा – मेंदूतील अपस्मार दोष शोषक; गुळवेल + आमलकी + मुस्ता – मेंदूतील मज्जादोषपाचक; काडेचिरायत + चंदन विश्व + आवळा – अस्थिगत दोष पाचक. विशिष्ट द्रव्याचे दोष कमी करण्यासाठी ही काही द्रव्यांचा वापर यात केलेला दिसतो. जसे हिरडा रज कमी करणारा म्हणून कृष्णबोळ वापरला.

✳ गुरूवर्य वायवारूंच्या धातूपाचक काढ्यांचा/ योगांचा वापरही येथे केलेला दिसतो.

✳ धातूपोषक म्हणून – १) लमावसंत + नवायस + तंतुपाषाण भस्म, उदान व स्वप्नकाली ब्राह्मीरसासह

यात लघुमालिनी वसंत – सार्वदेहिक वाढीसाठी; नवायस–शिरोरोगात रक्तदुष्टी प्राधान्य असते नवायस आणि रक्तदोषपाचक व रक्तवृध्दीकर आहे म्हणून. तंतुपाषाण भस्म हे नवीन औषध वापरले आहे.

पोषक विचार करतांनाही स्थान विचार, तेथील दोष, तेथील धातू यांचा विचार केलेला दिसतो.

✳ रसायन व अपस्मार नाशक – वेखंड तेल नस्य म्हणून दिलेले दिसते.

नस्य इ. पंचकर्मे किंवा इतर कर्मे करतांनाही प्रथम शोधन व नंतर पोषण असा विचार केलेला दिसतो. उदा. प्रथम स्त्रोतोशुध्दीसाठी – अणूतेल नस्य.

✳ नंतर धी, धृती, स्मृती पोषक – षट्बिंदूतेल नस्य वापरलेले दिसते.

✳ सार्वदेहिक दोष कोष्ठात येऊन बाहेर घालवण्यासाठी घर्षण चिकित्सा दिली आहे. रुग्ण कृश, नाजूक असल्यामुळे रेशमी वस्त्राने घर्षण दिले आहे.

✳ अपस्मारकर, शिरः स्थानातील दुष्टरक्त शुध्दी साठी भ्रुमध्य व हनुसंधी येथून रक्तमोक्षण तसेच घर्षण व नंतर रक्तपोषक म्हणून नवायस अशी योजना केलेली आढळते.

✳ पंचकर्म करतांना ही शोधन, बृंहण तसेच स्थान विचार केलेला दिसतो.

अपस्मार बरा झाल्यानंतर हृद्रोगाची चिकित्सा केलेली दिसते. हृद्रोगाच्या चिकित्सेतही प्रथम हृद्शोधक नंतर बल्य व रसायन औषधे दिल्याचे आढळते.

✳ हृद्शोधक – आरोग्यवर्धिनी यातील ताम्रभस्म – विषनाशक, रक्तदुष्टीनाशक, विरूध्द आहार जन्य विषनाशक

✳ हृद् बल्य व रसायन – सुवर्णमालिनी वसंत – रसायन काली
मृगशृंग– व्यान , उदानकाली, पानफुटी रसासह.

✒ अनुपानाची योजना ही हृद्बल्य असा विचार करून दिलेली दिसते.

येथे हृदय व फुफ्फुसावर कार्यकारी म्हणून पानफुटी वापरली आहे. (सं. – आ.प. १७ फेब्रु. ८०; असाध्य हृद्रोग)

हृद्रोगाचा हेतू म्हणून माशांचा गंध असा विचार त्यांनी मांडलेला आढळतो. व देशबदल ही चिकित्सा दिल्याचे आढळते. यासहच तालभस्म विषशोधक (गरविष व विरुध्दान्नज विषनाशक) म्हणून वापरले व नंतर हृद्य, रसायन म्हणून कासीस भस्म, मृगशृंग, सुवर्णभस्म वापरले आहे. (सं. – आ.प. सप्टें. ८४; जन्मतः उत्पन्न हृद्रोग)

**शिर: शूल** चिकित्सेमध्ये विस्तृत आहार विहारज हेतू विचार केलेला दिसतो. संप्राप्ती मध्ये व्याधीस्थान विचार तसेच दूषित स्त्रोतस/कला विचार केलेला दिसतो. उदा. शिर:शूलांत शिरस्थानातील रक्त व वातप्रकोप कारणीभूत असतो म्हणून रक्तशोधन व रक्तधराकलेवर कार्य करणारी रक्तप्रशमन द्रव्ये वापराली आहेत.

रक्तधराकलेवर कार्य करणारी द्रव्ये म्हणजे अर्णशुक्ती, ताम्रभस्म व आरोग्यवर्धिनी.

त्याचप्रमाणे स्थान विचार लक्षात घेऊन पंचकर्म विचार किंवा औषधीकाल ठरविलेला दिसतो. येथे शिर:स्थानावर कार्यकारी म्हणून नस्य व उदान, स्वप्नकाली औषधे असा विचार आढळतो. (सं. – आ.प. सप्टें. ८१; रक्तावृत्त प्राण उदान प्रकोपज शिर:शूल)

## आवृतवात :

आवृत्तवात म्हणजे विषमज्वरासारखाच वेगाने येणारा व वेग संपताच नाहीसा होणारा विकार आहे. यात एका दोषाची वृध्दी होते. तो प्रकोप होऊन प्रसरण पावतो आणि दुसऱ्या दोषावर किंवा धातूवर आक्रमण करतो. त्या दुसऱ्या दोषाचे कार्य नष्ट करतो. तत्कालिक चिकित्सेने ते आक्रमण एकदम कमी होते.

शास्त्रात वर्णित नसलेल्या अपानावृत प्राण असे एका रूग्णाचे निदान त्यांनी केले आहे. येथे आत्ययिक चिकित्सा म्हणून अपान अनुलोमनासाठी

- ✳ प्रथम एरंडेल + सैंधव मात्राबस्ति, नंतर शिकेकाई क्वाथाचा निरुह दिला आहे. नंतरच्या चिकित्सेत
- ✳ हिंग्वाष्टकचूर्ण, मनुका व खजूर यांच्या वाटणातून अपानकाली दिले आहे. येथे मनुका, खजूर दोन्हीही मल वातानुलोमक द्रव्ये वापरली आहेत.
- ✳ 'अभ्यंग' प्राणाचे बल वाढवणारे आहे असा उल्लेख आढळतो. त्याचे स्पष्टीकरण करतांना ते सांगतात की त्वचा स्पर्शग्राही इंद्रिय आहे. आणि स्पर्शनेद्रिंय प्राणाचे आहे. म्हणून अभ्यंग प्राणावर कार्यकारी ठरते. येथे संपूर्ण वातशामक चिकित्सा दिलेली आढळते.
- ✳ उदा. महानारायण तेलाने अभ्यंग, कर्णपुरण, नस्य, महानारायण व माषसैंधव तेलाचा योनीमध्ये पिचू,
- ✳ शुक्रक्षीण रूग्णा म्हणून वृष्यवटी
- ✳ वातशामक आहार योजना केलेली दिसते. (सं. – आ.प. मे ८४; आवृत वाता निरजव चिकि.)

## कॅन्सर :

कॅन्सर सारख्या असाध्य रोगातही त्यांची विचारांची एक विशिष्ट बैठक आढळते. मानेच्या गाठी व जांघेत गाठी असलेल्या, आधुनिक शास्त्राने कॅन्सर असे निदान केलेल्या रूग्णात व्याधी स्थानाचा विचार करून औषधीकालांची योजना केलेली दिसते.

- ✳ प्रथम आरोग्यवर्धिनी – संप्राप्तीनाशक औषध.
- ✳ गंडमालाकंडन रस – ग्रंथीनाशक व्याधीप्रत्यनिक औषध.

* चंद्रप्रभा – मान व काखेतील गाठींसाठी – प्राण व उदान क्षेत्रातील व्याधी म्हणून औषध काल उदान व स्वप्नकाल.
* प्राणवल्लभ व आरोग्यवर्धिनी – जांघेतल्या गाठीसाठी म्हणून अपानकाली दिली आहे. याच रूग्णात पलाशमषीचा वापरही दिसतो. (सं. – जुलै ८३; 'असाध्य रोगांची सफल चिकित्सा')

शुभदाताई कॅन्सर संबंधी आयुर्वेदीय विचार मांडतांना त्या लिहितात की, कॅन्सर विशेषजन्य संचयात्मक व्याधी आहे. यात कफप्रधान त्रिदोषांचा प्रकोप होऊन विशेषत्वाने कफ, रक्त, मांस, मेद, शुक्र यांची दुष्टी होते. ओजाचीही दुष्टी होते. शुक्रधराकाला सर्व शरीर व्यापी असल्याने वाढ झपाट्याने पसरते. कॅन्सर इतर ग्रंथीप्रमाणे केवळ जड घटकांचा संचयात्मक व्याधी न राहता यातील प्रत्येक घटक जणू स्वतंत्र सूक्ष्म जीवच आहे असे भासते.

कफस्थानी, कफधातूघटीत अवयवात व मर्मस्थानी झालेला कॅन्सर असाध्य होय.

याविकारात कफधातूच तयार होत नाही व शुक्रही दुष्ट असतो म्हणून शरीराचे बल कमीच असते.

## स्वस्थवृत्त संदर्भात :

**स्वस्थवृत्त विषया संदर्भात व्याख्याने व लेखनातून** त्यांनी समदोषप्रकृती, वय:स्थापन, प्रकृती स्थापन चिकित्सा, निरोगी कोणास म्हणावे ? प्रसन्नात्मा कशावरून समजावा, इ. व्यवहारात उपयोगी विषयांवर मार्गदर्शन केलेले आहे.

स्वस्थ व्यक्ती कायम स्वस्थ राहण्यासाठी काय करावे याचे मार्गदर्शनच यातून केलेले आहे. उदा.प्रकृती स्थापनी चिकित्सा. स्वभाव बदलण्यासाठीही याचा उपयोग करता येतो जसे वातप्रकृती रूग्णात धातूक्षीण असल्याने सतत दुसऱ्याचे हवे ही इच्छा निर्माण होते. चोरीची वृत्ती वाढते. अशावेळी धातूपोषक व बृंहण चिकित्सा दयावी.

तिन्ही प्रकृतीच्या व्यक्तींसाठी स्वयंपाक कसा करावा याचेही विवेचन केले आहे. जसे एकांत हितकर द्रव्ये घेऊन त्यावर प्रकृतीनुसार संस्कार करावेत.

स्वस्थ व्यक्तीची दोषानुसारीप्रकृती, धातूंचे सारासत्त्व आणि त्यानुसार आवश्यक गुणांच्या पदार्थांची योजना ही विचारसरणी आढळते.

नवा महाराष्ट्र यांत त्यांनी 'घरे कशी बांधांवी' यावरही लेखन केल्याचा उल्लेख मिळतो.

नेहमीच्या वापरातील त्याच त्याच भाज्या, पदार्थ खाण्यापेक्षा आजूबाजूच्या वाया जाणाऱ्या अनेक वनस्पती नियमित आहारात आणाव्यात. जसे कवठ, चिकणाबी, शेंबर्टी, आंब्यांची कोय, असे ते म्हणताता. (सं. – आ.प. सप्टें. १९५६; स्वस्थवृत्त)

याच संदर्भात त्यांनी अजून एक महत्त्वपूर्ण विचार मांडला आहे. बरेचदा आपण तेल, तूप मिळत नाही म्हणून तक्रार करतो. आणि लाल भोपळा, पांढरा भोपळा, काकटी, टरबूज, खरबूज, वाळूक यांच्या स्निग्ध बीया फेकून देतो.

आबईच्या कोवळ्या पानांची भाजी, बीयांची उसळ, द्विदल धान्यांची पीठे दळून त्याचा वापर केला पाहिजे. टाकळा खंडोगणती वाया जाते. त्याचा वापर करावा. आपल्या आजूबाजूला जीजी द्रव्ये उपलब्ध होतात त्यांचा वापर केल्यास विनामूल्य, विनाप्रयास आरोग्य मिळवू शकू.

याचप्रमाणे कमळबीज, कवठ, आंब्याची कोय, तालीमखाना, चिकणाबी, रानभेंडी, शेंबटी यांचे प्रचलन वाढवायला हवे. (सं. – आ.प. १६ डिसें. ४९; शक्तीदायक हिवाळा व पूरक अन्ने)

आजच्या काळात जेव्हा केवळ ठराविक भाज्यांचेच प्रचलन आहारात आहे, तेथे हा विचार खूप महत्त्वाचा आहे.

## संशोधन संदर्भात :

आयुर्वेदात संशोधन व्हावे हे आपण नेहमीच ऐकत आलो आहोत किंवा म्हणत आहोत. पण त्या दृष्टीने नेमके काय करावे ! याबद्दल अजूनही संभ्रमावस्था आहे.

संशोधन म्हणजे आधुनिक विचारसरणीने की आधुनिक यंत्रांनी की आयुर्वेदीय पध्दतीने संशोधन व्हावे असा संभ्रम असतो.

वैद्य वेणीमाधवशास्त्रींनी त्यांच्या लेखनातून यावर बराच प्रकाश टाकलेला आहे. उदाहरणे देऊन हा विषय स्पष्ट केला आहे. १९४८–४९ च्या काळातील त्यांची मते आजही तेवढीच उपयुक्त आहेत, दिशादर्शन करणारी आहे.

आयुर्वेदीय संशोधन कसे व्हावे ! कोणत्या क्रमाने व्हावे ? कोणी करावे ? पारद संशोधन योजनेत त्यांनी केलेले कार्य यावर त्यांनी लिखाण केलेले आढळते.

वैद्य धामणकरांनी आयुर्वेदीय औषधांवर लिहलेल्या निबंधावर परीक्षणात्मक प्रतिक्रीया या संदर्भात त्यांनी लेखन केले आहेत. त्यांच्या कार्याचे, मेहनतीचे त्यांनी कौतुक केले आहे पण चुकांवर आक्षेप घेऊन, नेमके काय करायला हवे होते याबद्दल योग्य मार्गदर्शनही केले आहे. त्यावरून त्यांची संशोधनाबद्दलची भूमिकाही स्पष्ट होते.

आयुर्वेदात, ‘मानवी शरीरावर होणारे परीणाम’ हा विचारांचा मुख्य केंद्रबिंदू धरून काम करावे असे ते म्हणतात. केवळ प्रयोग शाळेतील निरीक्षणे धरू नये. उदाहरणादाखल सुवर्णमाक्षिकात सुवर्ण नाही, लोहाचा अंश आहे म्हणून ते लोहाचा उपधातू धरावे. या धामणकरांच्या निष्कर्षावर आक्षेप घेऊन, सुवर्णमाक्षिकात सुवर्णाचे अंश जरी प्रत्यक्ष नसले तरी सुवर्ण आणि सुवर्णमाक्षिक हे गुणधर्म शास्त्राच्या दृष्टीने समान गुणकर्माचे असल्याने ते जवळचे येतात व ‘‘कांचनाभावे स्वर्णमाक्षिकम्’’ हा आयुर्वेद प्रकाश मधील ग्रंथाधारही देतात. आयुर्वेद ‘घटकसामान्य’ ला महत्त्व देत नसून ‘गुणसामान्य’ ला महत्त्व देते,

याचप्रमाणे असात्म्य द्रव्य किंवा आहार, औषध म्हणून कार्य करते या विधानावरही आक्षेप घेऊन वर्धमान पिप्पली किंवा ज्वरातील पेयादी कल्पना यामागिल चरकाचार्यांची सात्म्यकल्पना स्पष्ट केली आहे. भस्मीकरण, अमृतीकरण आणि अनुपान यामागेही ‘सात्म्यता’ हाच हेतू असल्याचे ते स्पष्ट करतात. (सं. – डिसें. ४८ व जाने ४९; आयुर्वेदीय औषधी संशोधन)

आयुर्वेदीय संशोधन कोणत्या क्रमाने व्हावे या बाबतही त्यांनी लेखन केले आहेत. त्यातील काही मुद्दे बघण्यासारखे आहेत.

१) प्रथम ग्रांथिक संशोधन करावे

- ❖ सर्व प्रकारच्या वाड.मयातून आयुर्वेदाशी संबधित वचनांचे एकत्रीकरण करावे.
- ❖ त्यांचे निदान, चिकित्सा असे वर्गीकरण करावे.
- ❖ रोग, कारणे, अवस्था, त्यांचे उपचार यानुसार यादी करावी.

- ❖ नंतर त्यानुसार रुग्णांवर प्रयोग करावेत.

२) रोगकारक द्रव्यांच्या रोगकारकत्वाचे संशोधन करावे. उद्धा. दही कुष्ठकर. म्हणून कुष्ठ पिडीत व्यक्तींच्या हेतूंचा अभ्यास करावा.

३) दीर्घायुषी आणि अलौकीक कर्तृत्ववान व्यक्तींचे परीक्षण करून त्यातील कार्यकारण भाव तपासावा. प्रामुख्याने पुढील गोष्टींचे परीक्षण करावे.

- ❖ त्यांचे शरीर, मन, प्रकृति, सारासारत्व, संहनन.
- ❖ त्यांच्या मातापित्यांचे आहारविहार, सवयी, व्यसने.
- ❖ सार किंवा असार धातूंचे व्याधी होऊन गेले काय.
- ❖ रसायन द्रव्यांचे सेवन आढळते का ?

हे परीक्षणाचे काही नवीन मुद्दे आढळतात आणि मुख्यतः यांचा उपयोग राष्ट्राला उपयुक्त कसा होईल याचा विचार त्यांनी केलेला आढळतो. विश्वासाठी, देशासाठी आयुर्वेद उपयुक्त कसा होईल हा विचार. त्यांच्याच भाषेत बोलायचे झाले तर त्यांचे मज्जासारत्व येथे व्यक्त होते.

४) वनस्पतींचे संशोधन करावे. यासाठी समाजातील साक्षात् रोग न झालेल्या, तिन्ही प्रकृतीच्या तरूण लोकांची निवड करून त्या व्यक्तीत जे गुण वाढले आहेत त्याच्या विपरीत गुणांची वनस्पती वापरून तिच्या गुणांचे प्रत्यंतर घ्यावे.

५) खनिजद्रव्य व सिद्धोषधींचे संशोधन. साधारणतः २५ वर्षे तरी यासाठी कार्य होणे आवश्यक आहे असे ते म्हणतात. (सं. – आ.प. सप्टेंबर ४१; आयुर्वेदीय संशोधन कोणत्या क्रमाने व्हावे)

आयुर्वेद संशोधन म्हटले की अनेकदा आयुर्वेदीय औषधांचे संशोधन असाच विचार अनेकांच्या डोळ्यांसमोर येतो आणि ते संशोधनही आधुनिक विचारसरणीने किंवा ॲलोपॅथिक पध्दतीने ! यावर टीकात्मक लेख लिहून इतर पॅथींच्या लोकांनी त्यात लुडबुड करू नये असा स्पष्ट ईशाराही त्यांनी दिला आहे. आयुर्वेदीय औषधांचा उपयोग आपल्या पॅथीच्या दृष्टीने करण्यासाठी हे प्रयत्न चालू आहेत असा आरोपही ते करतात.

उलट इतर पॅथीतील औषधांचेच आयुर्वेदीय दृष्टीने परीक्षण/ संशोधन करावे असे ते म्हणतात. इतर लोकांना आयुर्वेदाची केवळ औषधे हवी आहेत आयुर्वेद नको आहे.

आयुर्वेदात संशोधन करण्यासाठी मुख्यतः 'आयुर्वेद दृष्टी' असणे आवश्यक आहे आयुर्वेदीय रचना, शरीरक्रिया, दोष, दूष्य संकल्पना, रसवीर्य विपाक कल्पना इ. माहित असणे आवश्यक आहे. तरच ते संशोधन योग्य संशोधन होऊ शकते. थोडक्यात वैद्यांनीच हे कार्य करावे असे मत ते मांडतात. (सं. – आ.प. मार्च ५३; आयुर्वेद संशोधन हे वैद्यांचे कार्यक्षेत्र आहे)

नागपूर विद्यापीठात पारद संशोधनावर झालेल्या कार्याची माहिती देतानाच संशोधनात आधुनिक विज्ञानाची मदत नेमकी कशी घ्यायची याचे मार्गदर्शनही आहे. पाऱ्याच्या अष्ट संस्कारांची व्यवहार्यता बघण्यासाठी हा संशोधन प्रकल्प केला गेला. मुंबईच्या इंडियन फार्मा असो. ने नागपूर विद्यापीठाला त्यासाठी आर्थिक सहाय्यही केले होते.

अष्ट संस्कारांचे फलित वर्णन करतांना त्यांनी आधुनिक शास्त्रातील परिभाषेंच्या आधारे ते स्पष्ट केले आहे. यामुळे आयुर्वेदीयांना आपल्या शास्त्रीय विधानांचा अर्थ व त्यांचे मूल्यमापन अधिक सूक्ष्म आणि निश्चित

होईल असे मत ते मांडतात. उदा. स्वेदनाने मल शिथिल होतात म्हणजे पाऱ्याचा मॉलेक्यूल व पाऱ्यात आलेल्या मलरूप द्रव्याचा (शिसे, इ.) मॉलेक्यूल यांचा संयोग स्वेदनापूर्वी जेवढा दृढ होता त्यापेक्षा स्वेदनानंतर कमी दृढ झाला. दोन अणूंमध्ये अवकाश अधिक निर्माण होतो.

संशोधनासाठी आधुनिक उपकरणांचे, यंत्राचे सहाय्य घेण्यास हरकत नाही. असे मत आचार्यांचे दिसते. उदा.

- ❖ पायऱ्याच्या molecule मधील अंतर बघण्यासाठी x-ray refraction वापरावे.
- ❖ पाऱ्याचे स्थिरत्व तपासण्यासाठी संस्कार पूर्व व नंतर viscometer ने तपासणी करावी.
- ❖ शुध्द व अशुध्द मधील तेजस्वीपणातील अंतर पाहण्यासाठी Reflectometer वापरावे.
- ❖ इतर दोष शिसे, इ. काढण्यासाठी निर्गुंडी, लसूण, किती उपयोगी हे पाहण्यासाठी Bio chemistry चा वापर करावा. (सं. – आ.प. ऑक्टों. ७१; आयुर्वेदातील अमोल पारदौषधींचे संशोधन)
- ❖ पाऱ्याची special gravity व % चे प्रमाण तपासावे. आणि या पाऱ्यापासून औषधे तयार करून विविध पारद कल्प, सिंदूर कल्प तयार करून विविध अवस्थांतील रूग्णांत त्याचा प्रयोग करून गुणकर्म तपासावे. यात आयुर्वेदीय दृष्टीने परीक्षण आणि मल, मूत्र, रक्त, कफ, इ. चे पॅथॉलॉजिकल परीक्षण करावे. (सं. – आ.प. ऑक्टो. ७१; आयुर्वेदातील अमोल पारदौषधींचे संशोधन)

खरे तर या दोन लेखांमध्ये आचार्यांच्या विचारसरणीत बदल झालेला आढळतो. धामणकरांच्या निबंधपरीक्षणात आचार्य केवळ आयुर्वेदीयच सिध्दांतांवर भर द्यावा असे म्हणतात तर पारदसंशोधनावरील लेखात आधुनिक शास्त्राची मदत घेण्यास हरकत नाही असे मत मांडतात. या संशोधन प्रकल्प कमिटीत केमिस्ट्री तज्ञ ही होते. कदाचित हा त्यांचा प्रभाव असू शकेल.

## वेणीमाधवशास्त्रींचे विशेष संशोधन :

वेणीमाधवशास्त्रींनी आयुर्वेद चिकित्सा पध्दतीत घातलेली मोलाची भर आणि विशेष संशोधन म्हणजे 'घर्षण चिकित्सा पध्दती' याबद्दल ते म्हणतात की मला शास्त्रमंथनातून जे अनेक कुंभ लागले त्यातील एक घर्षण चिकित्सा कुंभ आहे. या मध्ये हाताने, रेशमी वस्त्र किंवा लोकरी वस्त्राच्या सहाय्याने लाकडी आसनावर बसून सर्व शरीराच्या त्वचेवर घर्षण केले जाते.

येथे त्वचेचे वैशिष्टय त्यांनी सांगितले आहे की त्वचा सर्वत्र दिसायला सारखी पण असायला निराळी, प्रत्येक अवयवावरची त्वचा दुसऱ्या अवयवावरच्या त्वचेपेक्षा भिन्न असते.

घर्षणाचे कार्यकारणभाव सांगतांना ते म्हणतात की, यामुळे उष्णता निर्माण होऊन रसरक्तादी पोषकधातू वाहिन्या व मलमोचक वाहिन्या विस्तृत होतात.

द्रवधातूवहन व दोष, मल वहनही वेगाने होते. तसेच त्वचेतील भ्राजकाग्नि दीप्त होऊन तेथे आलेल्या दोषांचे पचन करतो आणि कोष्ठाग्निही दीप्त होतो.

उद्घर्षण, उत्सादन व उद्वर्तन या प्रक्रियेशी या चिकितसेचे साम्य आहे. इतर व्यायाम, आसने यांचेशी तुलना करता इतर कर्मांचे श्रम इतरत्र होतात. उदा. मल्लखांबाचे व्यायामात श्रम मल्लखांबावर होतात. पण घर्षणात ते श्रम स्वत:च्या शरीरातच उपयोगात येतात. व्यायाम व घर्षण असे दुहेरी फायदे यात मिळतात.

या चिकित्सा पध्दतीचे विस्तृत वर्णन करतांना त्यांनी घर्षणस्थान, परीणाम होणारे अवयव, परिणाम होणारा रोग, घर्षण करताना काय काळजी घ्यावी याचे विस्तृत वर्णन केले आहे. त्याचा तक्ता दिला आहे. जंघा, वृषण, कंबर अशा १६ स्थानांचे वर्णन त्यांनी केले आहे. स्वत: घर्षण करतांना त्या पोझेस घेऊन फोटोही प्रसिध्द केले आहेत.

कोणत्या व्याधीसाठी कोणते साधन वापरावे याचा उल्लेख आहे. उदा. नासार्श किंवा नाकाचे हाड वाढले असल्यास लोकरीवस्त्र वापरावे.

ज्वर असतांना, रक्तज व मांसज दुष्टार्बुद यावर घर्षण करू नये असा उल्लेखही आढळतो.घर्षण करतांना जमीन, भिंत, धातूच्या खुर्च्या, पलंग यांचेशी संपर्क येऊ देऊ नये. शिर:स्थानातील इंद्रिये, अवयव यांसाठी अधिक घर्षण करू नये. त्याचबरोबर निदानकर आहारविहारांचा त्याग करावा. अशा सूचनाही केलेल्या आहेत. प्रत्येक अवयवावर नेमके कसे घर्षण करावे ही पूर्ण प्रक्रिया सांगितली आहे.

काही विशेष रोगांकरीता विशेष स्थाने सांगितली आहेत याचा संदर्भ ग्रंथात वर्णित रक्तमोक्षणाच्या विशिष्ट स्थानांशी असल्याचे ते नमूद करतात. उदा. गलगंड,अपचीमध्ये इंद्रबस्तिच्या खाली २ अंगुले, आंत्रवृध्दीत अंगठ्याच्या वरचा स्नायू येथे रक्तमोक्षण सांगितले आहे. वरील व्याधीत याच स्थानी घर्षण करण्यास वेणीमाधवशास्त्रींनी सांगितले आहे.

या लेखनात हाताच्या संदर्भात त्यांनी काव्यही केलेले आहे. (सं. – आ.प. एप्रिल ते ऑगस्ट ८२; घर्षण चिकित्सा)

## प्रबोधन

### अ) आयुर्वेदीयांना मार्गदर्शक विचार

वैद्य वेणीमाधव शास्त्री आयुर्वेदाच्या प्रचार, प्रसारासाठी कायम झटले. प्रांत वैद्य संमेलनाचे अध्यक्ष असतांना त्यांनी दिलेल्या व्याख्यानातूनही ही तळमळ दिसते.

त्यांची काही व्याख्याने लेख स्वरूपात आयुर्वेद पत्रिकेत प्रसिध्द झालेली आहेत, तर काही विषयांवर त्यांनी लेखनही केले आहे आणि यामार्फत विविध विषय त्यांनी हाताळले आहेत असे दिसते.

मुंबईला प्रभुराम कॉलेजमध्ये **डिसें. १९५२** मध्ये त्यांनी **वाग्भटावर २० व्याख्याने** दिली होती. त्याचा सारांश लक्ष्मीबाई बोरवणकरांनी लिहून पत्रिकेत दिला होता. मार्च १९५३ च्या अंकात तो आला आहे.

एखादया ग्रंथाचे रसग्रहण किंबहूना विवेचन कसे करावे. याचे हे उत्तम उदाहरण होय.

ग्रंथ कसा लावावा, त्याची मांडणी, लेखनपध्दती, क्रम, विषय मांडण्याची पध्दत येथपासून तर स्वत: ग्रंथकर्त्याची लक्षणे ग्रंथावरून समजतात असे ते म्हणतात. ग्रंथकर्त्याचा काल, त्याने लिहिलेले इतर ग्रंथ, त्यातील साधर्म्य किंवा विशेषता, त्याची परंपरा यांचा विचार प्रथम केलेला आढळतो.

ग्रंथाच्या बलस्थानासहच त्याचे दोष कोणते आहेत तेही त्यांनी परखडपणे सांगितले आहे.

ग्रंथ लावतांना ग्रंथाचा मुख्यभाग कोणता हे बघावे. वाग्भटाचे बाबतीत सूत्रस्थान अत्यंत महत्त्वाचे कारण आयुर्वेदाचे सारे तत्वज्ञान त्यात आहे. प्रथम तत्वज्ञान शिकवून मग शारीर शिकवण्याची आयुर्वेदाची पध्दत श्रेष्ठ होय आणि तशीच वाग्भटाची मांडणी आहे. असे ते म्हणतात.

ग्रंथारंभीच्या प्रार्थनेलाही महत्त्व आहे. जसे नंदीवरून नाटकाचा अंदाज येतो. तसेच प्रार्थनेवरून ग्रंथाचे

स्वरूप समजते आणि वाग्भटानेतर अपूर्व वैद्याची प्रार्थना केली आहे. वाग्भट हा कायचिकित्सा प्रधानग्रंथ असून त्यातील अध्यायांची मांडणी ही अतिशय सुसंगत आहे. वाग्भटाचे शरीर स्थान चांगले नाही. त्यात द्वोष आहेत. कारण प्रत्यक्ष ज्ञानाचा अभाव. (सं. – आ.प. डिसें. ७२; वाग्भटावरील व्याख्याने)

'आयुर्वेदाचे शिक्षण कसे व्हावे, आयुर्वेदीय शिक्षक कसा व्हावा या विषयीचे सोदाहरण विवेचन त्यांच्या लिखाणात आढळते. कारण आयुर्वेदाचा प्रचार चांगला होण्यासाठी मूळ विद्यार्थी चांगल्या पध्दतीने तयार होणे आवश्यक आहे. आणि विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षक उत्तम तयार असणे आवश्यक आहे.

हा विषय आजच्या काळातही तेवढाच गरजेचा असल्याचे त्यांचे मत विस्तारश: बघणे योग्य ठरेल. येथे आदर्श शिक्षकाच्या वर्णनासहच चिकित्सेच्या काही टिप्स वेळोवेळी दिलेल्या आढळतात तर काही नवीन विचार ही मांडलेले आहेत. येथे सोपी सोपी उदाहरणे देऊन विषयमांडणी केल्याचे आढळते.

अध्यापका विषयी ते म्हणतात की, अध्यापक हा विषयाचा ज्ञाता, विद्धान तर असावाच त्याबरोबरच वक्तृत्व उत्तम हवे. विद्यार्थ्यांना तो विषय समजावून सांगता येणारा हवा. येथे शब्दासहिष्णुताचा अर्थ सूत्राचे स्पष्टीकरण व्यायामाचा कार्यकारण भाव वर्णिला आहे. (सं. – आ.प. ऑक्टो. १९६०; आयुर्वेदीय ग्रंथ आणि ग्रंथांश...)

यातील अनेक विचार काळाच्या बरोबर किंबहुना काळाच्याही पुढे जाऊन मांडलेले विचार आहेत. उदा. Audio अध्यापन व्हायला पाहिजे असे ते म्हणतात. याच बरोबर अध्यापनासंदर्भात आपली परखड स्वरूपात मतेही मांडली आहेत, यशस्वी चिकित्सक कसे व्हावे याचे मार्गदर्शनही केले आहे.

यातून त्याची आयुर्वेदाबद्दलची तळमळ आढळते.तसेच त्यांची चिकित्सादृष्टीही आढळते. शास्त्रीजी म्हणतात,

- आयुर्वेद कॉलेज मध्ये आयुर्वेद शिकविला जात नाही. म्हणून पदवीधर आयुर्वेद चिकित्सा देत नाहीत.
- विविध विषयांच्या Tapes विद्यार्थ्यांना ऐकवाव्या. काळानुसार शिक्षण पध्दतीत बदल अपेक्षित आहेत.
- विद्यार्थ्यांची ग्रंथावर निष्ठा वाढवावी.
- वाग्भटास गुरू माना.
- आयुर्वेदाखेरीज इतर काही शिकवू नका.
- संशोधन आयुर्वेद पध्दतीनेच करावे. ॲलोपॅथीच्या पध्दतीने ते बालिश होते.
- संशोधनासाठी उत्कृष्ट निदान पत्रके करावी.
- यशाची गुरूकिल्ली –=चिकित्सा सूत्रच.
- प्रथम असार धातूंचे पचन सुधारून चिकित्सा करावी.
- ३५ वर्षानंतर वृष्य औषधे द्यावीत.
- दुर्बल अवयवांना बल देणारी चिकित्सा यासह रोगनाशक औषध दयावे.

Allopathy डॉक्टरांना आयुर्वेद शिकवू नये. कारण त्यांचा मूळचा दृष्टीकोन बदलत नाही. याच लेखात त्यांनी रूग्णालयाचे प्रकार सांगितले आहेत. ती दृष्टीही वैशिष्टयपूर्ण आहे. उदा. ते म्हणतात तीन प्रकारची रूग्णालये असावीत.

१) लोकोपयोगी चिकित्सक रूग्णालय

२) अध्यापन व अध्ययनार्थींना उपयुक्त.

३) संशोधकांना उपयुक्त. खालच्या घ्यावे. विविध स्तरांवर त्यांचे चिंतन, मनन चालू असे, हे यातून दिसून येते. (सं. आ.प. जून ८३; वे.मा.जोशी यांचे मार्गदर्शक विचार)

काही लेखात आयुर्वेदाचे सार वर्णिले आहे. निदान, लक्षणे, इ. विषयीचे थोडक्यात पण नेमके वर्णन केले आहे. काही परिभाषा स्पष्ट केल्या आहेत तर काही नवीन विचार मांडले आहे.

आयुर्वेदीय चिकित्सकाला महत्त्वाच्या टिप्स दिल्या आहेत.

उदा. आयुर्वेदाची लॅब म्हणजे मानवी शरीर.

✳ विकृती व्यक्त करण्याची शरीराची एक परिभाषा आहे. ज्याचा रोगनिदानासाठी उपयोग होतो.

✳ दोष केवळ शरीरातच सापडतात व त्यांच्या प्रकोपाची लक्षणेही शरीरावरच आढळतात.

✳ व्याधीतील लक्षणे ही नैसर्गिकच असतात. उदा. ज्वरातील मलावरोध.
जेव्हा दोषांचे पचन होते तेव्हा आपोआप मलप्रवृत्ती होते. म्हणून दोष पचनापूर्वी एनिमा देऊ नये.

✳ शरीराच्या नैसर्गिक मागणीकडे लक्ष द्यावे. उदा. दूध, तूप आवडत नाही याचा अर्थ शरीरात रूक्षतेची गरज आहे. यावरून कोणत्या गुणांची वाढ झाली आहे. दोषांचा कोणाता ग्रुप वाढला आहे हे लक्षात येते.

✳ शरीरपुष्टीसाठी मांसाद्‌मांस म्हणजे मांस खाणाऱ्या प्राण्याचे मांस उपयोगी ठरते रसवीर्य विपाक विचार – द्रव्य घेतल्यापासून पचनापर्यंत रसाचे कार्य पचनानंतर ते शोषण होऊपर्यंत विपाकाचे कार्य, ते द्रव्य शरीरात असेपर्यंत वीर्याचे कार्य.

✒ **औषधीकल्पाचे कार्यकारीत्व –** कल्क आमाशयावर, काढा आंत्रावर, आसवारिष्टे मध्यम मार्गावर उपयुक्त ठरतात हा नवीन विचार मांडला आहे.

✳ शोधन चिकित्सा हीच खरी चिकित्सा होय. आयुर्वेदाची खरी चिकित्सा म्हणजे पंचकर्म चिकित्सा. पंचकर्मापूर्वी आशय, धातू व प्रकृतीचा विचार करावा.

✒ शरीर रचना शास्त्राचे चिकित्सा महत्त्व ते विशद करतात, की शरीराची माहिती दोन प्रकारे देता येते. कार्यानुसार, जसे दिसते तसे. उदा. नाकाद्धारे हवा आत बाहेर टाकली जाते तर चिकित्सा दृष्टीने नासाही शिरसोद्‌वारं.

✒ निदान म्हणजे रोग्याचे शरीर वाचणे.

लक्षणे म्हणजे रोगमार्गावरील कंदील. हे बघतांना रोगचिन्हांपैकी दोषचिन्हे, धातूचिन्हे,उपधातूचिन्हे, अवयवचिन्हे, मलचिन्हे पैकी कशाची चिन्हे अधिक आहेत ते बघावे.

उदा – दाह – पित्तदोष चिन्ह     अंगमर्द – मांसधातू चिन्ह     कंप – उपधातू (स्नायू) चिन्ह
शुल – वातदोष चिन्ह     उलटी – अवयव चिन्ह

✳ रोगी प्रमुख लक्षण सांगतोच पण चिकित्सकाने अवस्था ठरवायची असते.

✳ रोग्याचे सारासारत्व बघावे.

✳ निदान करतांना रसरक्तादिक दूष्ये, त्यांची स्वाभाविक कार्ये व त्यात झालेले बदल बघावे.

✳ रोगोत्पादक दोषांची सुरवात कोठून झाली ते बघावे. उदा. अति व्यायामाने थकवा असेल तर सुरवात स्नायू पासून. अपचन – सुरवात आंत्रापासून. (सं. – १ एप्रिल ५३; आजकाल आयुर्वेदीय...)

आयुर्वेदाच्या बलस्थानांचे, वेगळेपणाचे वर्णन ते करतात. आयुर्वेदाच्या इतिहासाचेही सिंहावलोकन त्यांनी केले आहे. त्याचवेळी लोकांनी ॲक्यूपंक्चरचे केलेले कौतुक पण आयुर्वेदातील शोधांकडे करीत असलेले दुर्लक्ष याची वेदनेही लेखनात आढळते.

ॲक्यूपंक्चर हे वेधन चिकित्सेचेच चीनमध्ये विकसित झालेले रूप आहे, असे ते म्हणतात. त्याचप्रमाणे आयुर्वेदातील मर्दन व सूक्ष्मीकरण चिकित्सा पुढे हॉनिमान यांनी वाढवली व होमीओपॅथी निर्माण केली.

दैवकृत छिद्रांबद्दलही ते माहिती देतात. बाह्यग्रंथात शारीर किती विस्तृत लिहिले होते, शिरांचेही सूक्ष्म अवलोकन होते याची कल्पाना येते. एका बिंदूची १/१० चुकलो तर कोणत्या वाहीनींचा छेद होतो हे स्पष्ट दाखवले आहे. उदा. कानातील, नाकातील, डोळ्यातील दैवकृत छिद्रे.

मर्म चिकित्सा हेही आयुर्वेदाचे वैशिष्ट्य आहे असे ते सांगतात. विंचू दंशांत विरूध्द बाजूच्या अंगठ्याचे क्षिप्रमर्म दाबून विष उतरवता येते. हा अनुभवही सांगतात.

- पुंसवन चिकित्सा, रक्तमोक्षण, औषधीकाल, अग्निकर्म या आयुर्वेदातील बल स्थानांचेही वर्णन, वैशिष्टय ते सांगतात.
- आयुर्वेदाचा अभिमान या लेखात दिसून येतो. हा वृथाभिमान नसून त्याची पद्योपद्यी कारण परंपराही त्यांनी मांडली आहे.
- ब्रह्मआयुर्वेद, सुश्रृत आयुर्वेद आणि सध्याचा आयुर्वेद. अशी कालदृष्ट्या विभागणी केलेली आढळते.

ब्रह्मदेवाच्या पेक्षा सुश्रृताचे वेळा १/६ आयुर्वेद होता. आता एक शतांश / सहस्त्रांशही नाही अशी खंत ते मांडतात.

- ग्रंथातील वचनांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची वृत्ती आढळते. गंडमाळेच्या रुग्णेत घोट्याच्या वर पिंढरीत त्यांनी शस्त्रक्रिया करवून घेतली होती. (ग्रंथात घोट्याच्या वर इंद्रबस्ति मर्म सोडून वर/खाली छेद घेऊन तेथे माशांच्या अंड्यासारखी बारीक जाळी असतात ती काढावीत व दहनकर्म करावे असा उल्लेख आहे).
- मर्म चिकित्सेचा वापरही ते करीत होते असे दिसते. (सं. – आ.प. एप्रिल १९७७; ॲक्यूपंक्चरच्या निमित्ताने आयुर्वेदीय शोधांचा शोध)

ठाणे जिल्हा वैद्य संमेलनाचे अध्यक्षीय भाषणात ते म्हणतात की

वैद्यांच्या  न्याय्य हक्कांसाठी ते वेळोवेळी झटत होते असे येथे दिसते. आसवारिष्ट, अफू, गांजा यावर सरकारने निर्बंध आणल्यावर त्याविरूध्द त्यांनी आवाज उठविला.

आयुर्वेदातील एका आशुकारी व प्रभावी चिकित्सेवर यामुळे निर्बंध येतात म्हणून वैद्यांना त्याची परवानगी मिळालीच पाहिजे असे ते म्हणतात. सरकारने तज्ञ वैद्यांचे मंडळ नेमून प्रयोग करावेत असेही ते म्हणतात.

वैद्यांनीही ग्रंथातील विविध योगांवर सतत प्रयोग किंवा अभ्यास करावा. त्याचा अनुभव घ्यावा. उदा. दारूत काळेमीठ घालून दिल्यास मूत्रमार्गातील पीडा त्वरीत दूर करते. विविध वनस्पतींचा अभ्यास करून प्रयोग करावे, आपले ज्ञान वाढवावे असे ते म्हणतात. (सं. – आ.प. फ्रेब्रु. १९५०; आपला व्यवसाय सतत अभ्यासाचा आहे)

त्यांच्या अनेक लेखात आयुर्वेदाच्या तत्कालीन अभ्यासक्रमाची स्थिती, त्या बद्दलचा इतिहासही ज्ञात होतो. जसे –

१९३८ मध्ये तत्कालीन वैद्यक कायदयाने शुध्द आयुर्वेदीय शिक्षण सरकारने बंद केले. त्याविरूध्द आंदोलन

केल्यानंतर शुध्द आयुर्वेद अभ्यासक्रम समिती नेमण्यात आली होती.

आयुर्वेदाच्या ऱ्हासाच्या कारणांमध्ये मिश्र शिक्षण हेही एक महत्त्वाचे कारण आहे असे मत त्यांचे होते. मिश्र शिक्षण आयुर्वेदाला पोषक ठरण्याऐवजी आयुर्वेदाचे द्वेष्टेच त्यामुळे अधिक निर्माण झाले. आयुर्वेदासंबंधी अनेक भ्रामक संकल्पना निर्माण झाल्या. त्या दूर करण्यासाठी व नेमका आयुर्वेद व आयुर्वेदीय औषधे म्हणजे काय हे सांगण्यासाठी हा लेख त्यांनी लिहिला आहे.

एकच द्रव्य जरी वेगवेगळ्या पॅथीचे लोक वापरत असले तरी ते वापरण्यामागची विचार प्रणाली, पध्दती भिन्न असते. यासाठी त्यांनी बचनागाचे उदाहरण दिले आहे. आयुर्वेदात बचनागावर गोमूत्र किंवा गोदुग्धाचे संस्कार करून वापरतात, ॲलोपॅथीक डॉक्टर Extract काढेल, तर होमिओतज्ञ सुक्ष्म करून, Potency वाढवून त्याचा उपयोग करेल.

आयुर्वेदात द्रव्य वापरण्यापूर्वी रस, वीर्य, विपाक, प्रभाव यांचा आणि शरीरातील दोष, दूष्य, कालाचा विचार तसेच व्याधी विशिष्ट अवस्थेचाही विचार करेल असा विचार इतर पॅथीत होणार नाही.

म्हणजे औषधीद्रव्य पॅथी ठरवत नाही तर त्यामागचे विचार हे पॅथी ठरवतात. (सं. – आ.प. एप्रिल १९५१; आयुर्वेद व आयुर्वेदीय औषधे यांच्या व्याख्या)

जून १९८२ मध्ये वयाच्या ८५ व्या वर्षी त्यांनी 'अन्नप्रार्थना' व 'कायाग्नि प्रार्थना' अशा संस्कृत श्लोकांची रचना केली आहे. या प्रार्थना आयुर्वेदीयांनी कराव्यात असे ते म्हणतात.

या वयातही त्यांची बुध्दी तेजस्वी होती, असे दिसते. 'स्मृतीबुध्दीकर गणा' चा वापर ते करीत असे भाष्य संपादकांनी या श्लोकांच्या निमित्ताने केले आहे.

अन्न व कायाग्निचे महत्त्व या श्लोकातून त्यांनी दाखविले आहे. येथे कवितेच्या रूपात अलंकारीक भाषेत संपूर्ण पचनक्रियाच सांगितली आहे. येथेही त्यांनी धातुसारत्वाला महत्त्व दिलेले आढळते.

कायाग्नि प्रार्थनेत त्यांनी कायाग्निचे महत्व विषद करून, तू प्रज्वलित असतांना मी रसायन घेतो असाही उल्लेख केला आहे.

## अन्न प्रार्थना

हे भोज्य पूर्णब्रह्म त्वं इष्टगंधादिसंयुत । सुस्थापित स्वादुपात्रे सादर च नमो स्तुऽते ॥१॥

दुर्लभं मानुषं जन्म मत्व त्थास्यसि भाजने । मम मानुषदेहस्य घटनाय भविष्यसि ॥२॥

सुस्वागतं ते, तव स्वागतस्य, मधुभावनार्थं मधुरप्रसंगे ।

दक्षोऽस्ति लालागतश्लेष्मर्वान्हिः श्लेषाय तुभ्यं मुखकूहरस्थः ॥३॥

माधुर्यभावमापन्नः जठरग्रहणीगतः । मानुषे घटके प्राप्ते पोषणार्थं समुद्यत ॥४॥

पोष्योऽपि च समापन्नः पोषकग्रहणातुरः । ग्रहणात् पचनाच्योर्ध्व देहभावं समाप्नुहि ॥५॥

देहभावे परिणते मानुषं जन्म चा भवत् । तदैवोऽहं ब्रह्मरूपश्चाभवं सात्म्यतस्तव ॥६॥

एकान्तहिततमद्रव्यकुलजस्त्वं समागत । तदा भाग्यचंद्रश्च उदिष्यत्युदयाचले ॥७॥

विशुध्दसमधातुत्वं सारेणोत्तमकार्मुकम् । प्राप्नोस्यतश्च सार्थक्य मम मानुषजन्मनः ॥८॥

**अर्थ :** हें अन्ना तू हव्या असणाऱ्या गंधरूची इ. ने युक्त असून तुला आवडत्या पात्रात योग्य रीतीने ठेवले आहे. तू

पूर्णब्रम्ह असून तुला आदरपूर्वक नमस्कार असो ॥

मनुष्यजन्म दुर्लभ आहे हे मान्य करून तू पात्रांत रहाशील व मनुष्यदेह प्राप्त झालेल्या माझ्या देहाचा तू घटक होशील.

हे अन्ना तुझे सुस्वागत असो. माझ्या मुखदालनात असलेल्या व लाळेत असलेला कफाग्नी या मधुर प्रसंगी माधुर्य निर्माण करण्यासाठी तुला आलिंगन देण्यासाठी दक्ष आहे.

मधुरभावत्व प्राप्त झालेला, जठर व ग्रहणीत गेलेला अंश मानवी घटकाचे रूपाप्रत गेल्यावर पोषणासाठी तयार आहे.

पोषणीय सुध्दा पोषकाचे ग्रहणकरण्यास तत्पर असून ग्रहणानंतर व पचनानंतर देहरूप हो.

तूझ्या सुखदायित्वामुळें, (सवयीमुळे) देहभावाला गेल्यावर मानवी जन्म प्राप्त झाला, त्यावेळेपासून मी ब्रह्मरूप झालो आहे.

निश्चयाने हितकारी अशा कुलातील तू आल्यापासून माझा भाग्यचंद्र उदयाचलावर उगवेल ॥

अत्यंतशुध्दतम, समधातुरूप व उत्तमसार होऊन कार्य करण्यास समर्थ असा तू होतोस त्यावेळी माझ्या मनुष्यजन्माचे सार्थक होते.

## कायाग्नि प्रार्थना

हे सर्वपाचकायाग्ने त्वमूष्मा जठरस्थित: । दोषधातुमलादीनां घटकानां समुच्धित ॥१॥

बलं ददासि तां सवीन् चोष्मण: सतत पुन: । संधुक्षितस्त्वं भुक्तनि तथा पानीषधमनिच ।

धातुमापद्यमानानि पचनग्रहणक्षम । ग्रण्हामि युक्तं कालैव हितं संधुक्षित्तं त्वयि ।

मितं रसायनं सारसत्तमं पचनक्षमम् ॥

**अर्थ :** सर्वप्रकारचे अन्नाच्या पचन करण्याऱ्या अग्निदेवते, तू दोषधातु, मल इत्यादि घटकांचा जठरांत असणारा उष्मा आहेस.

तू त्या सर्वांना सातत्याने उष्नतेने बल देतोस. प्रज्वलित झालेला पचन व ग्रहण करण्यास समर्थ असा तू खाल्लेली व प्यालेली औषधे धातूंकडे नेतोस. तू प्रज्वलित असताना योग्य काळी, मी हितकारक, अत्यंत सारवान, पचण्यास योग्य, असे सर्वधातुंना प्रशस्त करणारे रसायन मित प्रमाणांत घेतो.

आयुर्वेदाचा प्रसार अधिक चांगला करायचा असेल तर लोकशिक्षण आवश्यक आहे, हे त्यांनी जाणले होते. यासाठी विविध प्रयोगही त्यांनी केले होते. त्याची माहिती वेणीमाधवशास्त्री, शुभदाताई व पाध्ये गुर्जर यांनी फेब्रु, मार्च, एप्रिल १९८४ च्या अंकात लेखमालेच्या स्वरूपात दिली आहे. ('प्रसिध्दी माध्यमाचे द्वारे आयुर्वेदीय लोकशिक्षण') प्रसिध्दी माध्यमाचे महत्त्व त्यांनी ओळखले होते व त्याचा वापरही केला होता असे दिसते.

आयुर्वेद ही केवळ उपचार पध्दती नाही, तो केवळ वैद्यांचा वारसा नाही, तर आपल्या समाजजीवनाचा, संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे असा महत्त्वपूर्ण विचार त्यांनी येथे मांडला आहे.

आयुर्वेदाचे काम करण्यासाठी समाजातील विविध क्षेत्रातील लोकांचा समावेशही झाला पाहिजे, असे ते म्हणतात.

'वृत्तपत्र' माध्यमाचा अधिक व पुरेपुर वापर त्यांनी केलेला दिसतो. विषयांचे वैविध्यही यात दिसते. उदा. रूग्णकथा, आयुर्वेदोपदेश, आहार- विहार, आयुर्वेदाची मुलतत्वे, आयुर्वेदीय परीभाषा इ. चिकित्सक आणि

रूग्ण या दोघांमध्ये आयुर्वेदाचा प्रसार या निमित्ताने झालेला दिसतो.

'सुप्रजा' या स्थायी केंद्राची निर्मितीही यामुळेच झाली.

पां.वा. गाडगीळ, विद्याधर गोखले व लोकसत्ता यांची मोठी मदत या प्रचार-प्रसार कार्यासाठी झाल्याचे दिसते. (सं. - आ.प. फेब्रु., मार्च, एप्रिल १९८४; प्रसिद्धी माध्यमाचे द्वारे आयुर्वेदीय लोकशिक्षण)

## ब) आक्षेप आणि उत्तरे

या माध्यमातूनही अनेक विषयांचे प्रबोधन झालेले आढळते आणि त्याचबरोबर तत्कालीन आयुर्वेदाचा इतिहास, स्थित्यंतरही समजतात,

वेणीमाधवशास्त्री जोशी महाराष्ट्र प्रांत वैद्य मंडळाचे अध्यक्ष होते. वैद्यांसाठी व आयुर्वेदासाठी कार्य करणारी ही संस्था होती. या काळांत त्यांच्या कार्यावर किंवा विधानांवर आक्षेप घेतले गेले. या आक्षेपांना उत्तर त्यांनी आयुर्वेद पत्रिकेच्या माध्यमातून दिलेले दिसते.

तसेच त्यांच्या गांवकरी, लोकसत्ता इ. वृत्तपत्रातील लेखांवरही इतर वृत्तपत्रातून आक्षेप घेतले गेले. त्यांनाही आयुर्वेद पत्रिकेच्या माध्यमातून शास्त्रीजींनी उत्तरे दिलेली आहे.

यावरून आयुर्वेद पत्रिका व वेणीमाधवशास्त्री यांचे असलेले जवळचे नाते लक्षात येते. तसेच सर्व वैद्यवर्गापर्यंत आयुर्वेदपत्रिका जात होती, वाचली जात होती हे ही आढळते.

वैद्य भा.वि.गोखले यांनी पदवीधर संघाचे अध्यक्ष म्हणून भाषण करतांना म.प्रा.वैद्य मंडळावर आक्षेप घेतले. त्याला शास्त्रीजींनी उत्तरे दिली आहेत.

या लेखाच्या माध्यमातून आयुर्वेदाचा तत्कालीन इतिहास, वैद्यांच्या संघटनांची माहिती, तत्कालीन वैद्यांच्या समस्या, त्यांची मानसिकता व त्यांचे विचार लक्षात येतात.

मुख्यत: मिश्रशिक्षण आणि शुध्द आयुर्वेदीय शिक्षण यावरील वाद तेव्हा चालू होता असे दिसते. तसेच इतर वैद्य आणि पदवीधर वैद्य यांच्या भिन्न संघटना होत्या असेही लक्षात येते.

पूर्वी म्युनिसिपाल्टीचे आयुर्वेदीय दवाखाने होते. ४१ च्या काळात ते बंद होऊ लागले होते असेही येथे लक्षात येते. (सं. - आ.प. ऑक्टो ४१; आक्षेप आणि उत्तरे)

वैद्य वेणीमाधवशास्त्री पूर्वी मिश्रशिक्षणाचे पुरस्कर्ते होते पण आता शुध्द आयुर्वेदाचे कट्टर पुरस्कर्ते झाले असा व्यक्तीश: आक्षेप त्यांच्यावर घेतला गेला होता. त्याच्या उत्तरादाखल ते म्हणतात -

आयुर्वेदाचा जर परिपोष व्हायचा असेल तर आयुर्वेदाचेच उत्तम शिक्षण विद्यालयांमधून होणे आवश्यक आहे. मिश्रशिक्षणाचे परिणाम आपण बघितले आहेत. अशा शिक्षणातून आयुर्वेदाचा व्देषच वाढतो असे ते पुन्हा आवर्जुन सांगतात व शुद्ध आयुर्वेदाचाच पुरस्कार करतात.

बिंदू माधवपंडितांनी गांवकरीत 'उन्हाळ्यातील व्यायाम वर्ग की क्षयरोग original कार्य.' असा लेख लिहिला होता. त्यावर टीकात्मक लेख वैद्य म्हसकरांनी नवशक्ति मध्ये लिहिला 'कोणत्याही ऋतुत व्यायाम घेणे अपायकारक नाही.' आणि घातुकलेख किंवा बेजबाबदार व अशास्त्रीय लेख म्हणून बिंदू माधवांच्या लेखावर टीका केली. (सं. - आ.प. नोव्हे ४१; वैयक्तिक विधानांचा समाचार).

या लेखाला उत्तर म्हणून वेणीमाधवाशास्त्रींनी दोन लेख लिहिले आहेत.

आयुर्वेदासाठी केव्हाही उभे राहण्याची वृत्ती यातून दिसून येते. खरे तर डॉ. म्हसकर आयुर्वेद संशोधन कमिटीचे अध्यक्ष तरीही आयुर्वेदाच्याच शास्त्रीय विधानांवर त्यांनी आक्षेप घ्यावा याचे दु:ख व चीड दोन्ही यातून दिसते.

पण हे करतांनाही त्यांची लेखणी कुठेही घसरत नाही. अतिशय मुद्देसूदपणे, पण परखडपणे डॉ. म्हसकरांनी त्यांची चूक दाखविली आहे. बेजबाबदार विधाने करण्यापेक्षा नेमके काय करायला पाहिजे होते, याचे मार्गदर्शनही ते करतात आणि मुख्य म्हणजे हा प्रश्न केवळ वैयक्तिक डॉ. म्हसकर, वैद्य बिंदूमाधव पंडित यांचा नसून संपूर्ण देशाच्या आरोग्यशास्त्राचा प्रश्न आहे. या विचारातूनही वैद्य वेणीमाधव यांचे मज्जासारत्व पुन्हा निदर्शनास येते.

कोणत्याही शास्त्रीय विधानावर आक्षेप घेण्यापूर्वी, अनेक लोकांवर परीक्षण करून, त्याचा statistical data तयार करून मग बोलावे, ही संशोधकाची वृत्तीही वेणीमाधवांकडे दिसते.

डॉ. म्हसकरांच्या प्रत्येक चुकीच्या आहे हे ग्रंथातील संदर्भ देत सांगितले आहे. काही ठिकाणी त्यांची भाषा उपरोधिक ही झालेली दिसते. उदा. म्हसकरांचे वाक्य, की उन्हाळ्यात घाम जास्त येतो, त्यामुळे शरीरातील मीठ कमी होते म्हणून उन्हाळ्यात अधिक मीठ खावे. हे वाक्य म्हणजे नवीन संशोधनच आहे. त्याला नोबेल पारितोषिक मिळाले पाहिजे, असे वेणीमाधवशास्त्री म्हणतात.

डॉ. म्हसकरांची काही विधाने म्हणजे 'वदतो व्याघाताचे' सुंदर उदाहरण आहे असे शास्त्रीजी म्हणतात. यावरून त्यांचा मराठी व्याकरणाचा अभ्यासही उत्तम होता असे दिसते. (सं. आ.प. १ व १६ सप्टें ७१; नाणावलेल्या संशोधकांची...)

६ डिसें.७६ मध्ये लोकसत्तेत पां.व.गाडगीळांनी वेणीमाधवशास्त्रींची घेतलेली मुलाखत छापली होती 'आयुर्वेदासाठी सरकारने काय करावे' यातील काही विधानांवर डॉ.शिवाजी हिरेंनी आक्षेप घेतले होते.

या आक्षेपांना वेणीमाधवशास्त्रींनी आयुर्वेद पत्रिकेच्या माध्यमातून उत्तर दिले.

✳ मिश्र शिक्षण सुरू करण्यात ॲलोपॅथी डॉक्टरांनी पुढाकार घेतला व त्याला सरकारने मदत केली, असा वेणीमाधवशास्त्रींनी आरोप केला होता. त्यानिमित्तांने मिश्र शिक्षणाचा इतिहास व त्यामागील भूमिका ही समजते. उदा. १८९६ साली 'आर्यन मेडिकल स्कुल'ची संस्था स्थापन झाली आणि १९०१ साली प्रथम पदवीदान समारंभ झाला. तर १९४६साली ५०वा वाढदिवस झाला.

नंतर १९१३ ला आर्यांग्ल वैद्यक शाळा, नूतन वैद्यक विद्यालय, आर्यांग्ल वैद्यक विद्यालय सुरू झाले. १९१७ ला नगर येथे गुणेंनी आ.म.वि. काढले तर १९२४ साली पुणे येथे नानल यांनी आ.म.वि. सुरू केले. नंतर येवला येथेही अ.म.वि. होते.

✳ 'प्रथम मिश्र शिक्षणाचा कट्टर पुरस्कर्ता असलेला मी अपयशाच्या अनुभवाने केवळ आयुर्वेदाच्या स्नातकीय शिक्षणाचा पुरस्कर्ता बनलो, असे वेणीमाधवशास्त्री कबूल करतात. पदवी शिक्षणाबद्दल काही महत्त्वाचे विचार त्यांनी मांडले –

✳ Allopathy जगभरात प्रसारात आहे. पण तद्देशीय वैद्यक व Allopathy यांचे मिश्रण कोणत्याही देशात दिले जात नाही.

✳ Phy, chem, bio, botany यांच्या अभ्यासानंतर आयुर्वेदाचा अभ्यास केल्यास आयुर्वेदाची पुष्टी होईल.

✴ आयुर्वेदाचे स्नातकीय शिक्षण हे आधुनिक उपलब्ध साधनांच्या मदतीने प्रात्यक्षिक देऊन होणे जरूर आहे. आधुनिक साधने Allopthy ची नाहीत ती physics इ. आधुनिक विज्ञानाची आहेत. आयुर्वेदही त्यांचा उपयोग करून घेऊ शकतो.

✴ अध्यापक कसा असावा याबद्दल ते लिहितात की – अध्यापक आयुर्वेद निष्ठ, सर्व शास्त्रशाखांमध्ये निपुण, अन्य शास्त्रांचा परीचय असणारे, शास्त्रसिध्दांतांचे प्रात्यक्षिक दाखविणारे असावे.

✴ मिश्र शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांची आयुर्वेदाची नव्हे, तर Allopthy ची भूक भागते कारण आयुर्वेद शिक्षकांना आयुर्वेद शिकविता येत नाही. आयुर्वेद निदान, शारीर, गुणकर्म, चिकित्सा यांची उकल दाखविता येत नाही.

यामुळे Allopthy चे अर्धशिक्षित व आयुर्वेद कळत नसलेले आयुर्वेद द्वेष्टे इंटिग्रेटेड जे Allop. व आयुर्वेद या दोघांनाही डोकेदुखी झालेले चिकित्सक निर्माण झाले.

मूर्तिकारांनी विनायकाची मूर्ती घडवण्याला घेतली पण वानर तयार झाले असे उद्विग्न होऊन ते लिहितात.

✴ शुध्द आयुर्वेदीय शिक्षण सुरू झाले ही भाग्याची गोष्ट. पण तो यशस्वी करणे अतिशय कठीण आहे. त्यासाठी प्रथम आयुर्वेदतज्ञ अध्यापक निर्माण करणे हे प्रथम ध्येय असावे यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न व्हावे अशी तळमळ ते व्यक्त करतात.

✴ आयुर्वेद सर्व जगाचा असला तरी त्याची जोपासना, परिपोष, संशोधन इ. मार्गाने उन्नती करण्याची जबाबदारी भारतीयांवर आहे.

एकंदर या लेखात शिक्षणक्रमाबद्दलचे मत त्यांनी मांडले आहे आणि या सर्वाला त्यांना आलेल्या अनुभवाची तसेच निरीक्षणांची जोड आहे. आयुर्वेद अधिक अधिक प्रगत व्हावा यासाठीची तळमळ यातून जाणवते.

इतरांनी केवळ आरोप प्रत्यारोप करण्यापेक्षा नेमके उपाय सुचवावे व तसे प्रयत्न करावे, असे ठणकावूनही ते सांगतात. (सं. – आ.प. १७ डिसें.७६; आयुर्वेदाच्या मिश्र अभ्यासक्रमाचा इतिहास व आयुर्वेदाचे भवितव्य)

## क) व्यक्तीचित्रे

जुलै ७६ मध्ये वैद्य बिंदुमाधव पंडितांच्या निधनानंतर वेणीमाधवशास्त्रींनी त्यांच्यावर लेख लिहिला आहे. 'स्व.वै.बिंदुमाधव शास्त्री यांची वैशिष्टये'

या लेखातून वै. बिंदुमाधवांची वैशिष्टये तर सांगितलीच पण वेणीमाधवांशास्त्रींची आयुर्वेदाबद्दलची तळमळही जाणवते. मिश्रशिक्षण–शुध्द आयुर्वेदीय शिक्षण यावरही ते भाष्य करतात. त्याकाळांत आयुर्वेदाच्या प्रचारासाठी केलेल्या प्रयत्नांचीही माहिती यातून मिळते. उदा. आयुर्वेदाच्या प्रचारासाठी आर्थिक मदत मिळविणेसाठी वै. वेणीमाधव, वै. बिंदूमाधव, करंदीकर यांनी महाराष्ट्रभर दौरे केले होते.

वै. बिंदुमाधव शास्त्री आयुर्वेद शिकण्यासाठी वेणीमाधवांच्या घरी राहिले होते. इतरही वैद्यांसाठी रोज सकाळी ५–६ ते आयुर्वेदाचा वर्ग चालवीत. आयुर्वेद अध्यापनाच्या कार्यासाठीही वेणीमाधव जोशी झटत असत हे ही यातून आढळते.

१५ जाने १९८४ च्या अंकात वेणीमाधवशास्त्रींनी 'आयुर्वेद क्षेत्रातील सुखद व दु:खद घटना' असा लेख लिहिला आहे. यात आयुर्वेदीयांची, विद्यार्थ्यांची आयुर्वेदाबद्दल असलेली उपेक्षा तर वेलोर येथील मिशन

हॉस्पिटलमधील ऑर्थोपोडिक सर्जन डॉ.डॅनियल यांनी वेणीमाधवशास्त्रीकडे राहून आयुर्वेदाचा घेतलेला अनुभव, दाखविलेली उत्सुकता व नंतर दिलेला अभिप्राय या घटनांचे वर्णन आहे.

यात त्यांनी डॉ.डॅनियल यांना दाखविण्यासाठी रूग्णांकडून चिकित्सेपूर्वीची अवस्था, नंतरची अवस्था याबद्दल रूग्णांकडून पत्रके लिहून घेतल्याचा उल्लेख आहे. हा फरक टक्केवारीत नोंदविला आहे.
आधुनिक विज्ञाननिष्ठांना त्यांना खात्री वाटेल अशा पध्दतीने नोंदी घेण्याची वेणीमाधवशास्त्रींची वृत्ती हे विशेष आहे.

रूग्णांच्या मुलाखती ही डॉ. डॅनियल यांनी घेतल्या. वेणीमाधवशास्त्री येथे म्हणतात की निदान संशोधकास मी कमी वाटू नये म्हणून सर्व शक्ती खर्चून कामास लागलो. मी कमी वाटलो, जिज्ञासू व्यक्तीस वैफल्य आले तर माझ्या उपास्य देवतेची (आयुर्वेदाची) हानी केल्याचे पाप मला लागेल. वयाच्या ८८व्या वर्षीही आयुर्वेदाबद्दलची तळमळ आणि संशोधकाची दृष्टी हे विशेष आहे.

आपल्याकडे आहे ते सर्व इतरांना सांगण्याची, दाखविण्याची वृत्ती वेणीमाधवाशास्त्रीकडे होती, पण आयुर्वेदीय विद्यार्थ्यांकडे शिकण्याची तळमळ नाही हे दु:ख ते व्यक्त करतात.

## नानल परंपरा

### वनस्पती शास्त्र

वनस्पतीशास्त्रावर र.म.नानलांचे विपुल लेख आहेत. यामध्ये सैध्दांतिक विवेचन तर काही अनुक्त वनस्पतींचे वर्णन रोजच्या व्यवहारात उपयोगी ठरतील असे योग, या पध्दतीने विवेचन केले आहे.

'विशिष्ट औषधी कल्पना' हे नानल परंपरेतील वैशिष्टय या लेखातही आढळते.

वनस्पतीचे सर्व अवयव किंवा स्वरस, तैल, मलम अशा बहुविध कल्पना, बाह्यत: व आभ्यंतरत: वनस्पती वापरणे, भिन्न – भिन्न प्रयोग करणे आणि महत्त्वाचे म्हणजे ते सर्वांसमोर सादर करणे, त्यातील सर्व बारकाव्यांसह सांगणे आणि शेवटी काही शंका असल्यास विचारण्याची नम्र विनंती करणे हे नानलांचे वैशिष्टय सर्वच लेखांतून जाणवते.

आयुर्वेदीय वैद्यांवर केला जाणारा गुप्ततेचा आरोप खोटा ठरलेला इथे आढळतो.

पानफुटी, तमाखू, पानकोबी या अनुक्त द्रव्यांचे वर्णनही त्यांच्या लेखनात आढळते.

फेब्रु. १० च्या 'गुणचिंतन' या लेखात र.म.ना. नी प्रथम शास्त्रवचनांचे महत्त्व सांगतांना, ते म्हणतात की शास्त्रवचनांमुळे मन शास्त्राचे ठिकाणी स्थिर राहते. बुध्दी, स्मृती, धारणाशक्ती, उत्साह, विश्वास या गोष्टी कार्यक्षम, सुदृढ व निरोगी राहतात. वास्तवाची जाण राहते. अहंकारही वाढत नाही आणि न्यूनगंडही.

द्रव्यगुण शास्त्राचे महत्त्व सांगतांना ते म्हणतात की सूक्ष्म अभ्यासाने निदान चिकित्सा योग्य होते. पण याकडे दुर्लक्ष केल्यास मात्र उपपत्तीपूर्वक विचार करण्याची सवय नष्ट होते.

येथे गुणविचारातील विकल्पना हा नवीन विचार त्यांनी सांगितला आहे. गुणाचे कार्यात दुसऱ्या गुणाच्या सापेक्षतेने कसे परिवर्तन होते, हे 'तुलसी' चे उदाहरण देऊन स्पष्ट केले आहे.

उदा. तुलसी रूक्ष आहे म्हणून ती स्तंभन असावयास हवी पण ती 'स्वेदन' हे पूर्णत: विपरीत कार्य करते. हे

तुलसीच्या उष्णवीर्याने होते. येथे रूक्ष गुणाला उष्णवीर्याचे सहकार्य आहे. म्हणून त्याचे कर्म बदलले आहे. याच पध्दतीने रस व गुण, परस्पर गुण विकल्पना, गुण व वीर्य, गुण व विपाक, गुण व शारीर देशातील कार्य, संस्काराने होणारे गुण परिवर्तन असा विचार करावयास हवा.

गुणांचे शरीरावरील कार्य ठरवतांना करावयाचा हा विशेष विचार त्यांनी येथे मांडला आहे. (सं. - आ.प. फेब्रु. १८; गुणचिंतन)

शास्त्रातील सूत्रांचा विस्तार कसा करावा याचे उत्तम उदाहरण विश्लेषण केले आहे. अनेकदा शास्त्रातील वचन समजले नाही तर 'आप्तवाक्य' हे उत्तर देऊन त्याचा कार्यकारणभाव टाळला जातो व पुढे ती सवय बनते. अनुमान करण्याची शक्ती नष्ट होते. म्हणून र.म.नानल म्हणतात की, ''म्हणोनी पहिलेची पाहावे। आणि शोधिलेची शोधावे। अवघे कळता स्वभावे। संदेह तुटती॥

प्रथम आप्त वाक्यांचाच अभ्यास करावा असे ते म्हणतात. त्या अभ्यासाचे दिशादर्शन त्यांनी केले आहे.

अभ्यास करतांना प्रथम शब्दाची फोड, त्यांचा परस्पर पूरक संबंध, परिभाषा, गुणकार्ये, दोषधातूंवरील कार्ये असे विवेचन ते करतात. उदा. अम्ले हृद्यानाम यात आम्ल व हृद्य असे दोन शब्द आहेत.

- ✳ यात हृदयाच्या दोष, धातू, इ. या प्रत्येक घटकांवर आम्लाचे कार्य कोणत्या गुणाने आहे व काय कार्य होते याचे विवेचन देऊन तो क्षीण/वृध्द कोणत्या अवस्थेत वापरावा हे स्पष्ट केले आहे. हे विवेचन मुख्यतः गुणविचारानुसार केलेले आहे.
- ✳ आम्ल रसातील कोणते द्रव्य वापरावे याचेही दिग्दर्शन केलेले आहे.

  उदा. साधक पित्तातील १) उष्ण गुण क्षीण झाल्यास हदयाचे पोषण करणाऱ्या पोषक रसास सामता येते व पित्तप्रधान हत्शूलाची लक्षणे दिसतात. २) स्निग्धगुणाच्या क्षयाने हद्शोष होतो. ३) लघुगुणाच्या क्षयाने नाडी गुरू होते. म्हणून युक्ती पूर्वक आम्लरसाचा वापर करावा. पित्तक्षीण अवस्थेतच आम्लरस वापरावा. पित्तवृध्द अवस्थेत अनुपशय दिसतो. हा विशेष विचार त्यांनी येथे मांडला आहे. याच प्रमाणे वात, कफादी दोषांवरील कार्याचे विवेचन केले आहे.
- ✳ धातूवरील कार्याचे ही विशेष विवेचन केलेले दिसते.
- ● आम्लरस प्रीणन करतो. प्रीणन = तर्पण, उदक कर्म. उत्तम बलाच्या रसाची उत्पत्ती करून, रसाग्निस बल देऊन रसप्रसाद भावांची निर्मिती करणे म्हणजे प्रीणन असे परिभाषेचे स्पष्टीकरण त्यात केले आहे.
- ● रसधातू शरीराचे प्रीणन करतो व आम्लरस रसधातूचे प्रीणन करतो.
- ✳ सामरसाचे अवस्थेत अम्लवे तसा सारखे उत्कट आम्लरसाचे द्रव्य वापरावे असे ते सुचवतात.
- ● रक्तधातूचे उत्पादन आम्लरस करतो. रक्तवृध्दीजन्य हृद्रोगात आम्लरस निषिध्द आहे. रक्तक्षय जन्य हृद्रोगात आम्लरस उपयुक्त आहे तसेच द्रवता व लघुता यांना आम्लरस बल देतो.
- ● रक्तातील लघुगुण क्षीण झाल्यास स्पर्शज्ञान कमी होते. अशावेळी अग्नि महाभूत प्रधान आम्ल द्रव्ये वापरावी. उदा. जंबीर.
- ● रक्तातील लघुता वाढल्याने हत्स्पंद वृध्दी, पापण्या फडफडणे, भ्रम लक्षणे असता लघुताशामक डाळींब रसासारखी द्रव्ये दयावीत.

✳ लक्षण विकल्पना लक्षात घेऊन आणि गुण विचारानुसार द्रव्याची निवड, हे त्यांच्या चिकित्सेचे वैशिष्ट्य येथे दिसते.

✳ लेख झाल्यावर त्यातील निरीक्षणे पुन्हा सारांशरूपाने त्यांनी मुद्दे स्वरूपात मांडली आहेत.

✳ हा सूत्रविस्तार सर्वांपर्यंत पोहोचवणे म्हणजे अंशत:का घेऊन शास्त्रऋणातून मुक्त होणे अशी तळमळही दिसून येते. (सं. – आ.प. जुलै ८२; अम्लंहद्यानाम् । एक अध्ययन)

१९७८ मध्ये नानलांनी द्राक्षा, कलिगंड, जांबूळ इ. वनस्पती वर लेखमाला लिहली आहे. यात रसवीर्य विपाकासहच पाश्चात्यशास्त्राप्रमाणे यांची घटक द्रव्ये पोटॅशिअम, सोडिअम, विटॅमिन्स, कॅलरीज,इ. चे प्रमाण ही दिले आहे. त्यांचे सोपे औषधी प्रयोगही दिले आहेत.

✳ द्राक्षाची मद्यसंधानाची कृती वर्णन केली आहे.

✳ शास्त्रीय माहितीसहच इतर अनुषांगिक माहिती ते देतात. उदा. उमरखय्याम याने मद्याच्या सहाय्याने अजोड पर्शियन कविता केल्या आहेत इ. (सं. – आ.प. १९ एप्रिल ७८; द्राक्षा)

**कलिंगड :** कलिंगडाचे बाह्य प्रयोगासाठी, तर काही आभ्यंतर प्रयोगासाठी औषधीयोग सांगितले आहेत.

✒ स्वरस, चूर्ण, अवलेह, आसव, लेप व अशा बहुविध कल्पनांचे वर्णन केलेले दिसते.

### औषधी योग :

१) स्वरस २ तोळे + जीरेचूर्ण १ मासा – रोज ३ वेळा ---> अल्पमेहन, जीर्णव्याधी

२) स्वरस २ तोळे + मध १ तोळा ---> हृद्रोगजशोथ

३) स्वरस २ तोळे + धने १ मासा – वंगभस्मासह ---> वृक्कविकार, कफजमेह, शोथ

४) स्वरस + सैंधव/स्वरस +औदुंबरजल ---> उष्माघात, अतिस्वेदजन्य दौर्बल्य

५) स्वरस ४ तोळे + १/४ तोळा निंबूरस + खडिसाखर १/२ तोळा – भोजनापूर्वी ---> हृल्लास, अरूचि, हृद्दाह, शूल, च्छर्दी

६) स्वरस ४ तोळे + आवळाचूर्ण १ मासा – प्राक्भक्त ---> आंत्रातील स्नेहांश प्राकृत राहून, आतड्यांची नैसर्गिक गती राखणे.

७) स्वरस ४ तोळे + ताक ४ तोळे + सैंधव ४ गुं. ---> कामला, आस्यशोष, हृल्लास यांवर

८) बियांचा रस १ तोळा + मध १/२ तोळा ---> राजयक्ष्म्यातील रक्तष्ठीवन

९) बियांचा रसन गोवऱ्यांची राख (वस्त्रगाळ) – हिरड्यांना चोळणे ---> सपूयदंतवेष्ट, रक्तस्त्राव, मुखपाक

१०) सालीचा पांठरा भाग वाटून सर्वांगास चोळणे ---> दाह कमी होतो.

११) फळाचे दोन भाग करून मधला गर काढून टाकणे त्याच्या सालाची टोपी डोक्यावर घालणे. दर १–१ तासाने बदलणे. बदललेली टोपी थंड पाण्यात बुडवून ठेवावी. दुपारी १२ ते ४ वेळेत ---> तिमिर दर्शन अनिद्रा, अल्पनिद्रा.

१२) सौंदर्यप्रसाधन कल्प –

- मध्यम आकाराचे कलिंगड घेऊन मध्ये भोक पाडावे.
- त्यात २५० ग्रॅ. तांदूळ + हळद १०० ग्रॅ. + चंदन २५ ग्रॅ. + भीमसेनी कापूर १० ग्रॅ. + १ मोठा चमचा

लिंबूरस भरावे.

- साल पुन्हा जागेवर ठेवावे, व भोक बंद करावे.
- १ आठवडाभर सावलीत ठेवावे.
- कापून गरासह सर्व पदार्थ सावलीत वाळवावे. वस्त्रगाळ करावे.

रूक्ष स्फुटित त्वचा लोण्यासह, मुखदूषिका घृतासह, यच्छात मंजिष्ठाच्या गंध्यासह, नियमित वापरासाठी दूध, पाणी, टोमॅटोरस, अंड्याचा बलक सह १/२ तास ठेऊन गरमपाण्याने धुवावे. साबण वर्ज्य.

१३) कलिंगड अवलेह – बालकांत अनुपान

१४) आसव – स्वरस + मध ४ भाग + धायटी २ भाग – संधान

**निषेध –** भातासह कलिंगड खाऊ नये याने अतिसार व शोथ होतो. (सं. – आ.प. मे ७८; कलिंगड)

**जंबूफल :** जंबूफलाचे गुणांचे अनुषंगाने काही सोपे कल्प सांगितले आहेत.

१) अपक्वफल रस + मीठ – गुळण्या – चलदंत, दंतवेष्टन शैथिल्य, मुखपाक, रक्तस्त्राव.

२) अपक्वफल रस + स्फटिका – पिचू – योनीभ्रंश, श्वेतप्रदर,

३) अपक्वफळ चूर्ण (20 gm) + तक्र (60 ml) – दिवसातून २-३ वेळा – अतिसार, प्रवाहिका.

४) पक्वफळ रस (40 ml) + आलेरस (10 ml) + मिरेदाणा १ – प्राग्भक्त – २१ दिवस – यकृतमांद्यावर उपयुक्त.

५) पक्वफळ रस (60 ml) + मध (10 ml) – अनन्नकाली – मूत्रदाह, नेत्रदाह, सरक्त अर्श

६) जंबुलोह ह्या अल्पमोली, बहुगुणी कल्पाचे वर्णन आहे.

– शुध्द लोह चूर्ण २५० gm, ताज्या फळांचा रस ५०० ml,

✳ परळात लोहचूर्ण घालून वरून फलरस चूर्णाचे वर १ अंगुळपर्यंत

✳ मिश्रण रोज ५-६ तास कडक उन्हांत ठेवावे.

रस आटल्यास पुन्हा घालावा. ६ आठवडे असे करावे. नंतर लोहचूर्ण खलून काचेच्या बरणीत ठेवावे.

✎ अनुपान भेदाने जंबुलोहाची रोगघ्नता सांगितली आहे.

✳ जंबूलोह ४ गुंजा + मध – २ वेळा ---> तीव्र पांडू मध्ये

✳ जंबुलोह + आवळा रस + शरपुंखा – समानकाली ---> यकृतवृध्दी, प्लीहा वृध्दीयांत.

✳ जंबुलोह + आवळाचूर्ण + गुलाबकळी ---> सूतिकापांडू, रक्तप्रदरात.

✳ जंबुलोह + अश्वगंधा ---> बल्य, वृष्य, आयुष्यवर्धक.

✳ जंबुलोह + अजायकृद्रस ---> कामलोत्तर यकृतमांद्यात.

✳ जंबुलोह + कारलेरस + मध ---> मधुमेहातील हस्तपाददाहात.

✳ जंबुलोह ४ गुंजा + एरंडस्नेह १/२ + रसोनस्वरस १० थेंब + विश्वाचूर्ण ६ गुंज – ४२ दिवस ---> संधीवात, आमवातातील वेदना यांत उपयुक्त.

७) जंबूपत्र रसाचेही उपयोग वर्णित आहे.

पत्ररस २० ml + मध १० ml + तक्र ४० ml + शतावरी २ मासे – पाळीचे ५ वे दिवसापासून १५ वे दिवसापर्यंत

– गर्भपाताची सवय असलेल्या महिलांना.

८) जंब्वासह विधी ही वर्णित आहे.

९) जांभळाच्या अतियोगाने घसा व छातीवर दुष्परीणाम होतात त्यासाठी मिरे व सैंधवासह जांभळे खावी. (सं. – आ.प. जून ७८; जंबूफल) र.म.नानलांनी दिलेल्या औषधीप्रयोगांमध्ये प्रत्येक ठिकाणी योग्य मात्रा, अनुपान, काल यांचे वर्णन केलेले आहे. येथे ग्रंथाधार नाही. हे प्रयोग अनुभूत / परंपरेतील असावे असे वाटते.

मद्याचे वर्णन करतांना मद्यपान करण्यापूर्वी विधी, मात्रा, काल सात्म्यासात्म्यता, बल, हितकरअन्न, देशविचार इ. चा विचार करावा असा विशेष विचार त्यांनी मांडला आहे. (सं. – आ.प. ऑगस्ट ७८; मद्यपान – सुपरिणाम व दुष्परिणाम)

इतर संशोधनाचा आयुर्वेदासाठी उपयोग करण्याची वृत्ती येथे दिसते. उदा. डॉ. विल्यम्स या न्यूरोसायकिॲट्रिस्ट ने ५०० मद्यपींचा अभ्यास करून मांडलेले निष्कर्ष त्यांनी येथे मांडले आहेत.

पानफुटी, तंबाखू, पानकोबी या अनुक्त द्रव्यांचे वर्णनही या द्रव्यात आढळते. पानफुटीच्या अनेक औषधी कल्पना त्यांनी सांगितल्या आहेत.

✳ पानफुटीच्या रसाने तैल सिध्द करणे. अनेकदा सिध्द करून त्याचे वीर्य वाढवावे. र.म.नानल स्वत: एकादशवार सिध्द तैल वापरतात असा उल्लेखही त्यांनी केला आहे.

✳ पानफुटी पानांचा कल्क + स्वर्णगैरिक चूर्ण – गोळ्या, कराव्या.

✳ मेण/ पेट्रोलियम जेली सहाय्याने मलम करावे.

✳ कल्क मद्यार्कात २१ दिवस ठेवावा. नंतर रेशमी वस्त्राने गाळून काचेच्या बाटलीत ठेवावा. होमिओ गोळ्यांवर अर्क टाकून चघळून वापरण्याचा उल्लेखही आढळतो.

✳ पानफुटी व्रणावर विशेष उपयोगी असल्याचा अनुभव ते सांगतात. उदा.

१) दुष्ट व्रण, सद्योव्रण, जीर्णव्रण, दग्धव्रण, मेदोजग्रंथी यावर बाह्यत: तैल प्रतिसारण.

२) आम्ल पित्त/ आंत्रव्रण – पानफुटी गोळ्या + शंखभस्म द्यावे.

३) सरक्त मल प्रवृत्ती – पानफुटी गोळ्या ४ गोळ्या + शतावरी १ मासा + लोणी द्यावे.

४) रक्तार्श – पानफुटी मलम उपयोगी

५) गुदगतव्रण/ परिकर्तिका – पानफुटी तैल बस्ति.

६) विचर्चिका, दद्रु, पामा – मलम.

७) कान फुटणे/ पू येणे – तैलाने कर्णपूरण.

८) नासागत रक्त – तैलनस्य / स्वरस नस्य.

९) सपूयदंतवेष्ट – मंजन करून नंतर बीजपर्ण तैल प्रतिसारण अत्यंत श्रेष्ठ असल्याचे नमूद करतात.

१०) पक्षवधातील शय्याव्रणात मलम उपयोगी. पोद्दार येथे अनेक रूग्णांवर याचे प्रयोग केल्याचे ते सांगतात. यासाठी त्यांनी स्वत: तेल बनवून दिले होते असा उल्लेख आहे. (सं. – आ.प. डिसें. ७९; अहिरावण – महिरावण)

असात्म्य पदार्थ सात्म्य कसे करावे याचेही मार्गदर्शन ते करतात. द्रव्याचे हानीकारत्व कमी करून शरीरोपयोगी कसे करावे ?, यासाठी शुध्दी प्रक्रिया, संस्कार, अनुपान, सहपान यांचे वर्णन केले आहे. एवढे करूनही खाण्यास अयोग्य कोण याचेही वर्णन आढळते. उदा. लसूण ताकात शुध्द करून/तूपात परतून/खोबऱ्यासह चटणी

करून खावा. ताक + सैंधव + काळे मीठ + लसूण – जेवणात पथ्यकर. तर लिंबू जेवणात / सरबत स्वरूपात / लिंबोटी खावी, लिंबोटीचा विधी वर्णन केला आहे. (सं. – आ.प. जून ८६; लसूण व लिंबू)

'तमाखू' हा लेख म्हणजे नवीन द्रव्याचे परीक्षण– गुणकर्म उपयोगांचे निश्चितीकरण करण्याच्या दृष्टीने उत्तम मार्गदर्शनपर लेख आहे. तंबाखू हे अनुक्त द्रव्य आहे. त्यामुळे याच्या अभ्यासाने र.म.नानलांनी शास्त्रात भर घातली आहे.

सदर लेखन हिंदी भाषेत केलेले आहे. गुणकर्म निश्चिती साठीचे तर्क, द्रव्यगुणाचे मूलभूत सिध्दांत व प्रत्यक्ष ज्ञानाच्या आधारावर केलेले आहेत. विशेष म्हणजे केवळ गुणकर्माची निश्चिती एवढेच न करता त्याही पुढे जाऊन औषधी उपयोग, विविध औषधी कल्पना व व्याधींच्या अवस्था यांचेही वर्णन केले आहे. काही अनुभूत प्रयोगांचे वर्णन आढळते. 'तमाखू' हे व्यसन करणारे द्रव्य आहे म्हणून औषधे बनवतांना त्याचे व्यसन लागणार नाही याची काळजी घेण्यास सांगितले आहे. सोबत व्यसनमुक्तीचे उपायही सुचविले आहेत. (सं. – आ.प. एप्रिल १९८७; तमाखु)

### अनुक्त द्रव्य अभ्यास पद्धती :

येथे तंबाखूचे उदाहरण देऊन विषय स्पष्ट केला आहे.

१) प्रत्यक्ष ज्ञानाने (पंचेंद्रियाव्दारा) गंध, रूप, रस, शब्दपरीक्षा केली आहे व त्यावरून गुण निश्चिती केली. उदा. स्पर्श–रूक्ष, रस– कटू इ.

२) गुणांवरून पांचभौतिकत्व निश्चितीकरण केले हे तलिका पध्दतीने केले आहे. यात तंबाखू हे 'वायू तेज' प्रधान द्रव्य निश्चित झाले.

३) यावरून रस, वीर्य, विपाक ठरविले. आप्तोपदेशाचा विचारही येथे केला. उदा. विपाक ठरवितांना पुढील प्रमाणे विचार केला आहे.

१) कटूतिक्तकषाय रसांचा विपाक कटू असतो. (च.सू.) तंबाखू कटूतिक्त रसाची आहे म्हणून विपाक कटू.

२) विपाक कर्मनिष्ठ असतो. (च.सू.२६.) चरकांनी कटू विपाकाचे पुढील कर्म सांगितले आहेत.

१) वातकर २) शुक्रनाशकर ३) बध्दविमूत्रताकर

✳ तंबाखू बध्दविमूत्रकर होते. तिक्तकषाय व रूक्ष असल्यामुळे.

तंबाखू तेज म्हणजे अग्नि प्रधान आहे तर शुक्र सौम्य आहे. विपरीत गुणामुळे हे शुक्रनाशक आहे. शुक्राने व्रणरोपण होते तर तंबाखू व्रणकर आहे म्हणजे तंबाखू शुक्रनाशकच आहे.

✳ तंबाखूचे पांचभौतिक संघटन व 'वृध्दीसमानै: सर्वेषां' यानुसार तंबाखू वातकर आहे म्हणून तंबाखूचा विपाक कटू आहे हे निश्चित होते.

४) द्रव्य, गुण, रस, वीर्य, विपाक यांच्या आधारावर शरीरावर होणारे कार्य निश्चित केले आहे.

✳ यात सामान्य दोष वातपित्तकफादींवर होणारे कार्य ठरविणे.

✳ त्यांच्या पंचविध दोष विकल्पनांवरील कार्य ठरविणे.

✳ धातू, मल, उपधातू, ओजावरील कार्य ठरविणे.

✳ प्रत्यक्ष परीक्षणाने कार्य पाहिले. उदा. हृद्द्रव, भ्रमप्रवृत्ती, मुखदाहकर, दौर्बल्यकर, कंप, तीव्रभ्रम, च्छर्दी,

दंतहर्ष, मुखपाक, दुर्गंधी, इ.

## औषधी प्रयोग सूत्र :

तंबाखू अग्निप्रधान द्रव्य आहे म्हणून कफजविकार, प्रतिलोम वातज विकार, कफावृतवातज विकारांत उपयुक्त ठरेल.

- ✳ कफज विकार – प्रतिश्याय,नासानाह, शिरोगौरव, गलजाड्य, लिप्त जिव्हा यात धूमपान उपयोगी आहे.
- ✳ प्रतिलोम वातज व्याधी – उदावर्ताचे प्रकार. यात बाह्य व आभ्यंतरत: उपयोग.
- ✳ कफज व प्रतिलोम वातज व्याधी – श्वास, हिक्का यात तंबाखूचे धूमनस्य करावे. तंबाखू फांटाने वमन त्वरीत लाभकर असल्याचा उल्लेख आहे.
- ✳ कफावृत्त वातज व्याधी –
    - ✳ कफावृत्त उदान – वाक्ग्रह
    - ✳ कफावृत्त समान – अस्वेद, अग्निमांद्य, गात्रशीतता, आभ्यंतरत: तंबाखूने स्वेद प्रवृत्ती प्रभूत होते. बाह्यत: तंबाखूसिध्द तैल अभ्यंग करावा.
    - ✳ कफावृत्त व्यान – संधी अस्थिरूजा, स्तंभ, यात सांध्यांना एरंडतैल लावून तंबाखूच्या पानाने पट्टबंध करावा.
    - ✳ कास – कफजकास, कफशोधनार्ह अवस्थेत धूमपान व वमनव्दारा उपयुक्त.
    - ✳ बाह्यप्रयोग

      आध्मान – पाण्यात भिजवून कोरडे करून तिळतेल लावून पोटावर बांधावे.

      मूत्रकृच्छ् – बस्तिप्रदेशी पत्रबंधन.

      त्वचारोग – कफप्रधान विचर्चिका – तंबाखू शुष्कचूर्ण उद्वर्तन.

      कंडूप्रधान त्वक् जाड्यता – तंबाखू सिध्द तैलाने प्रतिसारण.

      दंतशूल – तंबाखूचूर्ण + हिंग व सैंधवासह – दंत कोटर पूरण केल्यास वेदना शमन.

## इतर अनुभूत उपाय :

- ✳ अतीजृंभा प्रवृत्ती – तंबाखू धूमपान.
- ✳ क्षवथु – वेगावरोधज उदावर्त तंबाखू चूर्ण नस्य
- ✳ गलकंडू – धूमपान, कवल, गंडूष.

**व्यसनमुक्तीसाठी** म. पु. नानलांचे अनुभूत प्रयोग र म नानलांनी वर्णित केले आहेत. ते बघण्यासारखे आहे. उदा. दिवसभरातील तंबाखूच्या प्रमाणाच्या ५0% तंबाखू + २५% बाळंतशोप + २५% ओवा एकत्र कुटून वापरावे.

- ✳ ८ दिवसानंतर तंबाखू २५% + बडिशोप ५0%, ओवा २५%
- ✳ ८ दिवसानंतर फक्त बडिशोप + ओवा यांचे मिश्रण घ्यावे.
- ✳ धूमपान करतांना बिडी / सिगरेटमध्ये एक लवंग टाकून ठेवावी.
- ✳ दंतमंजनासाठी तंबाखू मषी ऐवजी यष्टीमधू व ओवा यांची मषी वापरावी.

या लेखाच्या माध्यमातून वैद्यांचा निद्रिस्त भाव जागा व्हावा, शास्त्रात भर पडत रहावी ही कळकळ ते येथे

व्यक्त करतात. त्यासाठी मैथिली शरणगुप्तच्या ओळीही ते लिहितात.

र.म. नानलांचे भरपूर अवांतर वाचन व योग्य तेथे त्याचा वापर करण्याची हातोटी येथे दिसून येते. (सं. आ.प. एप्रिल ८७; तमाखू)

**पानकोबी** या अनुक्त द्रव्यासंबंधी आयुर्वेदीय विचार मांडतांना. गुणधर्म निश्चितीसाठी द्रव्यगुण सिध्दांत, प्रत्यक्षादी प्रमाणे आणि वृध्दवैद्योपदेश यांचा युक्तीपूर्वक वापर केला पाहिजे असे ते म्हणतात. यासहच स्वानुभवाचा विचारही करावा असे ते म्हणतात. लागवडीच्यावेळी काय काळजी घ्यावी याचे विवेचनही र.म.नानलांनी मराठी विश्वकोषाचे आधारे केले आहे. वृध्दवैद्यांचे अनुभवांतर्गत वैद्य वेणीमाधवशास्त्री, वैद्य म.पु. नानल, वैद्य शंकर दाजीशास्त्री पदे, वैद्य अप्पाशास्त्री साठ्ये, अमेरीकन संशोधक डॉ. अमान यांच्या अनुभवांचे वर्णनही केले आहे. तंबाखू या द्रव्याप्रमाणेच क्रमवार पध्दतीने त्यांनी कोबीचे गुणधर्म, रस, वीर्य विपाक, दोष धातू मलावरील कार्याचे वर्णन केले आहे.

व्यवहारात कोबीची भाजी मोहरी, हिंग, इ. ची फोडणी व चणाडाळ सह केली जाते. पण त्याचा कार्यकारण भाव वर्णित नाही. याबद्दल र.म. नानल म्हणतात की कोबी शीतवीर्य, स्थूल, स्थिर द्रव्य आहे, म्हणून ती कोष्ठात काही काळ राहून पचन पावते, यामुळे पोटात काही काळ जडत्व / गॅसेस तयार होतात म्हणून मोहरी किंवा सरगुणात्मक चणाडाळ यात वापरली जातात.

✳ वेणीमाधवशास्त्रींनी कोबी हे रससार द्रव्य सांगितले आहे. याचा स्वरस श्रेष्ठ आहे असे ते म्हणतात.

✳ म.पु. नानल यांचे मते कोबी –

१) वातज, पित्तज, वातपित्तज हृद्रोगावर हितकर आहे. यात सूप /स्वरस कल्पना वापरावी.

२) उर्ध्वांग आम्लपित्त, दाह, भ्रम, शिर:शूल यासाठी कोबी रस + शर्करा वापरावी. शेकडो रूग्णांवर हा प्रयोग झाल्याचे र.म.ना. नमूद करतात.

३) अप्पाशास्त्री साठ्ये यांनी कोबीरस +साखरेचे सरबत शुष्क कास, सरक्त कासावर उपयुक्त सांगितले आहे.

४) डॉ.अमान यांनी प्रयोगांती कोबी कामला, यकृतशोष, मूळव्याध, दंतवेष्टन रक्तता, nephritis, cystitis, मूत्रदाह, त्वक्कंडू यात उपयोगी असल्याचे नमूद केले आहे.

✳ र.म.नानल यांनी स्वत:चे काही अनुभव सांगितले आहेत. यात प्राधान्याने गुणविचार केलेला आढळतो. तसेच कोबीच्या विविध कल्पनाही सांगितल्या आहेत. उदा.

१) आम्लपित्तात मृदु व शीत गुणांची वाढ होण्यासाठी – कोबीरस + तूप+ साखर – रोज सकाळी – उष्ण, तीक्ष्ण गुणात्मक दाह प्रधान लक्षणे कमी होतात.

२) याचप्रमाणे मुखपाकात उपयोगी मुखपाक पित्ताच्या तीक्ष्णगुणाने मांसधातूच्या आश्रयाने व रक्तदुष्टी प्रधान व्याधी आहे.

३) मूत्रकृच्छ्र –स्वरस + धनेचूर्ण – समानकाली द्यावा.

४) सरक्तदंतवेष्ट – कोबी रसाने गंडूष करावा.

५) अँटिबायोटिक्सचा परिणाम – कोबीरस १ कप, ३–४ दिवस द्यावा.

६) मद्यात्यय जन्य हद्‌दाहात उपयुक्त.

७) रसक्षय अवस्थेत – कोबीरस + मध द्यावा.

८) मधुमेह / मद्यात्यय यात मज्जाप्रदोषाची लक्षणे असतांना नेत्रशक्ती कमी होत असता – कोबीरस १ कप + मध स्वप्नकाली घ्यावे.

९) मधुमेहींनी कच्चा कोबीच खावा असे ते म्हणतात.

१०) विषमज्वरानंतर पचनशक्ती सुधारणे साठी कोबी वाफवून, जिरे, गाजर, कोथिंबीर सह ३ आठवडे घ्यावा.

११) ग्रीष्म, शरद ऋतुत नित्य वापरावा.

✳ याच लेखात 'द्रव्यांवरील संस्कार' यावर र.म. नानलांनी विशेष विवेचन केले आहे. ते सांगतात की संस्कार मुख्यत: दोन प्रकारांनी होतात. – जलसंस्कार, अग्निसंस्कार.

कोबीच्या बाबतीत जलसंस्काराने गुणवृध्दी होते असे ते म्हणतात. म्हणून स्वरस, सूप, वाफवून तो वापरावा.

✳ रोगातील विशिष्ट आहार योजना करतांना समान रोगघ्नतेची मित्र द्रव्ये वापरावी असा विशेष विचारही त्यांनी येथे मांडला आहे.

उदा. हृद्रोगात कोबीसह हृद्य आहार द्यावा.

मूत्रकृच्छ्रात कोबीसह मूत्रल द्रव्ये द्यावीत.

ग्रहणीत कोबीसह ग्राही आहार द्यावा.

✳ कालविचार ही आवश्यक असल्याचे ते येथे नमूद करतात. (सं. – आ.प. सप्टें. ८८; पानकोबी)

द्रव्यगुण शास्त्राच्या दृष्टीने तंबाखू व पानकोबी हे लेख म्हणजे mile stone आहेत.

प्राचीन व आधुनिक शास्त्रानुसार अंडी या विषयी दोन्हींच्या विचारधारेची तुलना केली आहे. त्यातील साम्य आणि मतभिन्नतेचे वर्णन केले आहे. प्राचीन मत स्पष्टीकरणासाठी विविध संदर्भ दिलेले आहेत. उदा. युजुर्वेद, च.सं., जीतिदर्पण, सुश्रुत, चाणक्य, भावप्रकाश इ.

✳ कृत्रिम अंडी निर्माण हे नैसर्गिक अंड्यापेक्षा पूर्णत: भिन्न आहे असे मत ते मांडतात. कृत्रिम मध्ये केवळ संख्यात: वृध्दी आहे, गुणत: नाही.

✳ कृत्रिम अंडी निर्माणात – कोंबड्याची आहारपध्दती (हालचाल न होता एकाच जागी खाणे.) अकाली आहारसेवन (रात्री पण कृत्रिम प्रकाशात खाणे), संप्रेरकांचा अतिरिक्त वापर, एकाच प्रकारचे रासायनिक अन्नसेवन आणि केवळ कोंबडी पासूनच (एकलिंगज) निर्माण होण्याची प्रक्रिया यामुळे ही अंडी गुणत: हीन आहेत हा विचार स्पष्ट केला आहे.

✳ नैसर्गिक अंडी रस, मांस, मेद व शुक्रवर्धक आहेत. सद्योबलकर आहे तर कृत्रिम अंडी रसधातूची विकृती, हृद्रोगकर, अतिरिक्त अपाचित परिणाम आपद्यमान धातू विकृत करून रस, रक्त मेदाची दुष्टी करून रक्तवाहिन्या उपलेप करणारी आहेत. आमदोष निर्माण करतात.

✳ अंडी कशा प्रकारे सेवन करावीत याचेही दिग्दर्शन केले आहे.

यात पचनशक्तीचा विचार करून अंडी खावीत, तसेच कफकालात अंडी नियमित खाऊ नयेत आणि सेवनानंतर १/२ तास पाणी पिऊ नये हे काही विशेष विचार मांडलेले आहेत. (सं. आ.प. जाने. ९५; अंडे = प्राचीन एवं

आधुनिक विचार, कुछ तथ्य कुछ पथ्य)

दूध आणि तूप ही रोजच्या वापरातील द्रव्ये श्रेष्ठ रसायन कशी आहेत. हे चरकाचा संदर्भ देउन स्पष्ट केलेले आहे. या निमित्तानेच काही प्रश्नही त्यांनी उपस्थित केलेले आहेत आणि रसायनांच्या नावाखाली बाजार मांडून लोकांना फसवणाऱ्यावर सडेतोड टिकाही केली आहे.

दुधाचे वर्णन करताना दुध साक्षात सौम्य असून मानवी रसधातूच्या समान गुणांचे आहे. त्याचप्रमाणे यातील मधुरत्व गूळ, साखरेप्रमाणे उत्कट नसून समघात प्रकृतिचे आहे. असे विवेचन केलेले आहे.

चरकांनी आग्ऱ्यसंग्रहात दूध व तूप ही रसायन द्रव्यात श्रेष्ठ सांगितली असली तरी आज उपलब्ध असणारे दूध व तूप त्या योग्यतेचे आहे का ? या विषयी प्रश्न उभे केले आहे. तसे नसतील तर त्यांचे प्रतिनिधी व पर्याय कोणते ? असा प्रश्न ते विचारतात आणि या प्रश्नांचे उत्तरेही त्यांनीच दिलेली आहेत. उदा.

१. केवळ गाईचेच दूध विकणाऱ्या अनेक संस्था स्थापन व्हाव्यात.

२. दूधाच्या गुणांची परिक्षा पांचभौतिक संघटनेप्रमाणे करावी, त्यादृष्टीने संशोधन व्हावे.

३. रानात चरणाऱ्या गाईंचे दूध व गोशाळेतील गाईंचे दूध यांचा तूलनात्मक अभ्यास करावा.

४. दूग्ध सेवनानंतर त्या व्यक्तीच्या आमाशयाचे परिक्षण किंवा त्याचे अनुभुत माहितीची नोंद करून या दोन्ही परिणामांचा तौलनीक अभ्यास करावा.

५. बाजारात मिळणाऱ्या कच्च्या कढाचे तूप अनुपानार्थ किंवा सेवनार्थ वापरू नये. पण अन्न बनवताना इतर अन्नासोबत केल्यास चालतो. कारण अग्निसंस्कार त्याचे पचन करतो.

६. कच्च्या कढाचे तूप पुन्हा तापवून पूर्ण कढविले तर ते वापरण्यास हरकत नसते. अन्न पुन्हा पुन्हा अग्निसंस्कारीत करू नये पण दूध व तूप पुन्हा गरम करता येतात.

७. हे दोन्ही पदार्थ उपलब्ध नसतील तर आहार द्रव्यातील रस, मांस, व शुक्रवर्धक द्रव्ये वापरावी.

    १. रसवर्धक – आंबा, अंजीर, श्रीखंड, गुळाचे मध, खडीसाखरेचे पाणी ही द्रव्ये तर्पण करणारी आहेत.

    २. शुक्रवर्धक – गहू, उडीद, मनुका, खजूर, आंबा, नारळ, चारोळी, आले, सुंठ, कांदा, लसूण, लोणी, तूप, उस, मध, श्रीखंड, सैंधव, दही, द्राक्षे, नारळ पाणी पिणे.

या पैकी तीक्ष्ण, उष्ण, पिच्छील गुणांचा अतिरेक दर्शविणारी द्रव्ये नियमीत पणे किंवा एकाच वेळी अतिप्रमाणात वापरू नये. आवृत्तवाताच्या सर्व प्रकारात लसणाचा वापर करावा. अपवाद – पित्तावृत्तत्व असाही विचार त्यांनी येथे मांडला आहे.

अभ्यास म्हणजे पुन्हा पुन्हा सेवन व नियमित पणे प्रमाणशीर सेवन अपेक्षीत आहे. केवळ एकदाच खाऊन रसायन सेवन झाले असा भ्रम ठेवू नये असे ते म्हणतात. (सं. – आ.प. १७ फेब्रुवारी १९८७; क्षीरा घृताभ्यासो रसायनाणाम्!)

## औषधीकल्प व अनुभूत योग

नानल परंपरेचे वैशिष्ठ्य म्हणजे वैषिष्ठ्यपूर्ण अनुभविक योग. यामध्ये अनेक कल्पांचे वर्णन त्यांनी विविध लेखातून स्पष्टपणे केलेले आढळते. यात सुवर्णयुक्त रसकल्प, चूर्णे, गुटीका, आसव, क्षार, तैल, अर्क, अवलेह यांचे वर्णन आहे.

नित्य सेवनीय रसायन व बल्य योग, हृद्रोगातील कल्प, स्त्रीरोगातील कल्प, वातरोगातील कल्प अशा वैशिष्ट्यानुसारही योग सांगितलेले आहेत. अशा बहुविध कल्पना आढळतात. यातील अनेक कल्प पूर्णतः नवीन असून काहींची निर्माण प्रक्रिया वेगळी आहे तर काहींची चिकित्सेतील उपयुक्तता नवीन आहे. यातील बहुतांशी कल्पांचा निर्माण विधी, घटकद्रव्ये, मात्रा, काल व अवस्थेनुसार उपयोग सांगितले आहेत.

आयुर्वेदावर किंवा परंपरांवर केला जाणारा गुप्ततेचा आरोप येथे पूर्णतः चूकीचा आढळतो.

येथे वर्णित कल्पांपैकी काही कल्प ग्रंथात वर्णित आहेत तर काही पूर्णतः नवीन कल्प आहेत. ग्रंथोक्त कल्पांच्या वापराची पध्दत मात्र नवीन आहे. रोगघ्नता ही ग्रंथापेक्षा भिन्न आहे. प्रत्येक कल्पाची मात्रा, काल, अनुपान, पथ्यापथ्य यांचे स्पष्ट वर्णन केलेले आहे.

## १) नित्यउपयोगी अनुभूत योग :

१ जुलै १९६१ ते १६ एप्रिल ६२ या काळांत वै.म.पु.नानल यांनी 'अनुभूत प्रयोग' या नावाने १० लेखांची लेखमाला लिहिली आहे. यात अत्यंत सुलभ अशा योगांचे वर्णन आहे. दैनंदिन व्यवहारात वैद्यांना उपयुक्त ठरतील आणि बहुजन समाजाचे आयुर्वेद दृष्टीने स्वास्थ्य रक्षणासाठी याचा उपयोग होईल म्हणून त्यांच्या अनुभवात्मक संग्रहातील लेख सविस्तर लिहित आहे असे ते म्हणतात. येथे आपल्याकडे आहे ते सर्वांना सांगण्याची वृत्ती दिसून येते तसेच समाजाचे भले व्हावे ही भावना ही यातून दिसते. येथेच ते इतर वैद्यांना अवाहन ही करतात की त्यांनी आपल्या परंपरेतील, संग्रहातील उत्तमोत्तम योग सर्वांपूढे आणावेत. हे 'स्वस्थप्रवृत्तीकर' योग आहेत असे नानल म्हणतात. यात बाह्य तसेच आभ्यंतर, शाकाहारी आणि मांसाहारी अशी बहुविधकल्पना असलेले, यामूळे बहुसंख्य वर्गास हे उपयुक्त ठरतील असे ते म्हणतात. वृध्दवैद्य परंपरेत अशा प्रकारचे योग आढळतात. ही परंपरा लुप्त होऊ नये यासाठी त्याचे प्रचलन वाढवणे आवश्यक असल्याचे ही ते येथे व्यक्त करतात.

या योगात वापरलेली द्रव्ये सहज उपलब्ध अशी आहेत. ते नेमके कसे घ्यावे याचे सविस्तर विवेचन त्यांनी केले आहे. त्यांचे मात्रा, काल, अनुपान विस्तारपूर्वक सांगितले आहे. योगांची रोगघ्नता निषेध याचेही वर्णन आहे. घटक द्रव्यांचे गुणधर्म, ग्रंथाधारासह वर्णिले आहेत. द्रव्ये निवडतांना कोणती काळजी घ्यावी, श्रेष्ठ द्रव्य कसे निवडावे याचे वर्णन आहे. या योगाचे कार्य कुठे घडते, कसे घडते याचेही वर्णन आहे. किती दिवसात फरक दिसेल याचे ही नेमके वर्णन केले आहे. बहुतांश कल्प कोणत्याही ऋतुत घेतले आणि अनेक काळ सेवन केले तरी चालतात असे आहेत. अनेक अनुक्त द्रव्यांचा वापरही या योगात आढळतो. उदा. ग्रेपफ्रुट, टोमॅटो याला संदर्भ म्हणून ते अम्लरसवर्ग, जंबीर वर्ग सदृश रस, वीर्य, विपाक आधारभूत घेऊन त्यांचे वर्णन केले आहे. मांसयुक्त कल्पात मांसाहाराचे श्रेष्ठत्वही त्यांनी वर्णन केले आहे. तेथेच डालडा सारख्या वनस्पती तूपाबद्दलचा निषेधही नोंदवला आहे.

सदर योगात प्रधान द्रव्याचे दोष नाहीसे करून, ते पचन सुलभ होऊन शरीरास उपयोगी ठरतील अशा द्रव्यांची जोड आढळते. उदा. माषकल्पात उडीद हे प्रधान द्रव्य. पण ते गुरू आहे म्हणून काळेमिरे, सुंठ, यांचा वापर. बल्यगुण वाढण्यासाठी क्षीरपाक पद्धतीने वापर केलेले आढळते. मोड आलेल्या गव्हात 'व्हीटॅमिन ई' असते म्हणून वंध्यत्वातही ते उपयुक्त ठरतील असा उल्लेख त्यांत केला आहे.

I) **सार्वदेहिक पुष्टीकर योग :** सर्वऋतुंत व आबालवृध्दांस उपयुक्त.

१) ● पहिल्या दिवशी २ खजूर (बी काढून) + १ चमचा लोणी + मिरे १-१ दाणा, रात्रभर ठेवावे.
सकाळी खाऊन दूध + साखर घ्यावे. या प्रमाणे ७ दिवस करणे.

● आठव्या दिवशी १ खजूर वाढवणे याप्रमाणे ५ खजूर पर्यंत नेणे.

✒ जीर्ण बध्दकोष्ठ, सर्वगात्रशैथिल्य, अप्रसन्नता.

वर्ज्य ✒ प्रवाहिका, अतिसार, संग्रहणी, सन्निपात ज्वर, कफज अजीर्ण.

२) ● १/२ अक्रोड + १ खारीक + १ च. तूप + २ मिरे

● तूप गरम करून सर्व द्रव्ये भरड टाकून रात्री एकत्र करावे. सकाळी घ्यावे.

✒ देहबल, अग्निबल, मनोबल वृध्दी.

✒ पचन,विवेचन, मुचंन क्रिया प्राकृत,त्रिधातू समतोल.

३) बीही पाक (मोगली बेदाणा) : शक्तीक्षय त्वरीत भरून काढणेसाठी,

● ५-७ बीया (अर्धकूट) + ५0 ml पाण्यात भिजवणे १00 ml दूध + खडीसाखर.

● दर दहावे दिवशी २ बीया वाढवणे, क्रमाने ३ महीने पर्यंत.(शू-रग बी)

✒ जिव्हा ते गुद (पचनव्यूह) अवयव कार्यान्वित, विस्मृती, स्मृतीभ्रंश, धातूपचन सुधारते. आनाह, हिक्का, मलावष्ठंभ, ओजोक्षय. (सं. - आ.प. ४१ जुलै ६१; अनुभविक योग)

४) अमृतकल्प : ५0 gm आवळकाठी लोखंडी तव्यावर भाजणे. काळी झाल्यावर २ चमचे लोणी टाकून भाजावे. आवळकाठी फुलुन काळी झाल्यावर ५0 gm खडीसाखर घालून खलबत्त्यात कुटावे.

✒ १ चमचा कल्प दिवसातून ४ वेळा घ्यावा. (एकावेळी १0 दिवसाचे औषध करून ठेवावे)

✒ पित्ताचे उष्ण, तीक्ष्ण गुणत्व अनन्नाभिलाषा, उद्गार, जळजळ, तृष्णा, मानसिक त्रास

५) गोडंबी + तूप + काळ्या मनुका :

● १ गोडंबी + ७ मनुका + १ च. तूप रात्री वाटून ठेवावे. सकाळी खाऊन वर दूध घ्यावे.

● दर १0 दिवसांनी १ गोडंबी + ५ मनुका वाढवाव्या.

● १ महिन्या नंतर ३ गोडंबी + १७ मनुका + २ च. तूप हेच २-३ महिने चालू ठेवावे.

✒ मांसधातूची वाढ, अग्निदीपन, बलरक्षण, मलविसर्जन, श्रम क्लम नाशन, वीर्यदौर्बल्य.

(सं. - आ.प. जुलै ६१;)

६) डिंक + तूप + खडिसाखर + अहाळीव २0 दिवसांचे मिश्रण १0 तोळे डिंकलाही पूड + २५0 gm कढत तूप ओतावे + २५0 gm खडीसाखर घालावी. बरणीत ठेवावे.

● वरील मिश्रण २ चमचे + १ चमचा भिजलेले अहाळीव + १ कप दूधासह घ्यावे.

✒ अनेक दिवस घेता येते.

✒ गर्भिणी, बाळंतीण, तरूण मुले, मुली

✒ सर्व शर्रीरिंद्रियाचे पोषण, बलसंवर्धन. (सं. - आ.प. १ ऑगस्ट ६१;)

७) अंजीर + तूप + मिरे + मनुका

● १ सुका अंजीर + १० मनुका + १ मिरा + १ च. तूप – रात्री एकत्र करावे.

● सकाळी सूर्योदयापूर्वी खाऊन दूध + खडीसाखर घ्यावे.

● केवळ अंजीर गुरू होऊ शकतात. पण हा योग तो दोष नाहिसा करतो. (सं. – आ.प. १६ ऑगस्ट ६१;)

८) महादीपन घृत (१) : घृत १ कि.

| | | |
|---|---|---|
| काढाद्रव्ये – | महाळुंग तुकडे – ४० तोळे | ओली हळद – ७.५० तोळे |
| | इडलिंबू – ७.५० तोळे | आले तुकडे – ५ तोळे |
| | कागदीलिंबू रस – १० तोळे | चुक्याचारस – २० तोळे |
| कल्क – | त्रिकटु – ७.५० तोळे | गोरखचिंचमगज – १० तोळे |
| | मनुका – १० | चतुर्जात – ४ तोळे |
| | जिरे, ओवा, धने – ३–३ तोळे | जिरफळ – ५ तोळे सैंधव – ५ तोळे |

- घृत सिद्ध करणे,
- १ चमचा तूप समानकाली
- अध्यशन, इ. कारणांनी बिघडलेल्या पचनशक्तीसाठी.
- आध्मान, बध्दकोष्ठ, जळजळ, इ.

९) महादीपनघृत (२) : तूप – १ कि.

| | | | |
|---|---|---|---|
| डाळींबरस – २०० ml | ग्रेपफ्रुटरस – १०० ml | आवळारस – २०० ml | टोमॅटो रस – १०० ml |
| कोथिंबीररस – १००ml | आले रस – १०० ml | ताजे ताक – ४०० ml | दशक काढा – २ lt. |

दशक काढा द्रव्ये :

१) जिरे – २॥, शहाजिरे – २॥, ओवा – ३॥, २) सैंधव – ३॥, पादेलोण – २॥

३) मिरे – २॥, पिंपळी २॥, वेलची १। ४) मनुका १०, खजूर १०

- घृतसिद्ध करणे.
- अनन्नाभिलाषा, हल्लास, आध्मान – हृदयगौरव, बध्दकोष्ठ,बिघडलेले पचन.

(सं.– आ.प. १६ ऑगस्ट ६१)

१०) महादीपनघृत (३) : तूप – ८०० ग्रॅ.

बोकड कलेजी – १०० ग्रॅ.
बोकड तंगडी – २०० ग्रॅ.
अंड्याचा बलक – ४–८ ग्रॅं
} ४.५ lt. पाण्यात काढा – १.२५ शेष

त्रिकटू – ९० ग्रॅ.
ओवा – ३० ग्रॅ.
हिंग – २० ग्रॅ.
सैंधव – २५ ग्रॅ.
बिडलवण – २५ ग्रॅ.
वेलदोडा – २५ ग्रॅ.
} ४ lt. पाणी काढा – १ lt. शेष

✍ दोन्ही काढे + घृत. सिध्द करणे.

मात्रा – १। तोळा. जेवणापूर्वी / पीठात मळून पोळी करून.

✍ मागील घृताप्रमाणे उपयोग. (सं. – आ.प. १ सप्टें. ६१)

११) बदाम + गुलकंद १ चमचा + अश्वगंधा – १ चिमूट

● ३ बदाम रात्री भिजवून सकाळी वाटून + इतर द्रव्ये दूधासह

✍ शरीर व मनाची सर्वांगीण वाढ, ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये व मनास उपयुक्त (सं. – आ.प. १८ सप्टें. ६१)

१२) उडीदडाळ + काळेमिरे + सुंठ + खडिसाखर

● १ $^{१}/_{२}$ चमचा डाळ रात्री भिजवणे.

● सकाळी डाळ + ३ मिरे वाटावे.

● वरील मित्रण + दूध + सुंठ १/४ चमचा + साखर १ $^{१}/_{२}$ चमचा – १ कढ येईपर्यंत उकळावे.

✍ पौष्टीक, सद्य: फलदायी, तारूण्यकर, वीर्यवृध्दीकर, प्रतिकारशक्तीवर्धक. (सं. – आ.प. १ ऑक्टो. ६१)

१३) गोरखचिंच + मनुका + खडिसाखर

● गोरखचिंच गर मगज १ $^{१}/_{२}$ चमचा + १० मनुका + १० ग्रॅ. साखर.

● एकत्र वाटून – ६ गोळ्या.

● अनशापोटी समान काली – २ – २ गोळ्या किंवा

✍ पित्तवृध्दी, अन्नपचन मार्गात व्रण, पोटदुखी (भोजनोत्तर अमृतकल्प). (सं. – आ.प. १६ ऑक्टो. ६१)

**अन्यथा**

गोरखचिंचावलेह – हा टिकाऊ कल्प वापरावा.

● ६ गोरख चिंचा मगज + 200 gm काळ्या मनुका + ४ च. पाणी – ८ तास भिजवावे.

● काढा – १ $^{१}/_{२}$ शेर शेष – गाळणे + खडीसाखर १ शेर – अवलेह करणे

● १ शेर खावा.

✍ आम्लपित्त, विदग्धपित्त. (सं. – आ.प. १ नोव्हें. ६१)

१४) रसाला :

● $^{१}/_{४}$ lt. दूधाचे रोज ताजे श्रीखंड सायंकाळी खावे.

✍ शारिरीक मानसिक अशक्तता, वजनवृध्दीकर, धात्वग्नी व स्थूल पाचकाग्निमांघ, वृष्य, सद्य: प्रत्यकारी योग.

OR

**श्रीखंड वडी रोज २, ३–४ महिने.**

१५) सुरणकल्प

● ५० ग्रॅ. सुरण + $^{१}/_{२}$ चमचा जिरे + १ $^{१}/_{२}$ च. तूप + कोथिंबीर + २–३ च. साखर + २ च. ओले खोबरे कुकरमध्ये शिजवावा.

● अनशापोटी खावा.

● मधुमेहात साखरे ऐवजी आलं सैंधव टाकावे.

● मंदाग्नी, आध्मान, मलावरोध, अर्श, गुदकंडू, निरूत्साह, उदावर्त.

किंवा

● सुरण कीस (उन्हांत वाळवून) – खीर करावी दूधात / ताकात

● सुरणपीठ – थालीपीठ करावे.

● सुरण कोशिंबीर खावी.

१६) गव्हाचे सत्त्व (मोड आणून)

● मोड असलेले गहू वाळवून तव्यावर भाजून पीठ करावे.

● १ चमचा पीठ + १ कप दूध +१ चमचा साखर – अनशापोटी.

● हे Predigested food, आहे.

OR

● मोड आल्यावर सुकवून तुपात तळावे.

● रोज १–२ तोळे.

✎ सद्योतर्पण, अशक्त आबालवृध्दांची शक्ती झपाट्याने वाढते, गर्भिणी तिसऱ्या महिन्यापासून, जीर्णव्याधी उत्तर, नवसूतिका, देहधातू क्षीणता, अस्थिसंधानकर, वंध्यत्वनाशन.

१७) धात्वग्निपुष्टीकर योग –

१) साळीच्या लाह्यांचे पीठ + मधुशर्करा + गरम पाणी.

२) राजगिरालाही पीठ + मधुशर्करा

३) नाचणीसत्त्व + मधुशर्करा.

४) शृतशीतजल + तप्त सुवर्ण

५) मातीच्या कोऱ्या मडक्यात १ lt. पाणी + ५ मिरे उकळणे – १/१६ शेष सूर्योदयापूर्वी पिणे.

६) जिरे + मोहरीचूर्ण (समभाग) + मध.

७) कौंचफुले + नागरमोथा ६ मासे + तृणपंचमूळे १० मासे + ८ पट पाणी – रात्रभर भिजवणे . सकाळी उकळून १/८ शेष. पिणे.

८) मायफळ + सराटे + चंदन + धने + जिरे – ३–३ मासे.

९) चांदकुडा गंध जेवणापूर्वी.

१०) सूर्योदयापूर्वी १० थेंब मधात शुध्द सुवर्ण ३–१० वेढे घेणे.

११) सुर्योदयापूर्वी औदुंबरजल ५ तोळे पर्यंत पिणे.

१२) ग्रेपफ्रुट रस + खडिसाखर + गरम पाणी.

१३) मेथीपूड + जुनागूळ + तिळतेल.

१४) सब्जारस + भीमसेनी कापूर. (सं. आ.प. १ नोव्हें. ६१;)

श्री.र.म.नानल यांनी ‘श्रीखंडाचा’ सोपा रसायन प्रयोग सांगितला आहे. हाच योग म.पु. नानलांनी १९६१

च्या अंकात सांगितला आहे. र.म.नानलांच्या योगात काही बदल आढळतात. उदा. त्यांनी दूध ज्या भांड्यात विरजवायचे असेल त्यास आतून आल्याच्या रसाचा लेप देण्यास सांगितले आहे. ही परंपरेत घातलेली भर आहे.

वै. म.पू.नानल हे श्रीखंड सायंकाळी खावे असे सांगतात तर र.म.नानलांनी दुपारी जेवणात पोळीसह सांगितले आहे. हा परंपरेत झालेला बदल आहे. र.म.नानलांनी याचे कार्यकारीत्व सिध्दांतदृष्टया अधिक स्पष्ट केले आहे. उदा. हा योग रस, मांस, शुक्र या तीन धातूंचे पोषण करतो व हृद्य आहे.

✳ क्षीरान्नाद ते दंतविहीन वार्धक्यापर्यंत सर्वांना उपयोगी.

✳ खेळाडू, कसरत, व्यायामपटू, पित्त व वातप्रधान व्यक्ती. आम्लपित्त, आध्मान, मलविबंध, ग्रहणी, शोष. शुक्रक्षीणता व रसक्षीणतेत उपयुक्त.

✳ चाळीशीनंतर शरीराचा ऱ्हास होण्याची गती कमी करण्यासाठी उपयुक्त.

म.पु.नानल केशर वेलची यांची आवश्यकता नाही असे म्हणतात. तर र.म.नानल आंबामावा, केशर, वेलची घालण्यास हरकत नाही असे म्हणतात. कदाचित बदलत्या काळाची गरज, म्हणजे चवदार होण्याच्या दृष्टीने हा बदल असेल.

हा योग त्यांच्या पिढीजात वैद्यक घराण्यात सहस्त्रश: अनुभूत असल्याचे ते नमूद करतात. (सं. – आ.प. जून ८५; श्रीखंड एक सोपा रसायन प्रयोग)

## II) हृद्रोगातील अनुभूत योग :

### अ) एकेरी द्रव्ये :

| नं. | द्रव्यनाम | रोगघ्नता | हृद्रोगघ्नता |
|---|---|---|---|
| १ | पुष्कराज | आमांश, मस्तिष्करोगघ्न | हृद्रोगघ्न (स्वतंत्र) |
| २ | वज्रभस्म | | हृद्रोगघ्न (स्वतंत्र) |
| ३ | मण्डूरभस्म | पाण्डु, कामला, यकृत प्लीहारोग | हृद्द्रव, दौर्बल्यश्च |
| ४ | माणिक्यभस्म | | स्वतंत्र हृद्रोगघ्न |
| ५ | लोहभस्म | पाण्डु, प्रमेह, मंदाग्नि, मूत्रकृच्छ्र | स्वतंत्र कफहृद्रोगघ्न |
| ६ | अकीक पिष्टि | मृत्रकृच्छ्र, अम्लपित्त | वातपित्तज हृद्रोगघ्न, हृद्य |
| ७ | शृंगभस्म | फुप्फुसविकार | स्वतंत्र हृत्शूलघ्न, कफहृद्रोगघ्न, |
| ८ | स्वर्णभस्म | रसायन | हृदयबल्य |
| ९ | स्वर्णमाक्षिक भस्म | शोथघ्न, वृष्य | वातपित्तज हृद्रोगघ्न, मनोविकृति |

**ब) कल्प :** यात अनेक ग्रंथोक्त कल्प हृद्रोगाच्या कोणत्या अवस्थेत उपयुक्त आहे याचे अनुभव दिले आहेत.

| नं. | कल्पनाम | हृद्रोग अवस्था विशेष |
|---|---|---|
| १ | मकरध्वज | क्षीण व मंद नाडी, (हृदयगति-हास) स्तम्भ ग्रहादि, ओजक्षयनाश |
| २ | कस्तूरीभैरव | क्षीणवातज, वृद्ध कफ संप्राप्तिभेदन |
| ३ | हेमगर्भ | कफज हृद्रोग, श्वासकासातिरेकनाशन मूर्च्छानाशन |
| ४ | बृहद्वातचिंतामणी | वातगतिप्रधान हृद्रोगनाशक (शमन), हृत्शूलघ्न |
| ५ | त्रैलोक्यचिंतामणी | कफावृत उदानावस्थाघुर्घुरक, जलपार्श्वनाशन |
| ६ | रससिंदूर | सर्वांगशोथनाशन, हृद्रोग उपद्रवरूप शोथात उपयोगी |
| ७ | मन:शिलासिंदूर | श्वासघ्न, उन्मादअपस्मारज हृद्ग्रहघ्न, मेदोरोगघ्न, |
| ८ | हेमाभ्रक सिंदूर | प्राणवह स्त्रोतोदौर्बल्य, रसायन, पित्तजहृद्रोगनाशन |
| ९ | समीरपन्नग | नाडीगतिवर्धक, हृद्य (सुवर्णसमीर - विशेष हृद्य) |
| १० | चतुर्भुज | श्वासकष्ट, वरणजन्य हृद्रोगनाशन, शीतांगनाशन |
| ११ | चतुर्मुख | हृद्य कफहृद्रोगघ्न |
| १२ | प्रवाल पंचामृत | महास्रोतसविकृतिजन्य विविध परतंत्र व स्वतंत्र हृद्रोगघ्न |
| १३ | प्रभाकर वटी | वृध्दगतिप्रधान हृद्रोगघ्न, प्रमेहज हृद्रोगात विशेष देणे |
| १४ | चंद्रप्रभा वटी | हृद्रोगघ्न, प्रमेहोपद्रवात उपयोगी |
| १५ | संशमनी वटी | हृद्रोगघ्न, ज्वरजन्य हृदयोपद्रवनाशन |
| १६ | महाशंखवटी | प्रतिलोमवातज, उदरशूलघ्न, उन्मादघ्न, |
| १७ | लशुनादि वटी | कफजहृद्रोगनाशन, कृमिजहृद्रोगघ्न, उन्मादघ्न |
| १८ | हिंगुकर्पूर वटी | हृदयउत्तेजक, स्वेदल, हृत्स्तंभ, ग्रहनाशन |
| १९ | अग्नितुंडी वटी | हृद्रोगघ्नी, अग्निमांद्यज, हृद्रोगघ्न |
| २० | आरोग्यवर्धिनी वटी | हृद्य, अम्लपित्त, उदर, शोथज हृद्रोगघ्न |
| २१ | महायोगराज गुग्गुल | हृद्य, उर:शूलघ्न (अस्थिगत), रसायन, स्नायूशूलघ्न |
| २२ | योगरोज गुग्गुल | हृद्य, फासळ्या दुखणे (उर:शूल अस्थिगत) |
| २३ | गोक्षुरादि गुग्गुल | मूत्रकृच्छ्रनाशन, पित्तज हृद्रोगघ्न |
| २४ | पुनर्नवादि गुग्गुल | शोथघ्न, परतंत्र हृद्रोग |
| २५ | त्रिफला गुग्गुल | कफमेदोज हृद्रोगघ्न |
| २६ | सप्तविशति गुग्गुल | उर:शूल, पार्श्वशूलघ्न |
| २७ | मधुगुग्गुल | मेद:क्षेपणार्थ यशस्वी. |
| २८ | अर्ककल्पना | दीपन पाचन, हृद्य द्रव्यांचे अर्क, सूरसार्क, सर्पगंधार्क, ज्वरघ्न अर्क, शतवीर्यादि अर्क, स्तम्भन अर्क |

| नं. | कल्पनाम | हृद्रोग अवस्था विशेष |
|---|---|---|
| २९ | अवलेह | च्यवनप्राश – हृद्रोगघ्न, हृद्द्रव, उरःशूलघ्न |
| ३० | चूर्ण | १. एलादि चूर्ण – हृद्य, छर्दिजन्य हृद्रोगघ्न<br>२. कर्पूरादि चूर्ण – हृदयोत्तेजक<br>३. पुनर्नवा चूर्ण – शोथघ्न<br>४. त्रिफला चूर्ण – कफपित्तमेदोज हृद्रोगघ्न<br>५. त्रिकटू चूर्ण – कफजहृद्रोगघ्न<br>६. लवणभास्कर – हृत्स्तम्भघ्न<br>७. हिंग्वाष्टक – हृद्य, प्रतिलोमअपानघ्न, कफहृद्रोगघ्न<br>८. आमलकीमषी – आम्लपित्तज हृल्लास, उत्क्लेशदाहघ्न |
| ३१ | क्षार | अपामार्ग, तिल, चणक, निंब, पर्णबीज, अर्क, कुमारी यांचे क्षार विशेषतः कफावृत समान, अपानजन्य हृद्रोग व लक्षणांमध्ये वापरतात. उदा. कफज हृद्रोग, ग्रहणी, यकृद्दाल्यूदर, शोथ, गुल्म अजीर्णजन्य परतंत्र हृद्रोगात उपयोगी होतो. आवश्कते प्रमाणे थोडे दिवसच वापरतात. |
| ३२ | अरिष्ट | १. वासाकुमारी – (स्वतंत्र कल्प) प्राणवह स्त्रोताचे रोगघ्न.<br>२. दशमूलारिष्ट – प्रसिद्ध आहे. शोथ, विबंधात वापरतो.<br>३. खदिरारिष्ट – हृद्य, रसरक्तपाचक, मांसधात्वग्नि दीपन.<br>४. अर्जुनारिष्ट – सर्व हृद्रोगात<br>५. पुनर्नवारिष्ट – शोथ, मूत्रकृच्छ्र, उदरघ्न<br>६. विंडगारिष्ट – कृमिजन्य हृद्रोगासाठी, प्रमेहघ्न.<br>७. द्राक्षारिष्ट – प्रसिद्ध आहे. मानसिक व्यग्रतानाशन. |
| ३३ | आसव | १. दाडिमासव – हृद्य. पित्तवातज हृद्रोगासाठी अप्रतिम काम करते. |
| ३४ | तैल-घृत | महातिक्तक, दशतिक्तक, शतावरी घृत व फलघृत वापरतो. पित्तवातज हृद्रोगात. बलातैल, सहचर तैल, बीजपर्ण तैल – पान, अभ्यंग करण्यासाठी विशेषतः उरः शूल, पार्श्वशूलघ्न (हृद्रोगात बस्ति किंवा वमनप्रयोग करत नाही). |
| ३५ | गंधकद्रुती | कै. वैद्य म.पु. नानल संशोधित कल्प आहे. |

## III) सुवर्ण कल्पाचे अनुभूत योग :

यात हेमकल्प (सुवर्णसिद्धजल), सुवर्णवर्ख, सुमावसंत, स्वर्णपर्पटी, वचासुवर्णवटी, स्वर्णवज्रमधु यांचा वापर आढळतो.

**हेमकल्प –** १ lt पाण्यात १ ग्रॅ. सोने, तप्त करून विझवणे. हि क्रिया २१ वेळा करणे. गाळणे. बाटलीत भरणे.

* ८–१० दिवस वयाच्या बालकांपासून वृध्दांपर्यंत वापरण्यास उपयुक्त.
* प्रतिकार शक्ती वाढणे, व्याधीनंतरचे दौर्बल्य, दुर्जल सेवनजन्य रोगाच्या प्रतिबंधार्थ, उपयोगी असल्याचा उल्लेख.

**सुवर्णवर्ख –** वृध्दवैद्य परंपरेचा उल्लेख आहे.

* १ कि. रसायन कल्पासाठी १ ग्रॅ. वर्ख वापरतात.
* बालकांना सूक्ष्म करून वापरतात. २५० ग्रॅ. खडिसाखर + १/२ ग्रॅ. वर्ख
* पित्तवातज विकारात साखरेसह, कफवात प्रधान रूग्णांत मधासह दिला जातो.
* जातज हृद्रोग व प्राण व स्त्रोतस दौर्बल्यात वापरतात.

**सुमावसंत –** सूक्ष्म करून किंवा बालकांसाठी मात्रा करून वापरण्याची पध्दत आढळते. त्यांच्या व्याधीतील वापरात वैशिष्टय आढळते. त्यांच्या व्याधीतील वापरात वैशिष्ट्य आढळते.

| व्याधी | काल | अनुपान |
|---|---|---|
| ✳ अन्नविषबाधाजन्य उपचारानंतर | तीन आठवडे | |
| ✳ हृद्शस्त्रक्रियेनंतर | १ ऋतुपर्यंत | व्यानउदानकाली |
| ✳ नेत्ररोग शल्यकर्मोत्तर | २ महिने | निशाकाली, अनन्नकाली |
| ✳ वातजपांडु | ६–८ महिने | महातिक्तघृत, शतावरीघृतासह |
| ✳ धातुशोष–बालकांत | | पंचामृतासह |
| ✳ स्मरणशक्ती कमी होणे | १ वर्ष | रात्री बदामासह |
| ✳ चंचलता असेल तर | | अभ्रक भस्म + सु.माक्षिक–जटामांसीसह |
| ✳ आमाशय प्रदोषज ग्रहणी, श्वास | ४ महिने | त्रिकटू ५०० मिली.+ महातिक्तघृत १० ग्रॅ + सु.माक्षिक १२५ मिली. सअन्न |
| ✳ चिरकारी पांडु | | कासीस, लोह, दाडिमासवासह |

**सुवर्णपर्पटी –** हा कल्पही 'सुक्ष्म' पध्दतीने वापरतात. यासहची पथ्य कल्पना विशेष वर्णन केली आहे. उदा.–

* दूध, पंचामृत, शतावरीघृत हे पदार्थ अधिक दयावे. द्रवप्रधान आहार दयावा.
* चिरकारी ग्रहणी, हृद्रोग, अग्निमांद्य यात 'वर्धमान' मात्रेचा वापर केला जातो.
* जीर्णज्वर,वातबलासक ज्वरात चौसष्टी पिंपळीसह देतात.
* वातजग्रहणी जन्य हृद्रोग, प्लीहावृध्दी यात शतावरीघृत, जीरक, अभ्रकाचा उपयोग केला जातो.

**वचासुवर्णवटी –** म. पु. नानल यांनी सर्वप्रथम हा प्रयोग केल्याचा उल्लेख. वेखंडाची लागवड करतांना सोन्याची

तार खोचून झाड वाढवावे. नंतर पंचांगांच्या गोळ्या कराव्या. मेध्यरसायन, पक्वाशयाचे चिरकारी व्याधी, कृमिज प्रतिरमाया चघळून दिल्या जातात.

**स्वर्णवज्रमधु –** वज्रभस्म १ गुंजा + मध १ कि. हे मिश्रण सोन्याच्या मथनीने १प्रहरपर्यंत वेगवान यंत्राने घुसळणे. हा प्रयोग म पु नानल यांनी सर्वप्रथम केल्याचा उल्लेख वि.म. नानल याचा अधिक वापर करत असल्याचा उल्लेख आहे. अरिष्टात्मक, असाध्यलक्षणात्मक अवस्थांत उपयुक्त. (सं. – आ.प. ऑक्टो. १७; सुवर्णचिकित्सा अनुभव)

## IV) वैद्य पु.ग.नानल यांचे वापरातील वनौषधि/रसौषधि –

१) **विश्वभैषज चूर्ण**

२) मातुल चूर्ण (सध्याचे सुखसारक चूर्ण) दीपन, पाचन–ग्रहणी प्रदोषघ्न

३) अनेक ताज्या वनस्पती व त्यांचे , सिद्ध तैल, घृतादि कल्पही वापरत.

४) **माक्षिक –**

१. रक्तसंजननार्थ; २. वृष्य (र.र. समुच्चय); ३. शिर:शूल – बुद्धि स्मृतिवर्धनार्थ–रौप्य अभ्रक देत होते.

५) **खर्परभस्म –** वातप्रधान आर्तवविकारात (ते कष्टार्तव संज्ञा वापरत) तीव्र कटीशूलादि व रसरक्तक्षीणतेसाठी

कासीस २ गुंजा + गंधक २ गुंजा कोरफड (गर) २ मोठे चमचे + मध देत असत. रज: काळी द्यावा.

६) **गर्भिणी विकार –** १. गर्भिणी शोथ : मंडूर २ गुं. + शतावरी गुळवेल हिरडा काढा–घृतप्रक्षेप

२. गर्भिणी अर्श : मंडूरभस्म २ गुंजा ताकातून जेवताना द्यावे.

३. गर्भिणी पाण्डुता : मंडूर + अभ्रक १/४ गुंज प्रत्येकी तूपसाखरेतून.

७) **स्त्रीविकार –** १. श्वेतप्रदर : वंग + ल.मा.व. (खर्परभस्म) + जिरे

२. कफजयोनिरोग : अभ्रक, शिलाजतु + गुडुचिसत्व + मधु.

: त्रिवंग + गुडुचिसत्व दुर्बल रूग्णेस घृतासह दीर्घकाल द्यावे.

: नागभस्म + कामदुहा – चिरकारी प्रदरघ्न.

: यशदभस्म + लोहभस्म – चिरकारी प्रदरघ्न.

८) **बालरोग –** १. कृमी व कफविकार : खर्पर/यशदभस्म

२. दंतोद्भेदज रोग : मुक्तापिष्टी, प्रवाळपंचामृत (सं. – आ.प. ऑगस्ट ११; स्त्रीरोग बालरोग अनुभूत चिकित्सा)

## कै. म.पु. नानल

१) ग्रंथोक्त कल्पांच्या बरोबर एकेरी किंवा निवडक वनस्पतिज सहपान औषधांची योजना करीत असत.

२) स्वतंत्र कल्पनिर्मिती व स्वसंशोधित औषधांवर फार कटाक्ष असे.

३) पथ्य योजना विशेष असे (फक्त नेमके द्रव्य, संस्कार, मात्रा इत्यादींचा तपशील फार बारकाव्यांसह सांगत असत).

**स्त्री रोगातील ग्रंथोक्त विशेष कल्प :**

१) गर्भपाल  २) त्रिवंग  ३) वंग  ४) गुडुचिसत्व  ५) पुष्यानुग चूर्ण  ६) फलघृत

७) शतावरी  ८) मोचरस  ९) नागकेसर  १०) बोल  ११) टंकण  १२) अपामार्गक्षार

१३) चंद्रकला  १४) चंद्रप्रभा (क्षारयुक्त) शिशुपाल

**अनुभूत कल्प :**

- विषांचा वापरही औषधांमध्ये केलेला आढळतो. उदा. नागविष, सर्पविष, यापासून कोब्राकेन हे औषध बनविले. (सं. - आ.प. म.पु. नानल विशेषांक पान. ३८)
- प्राणिज औषधे : कासव मांसरस - उदाराच्या लोकांना
  घोरपडीची चरबी उकळून तवंग काढून त्याचा वापर बाह्यस्नेहासाठी
  सूकरवसा (वराहवसा) - मेदोरोगात बाह्यस्नेह म्हणून
- सूक्ष्मौषधे अधिक वापरीत लॅक्टोज व गैरीकमध्ये सूक्ष्मीकरण करीत.
  अभ्रक, लोह सुवर्णयुक्त औषधे बालकांची औषध लॅक्टोज माध्यमा मध्ये सूक्ष्म करीत.
  अन्नवह, रसवह स्त्रोतसांवरील औषधे, पित्तप्रधान व्याधी, यासाठी गैरिक माध्यमात सूक्ष्मीकरण करीत.
- गंधकाचा बहुकल्पी वापर आढळतो. शुगंधक, सिद्धगंधक, गंधकद्रती स्वरूपात वापरीत
  गंधकद्राव हा स्वशोधित कल्प (सं. - आ.प. जुलै ७९; विविध बालरोग व एकच गंधद्राव)
- क्षार चिकित्सा - अनेक वनस्पतींचे क्षार बनवीत. अपामार्ग, शरपुंखा, निंब, कंटकारी, अर्क, तीळ, चिंचा, कुर्ड , माठ यांचे क्षार. हे क्षार स्वतंत्रपणे, काढ्यात प्रक्षेप करून किंवा गुटीका स्वरूपात वापरीत.
- मषी कल्पना - आमलकी, चतुर्बीज, अजाशफ, कच्छपपृष्ठ, गंजदंतमषी
- उर्ध्वपातित अर्क - दीपनपाचन अर्क, शिशुपाल, गंधार्क, सुरसार्क, पारिपाठा, ज्वरघ्न, स्तंभन अर्क, हृद्यअर्क, विश्वामित्र कपालार्क, शतवीर्याअर्क, शतपुष्पा, जीरकादी अर्क
- कर्कद्राव - खेकडासिद्ध तेल
- स्वरस - दूधीस्वरस ब्लडप्रेशरसाठी, कोबीस्वरस
- लेह - मध्वामलकलेह, कपित्थजंबीर लेह, जंबीरावलेह
- वटी - रोचनावटी, बीजपर्णवटी, रक्तवटी, वंशिकावटी, यकृतवटी, दुग्धार्कवटी, आत्रेयवटी, आमगर्भवटी, वचासुवर्णवटी, श्रीफलकुसुमवटी, रजस्विनी (महिषीपीयूष दुग्धशर्करा) निळंबी (वनस्पती) गैरीक माध्यम किंवा दूग्धशर्करा माध्यम वापरून अनेकदा गुटीवटीक करीत.
- काढा - कामाक्षअश्मरीहर काढा, रक्तशोधक काढा, वासाकुमारी, अश्मरीहर कषाय, डुमरॉल (योनिधावनार्थ)
- लेप - संधीलेप
- वनस्पतीची लागवड करतांना त्यात धातूंची तार ओवून त्या वनस्पतीच्या पंचांगापासून औषधे बनविला वचासुवर्ण, ताम्रकुमारी, रसहरिद्रा, निशादीवटी, पारदकुमारी

**कल्प :**

१) ● अपत्यजननयोग – चतु:स्नेह एकत्र करून,

● आमंडिन – शतावरी कल्पाप्रमाणे बरास कल्प.

● वाग्भट १५ व्या अध्यायातील ३३ गणांचे या प्रमाणेकल्प करून त्यांचा वापर

● सूक्ष्मत्रिफळा – १ भाग कज्जली व १५ भाग त्रिफळा यांचे मर्दन करणे.

● सूवर्णसिद्धजल – ५ ली. पाण्यात सुवर्ण उकळून २.५ ली. करणे. त्यात सारीवा किंवा बीट उकळणे. याचप्रमाणे रौप्य, मौक्तिक सिद्धजल.

● दन्तोद्‌भेदासाठी – लोखंडी चोपचिनी, हरिद्रा, मुक्तापिष्टी, क्षारतैल.

● वज्रमधु – रिष्टात्मक, – असाध्य बालरोगासाठी देत असत.

## वैद्य भा.पु.नानल यांच्या वापरातील अनुभूत औषधे

गुणवत्तेसाठी स्वत: औषध निर्मिती करीत. औषधांना कोड नं. दिले होते.

✳ अर्कांचा वापर करीत.ग्लोब्युल्सवर अर्कटाकून वापरीत.

✳ अर्कांचे इंजेक्शन वापरीत. हाफकिन इन्स्टिट्यूटमध्ये टेस्ट करून इंजेक्शन्स करीत उदा.बदामसाल, करवंटीचे अर्कांचे, इ.

✳ सूक्ष्मोषधांचा वापरही करीत विशेषत: भस्मे सूक्ष्मीकरणासाठी गुळवेलसत्व, लॅक्टोज, कॉर्नस्टाच वापरीत. ६x पर्यंत सूक्ष्म करीत.

✳ कुक्कुटनखी गुग्गुळ, दशमूळ गुग्गुळ

✳ आमलकीमषी + शंख – आम्लपित्तात आवळा क्लीन्नता वाढवतो, मषीत क्लेद काढला जातो. म्हणून मषीचा वापर करीत.

✳ आमलकी मषी + इसबगोल.

✳ केस वर्धनासाठी त्रिभुवन कीर्ती वापरीत.

✳ वेदनास्थापक व संप्राप्तीभंगासाठी प्रत्येकाला इतर औषधांच्या जोडीला 'वचा' वापरीत.

✳ अश्वगंधा, गुळवेल, वचा, दशमूळ यांचे घन वापरीत.

✳ वाजीकर औषधांचे जोडीला अनुपान म्हणून रबडी वापरीत.

✳ तैल – तैलांचा वैशिष्ट्यपूर्ण वापर आढळतो. ग्रंथोक्त तैले विविध अवस्थांनुसार वापरली आहेत. तर काही नवीन तैले तयार केली आहेत.

**वातनिरुपस्तंभित अवस्था :** नारायण तैल, बला तैल, माष तैल, चंदनबलालाक्षादितेल, दशमूलतैल, क्षीरबला शतपाक सहस्त्रपाक.

**एकेरी तेले :** तिलतैल, बदामतैल, अक्रोडतेल

**वातउपस्तंभित अवस्था :** विषगर्भ तैल,

**रक्तदुष्टी कुष्ठादि विकार :** पारिभद्र तैल, त्रिफळा तैल (पित्तप्रधान), अर्कतैल, मरीच्यादि तैल, अनूभविक –

बीजपर्ण तैल

**उर्ध्वजत्रुगत विकार : शिर –** अर्कतैल, मरीच्यादि तैल, त्रिफलातैल, निंबबीज तैल, करंजतेल, पारिभद्र तैल महानिंब तैल, भल्लातकतैल, भृंगराजतैल ब्राम्हीतैल.

**शुल दाह गौरव –** बला तेल, दशमूलतैल वचातेल, बदाम तैल चंदनादि तैल सर्षप तैल, देवदारादि तैल विडंग तैल, अपामार्ग तैल.

**कर्ण शूल स्राव बाधिर्य –** लशून तैल, हिंग तैल, वचातैल, दशमूलतैल, बिल्वतैल

**नेत्र –** दाह शूल, स्तंभ दृकमांद्य, घृताचा उपयोग विशेषत: त्रिफला घृत, दशमूल तैल, चंदनादि तैल.

**नासा –** अणुतैल, क्षार तैल, तिल तैल, बदाम तैल, चंदनादितैल, बीचपर्णतैल, पद्मकादितैल, वचातैल

**दंतमुख –** भल्लातक तैल, लवंगतैल, तिलतैल, ईरिमेदादीतैल, बीजपर्ण तैल, दशमूलतैल, अपामार्गतैल

**मन्या –** दशमूलतैल, प्रसारिणीतैल वासणीतैल, नारायण तैल, बलातैल

**उर्ध्वशाखा –** बलातैल, नारायणतैल, माषतैल, विषगगर्भतैल, सहचरतैल, दशमूळतैल, अपामागतैल गुडच्यादितैल, सर्षपतैल, बदामतैल

**उरोभाग –** उर:शूल, पृष्ठशूल, पार्श्वशूल, कुक्षिशूल, हृदशूल पृष्ठभाग, उदरप्रदेश, कटिप्रदेश.

पुष्करमूलतैल, लशुनतैल, सर्षपतैल, देवदारुतैल, लताकरंजतैल, इंगुदीतैल, शिग्रुतैल, नारायणतैल, दशमूल तैल, बलातैल, कासिसादीतैल, चुक्रतैल, विडंगतैल, पंचकोलतैल, कुसुंभ तैल, जयपालतैल, पद्मकादितेल, लाक्षादितैल, एरंडतैल.

**अध:शाखा –** बलातैल, नारायणतेल, विषगर्भतैल, शिग्रुतैल, दशमूलतैल, एरंडतैल, सहचरतैल.

कामलेसाठी देवदाली तेलाचे नस्य

## वैद्य र.म.नानल यांचे वापरातील कल्प

पुर्व परंपरेतील बहुधा सर्व कल्प वापरतात. दाडिम आसव नवीन योग केला आहे. विशेषत: गर्भिणी पाण्डुताघ्न, हृद्रोग, दीपनयोग. (ताप्यादि, पुनर्नवामंडूर, धात्रीलोहासह).

**अनुपार्थ विशेष कल्प –** लाजामण्ड, धान्यजीरक फाण्ट, शतपुष्पाविश्वफांट, तण्डुलोदक राजक्षप-पेली-कुष्भांड-स्वरस. नित्याचे दुग्ध, तक्र, मस्तु.

## प्रमुख ग्रंथोक्त कल्प :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) ल.मा.वसंत | २) महायोगराज | ३) सुवर्णमालिनी | ४) ताप्यादि | ५) कासीस |
| ६) स्वर्णमाक्षिक | ७) अभ्रक | ८) त्रिवंग | ९) गर्भपाल | १०) वसंतकुसुमाकर |
| ११) दाडिमासव | १२) बालजीवन | १३) वासाकुमारी | १४) गोक्षुरादि | १५) चंद्रप्रभा |
| १६) चंद्रकला | १७) बलातैल | १८) सहचर तैल | १९) करंजतेल | २०) तिलतैल |
| २१) बीजद्राव | २२) महातिक्तघृत | २३) शतावरीघृत | २४) शिशुपालअर्क | २५) नाभिप्रक्षेप, अभ्यंग |
| २६) माणिक्य | २७) मुक्तापिष्टी | २८) गोमेदभस्म | २९) अकीक | ३०) त्रिविक्रम |

## वैद्य र.म.नानल यांचे चिकित्सेतील अनुभूत उपाय

**आम्लपित्त :** आम्लपितात लक्षणांनुसार घरगुती अनुभूत उपायांचे वर्णन केले आहे. उदा.

✳ **जळजळ –** १. चिमूट खाण्याचा सोडा + २ च. पाणी घ्यावे.

२. बाळहिरडा सुपारी प्रमाणे चघळावा.

३. आवळामषी लोण्यासह घ्यावी.

✳ **घशाशी येणे –** जळजळीत पाणी हे आम्लपित्ताचे लक्षण, तर नुसतेच पाणी हे अजीर्णाचे लक्षण. यात आवळामषी घ्यावी.

पित्ताचे द्रवत्व कमी होण्यासाठी आठवड्यातून एकदा त्रिफळाचूर्णाने विरेचन.

✳ **चक्कर, डोकेदुखी –** २० काळ्यामनुका + १ च. हिरडाचूर्ण याच्या गोळ्या करून ४ गोळ्या रात्री चघळाव्या.

अतीजलपान डोकेदुखीचे कारण ठरू शकते, ते टाळावे.

✳ **उलट्या –** आंबट, कडू उलटी होऊन पित्तपात असल्यास त्या थांबवू नयेत.

अशक्तपणा नसेल तर तीव्र विरेचन घ्यावे.

लाह्या, फळांचे रस मधून मधून घ्यावे. (सं. – आ.प. मार्च १२; आम्लपित्त व आयुर्वेदाचे विशिष्ट्ये)

**परिणाम शूल : शुलावस्थेत –**

१. खाण्याचा सोडा + पाणी

२. ओवा १ च.+ काळेमीठ १/४ च. + ओवा २ च. – यांचे मिश्रण कोष्णजलासह

३. एरंडेल तेल / नारळतेल–स्थानिक प्रतिसारण, स्थानिक स्वेदन.

**आध्मान अधिक असेल –**

१. हिंग + मोहरीचा पोटावर लेप. तत्पूर्वी एरंडतेलाचे स्थानिक प्रतिसारण करावे.

२. एरंडेल २ च. + मीठ २ च. + १ lt पाणी– बस्ति

३. काळेमीठ, निंबूरस, आलेरस कोष्णजलासह.

**पोटात दाह –**

१. कोष्ण दूध पिणे

२. जेष्ठमध + आवळा + शतावरी मिश्रण १/२ च. घेणे.

३. शिंगाडा, आरारोटची खीर घेणे

४. खजूर, मनुका, केळी, द्राक्ष यांचा उपयोग.

**च्छर्दी असेल –**

१. वेलची + मध– मुहुर्मुहु चाटण.

२. सज्जीखार + सैंधव आलेरसासह.

३. साळीच्या लाह्या, मोरावळा.

**उदर गौरव –**

१. सुंठ १/२ च. + काळेमिरे १/२ च. + ओवा १ च. – गरम पाण्यासह.

हळद १ च. + आले १ इंच. +काळेमीठ जेवणापूर्वी १५मि. घ्यावे. (सं. – आ.प. ऑक्टे. १०; परिणामशूल हेतुलक्षण उपचार)

## प्रमेहातील अनुभूत योग

- ✳ उचकी लागल्यास अहाळीवाचा काढा दयावा. किंवा अहाळीव, दालचिनी, वेलची यांची मषी तूपासह दयावी.
- ✳ हस्तपादतलदाह असतांना काकडी मध लावून खावी. काकडी साल वाटून तळव्यावर लावावी. कलिंगड, टरबूज, कोहळा यांच्या सालीही उपयुक्त आहेत.
- ✳ मूत्रमार्गास कंडू असल्यास कोबीरसाने धावन करावे. कोबी रस पोटातून घ्यावा.
- ✳ सर्वांग कंडू – कोबीरस वापरावा.
  - – कडूजिरे + कापूर मिश्रण सर्वांगास लावावे.
  - – रिठ्याचे पाणी सर्वांगास लावावे.
- ✳ योनीकंडू– त्रिफळाक्याथ/स्वर्जिकाक्षार जलाने योनीधावन.
- ✳ क्लम (थकवा) – झेंडूच्या पानांचा रस ६ चमचे + ओवा १/४ च. – ३/४ वेळा दिवसातून
- ✳ बहुमूत्रता :
  - १) अनशापोटी मिरे +साखर
  - २) बेलपाने रस २–२ च.
  - ३) ओली हळद२–२ च.
  - ४) जांभूळ बी चूर्ण रोज दूपारी जेवणानंतर ताकासह. ओवा भाजून १च. घ्यावा.
  - ५) श्रीवर्धन रोठा सुपारी खावी.
  - ६) पांढरी सदाफुली अनशापोटी १0फुले खावी.
  - ७) मेथीचा साखरेचा लाडू खावा. (गूळाचा वर्ज्य).
  - ८) आलेरस व लसूण खावा.

## प्रमेहातील उद्वर्तन

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आवळा | – | ५00 | लोध्र | – | २५0 |
| ओली हळद | – | १00 | कुळीथ | – | २५0 |
| जटामांसी | – | १00 | वेखंड | – | ५0 |
| चंदन | – | ५0 | भीमसेनी कापूर | – | १0 |

## प्रमेहातील भाजणी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्वारी | १कि. | बाजरी | १/२ कि. | गहू | १/२ कि. | हरबरे | १/४कि. |
| मूग | १/४कि. | कुळीथ | १/४कि. | जिरे | १/४कि. | धने | १/२कि. |

शहाजिरे १००ग्रॅ हिंग १०ग्रॅ ओवा १/४कि. काळेमीठ१०ग्रॅम

सैंधव १०ग्रॅ.

* नवीन औषधी निर्माण करतांना त्यातील घटक द्रव्यांचा पूर्ण अभ्यास प्रथम करावा. शास्त्रीय निकष लावून ते तपासावे. द्रव्यरस, गुण, वीर्य, विपाक, प्रभाव, दोष धातू, मल, उपधातूंवरील कार्य ठरवावे असे मत ते मांडतात.
* ग्रंथात वर्णित द्रव्ये ''आप्त वचन'' प्रमाणाच्या आधारावर ग्राह्य धरावी. त्यावर अध्ययन करण्यात धन व कालाचा व्यय करू नये. त्यापेक्षा जे ग्रंथात नाही त्यांचे सूक्ष्मातिसूक्ष्म निरीक्षण, परीक्षण, अध्ययन करावे असे स्पष्ट मत ते मांडतात. यासाठी सुश्रुताचा संदर्भही देतात.
* नवीन द्रव्यांच्या निकषात अवयव आणि समुदायत: हे दोन प्रमुख निकष सांगितले आहेत. उदा. केवळ रस, केवळ वीर्य, केवळ विपाकाने कार्य करणारे द्रव्य कनिष्ठ समजले जाते. पण या सर्वांव्दारे - समुदायाव्दारे कार्य करणारे द्रव्य श्रेष्ठ ठरते.

  शास्त्रातील माहिती विशिष्ट हेतू नुसार गुंफून त्याचे योग्य विश्लेषण त्यांनी केलेले आहे. (सं. आ.प. डिसें. १६; नवीन वनस्पतीज औषधी निर्माण आयुर्वेदीय दृष्टीकोन).

## नानल परंपरेतील नवीन कल्प

* **गंधद्राव**

**कृती -** अंड्यातील बलक काढून, टरफले कोरडी करावी. त्यात गंधक + टंकण ३:१ प्रमाणात भरावे. त्यास गोपीचंदनाचे यात कापड करावे. अक्रोड तेल रिकाम्या डब्यात टाकून त्यात ही टरफले उभी ठेवावी. मंदाग्नीवर १ प्रहर पचन करावे. - अंतर्धूम पध्दतीने करावे. निळा द्राव तयार होतो.

* **अमृतकल्प -** नवनीतभृष्ट आमलकी + खडिसाखर
* **रोचनावटी** - गोरोचन +कटूका + गैरीक

(गो) रोचना = गाईचे पित्त हे नवीन द्रव्य त्यांनी वापरले आहे. गाईचे पित्तात - गैरीक चूर्ण मिसळून २-२ गुंजेच्या गोळया केल्या. हे पित्त अतिशय विस्त्रगंधी असते. पण गोळया सुकल्यावर हा वास ८०% कमी होतो, असा अनुभव येथे नोंदवतात

**गुणधर्म :** दीपन, आमपाचन, दूषिविषपाचन, पित्तानुलोमन, मलप्रवृत्ती रंजन, कृमिजन्य विकारांतही उपयुक्त. मात्रा - २-४ गुंजा अधिक मात्रेत दाह भ्रम ही लक्षणे होतात.

* **वंशिका वटी -** वंगभस्म, शिलाजीत, कांतलोह कामदुधेच्या माध्यमात एकत्र करून २ गुंजंची गोळी.
* **यकृत्वटी -** अजायकृतकल्क + कामदूधा
* **दुग्धार्कवटी -** बकरीच्या दूधाचे चीज, त्याच्या गोळया
* **आत्रेयवटी**
* **रक्तवटी -** अजारक्त आणि सुवर्ण गैरिक यांच्या गोळया.
* **आमगर्भवटी -** कोंबडीची अंडी आणि दुग्धशर्करा यांच्या गोळया.

* **मूत्रलधारा –** काटेमाठ, तृणपंचमूळ, पळसफूल, वाळा, कदलीकंद, गोखरू आणि पाषाणभेद यांचा पातन यंत्राने काढलेला अर्क.
* **हृद्यअर्क –** कोबीचा अर्क
* **गंधार्क –** सर्पगंधा, जटामांसी, खुरासणी ओवा आणि धने यांचा अर्क.
* **कामाक्ष अश्मरीहर काढा –** काटे माठ, तांदुळजा (कुरडु) सूप स्वरूपात – आहारीय पदार्थ म्हणून वापर
* **रक्तशोधक काढा –** अनंतमूळ, मंजिष्ठा, चंदन, कुटकी, तृणपंचमुळ, रक्तरोढा, पुनर्नवा, त्रिफळा, धने.
* **संधीलेप –** शिग्रु, गुग्गुळ, रेवाचिनी, हिंग.
* **पपई मूलक्षार –** सोलर मध्ये पपईचा क्षार बनवणे.
* **कर्कद्राव –** खेकडा सिद्ध तेल याचे बाह्य आभ्यंतर उपयोग वर्णित आहेत किंवा गंधद्रावासह कर्कभस्म (खेकड्याचे भस्म) अस्थिसौर्षिर्यात वर्णित आहे.
* **सूक्ष्मौषधे**

  १ ग्रॅम मूळ औषध + ९ ग्रॅम दुग्ध शर्करा – १ x औषध

  १ x मधील १ भाग + ९ ग्रॅम दुग्ध शर्करा –२ x

  २ x मधील १ भाग + ९ ग्रॅम दुग्ध शर्करा – ३ x
* गंधनस्य म्हणजे वेखंड, कापूर, निलगिरी, पुदीनाफूल, इ. पदार्थ रूमालात ठेवणे. मधून-मधून वास घेणे.

## अ) संहिता सिद्धांत, संज्ञा, सूत्रे, गुण संकल्पना संदर्भात

आयुर्वेदातील सिध्दांत, संज्ञा सूत्रे गुण यांचा योग्य अभ्यास होऊन त्याचा व्यवहारात उपयोग कसा करता येईल हे त्यांनी स्पष्ट केले आहे. यासाठी पंचीकरण सिद्धांत 'प्रमाथी' संज्ञा, चरक स्नेह अध्यायातील सूत्र आणि गंधगुणाचे उदाहरणाद्धारे हे स्पष्ट केले आहे.

**सिद्धांत –** आयुर्वेदातील प्रत्येक सिध्दांत प्रयोजन सिद्धीकडे नेणारा आहे असे ते म्हणतात. पंचीकरण किंवा पंचमहाभूत सिध्दांत हा आयुर्वेदाच्या पायाभूत सिध्दांतांपैकी शिरस्थ सिध्दांत आहे. याच्या योग्य ज्ञानाशिवाय आयुर्वेद समजणे अशक्य आहे असे ते म्हणतात.

पंचमहाभूतांचे मिश्रण होण्याची प्रक्रीया म्हणजे पंचीकरण. ही प्रक्रीया कशी घडते याचे सुस्पष्ट विवेचन त्यांनी केले आहे. यासंबंधी दोन विचार आहेत.

१) अन्योन्य अनुप्रवेश – एकाएका महाभूताचा प्रवेश.

२) एकाचा दुसऱ्यात, दोघांचा तिसऱ्यात, तिघांचा चौथ्यात याप्रमाणे.

डल्हण ाने सुध्दा हा दुसरा प्रकार मांडलाआहे. पण हा न पटणारा आहे असे नानल म्हणतात. कारण तो व्यवहार विरूध्द आणि भ्रमसूचक आहे.

सुरेश्वराचार्य लिखित वेदांत सारातील सूत्राचा संदर्भ देउन तो विचार अधिक योग्य आहे असे मत त्यांनी

मांडले आहे. उदा. प्रत्येक महाभूतातले दोन भाग व त्यापैकी एका भागाने चार समान भाग अशा पध्दतीने अनुप्रदेशात्मक पंचीकरण प्रक्रीया घडते.

या लेखात त्यांनी अग्निच्या संदर्भाने याची व्यवहार्यता स्पष्ट केली आहे. जाठराग्नि संघटनेतील ज्या महाभूताच्या अग्निची विकृती असते त्या भावपदार्थाचे पचन बिघडते. जर पार्थिव अंश मंद झाला तर पार्थिव पदार्थाचे पोषण होत नाही.

अशा वेळी रूग्ण लक्षणांचे वर्गीकरण करताना केवळ कफ इ. चा विचार न करता पांचभौतिक संघटनेचा विचार करावा. त्याही पुढे जाउन या पार्थिव इ. द्रव्यांच्या रस, गुण, वीर्य, विपाकांच्या विकृतींची निश्चिती करावी. यामुळे नेमकी चिकित्सा होऊ शकते असा विचार त्यांनी येथे मांडला आहे. रूग्णाच्या लक्षणांची वैद्याने काळजीपूर्वक नोंद करावी.

विकल्पसंप्राप्तीज्ञ वैद्य आणि व्यापक रोगी असल्यास नेमकी औषध व पथ्य योजना होऊ शकते.

पंचीकरण विचार केवळ ग्रांथीक किंवा तात्वीक नसून आगमसिध्द व प्रत्यक्षसिध्द अशा दोन्हीही स्तरांवर सिध्द होतो याचा अधिक अभ्यास ही मोठी गरज आहे. येथे श्लोकातील अर्थ अधिक स्पष्टपणे व अधिक मुद्देसूद पध्दतीने आजच्या भाषेत मांडलेला आढळतो. (सं. – आ.प. मे १९९६; 'पंचीकरण विचार व त्याची व्यवहार्यता)

ग्रंथातील कार्मुक संज्ञांचे महत्व सांगून त्यांचा अभ्यास कसा करावा याचेही विवेचन केले आहे. यासाठी 'प्रमाथी' या संज्ञेचे उदाहरण दिले आहे. या संज्ञांचा विचार शरिर दृष्टीने केल्यास त्याची व्यापक उपयोगिता आणि श्रेष्ठत्व स्पष्ट होते तसेच त्यांचे नेमके व यशस्वी प्रयोग करता येतात असे ते म्हणतात.

**संज्ञा** – कोणत्याही संज्ञेच्या अभ्यासाचा क्रम कसा असावा याबद्दल सांगताना ते म्हणतात की या संज्ञेचा वापर बृहद्त्रयीतील चरक या ग्रंथात कसा केला आहे हे पहाणे अनिवार्य असते. यानंतर आवश्यक वाटल्यास वाग्भट पहावा व त्यानंतर भावप्रकाशादी ग्रंथ व त्यांचे टिकाकार पहावे. अशा प्रकारच्या क्रमामुळे विचारांची दिशा शास्त्राबाहेर जात नाही असा अनुभव ते सांगतात. हे दिशादर्शन विद्यार्थांसाठी तसेच व्यवसायिकांसाठीही अतिशय उपयुक्त आहे.

उदा. प्रमाथीचा विचार करताना चरकांनी किमान २ ठिकाणी हा वापरला आहे.

१) चरक सूत्रस्थान ७/९ –पुरिष वेगावरोध जन्य विकारांच्या चिकित्सेत प्रमाथी अन्नपान करावे.

२) चरक चिकित्सास्थान १३/१८० – उदर चिकित्सेत असाध्य रोग्यावर शेवटचा प्रयोग सांगताना प्रमाथीचा उल्लेख आहे.

पहिल्या सूत्रात चक्रपाणींनी प्रमाथी म्हणजे अनुलोमन असा अर्थ केला आहे तर दुसऱ्या सूत्रात क्षोभकारी व शीघ्रकार्यकारी असे दोन अर्थ दिलेले आहे. परंतु यातील क्षोभकारी हा शब्द अधिक योग्य असून त्याने दोषसंघात मिश्र होणे हे अपेक्षित आहे. प्र+मथ्+ती = प्रमाथी = प्रकर्षेन मथति = विशेष बलाने घुसळण्याची क्रिया करणे, हा अर्थ समजून घेतल्यानंतर शारंगधरातील (शारंगधर पूर्व.खंड ४) मूळ सूत्राचा अर्थ अधिक स्पष्ट होतो. जे इथे आपल्या वीर्याने स्त्रोतसातील दोषांचा संचय बाहेर काढून टाकते. प्रमाथी (नीज् वीर्ये नयत् द्रव्य...)

शारंगधराचे टिकाकार आढमल्ल आणि काशीराम यांनी 'निज वीर्येण' शब्दाचा अर्थ स्वप्रभावेन असा केला आहे तो चूकीचा आहे असे नानल म्हणतात, कारण वीर्य आणि प्रभाव या दोन भिन्न गोष्टी आहेत. निज वीर्येण् या शब्दाने वीर्यरूप गुणांचा निर्देश केला आहे असे माझे मत आहे असा स्पष्ट उल्लेख येथे आढळतो.

या ठिकाणी व्दिविध वीर्य आणि अष्टवीध वीर्य यांच्या गुणांचा विचार व विश्लेषण करून प्रमाथी द्रव्याचे गुण सांगितले आहेत. तसेच इतर शरीर गुणांचाही विस्तृत विचार केलेला आहे व यानुसार प्रमाथी द्रव्यांचे गुण उष्ण, स्निग्ध, तीक्ष्ण, सूक्ष्म, सर, द्रव, विशद असे होतात.

गुणानुरूप विचार केल्याने चिकित्सेमध्ये याचा वापर अधिक चपखलपणे करता येतो. चिकित्सेत गुणानुरूप वापर करण्याची युक्तीही त्यांनी सांगितली आहे.

**१) उष्ण गुणात्मक द्रव्ये –**

१) श्वास रोगात कफवातघ्न व उष्ण असणारे व वातानुलोमन करणारे उपचार करावे लागतात. येथे 'मरिच', मरिचादी प्रमाणातील त्रिकटू, अपामार्ग क्षार, नवसागर व स्वर्जीकाक्षार हे प्रमाथी कार्य करतात. हे शतश: अनुभवसिध्द आहे असे ते म्हणतात.

२) व्रणशोथाच्या विशिष्ठ अवस्थेत उष्ण उपनाह ही क्रियाही प्रमाथी समजावी असे ते म्हणतात.

३) पीनसादी चिरकालीन नासारोगात उष्ण जलाचे नस्य.

**२) स्निग्ध गुणात्मक द्रव्ये –**

१) स्त्रोतसातील दोषसंचय क्लीन्न व नि:सरण करण्यायोग्य करणे. उदा. वचा, करंज, शिग्रू, अतसीतैल.

२) मलविबंध, आध्मान यात स्निग्ध द्रव्यांचा बाह्य, आभ्यंतर उपयोग केल्याने होणारा लाभ.

**३) तीक्ष्ण गुणात्मक द्रव्ये –**

१) जेथे अवरोधात्मक संप्राप्ती असते तेथे या द्रव्यांचा वापर करावा. उदा. वृध्दकफजन्य तमक, संचित पित्त किंवा कामला, वृध्दवातासाठी मात्र मृदु शोधन वापरावे असे ते म्हणतात.

**४) सूक्ष्म गुणात्मक द्रव्ये –**

१) जेथे संकोचात्मक संप्राप्ती असेल तेथे ही द्रव्ये वापरावी. उदा. पक्षवध, अर्दीत, वातव्याधी, व्रणदुष्टी याज सलवण तैलाभ्यंग, मधूक ही द्रव्ये उपयोगी ठरतात.

**५) सरगुणात्मक द्रव्ये –**

१) मलविबंध फोडून बाहेर काढणारी द्रव्ये.

२) तमकातील सरगुणात्मक द्रव्ये – उदा. अपामार्ग क्षार.

**६) द्रव गुणात्मक द्रव्ये –** अन्नवहातील हल्लासासाठी आमाशयस्थ दोष लक्षणांमध्ये कोष्णद्रवपान करून च्छर्दी करविणे.

**७) विशद गुणात्मक द्रव्ये –** वृध्दपथ कामलेते आम्लरसाची विशद द्रव्ये देणे, उदा. जंबीर, याप्रमाणे प्रमाथी द्रव्यांचा गुणविचारानुसार वापर करणे हा पुर्णत: नवीन विचार नानलांनी येथे मांडला आहे. (सं. – आ.प. १५ जानेवारी १९८५; कार्मुकसंज्ञाचा विचार –प्रमाथी)

**सूत्र –** संहिता ग्रंथांचा चिकित्सेमध्ये उपयोग कसा करावा याचे सोदाहरण मार्गदर्शन त्यांनी केले आहे. विषय स्पष्ट करताना शिर्षकातील तिन्ही शब्दांचा अर्थ त्यांनी स्पष्ट केला आहे. संहिता, सूत्र, व्यवहार अर्थ स्पष्ट करताना संस्कृत, मराठी, English अशा ८ ते १० व्याख्या त्यांनी येथे सांगितल्या आहेत. संहितेतीलच दृष्टांत आणि न्याय या योगे हा विषय मांडला आहे.

वनपहिता: स्नेहा:... चरकसूत्र स्नेहअध्याय याचे उदाहरण त्यांनी दिले आहे. सूत्रातील प्रत्येक शब्दाचा संधीविच्छेद करून मग त्याचा सरल अर्थ दिला आहे. यासहच टिकाकारांनी केलेले स्पष्टिकरणही त्यांनी मांडले आहे. या व्यतिरिक्त काही शास्त्रीय विमर्श आणि पारिभाषिक संज्ञांचे ज्ञान अनिवार्य आहे असे ते म्हणतात.

या सूत्रात एकंदर ९ पारिभाषिक शब्द आहेत. लवण, स्नेह, स्नेहन, अभिष्यंदी, सर, सूक्ष्म, उष्ण, व्यवायी इ. या प्रत्येकाचा अर्थ, त्याचे प्रकार, त्यातील श्रेष्ठ द्रव्य इ. च्या आधारे स्पष्ट केलेला आहे.

ग्रंथांचा अभ्यास करताना विद्यार्थांना तसेच व्यावसायिकांनाही मार्गदर्शन उपयुक्त आहे. (सं. – आ.प. जानेवारी १९९३; संहितासूत्रांचा व्यवहार)

ग्रंथोक्त सूत्रांचा अर्थ कसा लावावा हे सांगतांना नानलांनी ''स्नेहमेव परं विद्यात् दुर्बलानल दीपनम्। नातंस्नेह समिश्चस्य शमयान्तं सुगुर्वपि ॥'' या सूत्राचे उदाहरण दिले आहे.

सदर सूत्राचा विमर्श सांगताना नानल म्हणतात की या सूत्रात स्नेह आणि अग्निदीपन यांचा सामान्य संबंध सांगितला आहे. हा स्वस्थ आणि रोगी या दोन्ही अवस्थात द्रव्यगुणत: विचार करून ठरविला आहे. विशेष अग्नि दीपन प्रक्रीया दोषादी सापेक्ष असते.

या सूत्रातील स्नेहाचा अर्थ समजण्यासाठी च.सू. २६/३७ मधील सूत्र 'अतश्च प्रकृतम् ...' सांगितले आहे. या सूत्रानुसार प्रकरण, देश, काल, ग्रंथकाराचा अभिप्राय आणि उपाय या आधारे स्नेहाचा अर्थ मांडला आहे. येथे स्नेह म्हणजे घृत असा अर्थ अपेक्षित आहे. सदर लेखात अवस्थांनुसार घृताचा वापर कसा करावा याचे वर्णन केले आहे. उदा.

१) बहूदोषावस्थेत – शोधनार्थ.

२) अल्पदोषावस्थेत –
  १) वातदोषासाठी – लवणआम्लरससिध्द
  २) पित्तासाठी – तिक्तमधूररस सिध्द
  ३) कफासाठी –तिक्तकटूरस सिध्द

३) कृश रोग्यासाठी दीपन घृत

४) निराम पुरीष परंतु द्रव मल – दीपन घृत थोडे थोडे निरन्न द्यावे.

५) मळाचा खडा – पंचलवण सिध्द घृत – अपानकाली.

ग्रंथात घृताचा वापर अधिक असून तेलाचा त्यामानाने कमी आहे. तसेच वसा व मज्जा यांचा उपयोग भस्मक रोगात आढळतो. दुर्बलादि रूग्णात विशेष वापरत नाही असे विवेचन त्यांनी येथे मांडले आहे.

त्यांच्या परंपरेतील म.पु.नानलांच्या वापरातील महादीपनघृताचा विधी व उपयोग आणि कार्यकारणभाव त्यांनी येथे विस्तारपूर्वक दिला आहे.

अभ्यंतर वापरासाठी वापरावयाचे घृत हे शक्यतोवर ताजे वापरावे म्हणजे १ महिन्यापर्यंतचे बाह्योपचारात जुने तूप श्रेयस्कर आहे असे ते म्हणतात. (सं. - आ.प. एप्रिल १९९६; अग्निदीपन व स्नेह)

**गुण -** 'गंध' गुणाचे चिकित्सेतील महत्त्व त्यांनी विषद केले आहे. विषय विस्तार करतांना त्यांनी गंधाचे पांचभौतिकत्व, प्राकृत दोष, धातूमलांचा गंध, विकृत शरीर घटकांचा गंध, रिष्टलक्षणात गंधाचे महत्व, चिकित्सेतील गंध द्रव्यांचा वापर, गंध ग्रहणाची प्रक्रीया, गंधाचे गुण,कर्म व प्रकार व हृद्य गंध द्रव्ये असा विस्तृत विचार केलेला आहे.

पंचमहाभूतांचे गुण सांगताना शब्द आकाराचा, स्पर्श वायूचा इ.फक्त एक गुण हे नैयायीक मत आहे. तर आकाश शब्दगुणाचा, तर वायू शब्द व स्पर्श गुणाचा याप्रमाणे पृथ्वी शब्द, रूप, रस, गंधयुक्त हे सांख्यमत आहे. चिकित्सकाला सांख्य मत अधिक योग्य आहे असे नानल म्हणतात.

दोष, धातू, मलांचा प्राकृत गंध सांगताना पित्त दोष-विस्त्रगंधी

रक्तधातू - विस्त्रगंधी; शुक्रधातू - मधुरगंधी; स्वेद - विगंधी

विकृत शरीरघटकांचा गंध विचार स्पष्ट करताना पार्थिव तत्वांची विकृती झाल्यास कफास दुर्गंधी येते.

अग्निवैषम्यामुळे पित्ताची घटनात्मक विकृती होऊन त्यातील पार्थिव गुण विस्त्रगंधी होतो आणि आमगंधत्व, विस्त्रगंधत्व, मत्स्यगंधत्व, आणि लोहगंधत्व अशा विकृती निर्माण होतात. व्याधी लक्षणातील गंधाचे संदर्भही त्यांनी विस्तृतपणे मांडले आहेत.

उदा. रक्तपित्ता लोहलोहित मत्स्याम गंधास्यत्वम् । अतिसारात अतिदुर्गंधयुक्त मल, प्रमेहपूर्व रूपात अंगगंधवृध्दी इ. प्राय: प्रत्येक रोगात एखादे लक्षण तरी गंधविकृतीशी संबंधित मिळते असे ते म्हणतात.

गंध इंद्रियाशी संबधित घटक त्यांनी वर्णिले आहे. प्राणवायू, तर्पक कफ, साधक हृद्‌गत पित्त; रस, रक्त, मांस हे धातू, हृदय आणि मस्तिक.

शरिरास सात्म्य गंध तो सुगंध व असात्म्य गंध तो दुर्गंध अशी व्याख्या केलेली आढळते.

गुण भेदाने व कर्म भेदाने सुगंधाचे प्रकार केलेले आहेत हा विचार नवीन आहे.

**१) गुणभेदाने प्रकार -**

१) तीक्ष्ण - वेलची, कस्तुरी, लवंग, मिरे, हिंग इ.

२) मृदु - वाळा,गुलाब, जाई, पाचचे अत्तर.

३) स्निग्ध - खस (वाळा), चंदन तेल, बकुल.

४) रूक्ष - केसर, हिना अत्तर, दालचिनी.

५) शीत - चंदन, वासा, कमल.

६) उष्ण - मरवा, दवणा, सब्जा, तुलसी, केवडा, कस्तुरी, हिना अत्तर.

**२) कर्मभेदाने सुंगधभेद -**

१) उत्तेजक - मोगरा, केवडा,सोनटक्का, कापूर, हिंग, मदनबाण, चाफा इ.

२) अवसादक - शिवलिंगी, भाग (गांजा), कण्हेरफूल.

३) प्रसादकर - खस,गुलाब, कमल, जाई, अन्नसुगंध, चंदन.

४) शोधन - वचातैल, वेलची, पिंपळमूळ, लवंग, ओवा, तुलसी, सुतापकंध

५)	वृष्य – जाति,दवणा, जायफळ, कस्तुरी.

६)	हृदय – गुलाब, जाई, जुई, तुळस, मरवा, कापूर, हिंग, दवणा, कस्तुरी, हिना इ.

सुगंधी, हृद्यद्रव्याचे वर्णन करताना त्यांनी **विविध अवस्थांमधील उपयोग** सांगितलेले आहे. उदा.

१)	आम्लपित्तज हृदयदाह – अनन्नकाली गुलकंद १–३ तोळा.

२)	मदात्ययज हृदयक्लम – दर १ तासांनी १–१ तोळा गुलकंद.

३)	हृदयशक्तीजन्य क्लैब्य – अनन्नकाली, व्यान व अपानकाली गुलकंद.

४)	संयोगापूर्वी गुलाबाचे अत्तर हुंगावे किंवा गुलाबाचे अत्तराचे निरांजन लावावे. हा वृध्द वैद्य परंपरेतील प्रयोग सांगितला आहे.

५)	अतिशय ताणामुळे मनाचा व हृदयाचा थकवा असल्यास दर २ तासांनी गुलाबाचा वास घ्यावा.

६)	ग्रीष्म आणि शरदऋतु – गुलाब पाकळ्या घातलेले माठाचे पाणी प्यावे.

७)	पित्तज् ज्वरातील हृदय अस्वस्थता – यात गुलाब पाकळ्यांचा फांट.

८)	गर्भिणीत ४थ्या महिन्याच्या पूर्वीपासून ते ६ व्या महिनापर्यंत गुलाबपाणी व्यानकाली द्यावे. याने जातज् हृद्रोगाचा धोका टळतो. हा सुध्दा वृध्दवैद्य उपदेश आहे.

स्वत:च्या व्यवसायात हे योग अनेकवेळा वापरल्याचे ते नमुद करतात, याचप्रमाणे वैद्य म.पु.नानल यांच्या वापरातही हे योग होते. यासहच हीनाअत्तर, खसचे अत्तर यांचेही योग ते रूग्णांसाठी वापरीत असत.

गंधविचार अतिशय मोठा विषय असून त्यावर अभ्यास करून वैद्यांनी प्रबंध लिहावा अशी इच्छा येथे ते व्यक्त करतात. (सं. – १५ डिसेंबर १९८१; गंधविचार व सुगंधाचे हृद्यत्व)

## ब)	१. हेतु विचार :

हेतू संदर्भात नानलांनी सूक्ष्म विवेचन केले आहे. निदान, चिकित्सेत हेतूंना विशेष महत्त्वही दिलेले आहे. आम्लपित्त व परिणाम शूल यांच्या वर्णनात हेतूंचे विस्तारश: विवेचन केलेले आहे.

हेतूविवेचन करतांना ग्रंथोक्त आणि अनुक्त अशा दोन्ही हेतूंचा विचार केलेला दिसतो. उदा. १) मद्याचे आधुनिक प्रकार – ब्रॅडी, व्हीस्की, रम, जीन, इ. २) रासायनिक विषारी कीटकनाशके, ३) दुष्टजल ४) आधुनिक संस्कारीत अन्न – यीस्ट, व्हीनेगर यांचा वापर. ५) पर्युषित अन्न – फ्रीजमधील अन्न, इ.

या सर्वांचा समावेश रोगहेतू मध्ये करणे, शास्त्र उपबृंहणासाठी आवश्यक आहे असे ते म्हणतात.

✳	आम्ल पित्ताचे उदाहरण सांगतांना आम्लसेवनाच्या अतियोगाने होणारे आम्लपित्त हा विचार प्रथम केलेला आहे. यात आम्लरसाच्या ग्रंथोक्त व अग्रंथोक्त लक्षणांचाही विचार केला आहे.

✳	यात आम्लाचा विचार रसस्तरावर, नंतर गुणस्तरावर, लघु, उष्ण, स्निग्धादीनुसार; कार्यस्तरावर – शीघ्रपाकी, कृशताकर, दाहकर इ. पध्दतीने केला आहे.

✳	विपाक स्तरावर – शरीरावरील हे परीणाम प्रकृतीसमसमवाय कोणते आणि विकृती विषम समवाय कोणते याचेही विवेचन केले आहे.

✳	विदाही अन्नाचे स्पष्टीकरण त्यांनी अधिक नेमके केलेले आढळते. उदा. १) स्वभावत: विदाही २)

गौरवजन्य विदाही.

स्वभावत: विदाही रसाचा विचारही दोन स्तरावर करावा असे ते म्हणतात.

१) प्राकृत स्वरूपात योग्य प्रमाणात खाण्याने विदाह करणारे रस.

२) अतिस्वरूपात खाण्याने विदाह करणारे रस.

* आम्ल, लवण, कटू हे रस अतियोगाने विदाही होतात हे शास्त्रवचनावरून समजते. येथेच वै. नानलांनी नवीन विचार सिध्दांत मांडला आहे की ज्या व्यक्तीस आम्लपित्त व तेही विदाह प्रधान असेल तर त्याचा त्रास या तीन रसांच्या समयोगातील सेवनानेही वाढणार. प्रत्यक्ष अनुभवानेही हे सिध्द होते.

* द्रव्याचे विदाहीत्व ठरवितांना वीर्यत: विदाही म्हणजे उष्णवीर्याची द्रव्ये आणि गुणत: विदाही असा दोन्ही प्रकारे विचार करावा असे मत ते मांडतात.

विदाही गुणात उष्ण, तीक्ष्ण, गुरू गुणांची द्रव्ये, पचनकाल, यांचा विचारही आवश्यक असे ते म्हणतात. गुरू गुणांच्या द्रव्याचे विदाहीत्व हा नवीन विचार त्यांनी स्पष्ट केला आहे.

गुरू गुणात्मक द्रव्ये व प्रमाणत: गुरू असे दोन प्रकार यात येतात. आमाशयात अन्न गेल्यावर त्यावर क्लेदक कफ, पाचक व रंजक पित्ताचे संस्कार सुरू होतात. गुरू द्रव्ये पृथ्वी+ आप महाभूत प्रधान असतात. इतर द्रव्यांच्या मानाने ही आमाशयात अधिक काळ राहतात. त्यामुळे आमाशयाची अन्न घुसळण्याची प्रक्रिया वाढते. त्यासह स्त्रावांचे प्रमाणही वाढते. रंजक, पाचक पित्ताचे प्रमाण वाढते. परिणामी आमाशयाचे ठिकाणी विदाह व गुरूता जाणवते. आम्ल अवस्थापाकाचे वेळी ही प्रक्रिया पूर्ण व्यक्त होते.

आम्ल अवस्थापाकाचा कालावधी जेवणानंतर १-२ तासाच्या दरम्यान असल्याचे मतही ते मांडतात. या **विदाही द्रव्यांचा स्कंदही** त्यांनी सविस्तर वर्णिला आहे.

आम्लपित्ताची संप्राप्ती तीन प्रकारे घडते असा विचार त्यांनी सूत्रांच्या आधारे स्पष्ट केला आहे.

१) पित्त समावस्थेत असूनही केवळ आशयापकर्षाने जेथे जेथे जाते तेथे तेथे अस्थायी स्वरूपात दाह, भरे, त्या अंगाचे दौर्बल्य करते.

२) क्षीण कफ, समवायू आणि वृध्द पित्त ही दोषावस्था, शूल, दाह प्रधान लक्षणे असतात. उलटी नंतर दाह, शूल नष्ट होतात.

३) क्षीणकफ, वात पित्त वृध्द ही दोषावस्था, कंप, भ्रम, दाह, स्फुटन, अंगमर्द, शोष ही लक्षणे.

✒ विद्यार्थ्यांसाठी पाठांतराचा श्रीमद्तीसटाचार्यांचा श्लोक ही त्यांनी उद्घृत केला आहे.

कट्वम्लोष्ण विदाहितीक्ष्ण लवण क्रोधोपवासातप । स्त्रीसंपर्क तिलातसिद्धिशुक्तारनालादिभि: ।।

भुक्ते जीर्यति भोजने चशररि ग्रीष्मेसति प्रणिताम । मध्यान्हेच तदार्थरात्री समये पित्तं प्रकोपंव्रजेत् ।।

✒ अभिष्यंदी पदार्थांचे विदाहीत्व त्यांनी स्पष्ट करून दाखवले आहे. कांसामध्ये अभिष्यंदी पदार्थ स्त्रोतसात ओलेपणा, क्लिन्नता, चिकटस्त्राव निर्माण करतात. यामुळे आमाशयातील रसवाहिन्यांची तोंडे बंद करतात. त्यासहच गुरू गुणाचे अस्तित्व असते. यामुळे स्त्रोतोरोधजन्य संप्राप्ती घडून, आमाशयात

क्लेदाधिक्य होते, पित्तस्त्रावाने जळजळ होते. (सं. आ.प. मार्च १९९५ व एप्रिल १९९५; आम्लपित्त हेतुस्कंध विचार विमर्श)

याचप्रमाणे परीणामशूला बद्दल सामान्यजनांनाही उपयुक्त ठरेल अशा साध्या – सोप्या भाषेत प्रत्येक हेतूचे सूक्ष्म विवेचन केलेले आहे. पेप्टीक अल्सर व परीणाम शूल यांची तुलना सामान्यत: केली जाते. येथे र.म.नानल सांगतात की पित्तज परिणाम शूलाचे काही लक्षण पेप्टीक अल्सरशी मिळते जुळते आहेत. परंतु वातज, कफज प्रकार भिन्न आहेत. (स. – आ.प. ऑक्टो ९०; परिणामशूल : हेतू लक्षण व सुलभ उपचार)

हेतू विचारात व्यावसायिक हेतूंचा विचारही केलेला दिसतो. उदा. टेनिस खेळणाऱ्यात द. कूर्पर संधीशूल हे लक्षण जाणवते.

हेतूंचे वर्गीकरण केलेले आढळते. उदा. विरूध्द आहार, वातज आहार, कफकर आहार, विदाही आहार, रसरक्तदुष्टीकर आहार.

हेतू निश्चिती करतांना त्यांचा गुणविचार करून त्यानुसार चिकित्सा द्रव्य निश्चिती केलेली दिसते. **आम्लपित्त –** यात औषधी द्रव्याची निवड करतांना गुणधर्मानुसार एक कल्पाचा विचार कसा करावा हे सोदाहरण स्पष्ट केले आहे.

पित्ताचे ठिकाणी तीक्ष्ण हा गुण आहे; दाह करणे हा धर्म आहे. यावर विरूध्द गुणाची द्रव्ये–मृदुद्रव्ये–तुप उपयोगी ठरते. पण पित्ताचा स्निग्ध व अल्पद्रव गुण वाढल्यास उलटी, मळमळ, घशाशी येणे ही लक्षणे आढळतात. अशावेळी तूपाने त्रास वाढतो तर रूक्ष द्रव्ये लाह्या, इ. उपयुक्त ठरतात. (सं. – आ.प. मार्च १९९२; आम्लपित्त व आयुर्वेदाचे वैशिष्ट्य)

## २. संप्राप्ती विचार :

संप्राप्ती संदर्भात प्रत्येक अवस्थेचा सूक्ष्म विचार केलेला आढळतो. प्रत्येक हेतूमुळे नेमके काय घडते ? कोणत्या गुणांची विकृती होते. धातुक्षय, दोषदुष्टी, अवयवदुष्टी कशी होते ? याचा विचार केला आहे. कृमि, राजयक्ष्मा, हृद्रोग, संधीवात, आमवात, प्रमेह यांच्या वर्णनात हा विषय अधिक स्पष्ट केला आहे. यांचे उदा. दिले आहे.

संप्राप्ती निश्चिती करणे ही वैचारिक प्रक्रिया आहे व हे विचार कोणत्या दिशेने व्हावे याचे मार्गदर्शन त्यांनी केले आहे. प्रथम दूषित अवयवाचे प्राकृत गुणकर्मांचे संपूर्ण ज्ञान यासाठी आवश्यक आहे.

चरकातील संप्राप्तीविचार हा उच्चतम शास्त्रदृष्टीचा असल्याचे येथे ते नमूद करतात.

**कृमि –** कृमिंच्या निर्मितीमध्ये क्लेद व काल यांची विकृती कशी कारणीभूत आहे, हा नवीन विचार मांडला आहे. हे स्पष्ट करतांना चरकातील आहारपरीणामकर भाव व अष्टविध आहारविधी विशेषायतनांच्या विचाराधारे हे स्पष्ट केले आहे.

कृमिउत्पत्तीसाठी अतिरिक्त क्लेद उत्पत्ती व अर्धपाचित आहाराची अधिक कालपर्यंत स्थिती हे महत्त्वाचे कारण होय असे ते म्हणतात. यासाठी ससंदर्भ विवेचन केले आहे. परिभाषांच्या अर्थाची व्याप्तीही येथे स्पष्ट केली आहे. उदा. अजीर्णभोजी म्हणजे अध्यशन, समशन, विषमाशन हे आहाराचे सर्व मिथ्यायोग लक्षात घ्यावे

असे ते म्हणतात.

संप्राप्तीचे विवेचन करतांना. प्रत्येक हेतूमुळे संमूर्च्छना कशी उत्पन्न होते याचे उत्तम स्पष्टीकरण दिले आहे. उदा. अजीर्ण भोजीमुळे आंत्रात दोष, क्लेद, अन्न, काल यांची संमूर्च्छना होते.

येथे क्लेद विकृती नेमकी कशी व किती प्रकारे होते ते स्पष्ट केले आहे. उदा.

१. मधुररसाने कफप्रकोप मधुररसाचे आत्मलिंग 'अनुलेपन' यामुळे **मंदाग्नि** व क्लेदाधिक्य होते आंत्रात कफाचा उपलेप होतो. यामुळे आंत्राची गती मंद होऊन अन्न आंत्रात कालदृष्टया विकृत होते. कृमिउत्पादक स्थिती निर्माण होते.

२. अधिक आम्लरस सेवनाने **पाचक पित्ताचा द्रवगुण वाढतो.** त्यामुळे क्लेद वाढतो, तसेच आम्ल रसाचे प्राकृत कर्म क्लेदन याची विकृती झाल्याने दोष-क्लेद-अन्नकाल ही संमूर्च्छना कृमिउत्पादक ठरते.

३. अतिरिक्त पिष्टमय पदार्थ सेवन- पचनास गुरू असल्याने **पाचक द्रव्यांचे मान कमी पडते.** आंत्रात अती अधिक काल राहते आणि क्लेद विकृती होते.

४. **अतिगुडसेवन** कफ, क्लेद, कृमिकर आहे. हा आप्तोपदेश आहे.

५. अव्यायाम- शरीरगत मांस, मेद, कफाचे शैथिल्य करणारा व यासहच दिवास्वापमुळे कफक्लेद वृध्दी होऊन कृमि उत्पत्ती.

६. विरूध्दाहार सेवनाने आमाशय, पच्यमानाशय, पक्वाशय या तिन्ही ठिकाणी **आमदोषनिर्मिती** होऊन आंत्रक्षोभ होतो. **आंत्राक्रिया** हानी होते. आम-**प्रकुपित्तरक**, क्लेद व अन्न विगुण संमूर्च्छना होऊन कृमि उत्पन्न होतात. (सं. - आ.प. जून ७१; कृमिसंप्राप्ती व क्लेद विचार)

**राजयक्ष्मा** - याच्या संप्राप्ती विवेचन करतांना, राजयक्ष्मा केवळ फुफ्फुसांचा नसून सर्व शरीरधातूंत व्याप्त असल्याचे मत त्यांनी येथे मांडले आहे.

राजयक्ष्माचे प्रकार हेतू भेदाने आहेत. उदा. १) साहसज २) संधारणज ३) क्षयज ४) विषमाशनज. या प्रत्येक हेतूच्या विकल्पना त्यांनी स्पष्ट केल्या आहेत. उदा. साहसज मध्ये व्यवसायाचा हेतू म्हणून विचार विशेषत: करावा असे ते म्हणतात. उदा. हमाल, माथाडीकामगार यांचे अतिभारवहन, पोस्टमन, पोलीस, फिरते विक्रेते यांचे अध्वगमन, फुटबॉल, हॉकी, उंचउडी, वेटलिफ्टिंग हे खेळ. उच्चस्वराने बोलणे, शिक्षक, राजनेते, वकील, नट इ. या व्यवसायांचा विचारही 'साहस' विचार करतांना व्हावा. या प्रत्येक हेतूमुळे घडणारी संप्राप्ती त्यांनी वर्णन केली आहे.

हा रोग मंदाग्नि, त्रिदोषप्रकोप व **शरीरांतर्गत स्नेह द्रव्याच्या क्षयाने व्यक्त होतो.** वातप्रधान दोषदुष्टी असेल तर धातूंचा शोष व कफप्रधान दोषांनी स्त्रोतोरोध होऊन धातूंचे पोषण न झाल्याने शोष होतो. म्हणून **अग्नि व शरीरातील स्नेहाचे रक्षण करावे** असे ते म्हणतात.

लेखातील सदर विचार वैयक्तिक माझे आहेत असेही शेवटी त्यांनी नमूद केलेले आहे. (सं. - आ.प. ऑक्टो. ८१; राजयक्ष्मा)

**हृद्रोग :** हृद्रोगाची संप्राप्ती सांगताना कफज हृद्रोगाचे उदाहरणाचे हा विषय स्पष्ट केला आहे. ग्रंथात हृद्रोगाचे

पाच प्रकार व त्या प्रत्येकाचे एक सूत्र दिले आहे. ही सूत्रे म्हणजे अर्थगर्भित सिद्धांतच आहे आणि अभ्यास केल्यास या सूत्रांचे बृहद्रूप स्पष्ट होते असे ते म्हणतात.

उदा. कफज् हृद्ररोग यातील प्रत्येक शब्दाची फोड करून त्याचा अर्थ स्पष्ट केला आहे कफ+ज्+हृद्+रोग कफालाच श्लेष्मा अशी पर्याय नावे असली तरी त्यांची योजना विशिष्ट अर्थ दाखविण्यासाठी केलेली आढळते. उदा. १. कफ – याने कफाची जलप्रधान विकृति असे लक्षात घ्यावे. २. श्लेष्म – याने जोडण्यासंबंधी विकृति म्हणजे पृथ्वी + जल विकृतीचा संदर्भ लक्षात घ्यावा. ३. बलास – याने उद्दीत कफाची अवस्था व त्यासह मंद ज्वर असा अर्थ समजावा.

व्याधी लक्षणांचा विचार करताना महाभूत विचार व तदजन्य गुणांचा विचार केलेला आढळतो व गुणानुरूप कर्म आणि कर्मविशेष यांचा विचार केलेला दिसतो. गुणकर्माच्या व्याव्या अधिक स्पष्टपणे मांडलेल्या दिसतात. उदा. द्रव गुणाचा विचार करताना १. प्राकृतिक द्रवगुण आणि २. संस्कारजन्य नैमित्तिक द्रवगुण – जसे दुध, फळांचे रस ३. उष्णतेन द्रवगुण येणारे सुवर्ण, वंग असा विचार करावा.

हृदयाच्या बाबतीत अवलंबक कफाचाच विचार करावा लागतो. कारण तोच हृदयाचे पोषण व धारण करत असतो. म्हणून अवलंबक कफाचे गुणानुरूप कार्य प्रथम समजावून घ्यावे कारण त्यामुळे संप्राप्ती लक्षणे अधिक स्पष्टध होतात.

हृद्रोगाच्या संप्राप्तीत 'रसं दोषाः विगुणाः हृदयम् गता । (मा.नि.) असे म्हटले आहे. यथे विगुण दोष म्हणजे दोषांची वृद्धी क्षीणता व प्रकोप हे तिन्ही.... विचारात घ्यावे असे ते म्हणतात. कफज् हृद्रोगामध्ये वृद्ध कफ, प्रकुपित कफ व क्षीण कफ या तीन अवस्थांचा विचार द्रव्य गुणतः व कर्मता या भेदांनी बघावा. गुण या शब्दामध्ये कर्माचाही अंर्तभाव असतो असे मत येथे ते मांडतात. रसधातू दृष्टींची अवस्था समजण्यासाठी रसधातूचे गुण व त्यावर कफाच्या वृद्धी किंवा क्षीणतेचा काय परिणाम होतो हे पहावे या तिन्ही अवस्थांचे सोदाहरण स्पष्ट विवेचन करून कफज् हृद्रोग संप्राप्ति विचार मांडलेला आहे. (सं. – आ.प. मार्च २००२ कफज हृद्रोग...)

**संधीवात –** संधीवाताच्या संप्राप्तीच्या सूक्ष्म अवस्थांचा विचार मांडून त्यानुषंगाने नेमके निदान करून चिकित्सा कशी करावी याचे वर्णन आहे.

वातज शोथाची सामान्य संप्राप्ती अधिक नेमकेपणाने स्पष्ट केली आहे. उदा. संधीवातात कफाचा क्षय वाताची रूक्षता व पित्ताची उष्णता यामुळे शोथ संभवतो. शरीरातील प्रत्येक परमाणूत त्रिदोषांचे परमाणू आहेत. यात कफक्षयाने निर्माण झालेल्या अवकाशात वातवृध्दी होऊन त्याचा पित्ताशी अनुबंध होऊन त्या अणूचा शोथ होतो.

मार्गावरोधज संधीवातात आवरणाचा विचार ते करतात. दोषांचा विचार करतांना प्रथम कफाचा विचार करावा असे ते म्हणतात. तसेच इतर देहभावासह 'आम' याचेही आवृत्तत्व विचारात घ्यावे असा विचार मांडला आहे.

व्याधी निश्चय करतांना दोष, दूष्य, स्थान, स्वभाव, साध्यासाध्यत्व असा विचार करून व्याधीनिदान केलेले आढळते. (स. – आ.प. जुलै ७८; संधीगतवात)

**आमवात –** आमवाताच्या संप्राप्ती बाबत ते म्हणतात की, दोषांप्रमाणेच आमालाही रोगोत्पादकता असते. म्हणूनच 'आम' याला दोषाखालोखाल महत्त्व द्यावे. आमामुळे सर्वप्रथम रसधातू विकृत होतो.

आमवाताच्या संप्राप्तीत आमोत्पत्ती व वातप्रकोप या दोन्ही गोष्टी स्वतंत्रपणे व एकाच वेळी होणे हे निदानवैशिष्ट्य आहे, असे मत ते मांडतात. आमवात म्हणजे आमाने वाताचे आवृतत्त्व होणे हा नवीन विचार त्यांनी मांडला आहे. (सं. – आ.प. १५ नोव्हें ७८; आमवात)

प्रत्येक लक्षणाच्या कारण संप्राप्तीचा विचार केलेला आहे. उदा. कटीशूल–प्रकुपित वातज, पृष्ठकटीस्तंभ–रक्तदुष्टीजन्य, दुर्गंधी अपान सरनम्–सामवायूजन्य इ. प्रत्यक्ष परिक्षणातील लक्षणांचाही असाच विचार केलेला आहे. उदा. कटीशोथ, वाताचे आवृत्तत्व, ग्रंथील मल हे लक्षण सामवातज, उष्ण व कठीण शोथ, रसरक्तअस्थि यांचे सामदुष्टीजन्य इ. सामान्य संप्राप्ती व विकल्प संप्राप्तीचा विचार केलेला आढळतो. (सं. – आ.प. डिसें. ८२; अस्थीगतआमावृत....)

**प्रमेह –** प्रमेहातील संप्राप्ती गुणविचारानुसार स्पष्ट केली आहे. उदा. प्रमेहात कफ–मेद–मूत्र यांची दुष्टी होते. हे सर्व जलीय तत्वप्रधान पदार्थ आहेत. म्हणून शरीरात द्रव, शीत, स्निग्ध, गुरू, मंद, सर, पिच्छिल हा गुणसमूह वाढतो. पचनात जलांश (क्लेद) निर्माण होण्याची प्रक्रिया सर्वत्र होते. शरीराच्या प्रत्येक परमाणू व घटकात जो कफ असतो त्याचे द्रवत्व वाढते. नेमकी ''विकल्प संप्राप्ती समजणे नेमके चिकित्सासूत्र स्पष्ट होण्यासाठी आवश्यक आहे असे ते म्हणतात.

कफ मेद मूत्राची संप्राप्ती भंग होणे, जलीयतत्वांचे शोषण होणे यासाठी रूक्ष, शुष्क, उष्ण, लघु आहार विहार हवा. कारण प्रमेहात अग्नि ही मंद असतो. (सं. – आ.प. मे ८८; प्रमेह व भृष्ट धान्य)

**३. लक्षण :** हलिमकच्या वर्णनात ग्रंथात वर्णित नसलेल्या परंतु व्यवहारात आढळणाऱ्या लक्षणांचे वर्णन केले आहे. उदा.

- मल – वसासदृश असतो.
- कामलावर्धनशील असते.
- अत्यधिक अम्ल व तिक्तरसात्मक च्छर्दी असते.
- ओजक्षयाची लक्षणे दिसतात.
- सामान्यत: शिंपीजवळ वेदना आढळते.
- उष्णोपचारांनी (बाह्यत:) उपशय मिळतो.
- कामलेच्या कारणांत विद्रधी व अर्बुद यांचाही उल्लेख रूध्दपथ कामलेत केला आहे.
- निदानासाठी जरूर लागल्यास X-ray ची मदत घ्यावी, असे ते म्हणतात. (सं. – आ.प. ऑगस्ट ७७; हलीमक)

**४. निदान :** निदानाबद्दलचे विशेष विश्लेषण त्यांनी हृत्शूल, कफजहृद्रोग, कॅन्सर या व्याधींची माहिती देतांना केले आहे. हृत्शूल व हृद्रोग यातील वेगळेपण स्पष्ट करून नेमके निदान केस करावे हे सांगितले आहे. सुश्रुतांच्या हृतशूलाच्या श्लोकाचा अर्थ अधिक सोप्या भाषेत स्पष्ट केलेला आहे. उदा. कफेत्यादी अरूद्धोरूद्ध: । रसमूर्च्छितो रससंयुत: । म्हणजेच मांसवाही रसवाही धमन्यात होणारा, स्थान संश्रय अपेक्षित आहे. हृदिस्थ

म्हणजे हृदयाचे पोषण करणाऱ्या रसवाही धमन्या समजाव्यात असे ते म्हणतात.

उच्छ्वसावरोध या शब्दाने उदानविकृती आवरण सूचित आहे. हृदिस्थ, अवरूद्ध व रसमारूत: हे तीन शब्द महत्वाचे असून या शब्दांनी हृदशूलाचा स्थानसंश्रय शास्त्रकारांनी केला आहे. असे मत ते मांडतात.

हृत्शूल हा फक्त रसवाही स्त्रोतस किंवा धमन्या यातच असतो तर हृद्रोगात हृदयकपाट, महाधमनी यातही विकृती आढळते.

संप्राप्तीमध्ये रसदुष्ट करणाऱ्या कफ, पित्त या दोषांसह 'आम' विचार ही महत्त्वाचा आहे असे ते म्हणतात. आमानुबंधाने तीव्र व आशुकारी वेदना दिसते. हृद्शूलाच्या रूग्णानुभवाचे वर्णन करतांना स्त्रोतस परीक्षणात प्राण, अन्न, रसवह, स्त्रोतसांच्या लक्षणांसहच आमज लक्षणांचा विचार केलेला दिसतो. 'सामरसावृत्त वातज हृत्शूल' असे निदान केलेले दिसते. (सं. - आ.प. १७ सप्टेंबर ८१; हृत्शूल)

निदानात उपशय अनुपशयाचा वापर कसा करावा हे सोदाहरण - कफज हृद्रोगाचतील उपशय-अनुपशाद्धारे स्पष्ट केले आहे.

यासाठी मुख्यत: प्रश्न परीक्षा करावी असे ते म्हणतात. रुग्ण माहिती सांगत असतांना ती लिहून घ्यावी. अधिक माहिती मिळवण्यासाठी प्रश्न विचारावेत पण हे प्रश्न सूचक नसावेत तर निष्पक्ष असावेत. उदा.

१. लंघन केल्याने कसे वाटते ?

२. उलटी केल्याने कसे वाटते ?

३. दही, केळी खाल्ल्याने कसे वाटते. इ. ?

या प्रमाणे देश, रुग्णबल, रोगबल यासाठी तर्काने प्रश्न विचारावेत.

ही परीक्षा व्याधी, दोष व लक्षणे या तिन्हींचे परीक्षणासाठी उपयुक्त ठरते.

दोष प्रकार निश्चित झाल्यानंतर उदा. कफज हृद्रोग असे निश्चित झाल्यानंतर कफाचे कोणते महाभूत विशेष दुष्ट आहे यासाठी प्रश्न विचारावे. उदा. जलीय महाभूत की पार्थिव महाभूत इ. जलीय कफविकृतीत दूध, खीर, गूळ, दही याविषयी द्वेष किंवा अनुपशय आढळतो तर पार्थिव कफ विकृतीत खवा, पनीर, खजूर, शिंगाडा, पोहे, केळी, उडीद, तीळ यांनी अनुपशय दिसतो. (सं. - आ.प. डिसें. २००२; कफज् हृद्रोग, उपशय....)

हाच विचार पुढे त्यांनी विस्तृतपणे मांडला आहे. आयुर्वेदाची निदान पद्धती स्वयंपूर्ण व इतर शास्त्रापेक्षा भिन्न आहे याची ओळख इतर संशोधकांना व्हावी या हेतूने सदर लेखन केल्याचे ते म्हणतात. आयुर्वेदीय दृष्टीने कॅन्सरचे निदान व चिकित्सा कशी करावी, निदान व चिकित्सेची धोरणे, घटक पद्धती कशा असाव्या, आधुनिक निदान आणि उपचारांच्या जोडीने उपयुक्तता वाढेल का ? औषधांचे स्वरूप कसे असेल ?

**कॅन्सर -** कॅन्सर हा एकच रोग नसून अनेक रोगांचा समूह आहे असे मत त्यांनी येथे मांडले आहे. म्हणून यांच्या निदानासाठी हेतू, पूर्वरूप, रूप, उपशय, अनुपशय, संप्राप्ती यांचा सूक्ष्म विचार करून रोग, रोगस्वभाव, साध्यासाध्यता, अरिष्टविचार इ. सर्व बाजूचा निर्णय करावा.

**निदान कसे करावे ?** यासाठी संहितातील संदर्भ देऊन विवेचन केले आहे.

१. चरक सूत्रस्थान त्रिशोथीय अध्याय यातील सूत्राचे उदाहरण दिले आहे. सूत्र - रोगांचे अगणित प्रकार

होतात व त्यांचेही अनेक भेद होतात. हे भेद -

१. वेदना

२. वर्ण - (दोषप्रकोप ज्ञानार्थ वर्ण)

३. समुत्थान (हेतू)

४. स्थान (आमाशयोक्त / पक्वाशयोक्त / मर्मगत / एकांग / अक्षयनगन)

५. संस्थान - आकृत (गुल्म / अर्बूद / विद्रथी)

६. नाम - विशेषनाम यांच्या आधारे बघावे. (सं. - आ.प. फेब्रु. १८; कॅन्सर-आयुर्वेदीय विचार - एक परिचय)

## ५. व्याधींचे वर्गीकरण

व्याधींचे वर्गीकरणाची पध्दत वै. पु ग नानल, वै. भा वि गोखले, वै. अ दा आठवले, वै. शि गो जोशी, वैद्य निर्मला राजवाडे या परंपरेने दिली आहे असा उल्लेख त्यांनी केला आहे. **अनेक परंपरांचा संकर येथे आढळतो.**

व्याधींचे वर्गीकरण स्त्रोतसांप्रमाणे करणे अधिक सोयीचे असल्याचे मत त्यांनी मांडले आहे. यामुळे रोगाधिष्ठान, रोगहेतू, लक्षणे व चिकित्सेचा भाग स्पष्ट होतो. 'गलगंड' व्याधींचे सविस्तर वर्णन त्यांनी येथे स्त्रोतसाचे आधारे स्पष्ट केले आहे. (स. - आ.प. फेब्रु २००१; रोगांचे आयुर्वेदीय वर्गीकरण)

**६. चिकित्सा -** या संदर्भात विचार कसा करावा ? चिकित्सासूत्र केस ठरवावे ? कोणकोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्यात ? अत्ययिक चिकित्सेतील सूत्र यांचे विश्लेषण केले आहे.

अष्टोदरीय अध्यायातील सूत्र - रोग कोणताही असो तो त्रिदोषांच्या विकृती रूपातच व्यक्त होतो म्हणून दोषांच्या प्रमुख विकृति लक्षात घेऊन त्या आधारे ही चिकित्सा सुरू करता येते. दोषांच्या विकृती म्हणजे अल्प, वृद्धी, समत्व, आवरण, धातूगत इ.

जे रोग प्रत्यक्ष वर्णीत नाहित त्यांची वातज्, पित्तज, कफज, संसंर्गज, सन्निपातज आणि रक्तज इ. परिक्षा करून चिकित्सा सूत्र ठरवावे.

ज्वर चिकित्सा चरक यातील सूत्र - दोषदूष्य व हेतू यांच्या विपरित चिकित्सेने निश्चितच हितकर परिणाम होतात. हा विचार ग्रंथोक्त व ग्रंथानुक्त अशा दोन्ही रोगांसाठी करावा लागतो. वैद्य नानल परंपरेमंध्ये म्हणजे स्वत: रमेश नानल, म.पु. नानल, भा.पु. नानल आणि विलास नानल याच पद्धतीने निदान करून चिकित्सा करतात असा उल्लेखही त्यांनी केलेला आहे.

आधुनिक चिकित्सेच्या जोडीने केलेली चिकित्सा फारशी यशस्वी ठरत नाही असा अनुभवही त्यांनी येथे मांडला आहे. औषोधपचारांचे स्वरूप दोष व अनुबंधानुसार बदलणारे असतील तर नेमके उपचार असू शकत नाहीत. एकच द्रव्य, एकच औषध, एकच वनस्पती यांचा वापर यात शास्त्रीयत्व नाही असे मतही त्यांनी मांडले आहे. (सं. - आ.प. फेब्रु. १८; कॅन्सर-आयुर्वेदीय विचार - एक परिचय)

**आत्ययिक अवस्था -** आत्ययिक अवस्थेत व्याधी विनिश्चय किंवा नामकरण यात वेळ न घालवता दोषप्रकोप

आणि अधिष्ठान यांचा विचार करून तात्काळ योग्य चिकित्सा करावी. असा विचार वाग्भट आणि सुश्रुतांचे संदर्भ येथे देउन नानलांनी येथे मांडलेला आहे. काही व्याधींच्या चिकित्सा सूत्रातही आत्ययिक अवस्थेचा विचार आढळतो असे ते म्हणतात. उदा. शूल या व्याधीत अनुलोमन सांगीतले आहे. हे अनुलोमन म्हणजे केवळ वाताचे नसून दोषदुष्य आणि मल या तिन्हींचा विचार आवश्यक आहे असे स्पष्टीकरण नानलांनी दिले आहे. वायूच्या आवरणामूळे शूल होतो म्हणून रूढार्थाने अनुलोमन शब्द आला आहे असे ते म्हणतात.

दोषदुष्य मलांसह स्थानसंश्रयही प्रामुख्याने विचारात घ्यावा. उदा.

१) उदरशूल जर यकृतस्थानाजवळचा असेल तर तो पित्तावृत्वाने किंवा पितउद्रेकाने होतो. म्हणून पित्तघ्न औषधे किंवा पित्ताचा सरगुण वाढवून विरेचक औषधे वापरावी म्हणजेच अनुलोमन करावे.

२) पुरीषज आनाहामूळे उदरशूल असेल तर विरेचन न देता बस्ती द्यावा. याने पुरिष व वाताचे अनुलोमन होते.

३) वृषणकमुखपाकाने किंवा मूत्रकृच्छ्रजन्य शूल असेल तर गोखरु, पुनर्नवा, कदलीनल इ. मूत्रविरेचनीयऔषधे द्यावी.

४) संधीगत वातज शूल - स्नेहस्वेद द्यावा.

५) कफावृत उदानजन्य शूल - अभ्रक, पुष्करमूल, रससिंदूर, स्नेहस्वेद.

अनुलोमन क्रिया करताना शरीरातील सूक्ष्मतम स्त्रोतसांचे ठिकाणाहून सुरू करून अबाधितपणे सुरू ठेवले तर ती उत्तम व अपुनर्भव चिकित्सा होते असे ते म्हणतात. आत्ययिक चिकित्सेत दोषबंध स्थान विचार यासहच हेतूविशेषही लक्षात घ्यावे. तसेच वाग्भटोक्त अग्न्यसंग्रहातील औषधी आत्ययिक स्वरूपात वापरण्यास हरकत नाही असे ते म्हणतात. (सं. - आ.प. मार्च ७८; आत्ययिक चिकित्सा)

## फ) नवीन व्याधी विचार

यात संहितातील सूत्रांचा संदर्भ देऊन नवीन व्याधीचा विचार कसा करावा याबद्दल मार्गदर्शन केले आहे.

✳ येथे दोष प्रमुख धरून त्यानुसार व्याधींचे वर्गीकरण आदी विचार केलेला आहे.

✳ रोगाची प्रकृती, अधिष्ठान, भेद व कारणांचा विचार करून चिकित्सा करावी असे ते म्हणतात. (सं. - आ.प. मार्च व एप्रिल १९९४; नवीन रोगों का विचार)

**चिकित्सा** : चिकित्सा करतांना ग्रंथोक्त औषधे विशिष्ट पद्धतीने किंवा विशेष अवस्थांमध्ये वापरली आहेत. अनुपान व मात्रा यातही विशेष विचार दिसतो. अनेक पारंपरीक योग ही आढळतात.

**हलीमक** : या चिकित्सेत अनेक अनुभविक योग वापरलेले आढळतात. त्याचप्रमाणे औषधांची बहुकल्पना वापरलेली दिसते. उदा. रोचनावटी, दीपनपाचनअर्क, मध्वामलक लेह, सुरेचन मिश्रण.

✳ प्रथमत: प्रामुख्याने दीपक, पाचक औषधे दिलेली दिसतात. गुळवेल सत्त्वाचा उपयोगही केलेला दिसतो.

✳ ओजक्षयासाठी बीजपर्णवटी, रोचनावटी, रक्तवटी, सुधाजलकपित्थजंबीरलेह दिला आहे.

* बाह्यत: पटपत्रपट्टबंध वापरला आहे.
* इतर शास्त्रांची मदत घेण्याची वृत्ती आढळते. उदा. निदान करतांना डॉ. भागवत यांचा सल्ला घेतल्याचा उल्लेख ते करतात. तसेच उदरशूल वाढला तेव्हाही डॉ. भागवतांचा सल्ला घेतला असे ते सांगतात. (सं. – आ.प. ऑगस्ट ७७; हलीमक)

**यकृद्दाल्योदर –** वैद्य विलास नानल यांनी यकृद्दाल्योदर च्या चिकित्सेत गोरोचना वटी आणि अमृत कल्प हे अनुभविक योग वापरले आहेत. (सं. शो.प्र. – ३.२.१ अनुभूत योग)

* इच्छाभेदी रसाने विरेचन सतत एक सप्ताह विरेचन या पध्दतीने दिले आहे. २ गुंजा मात्रेत कल्प वापरला आहे. (सं. – आ.प. १५ मे १९७१; यकृद्दाल्यूदरची चिकित्सा)

**कामला –** कामलासाठी र. म. नानलांनी १ वर्षभर विनामूल्य तपासून शिबीर घेतले होते. समाज ऋणातून अंशत: मुक्त होणे व शास्त्रसेवा व्हावी हा हेतू यात दिसतो. याचबरोबर कामलेवर कार्यकारी इतर तुल्यबळ व स्वस्त औषधे वापरात यावी हाही उद्देश यात आढळतो. १ वर्ष शिबीर असूनही त्यामानाने कमी रूग्णांनी त्याचा लाभ घेतला. यापेक्षा वैदूंकडे इलाज करणाऱ्यांची संख्या जास्त असते या लोकांच्या वृत्तीवरही ते आघात करतात.

* तीन द्रव्ये चिकित्सेत वापरली – १) कुटकी, २) शरपुंखा ३) गोरोचना.
* कुटकी सामान्यत: १–३ मासे वापरली जाते पण नानलांनी १–४ गुंजा मात्रेतच वापरली आहे. वापरलेल्या द्रव्यांच्या गुणकर्मांचे विश्लेषण केले आहे. उदा.
  * कुटकी रूध्दपथ कामलेत कफप्रधान अवरोधाचे भेदन करून तर बहुपित्तात क्लेदांश कमी करून उपयोगी ठरते.
  * शरपुंखा – कफ व पित्तातील अतिरिक्त क्लेद शोषक, स्त्रोतोशोधक.
  * (गो) रोचना दीपन, आमपाचन, दूषिविषपाचन, पित्तानुलोमन, मलप्रवृत्ती रंजन, कृमिजन्य विकारांतही उपयुक्त ठरते.

  मात्रा – २–४ गुंजा अधिक मात्रेत दाह भ्रम ही लक्षणे होतात.
* व्याधीमोक्षानंतर रसायन म्हणून आरोग्यवर्धिनी ३ सप्ताह पर्यंत दिली आहे.

विशिष्ट आणि ठराविक कल्प घेऊन केलेल्या या अभ्यासातून त्यांची संशोधक दृष्टी दिसते. आणि हे अनुभव कर्तव्यापेक्षेने इतर वैद्यासमोर ठेवले असते म्हणतात. यातून आयुर्वेदाबद्दलची तळमळ, सेवावृत्ती दिसते. (सं. – आ.प. जून ८०; कामला चिकित्सा शिबिर: एक अनुभव)

**संधीवात –** संधीवात चिकित्सेत काही स्वतंत्र योग वापरले आहेत. उदा. वंशिकावटी, यकृत, दुग्धार्कवटी, कामाक्षअष्मरीहर काढा, संधीलेप (शिग्रु, गुग्गुळ, रेवाचीनी) (सं. – आ.प. जुलै ७८; संधीगतवात)

**आमवात –** आमवाताची चिकित्सा देतांना आवृतवाताचा विचार करून चिकित्सा केलेली दिसते. उदा. प्रथम आवरकाची चिकित्सा म्हणजे आमाची चिकित्सा दिली आहे. येथे भावमिश्राच्या चिकित्सासूत्राचा अवलंब केलेला दिसतो. लंघनं स्वेदनं तिक्तदीपनानि कटूनिच। विरेचनं स्नेहपानं बस्तयश्चाम मारूते ॥३ अ. २८॥

१) प्रथम लंघन किंवा दुर्बल रूग्णात लघु आहार – उदा. कुलत्थयुष, पंचकोलसिद्ध लाजामंड, शतपुष्पा,

यवानीकद चित्रकविश्वासिद्ध मस्तु, लसूणसिद्ध तक्र इ.

२) स्वेद – रूक्षस्वेद म्हणजे वालुकास्वेद किंवा नि:स्नेह उपनाह म्हणजे शिग्रु पत्र, काळाबाळ, रेवाचिनी, गंधाभिरोजा, वचा, शतपुष्पा, यवानी इ. योगरत्नाकरातील शतपुष्पादी उपनाह व अहिंस्त्रादी उपनाह उत्तम असल्याचे ते सांगतात.

अग्निदीप्तीसाठी आम्लरस उपयुक्त असला तरी तो स्निग्ध, पित्तल व अभिष्यंद कर आहे. आमवातात ज्वराचे पुनरावर्तन होऊ नये म्हणून पित्तल द्रव्ये वापरू नयेत, तसेच कटूतिक्त रसांची द्रव्ये वापरतांनाही आसवारिष्ट स्वरूपात न वापरता सिद्धजल, तक्र, मस्तु या स्वरूपात वापरावी असा विचार त्यांनी मांडला आहे.

३) विरेचक म्हणून गंधर्वस्नेह शतपुष्पा/सुंठी फांटासह.

४) स्नेहपानासाठी नारायणतेल, सैंधवादी तेल.

पित्तानुबंध असल्यास सिद्धघृत वापरावी उदा. चित्रक सिद्ध घृत, गुडुचीसिद्ध घृत, रसोनसिद्ध घृत, इ.

५) अपुनर्नव चिकित्सा म्हणून बस्तिचिकित्सेने लंघनादी उपक्रमांचा शेवट करावा. यासाठी सिद्धतैल, दशमूळ क्वाथ, वापरले आहे.

६) रसायन म्हणून महायोगराज, विषतिंदुक, सुवर्णभस्म, बृहत्वात, अमृतभल्लातक इ. कल्प दूध, मध, रास्नादी क्वाथ या अनुपानासह दिले आहे.

येथे आमवाताच्या चिकित्सेत पुढील पारंपरीक योग वापरले आहेत. दीपनपाचन अर्क, ज्वरघ्नअर्क, आत्रेयवटी, कर्कद्राव (सं. – आ.प. नोव्हे. ७८; आमवात)

**हत्‌शूल –** हत्‌शूलाच्या रुग्णात आमाशय गतत्वद्योतक लक्षणे असल्याने शोधनचिकित्सा म्हणून वमन दिले आहे. वमनानंतर ६ तास निराहार ठेऊन नंतर आहार योजनेतील 'सूप', द्राक्षासव २ तोळे, वेलची चूर्ण ४ गुंजा दिले आहे.

**शमन चिकित्सा म्हणून प्रथम –**

- विषतिंदुक १ गोळी ८ गुंजा + त्रिकटू + शृंगभस्म १ मासा – आलेरस, लसूणरस व मधासह चाटण. अनन्नकाली.
- अर्जुनारिष्ट १५० ml + पंचकोलासव ५० ml – उदानव्यान काली
- **आहार योजना –**
  - कोबी, कांदा, सुकीबोरे सूप + दालचिनी, मिरे, ओवा, जिरे, सैंधव.
  - सुंठसिध्दजल
  - इतर आहार वर्ज्य = ७ दिवस.
- दुसऱ्या सप्ताहात विषतिंदुक ऐवजी अग्नितुंडीवटी दिली. इतर औषधे पूर्ववत दिली.
- तिसऱ्या सप्ताहात केवळ अर्जुनारिष्ट ५० ml + पंचकोलासव २५ ml तीन महिने पर्यंत दिले.

येथे विषतिंदुक हृदयपेशी अशक्त होऊन नाडीक्षीण असलेल्या रूग्णांत सहस्त्रश: सिध्द वृध्दवैद्योपदेश असल्याचे ते सांगतात.

✳ हरिणशृंगात स्निग्धता जास्त असते तर सांबरशिंगात रुक्षता अधिक असते असा वृध्दवैद्योपदेश सांगितला आहे.

✳ कांद्दा कफज व आमज आवरणात उपयोगी असल्याचा अनुभव ही ते नमूद करतात. (सं. – आ.प. १७ सप्टेंबर १९८७ हृतशुल)

**आवृतवात –** आवृत्तवात या विषयावर र.म.नानलांनी विशेष चिंतन आणि विवेचन केलेले आहे.

**'साम कफावृत्त मस्तिष्कगत वात'** यात इंद्रिय वैगुण्यता स्पष्ट होण्यासाठी मज्जागत ऐवजी मस्तिष्क असा शब्द वापरला आहे. चिकित्सा किंवा निदान करताना व्याधी कोणत्या क्रिया कालात आहे म्हणजे दोष, धातू, मलांची स्थिती काय आहे, अधिष्ठान कोणते आहे. उदा. स्त्रोतस किंवा अवयव विशेष इ. हेतू म्हणजे आहार, विहार यांचा विचार केलेला दिसतो. सदर रूग्णात पुढील चिकित्साक्रम आढळतो –

१) सामकफाचे आवरण नाहिसे करणारी व वायू प्रकुपित न करणारी चिकित्सा.

२) आश्रयस्थानाची चिकित्सा.

३) मज्जाधातूवर कार्यकारी चिकित्सा – यातही कफघ्न आणि पाचक औषधांचाच वापर केलेला आहे.

४) उर्ध्वभागीगं कर्म कार्यं आश्वासम् यानुसार आश्वासन चिकित्सा.

५) प्राण, उदान रक्षक चिकित्सा व्याधी आत्ययिक ठरू नये म्हणून.

प्रत्यक्ष चिकित्सेमध्ये

१. अनन्नकाली विषतिंदुक वटी + त्रिभुवन किर्ती + त्रिकटू अनुपान मध !

२. व्यान व उदानकाली त्रिकटु ४ गुंजा पानातून; मधुकुमारी १ तोळा.

३. द्राक्षारिष्टासह स्वप्नकाली विषतिंदुक + त्रिभुवन किर्ती.

४. स्थान चिकित्सा म्हणून सर्षप, वचा, तुलसी सिध्द शिरोबस्ती. त्यानंतर कट्फल वचा चूर्णाचे प्रधमन नस्य.

सदर चिकित्सा १ महिना दिली. नंतर वमन देऊन पूर्वीच्या औषधातील त्रिकटू बंद केले. रसायनार्थ प्रात: ब्राम्हीप्राश व रात्री जोतिष्मती तेल १५ थेंब. (सं. – आ.प. जून ८१; मार्गावरोध म्हणजेच आवरण)

आयुर्वेदीय पध्दतीने व्याधीचे निदान कसे करावे याचा उत्तम नमुना म्हणजे **अस्थिमज्जागत आमावृत्त प्रकुपित वात** लेख होय. रूग्णपरिक्षण करताना प्रत्यक्ष व प्रश्न परिक्षा प्राधान्याने करून त्याचे निष्कर्ष मांडलेले आहेत.

याचे चिकित्सा सूत्र ठरविताना १) सामता २) आवृतत्व ३) आवृतत्वाचे शोधन व आत्ययिक चिकित्सा हा विचार केलेला आहे. शोधनासाठी सातलाक्वाथ सिध्द वर्ती प्रयोग वापरला आहे. वेदनाशामक म्हणून महायोगराज गुग्गुळ तर आमपाचक शूलशामक आणि रसरक्तमांसपाचक म्हणून कांचनार गुग्गुळ दिला आहे. (सं. – आ.प. डिसेंबर ८२; अस्थिमज्जागत आमावृत्त प्रकुपित वात)

**कफावृत प्राणोदान** याचा रूग्णानुभव वैद्य र.म.नानल यांनी मांडला आहे. केवळ व्याधी नामाचा विचार न करता दोषदुष्यादी विकल्पनांचा अभ्यास व त्याव्दारे उपचार यामुळे सफल चिकित्सा होऊ शकते हा

अनुभव त्यांनी मांडला आहे. केवळ रूग्णलक्षणे व प्रत्यक्ष परिक्षण यामुळेच ग्रंथातील अवस्था कफावृत्त प्राणोदान स्पष्ट झाली म्हणून इतर कोणतेही परिक्षण केले नाही असे ते म्हणतात. कफावृत्त प्राणोदानच्या रूग्णात कफ प्रधान अवस्था असली तरीसुध्दा वृध्दावस्था व हिनबल यामुळे शोधन चिकित्सा न करता शमन चिकित्साच दिलेली आढळते.

१) सुवर्णमालिनी वसंत १२५ mg + ६४ पिंपळी १२५ mg + त्रिभुवन किर्ती ३०० mg – अन्ननकाली आणि पिंपळीसिध्द दूधाच्या – अनुपानासह

२) रक्तवटी ८ गुंजा + दुग्धार्क वटी ८ गुंजा + ६४ पिंपळी १२५ mg – व्यानउदान काली – अनुपान गरम पाणी.

३) वासाकुमारी ३० ml दर २ तासांनी.

४ दिवसांनंतर ज्वर, कास इ. लक्षणे कमी झाल्यावर पुढील चिकित्सा दिली.

१) सितोपलादी १ gm + शृंगभस्म १ gm + लमावसंत २५० gm ३ वेळा.

२) वासाकुमारी २० ml दर २ तासांनी.

सदर रूग्णात 'सुवर्णमालिनी वसंत बल्य कल्प म्हणून वापरला आहे'. त्रिभुवन किर्ती कफज्वरातीलश्रेष्ठ कल्प व दीपक पाचक तर पिंपळी पिच्छीलत्व कमी करण्यासाठी व कफ सोडविण्यासाठी ! कफावृत्तत्वामुळे वाताचे चलत्व कमी होते. ते वाढविण्यासाठी सर गुणाची म्हणून पिंपळी व गोदुग्ध ही दोन्ही सर गुणाची द्रव्ये वापरली. त्याचप्रमाणे पिंपळी वापरताना रसायन द्रव्यासह वापरावी. (संदर्भ वाग्भट सूत्रस्थान ६, १६३) म्हणूनही दुध वापरलेले आहे. 'कफातील शेषद्रवत्व कमी होण्यासाठी रूक्ष गुणाचे शृंगभस्म, त्रिदोषघ्न सितोपला, आणि लघुमालिनी वसंत हा कल्प वापरला आहे'.

सदर रूग्णाचे निदान आधुनिक शास्त्रानुसार निमोनिया असे केलेले होते. परंतु रूग्ण भिषक्वश्य असल्याने त्याने केवळ आयुर्वेदीय चिकित्सा घेऊन त्याला उपशय मिळाला.

**कर्दम विसर्प** – या व्याधीच्या आशुकारी अवस्थेत दिलेल्या चिकित्सेचा अनुभव सांगितला आहे. सदर रूग्णात मत्स्य आणि दही सेवनामुळे २४ तासांत पायांवर, पोटावर बारिक पुटकुळ्या, तीव्र कंडू, दाट आणि प्रभुत मात्रेत स्त्राव अशी लक्षणे होती. वाग्भट सुत्रानुसार त्याचे कर्दम विसर्प असे निदान करून कफ, लसिका, मांस, रस या सौम्य भावांची विकृति अधिक, मूत्रप्रवृत्ती अल्प यावरून क्लेदवहनाचे काम कमी होत आहे असे ठरवून पुढील चिकित्सा दिली आहे.

१) अतिरिक्त क्लेद निहारणासाठी प्रथम रक्तमोक्षण केले.

२) स्थानिक प्रतिसारणासाठी निंबतेल आणि गंधकध्रुती.

३) मूत्रवृध्दीसाठी मूत्रधारा अर्क, गोक्षुरादी आणि आरोग्यवर्धिनी वापरले.

४) क्लेदबहुल त्वचेसाठी उत्कट तिक्त रसातत्मक निंब आणि मूग रूक्ष म्हणून मूगाचे बेसन कडूनिंबाचे रसात कालवून त्याचा जाड लेप दिला.

५) रस रक्त क्लेद, पित्ताचे द्रवत्व, उष्णत्व व तीक्ष्णत्व कमी होण्यासाठी अश्वकंचुकी हा विरेचक योग.

यामुळे २४ तासात ९०% उपशय मिळाला. शेष द्रवशोधन व रोपणासाठी त्रिफला गुग्गुळ, रक्तशोधक काढा आणि वंशिकावटी हे पारंपारिक योग वापरले आहेत.

शेवटी ३ आठवड्यांनंतर रसायनार्थ धात्री रसायन अनन्नकाली व मुद्गपीठ व कडूनिंब रसाचा लेप आणि दर १ महीन्यांनी विरेचनाचा सल्ला दिला आहे. (सं. – आ.प. जून ८१; कर्दम विसर्प)

**अष्मरी –** शल्यकमार्ह व्याधीवर आयुर्वेदातील सूत्रे आणि परंपरेतील औषधांनी योग्य उपशय मिळू शकतो हे अश्मरी व अवगाहनच्या लेखात वर्णिले आहे. वृक्कमुखगत अश्मरीच्या रूग्णात.

१) पपईमूल क्षार ४ गुंजा प्रात:काली, काटेमठ रस अनुपानासह.

२) गोक्षरादी गुग्गुळ सायंकाळी ४ वाजता अपानकाली दिले.

तीन महिन्यांनंतर अश्मरी वृक्कातून निघून मूत्रनलिकेच्या मुखापर्यंत आला. त्यावेळी शिग्रु क्वाथामध्ये अपानकाली अवगाहन दिले. अवगाहनापूर्वी स्नेहन म्हणून मूत्रमार्गात बलातेल सोडले व बस्ती प्रदेशावर बलातेलाचा अभ्यंग केला. वृध्द वैद्य सहचर तेल वापरतात परंतु नानल स्वत: बलातेलाचा वापर करतात, असे त्यांनी नमूद केलेले आहे.

वाग्भटांनी द्रवस्वेदात प्रथम शेवग्याचा उल्लेख केला आहे. तसेच शेवगा उष्ण, शोथघ्न आणि स्त्रोतस विस्फार करणारा असल्याने त्याचा काढा वापरला. ३ दिवस अवगाहाने अश्मरी पतन झाल्याचा अनुभव ते नमूद करतात. यातील पपईमूल क्षार हा पारंपारिक योग त्यांनी वापरलेला आहे. (म.पु.नानलांनी पुणे विद्यापिठाचे केमेस्ट्रीचे प्रोफेसर श्री.कुलकर्णी यांचे सहाय्याने सोलरयुनिटवर हा क्षार तयार करित असा संदर्भ येथे दिला आहे. पपईमूल हे स्त्रोतोविस्फार करणारे आहे. औषध निर्मितीमध्ये आधुनिक शास्त्र किंवा प्रक्रियांचा वापर करण्याची प्रवृत्तीही येथे आढळते. (सं. – आ.प. १५ मे १९८०; अश्मरी व अवगाहन एक अनुभव)

**आत्ययिक चिकित्सा –** तीव्र उर:शूल, हृल्लास आणि हृद्दाह या रूग्णात आत्ययिक चिकित्सा कशी केला हा अनुभव सांगितला आहे. सदर रूग्णाचे पित्तावृत प्राणोदान असे निदान करून 'पित्तावृतेतु पितघ्ने मारूतस्या विरोधिभि: ॥' या सूत्रानुसार चिकित्सा केलेली दिसते. हृल्लास या लक्षणावरून आमाशयदुष्टी आणि तीव्र उर:शूल यावरून प्राण व उदानाचे पित्तावृतत्व असा विचार केलेला दिसतो. सदर रूग्णास आत्ययिक आवस्थेत,

१) जंबीरावलेह १ तोळा

२) सूतशेखर ४ गुंजा+ गोरखचिंचा चूर्ण १ मासा+ मुक्तापिष्टी १ गुंजा

३) जंबीरावलेह

४) गंधकद्रुती सूचीकाभरण १/१०० दिले.

त्याने लक्षणे त्वरीत कमी झाल्याचा अनुभव येथे सांगितला आहे. (सं. – आ.प. मार्च ७८; आत्ययिक चिकित्सा)

आत्ययिक अवस्थेतील लक्षणांवर सद्यफलदायी चिकित्सा र.मा.नानलांनी सांगितल्या आहेत.

१) हिक्का – रूग्णाचा इतिहास बघितला असता ७ दिवसापासून त्रास होता व छातीत जळजळ होती परंतू हृदयात काही त्रास नव्हता. यावर –

१) सूतशेखर ५०० मि.ग्रॅम. (सूक्ष्म करून दिलेले)

२) जंबीरावलेह १० ग्रॅम

३) गोरखचिंचावलेह १० ग्रॅम मिश्रण दिवसातून ४ वेळा चाटन करावे. दुसऱ्या दिवशी ५0% व रात्रीपासून संपूर्ण उपशय मिळाला व पुनरावर्तन झाले नाही.

२) असह्य कटीशूल – (अवधी २४ तास)

१) स्थानिक संवाहन – विषगर्भ तेलाने

२) दशमूल नाडीस्वेद

३) अभ्यंतर योगराज गुग्गुळ ६ गोळ्या

४) दशमूळारिष्ट २ तोळे

यावर २५–३० मिनिटांत संपूर्ण उपशय मिळाला. यानंतर –

योगराज गुग्गुळ २ गोळ्या जेवनानंतर व अनुपानासाठी दशमूलारिष्ट ४ चमचे वापरले.

३) मूत्रावरोध – कालावधी २४ तास. यासह असह्य शूल, तीव्र आध्मान व नाडी १४० प्र.मि. यावर –

१) पलाशपुष्प लेप बस्तीप्रदेशावर व नाडीस्वेद गंधद्रावाचा

२) अभ्यंतर – अपामार्ग क्षार ५०० मि.ग्रॅ. पुनर्नवा मुळीगंध १ चमचा दिला.

यावर १५ मिनिटांनी लाल रंगाची मूत्रप्रवृत्ती झाली. आध्मान शांती झाली.

४) गुदाचे उजवे बाजूस पुटकुळी – अवधी ८–१० दिवस व ३–४ तासांपासून असह्य ठणका यावर –

१) कांचनार गुग्गुळ ८ गोळ्या व मधुआमलकस्वरस ४० ग्रॅम एकाच वेळी दिले. अर्ध्या तासात ५०% व दुसरे दिवशी संपूर्ण उपशय मिळाला.

५) श्वेत, घन, पिच्छिल योनिस्त्राव, असह्य कंडू यावर –

१) पुष्यानुगचूर्ण २ मासे

२) वंगभस्म ४ गुंजा (३ सूक्ष्म) दर २ तासांनी १

३) अशोकारिष्टाचा उत्तर बस्ती दिला व उपशय मिळाला.

६) अतिसार, मुखपाक, गुदपाक– अवधी १ महिना यावर –

१) कनकसुंदर १–४ गुंज व स्तंभन अर्क १ चमचा दर २ तासांनी ४ मात्रांनंतर ५०% उपशय मिळाला व १६ तासांत पूर्ण उपशय मिळाला. (सं. – आ.प. १५ फेब्रुवारी १९८३; आत्ययिक चिकित्सानुभव)

बालरोगातील आत्ययिक चिकित्सेचे वर्णन आहे.

१) बालक अतिसारातील आत्ययिक चिकित्सा–स्तंभन पंचामृतपर्पटी १ गुंजा + कुटजघन वटी १/२ गोळी काल – १ मात्रा मिश्रण १० मिनिटात चाटविणे अशी प्रत्येक १० मिनिटांच्या अंतराणे चाटविणे अशा १ तासात ३ मात्रा, दोन मात्रांच्या मध्ये स्तंभन अर्क २–२ चमचे देणे.

२) शिथिलमल आणि यकृत प्लीहावृद्धी आत्ययिक चिकित्सा

१. १/८ गुंजा ताम्र + शरेपुंखा क्षार १/४ गुंजा मधासह

२. शिथुपाल अर्क आणि दिपाअर्क दर १० मिनिटांनी एका आड एक १–१ चमचा नंतर केवळ

दिपाअर्कावर १२ तास ठेवले.

**क्षयजकास –** आधुनिक शास्त्राने ब्रांकोजेनिक असे निदान केलेल्या रूग्णाचे 'क्षयजकास' असे निदान करून चिकित्सा दिलेली आहे. सदर व्याधीत स्त्रोतोरोध आणि प्राणवहातील स्थानसंश्रय या दोन महत्वाच्या घटना होत.

कफप्रादुर्भाव आणि वाताचे वय म्हणून केवळ कफच्छेदन न करता लमावसंत आणि संशमनीवटी यांचे प्रयोजन केलेले आहे. त्रिकटु आणि मिरे हे प्रमाथी गुण वाढवून स्त्रोतसांतर्गत दोषशोधन व त्यासह योगवाही रससिंदूर दिलेले आहे. तर सरक्त निष्ठीवन आणि पूयवत ष्ठीवन या पित्तानुबंधी लक्षणांसाठी वासा व कुमारी यांची योजना केलेली आहे.

१) रससिंदूर १/४ गुंज+ त्रिकटू ४ गुंज+ लमावसंत ४ गुंज अनुपान वासाकुमारी– व्यानउदान काली.

२) पिप्पलीवटी २ गुंजा, संशमनीवटी ४ गोळ्या आणि मारिचचूर्ण ४ गुंज अनन्नकाली.

स्त्रोतोरोध नष्ट झाल्यावर स्त्रोतोबल वाढविणारी चिकित्सा दिलेली आढळते.

१) लमावसंत ४ गुंजा + शृंगभस्म १ मासा मधासह

२) वासाकुमारी काढा – व्यानउदानकाली

३) सुवर्णकल्प – १ गोळी अनन्नकाली मधासह (सं. – मार्च १९८३; आधुनिक शास्त्राने 'ब्राँकोजेनिक कारसीनोमा')

**मुखदुर्गंधी –** 'श्वास मुखविस्त्रता–मुखदुर्गंधी' हा विषय टीव्हीवरील जाहीरात बघतांना सुचला व लेख तयार झाला असे ते म्हणतात. यावरून त्यांचे शास्त्राविषयीचे चिंतन सतत चालू असते असे दिसते. जनसामान्यांसाठी माहितीपर, सोप्या भाषेतील हा लेख आहे. यात मुखविस्त्रताची संप्राप्ती, हेतू इ. वर्णन करून काही सोपे योगही त्यांनी वर्णन केले आहेत. रक्त, मेद हे धातू व पित्ताची यात प्रमुख भूमिका आहे. असे ते म्हणतात.

काही वेळा स्थानिक कारण नसतांनाही दुर्गंधी आढळते. अशावेळी रक्ताची अशुध्दता जाणावी किंवा रक्ताचे व्याधी होण्यापूर्वी पूर्वसूचना म्हणून हे लक्षण असते. उदा. प्लीहा, यकृत विकार, प्रमेह, कुष्ठ, रक्तपित्त इ. हा विशेष विचार मांडला आहे.

✴ हेतू निराकरणात भोजनोत्तर ब्रश करावा नंतर पाणी पिऊ नये किंवा पालथे झोपू नये ही विशेष पथ्ये मांडली आहे.

✴ सामान्य उपयात वेखंड नस्य किंवा गंधनस्य सांगितले आहे. गंधनस्य म्हणजे वेखंड, कापूर, निलगिरी, पुदीनाफूल,इ. पदार्थ रूमालात ठेवणे. मधून–मधून वास घेणे. प्रतिमर्शनस्य श्रेष्ठ उपाय असल्याचे ते सांगतात.

✴ आयुर्वेदाविषयी भारतीय परंपरेविषयी अभिमान त्यांच्या लेखनात जाणवतो. (सं. – आ.प. नोव्हेंबर २००१; श्वास–मुख विस्त्रता–मुखदुर्गंधी)

**गलगंड –** गलगंडाच्या विशिष्ट चिकित्सा सूत्रात त्यांनी नाडी स्वेद सांगितला आहे.

त्यात वातासाठी – एरंड पाने, कफासाठी – गोमूत्र, पित्तासाठी– आम्लद्रव्ये.

रक्तासाठी दूध, धातुक्षयजसाठी मांसरसाचा वाफारा असा उल्लेख आहे.

✳ स्थानिक उपायात कफमेद नाशनासाठी निर्लवण उपनाहाचे वर्णन आहे. वातासाठी सलवण उपनाहाचे वर्णन आहे.

✳ उद्‌वर्तन– लोकरी कपड्याने घर्षण करावे असा उल्लेख वै. वेणीमाधवशास्त्री परंपरेतील हा प्रयोग आढळतो.

**अरिष्ट लक्षण –** चिकित्सा करताना अरिष्ट लक्षणांचा अभ्यास असल्यास वैद्यांस चिकित्सा जरी यशस्वी ठरली नाही तरी जाणता वैद्य असा सन्मान मिळू शकतो. आयुर्वेदामध्ये अरिष्ट लक्षणे हा विषयविस्तृतपणे मांडलेला आहे. परंतु ह्यावर विशेष अभ्यास होणे आवश्यक आहे असे ते सांगतात. अरिष्ट लक्षणांच्या बाबतचा अनुभवही त्यांनी प्रस्तुत लेखा मांडलेला आहे. हृद्रोगी रूग्णात अरिष्ट लक्षणे असतांना उदा. – नख श्यावता शामता, नाडीसूक्ष्म, क्षीण, हृद्‌शूल, श्वास, तीव्र तृष्णा, क्वचित दुष्टोरिष्टो जिवती आणि 'यावत् कंठगतम् प्राणम् तावतं कुर्यात चिकित्सीतम्' या सूत्रांचा आदर्श ठेऊन चिकित्सा दिलेली आढळते. परंतु रूग्णाच्या नातेवाईकांनाही असाध्यते ची पूर्ण कल्पना, दिलेली दिसते.

१) बृहत्‌वात १ ग्रॅम + सु.मावसंत १ ग्रॅम + अकिक भस्म २ गुंजा अनन्नकाली; अनुपान– दूधात उगाळलेला बदाम

२) अर्जुनघनवटी १ ग्रॅम + रक्तवटी १ ग्रॅम + उदान व्यानकाली, उष्ण जल – अनुपान. आमगर्भवटी १ ग्रॅम

३) हृद्यगंधार्क – निशाकाली

४) सहस्त्रपुटी अभ्रक दर १ तासाने ६0 मिलि. ग्रॅम चघळून

यासह आहारात केवळ कोबी व दुधीचे सुप व सिध्दजल. सदर चिकित्सेने अरिष्ट लक्षणे अचानक नाहिशी झाली. पण हेही अरिष्ट लक्षणच होय. त्यानंतर अतिसार होउन रूग्ण कालवश झाला असा अनुभव आणि आयुर्वेदाचे सामर्थ्य यथार्थपणे अनुभवल्याचेही ते येथे नमूद करतात. बृहतवात, सुवर्णमालिनी, सहत्रकुटी अभ्रक ही औषधे सुक्ष्म स्वरूपात वापरली आहे. (सं. – आ.प. ऑक्टो.८६; अरिष्ट लक्षण अनुभव)

सदर लेखामध्ये चरक इंद्रियस्थानातील संदर्भ देऊन विषय स्पष्ट केला आहे. बृहत्‌वात, सुवर्णमालिनी, सहस्त्रपुटी अभ्रक इ. औषधे सूक्ष्म स्वरूपात वापरल्याचेही आढळते.

म. पु. नानल यांच्या वापरातील अनुभुत योग येथे वापरलेले आहेत. रक्तवटी, आमगर्भवटी, हृद्यअर्क, गंधार्क (सं. – आ.प. ऑक्टोबर १९८६; अरिष्टलक्षण अनुभव)

वै. भा.पु.नानल यांनी कॅनसरच्या रुग्णात वातप्रकोपासाठी बलानारायणतेलाचा अभ्यंग, वातप्रकोप व अग्नि साठी घृताचे स्नेहपान, तर ओजचिकित्सेसाठी वैक्रांत, सुवर्णाचा वापर केला आहे. मनोदोषासाठी गायत्रीमंत्राचा जप सांगितलेला दिसतो.

वैद्य झाल्यानंतर किंवा यशस्वी चिकित्सा केल्यानंतर येणारा अभिमान किंवा अहंकार किती खोटा असतो हे त्यांनी मांडले आहे. स्वत: वैद्य रमेश नानलांना जेव्हा एकही रूग्ण न पहाता अहंकार येऊ लागला की आपण, सर्व रूग्ण चुटकीसरशी बरे करू शकतो. त्यावेळी त्यांच्या वडीलांनी त्यांना पुढील सूत्र सांगितले.

''व्याधेस्तत्व परिज्ञानं वेदनायाश्च निग्रह: ।

एतद् वैद्यस्य वैद्यत्वं न वैद्यो प्रभुरायुषः ।।''

व्याधीच्या तत्वाचे सर्वतः ज्ञान असणे, वेदना कमी करणे हेच वैद्यत्व आहे. वैद्य रूग्णाचे आयुष्य वाढविणे किंवा कमी करण्यास समर्थ नसतो. यासंदर्भातील रूग्णानुभवही त्यांनी सदर लेखात दिलेले आहेत.

आयुर्वेद हे शास्त्र असल्याने त्यांची उपयुक्तता शास्त्रीय निकषांवर घासूनच पारखावी लागेल. चमत्कार, श्रद्धा, आदर या भावनांना शास्त्रात विशेष महत्व देउ नये. विद्यार्थांवर संस्कार करताना ते शास्त्रीय विचारांनी करावेत, चमत्कारांनी भारावणाऱ्या विचारांनी नाही. यासाठी आध्यापकांनी विशेष जागरूक रहाणे आवश्यक आहे. आयुर्वेद नेमका कसा शिकवला जावा याचेचे सूत्र नेमके त्यांनी या लेखात मांडले आहे. चिकित्सेपूर्वी प्रत्येक वैद्याने हा लेख वाचावा. (सं. – आ.प. फेब्रुवारी १९८३; न वैद्यो प्रभुरायुषः ।)

## पंचकर्म

पंचकर्म विषयक लेखन अतिशय थोडे आहेत. परंतु माहितीच्या दृष्टीने उत्कृष्ट आहेत. यात केवळ ग्रंथोक्त माहिती न देता सूक्ष्मनिरीक्षणे व अनुभवांचे वर्णन आहे.

**जलौकावचरण –** डॉ. बापट यांची गुडघेदुखी जलौकावचरणाने बरी झाली. त्याचा कार्याकारणभाव काय ? अशी शंका त्यांनी विचारली होती. त्याला उत्तर देतांना संधीगत वात व जलौकावचरणाचा संबंध स्पष्ट केला आहे.

पित्तावृतवात व रक्तावृतवात जलौकावचरणाचा विचार करू शकतो, असे ते म्हणतात. यातही दोन अवस्थांचा विचार करावा. १) पित्तरक्तावृत क्षीण व्यान, २) पित्तरक्तावृत प्रकुपित व्यान. यापैकी पित्तरक्तावृत क्षीण व्यानात पित्त व रक्तातील द्रवत्व वाढते व क्लेद निर्माण होतो. हा क्लेद मांस, त्वचा, स्नायू यात व्याप्त होतो. या अवस्थेत रक्तमोक्षण अतीशय उपयुक्त ठरते. चरक, सुश्रुत, वाग्भट यांचे संदर्भ दिलेले आहेत. यासंदर्भातील त्यांचे अनुभवही त्यांनी सांगितले आहे.

✳ जलौकाकृत व्रणातून १ ते ३६ तासपर्यंत स्त्राव होतात. हा स्त्राव थांबवल्यास शूल वाढतो. म्हणून याची उपेक्षा करावी. धातुक्षयज वात प्रकोपज संधी शूलात यात रक्तमोक्षणाने अनुपशय दिसतो असा अनुभव ते सांगतात.

**वमन –** व्यवहारात वमनाचा वापर कसा करावा करू याबद्दलची युक्ती त्यांनी वमन:सोपा पण प्रभावी उपाय या लेखात दिली आहे. **सद्योवमनाचा सोपा योगही** त्यांनी दिला आहे. २५ ग्रॅ ज्येष्ठमध + २५ ग्रॅ. वेखंड + ४ lt. पाणी –उकळून ३ lt. करावे. + १/२ चमचा मीठ घालावे. हे मिश्रण प्यावे. उलटी न झाल्यास १ lt. गरम पाण्यात ५ ग्रॅ. मीठ टाकून प्यावे. पोटास शेक दयावा. अवश्य वमन होते.

वमन सकाळी ५॥ ते ६॥ च्या दरम्यान उत्तम होते. असा अनुभव ते सांगतात. (सं. – आ.प. सप्टें. ११; वमन)

**बस्ति –** 'बस्ति' संदर्भात विवेचन करतांना बस्तिचे अनुभविक योगही सांगितले आहे. प्रथम बस्तिकाल, बस्तियंत्र या विषयी विवेचन केले आहे. उदा. बस्ति दिवसा दयावा कारण स्त्रोतसे मोकळी असतात व अग्नि अन्नरस युक्त असतो.

## अनुभविक योग

**अ) निरुह बस्ति**

१) दशमूळक्याथ निरूह : नवीन पक्षवध, आक्षेपक यांच्या शुध्द वातज अवस्थात निरूह व अनुवासन

व्यत्यासात द्यावे वातप्रधान आर्तवदोष, संधीशूल.

२) सातला क्याथ निरूह : सद्य:फलदायी, ग्रंथितमल, आवृतवात.

३) आराग्वधादी निरूह : चिरकारी प्रवाहिका, २-७ बस्ति.

४) तक्रबस्ति : नि:स्नेह तक्र – अर्श, ग्रथितमल, गुदशूल.

५) मोचरस + नागकेशर + इंद्रजव : समप्रमाणात – काढा – सरक्तमल, रक्तातिसार, रक्तार्श.

**ब) अनुवासन बस्ति**

१) बीजपर्णतेल – १-४ औंस तेलाचे १-७ बस्ति – रक्तस्त्रावात सद्यपरिणामकर.

२) वचातैल : शुष्क ग्रथितमल, पक्षवध, पादसुप्ती, स्पर्श वैगुण्याच्या सर्व अवस्था.

३) बदामतैल + अक्रोडतेल + तिल तैल : दीर्घकालीन आजाराने शरीरकृश, शुष्क, दुर्बल झाल्यास, बृंहणार्थ हा बस्ति देणे. वरील तेलांचे समभाग मिश्रण १ औंस दयावे. अल्पमात्रेत दीर्घकाल प्रयोग करावा. रसायनाचे फळ मिळते. (सं. – आ.प. ऑक्टो. ९२; बस्ति चिकित्सा काही अनुभव)

## स्वस्थवृत्त

स्वस्थवृत्त संदर्भात र.म.नानलांचे विपुल लेखन आहेत. यात प्रामुख्याने आहार विचार, देशविचार, धारणीय-अधारणीय वेग विचार, मानस वेग, आणि 'स्वास्थ्य संकल्पना' अशा विषयांवर विवेचन आढळते. व नविन विचार आढळतात.

## लंघन संदर्भात :

लंघनाची नेमकी संकल्पना त्यांनी स्पष्ट केली आहे. येथे ऋतु म्हणजे काय यांचे विवेचन करतांना ते म्हणतात की विशिष्ट काळात सृष्टी आणि शरीराची विशिष्ट स्थिती म्हणजे ऋतु लंघन म्हणजे केवळ उपवास नसून लघुभोजन, स्वेदन व रूक्षण म्हणजेही लंघनच. येथे लघुभोजन म्हणजे लघु राशी स्वरूपात भोजन तसेच लघुगुणात्मक भोजन. लघुगुणात्मक पदार्थ त्यांनी वर्णिले आहेत.

१) स्वभावत: लघु पदार्थ – उदा. जव, गहू, इ. १ वर्ष जुने धान्य, जुना मध, मूग, मसूर या डाळी, इ.

२) संस्कार सिध्द लघु पदार्थ – उदा. जांगलपशू मांस, दह्याची निवळ + सैंधव + सुंठ + मिरे, डाळींचे पाणी, द्राक्षासव, क्वथित जल, लाह्या, इ. असा सूक्ष्मतर विचार त्यांनी येथे मांडला आहे.

येथे शाकाहार व मांसाहार दोन्ही पध्दतींच्या आहाराची उदाहरणे दिली आहेत. (सं. – आ.प. जुलै १९९०; वर्षाऋतु लंघन क्यों और कैसे)

## प्रमेहातील पथ्य संदर्भात :

प्रमेहातील पथ्य सांगातांना मधुमेहातील सामान्य पथ्यकल्पना आणि विशेष पथ्यकल्पना स्पष्ट केली आहे. लक्षणांनुसार विशेष पथ्यापथ्य आणि सोपे उपाय हा विशेष विचार यांत आहे. (सं. – आ.प. फेब्रु ८७; प्रमेह)

अनुभूत योगांचे वर्णन आहे. (सं. - शो.प्र. ३.१.२; औषधीकल्प व अनुभूत योग पान नं. )

प्रमेहात भृष्ट धान्य उपयुक्त कसे ? हे आयुर्वेदीय दृष्टया ससंदर्भ स्पष्ट केले आहे. भृष्ट धान्य म्हणजे अग्निने पूर्वपाचित अन्न. हे अनभिष्यंदी होते.

✳ ज्या प्राण्यांना प्रमेह होत नाही, अशांना भरपूर जव खायला दयावे. ते न पचताच बाहेर पडतात. त्याचे विविध पदार्थ करून खावे, असे ग्रंथात वर्णन आहे. हा वैशिष्टयपूर्ण अग्निसंस्कारच आहे असे वै.र.म. नानल म्हणतात.

✳ भृष्ट धान्य कल्पना केवळ संतर्पणजन्य प्रमेहातच वापरावी असा विचार त्यांनी येथे मांडला आहे.

✳ भृष्ट धान्याचे काही अनुभूत योग त्यांनी सांगितले आहेत.

१) भृष्टयव २) भृष्टगोधूम ३) भृष्टतंडूल ४) भृष्ट अलयोग

(सं. - आ.प. मे ८८; प्रमेह व भृष्ट धान्य प्रयोग)

त्यांच्या परंपरेतील भाजणीचे प्रमाणही त्यांनी सांगितले आहे. (सं. - शो.प्र. ३.१.२; औ. कल्प.)

वैद्य र.म.नानल आणि सत्यव्रत नानल यांनी ''मधुमेह व भर्जित धान्य'' यावरच लेखन केले आहे. मधुमेह व भर्जित धान्याची कल्पना अजून थोडी स्पष्ट केलेली या लेखात आढळते.

✳ भर्जित धान्याचे अजून काही योग या लेखात अधिक वर्णित आहेत. उदा. गहू, तांदूळ, डाळी प्रथम भाजून मग वापराव्या. भात कमीत कमी पाण्यात शिजवून, फडफडीत भात खावा.

✳ मिरची हे द्रव्य द्रवशोषण चांगले करते. विशेषत: झाडावर सुकलेली/उन्हांत ठेवलेली लाल मिरची वापरावी. हिरवी मिरची अग्निवर भाजून मीठ लावून खाणे काहींना उपयोगी विशेषत: अग्नि मांद्यजन्य संधीवातात उपयोगी.

✳ भर्जित धान्याच्या पथ्यावर पाणी कमी प्यावे, असे ते सांगतात.

✳ जवाचे विविध पदार्थ, धान्यांचे विविध पदार्थ, मधल्या वेळेचे न्याहारीचे पदार्थ यांचे विस्तृत वर्णन आहे.

✳ वर्ज्य भर्जित धान्य कोणते याचे ही वर्णन आहे. तसेच कोण भर्जित धान्य वापरू नये, असे वर्णन आहे.

✳ भर्जित धान्य ही संपूर्ण चिकित्सा नसून, पचन सुधारून द्रवांचे प्रमाण नियंत्रित ठेवणेसाठी उपयुक्त आहे. तसेच कफाचे उपद्रव- अतिमूत्रप्रवृत्ती, स्वेदाधिक्य, गौरव, जडत्व यात उपयोगी असल्याचे ते सांगतात. (सं. - आ.प. ऑगस्ट २००३; मधुमेह व भर्जित धान्य)

✳ प्रस्तुत लेखात नानलांच्या परंपरेतील पुढील व्यक्ती श्री सत्यव्रत यांचेही लेखन योगदान आहे.

✳ एकाच विषयावर र.म.नानलांचे दोन लेख आहेत. मागील लेख व या लेखात साधारणत: १४ वर्षांचा काळ गेला आहे.

✳ सदर लेखात मूळ कल्पना अजून सुस्पष्ट रितीने, विचारपूर्वक मांडल्याचे आढळते.

## गर्भोपघातवर भाव संदर्भात :

गर्भोपघातकर भावांचे वर्णन करतांना. गर्भिणी परीचर्येचे पालन जे आई-वडिल करीत नाहीत ते अपंग

प्रजा निर्माण करण्याचे कारण ठरतात. आणि हा राष्ट्रीय अपराध आहे. कारण याचा भार अप्रत्यक्षपणे समाजावर व पर्यायाने राष्ट्रावर पडतो. असा विचार त्यांनी येथे मांडला आहे. यावरील उपायांचे वर्णनही त्यांनी केले आहे.

जन्मजात अपंगत्वावर मात करण्यासाठी आयुर्वेद दोन प्रकारे सहाय्यभूत होऊ शकतो.

१) एक म्हणजे आयुर्वेदातील गर्भिणी परीचर्येचे पालन करणे. अपंग प्रजा निर्माणच होणार नाही असा प्रयत्न करणे.

२) दुसरे म्हणजे अपंग शरीरात लोखंडी मन तयार करणे.

अवृत्तिव्याधिशोकाऽऽर्तानुवर्तेत... हा महत्त्वाचा विचार त्यांनी येथे मांडला आहे. (सं. - आ.प. मार्च ८१; अपगोध्दार)

* गर्भोपघातकर भावांचे वर्णन आहार - विहार - मानस अशा पद्धतीने असे केले आहे.
* चिकित्सा द्रव्यांचे गर्भोपघातकरत्व तसेच विशिष्ट व्याधींचे गर्भोपघातकरत्व ही वर्णन केले आहे.

'सुप्रजा' निर्मितीच्या दृष्टीने त्यांनी विशेष मार्गदर्शन केले आहे. परिचर्या कालाची विभागणी - गर्भधारणेपूर्वी २ महिने, ऋतुमतीचर्या आणि गर्भावस्थेतील परीचर्या अशी केली आहे.

* दौहृदाचे वर्णनात अहितकर द्रव्यांऐवजी हितकर द्रव्यांची योजना करावी यासाठी मृद्‌भक्षणचे उदाहरण दिले आहे. त्याऐवजी गेरू, हळद, आवळ्याची राख यांचा वापर करावा अशी उदाहरणेही आढळतात.
* या विषयासंदर्भात सामान्यांना प्रशिक्षण देण्याची, जनजागृतीची गरज आहे असे मत ते मांडतात.
* कारण सुप्रजा निर्मितीने राष्ट्रीय समस्येचे निराकरण होऊ शकते. येथे त्यांचे मज्जासारत्व दिसून येते. (सं. - आ.प. जाने. ९०; गर्भोपघातकर भाव)

## वेग संदर्भात :

वेग म्हणजे 'विज्' धातूस धत्र प्रत्यय लागणे. त्वरा किंवा जोराची गती.

वेगाची अतिशय साधी सोपी व्याख्या नानलांनी येथे केली आहे. ''शरीराच्या नैसर्गिक प्रवृत्ती सर्वतः व पूर्ण रूपेण व्यक्त होणे म्हणजे वेग''.

वेग उदीरणाने होणारे परिणाम समजण्यासाठी प्रत्येक वेगकालात होणाऱ्या शारीरक्रियांचा अभ्यास दोषधातू मलांच्या परिभाषेत केला पाहिजे. त्यामुळे वेगाची प्रकृती समजते तसेच विधारण व उदीरण या विकृतीच्या कल्पनाही श्रेष्ठतेने समजू शकतात. प्रत्येक वेग वायुमुळेच निर्माण होत असला तरी काही वेग दोषप्रधान, काही धातूप्रधान तर काही मल प्रधान संप्राप्ती दाखवतात हा नवीन विचार येथे ते मांडतात. वेगनिर्मितीत मनाचा ही संबंध असतो. वेगनिर्मिती वायू व मनामुळे तर तर निष्क्रमण वायूमुळे. मन व्यग्र असल्याच वेगनिर्मितीच बंद होते.

आयुर्वेदाने वेग 'गतित्वदर्शक' व रोगावस्था दाखवण्यासाठी वापरला आहे. वेग उत्पन्न होण्याची कारणे याप्रकारे आढळतात.

१) स्वभावतः

२) अंतरात्म्याने बहिरात्म्याव्दारे प्रकट केलेली इच्छा.

३)	वायू सर्व वेगांना उत्पन्न करतो. पण यावरून नेमकी वेगप्रक्रिया स्पष्ट होत नाही. यासाठी पाणिनीने शब्दोत्पत्तीची प्रक्रिया दिली आहे, यावरून अनुमान करून र.म.नानलांनी वेगप्रक्रिया मांडली आहे – (सुबुध्दी) आत्मा + अर्थ + मनोप्रेरणा–अग्नि–आहनन–अनिल प्रेरणा (चलगुणाने) वेगोत्पत्ती.

म्हणजे बुध्दीयुक्त आत्म्याने इच्छा करणे, त्याने मनांत रजोगुण प्रधान वैषम्य निर्माण होणे व याचा परिणाम अग्निवर होऊन त्याव्दारे परमाणु स्थित वायूचा चलगुण वाढून प्रस्पंद उत्पन्न होणे.

यात अग्नि महत्त्वपूर्ण वाटतो असे ही ते म्हणतात.

✳	परमाणुस्थित वायू म्हणजे प्राणवायूच समजणे योग्य असे मत ते मांडतात. तो वेग योग्य स्थानापर्यंत पोचवण्याचे कार्य व्यानवायू करतो. त्याठिकाणचा प्राण व स्थानिक वात यामुळे वेगप्रवर्तन घडते.शुक्रवेग व जृंभावेग याचे विवेचन केलेले आहे.

**शुक्रवेग –** पाश्चात्यवैद्यकाने हस्तमैथुन स्वाभाविक गोष्ट सांगून त्याने कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत असे म्हटल्यावर र.म.नानलांनी यावर अभ्यासपूर्ण लेख लिहिला आहे. उदा.

✳	शुक्र म्हणजे काय ? त्याचा शरीराशी, मनाशी संबंध काय ? शुक्रवेग म्हणजे काय ? त्याची प्रक्रिया कोणती ? शुक्रवेग व शरीर अवस्था – मनाची अवस्था कोणती ? शुक्रउदीरणाचा व दोषधातूमल विकृतींशी संबंध, मनाशी संबंध, धातूक्षीणता हा विचार स्पष्ट केला आहे.

- शुक्रवेगाची निर्माण प्रक्रिया हा नवीन विचार त्यांनी मांडला आहे.
  शुक्रवेगाचे संदर्भात प्राण व अपान यांचे कार्य होते.
- हस्तमैथुनाने होणाऱ्या शरीरविकृतींचे अनुभव सांगतांना इतर समकालीन वैद्यांचे, वृध्दवैद्यांचे अनुभव त्यांनी लिहिले आहेत. उदा. वेणीमाधवशास्त्री, म.पु.नानल, विनायक बापट, विलास नानल. (सं. – आ.प. मे ८४; हस्तमैथुन अर्थात शुक्रवेगोदीरण)

**जृंभा वेग –** आयुर्वेद शब्दकोशातील 'जृंभा'ची व्याख्या दिली आहे. मरगळलेल्या मनुष्याकडून आ करून हवेचा एक श्वास पिऊन तो चैतन्य शिथिल झाल्यामुळे पुन:डोळ्यात अश्रु येऊन सोडला जातो यास जांभई म्हणतात. जृंभा हा वेग दोषात्मक संप्राप्ती दाखवतो असे ते म्हणतात.

- जृंभाची संप्राप्ती कशी घडते याचे स्पष्ट विवेचन करून शास्त्रातील सूत्रांचा अर्थ त्यांनी येथे स्पष्ट केला आहे. जृंभा ही श्वासोच्छवासाची विशेष पध्दत आहे. यात प्रथम श्वास आत घेण्याची प्रक्रिया म्हणजे निश्वास होते. निश्वास हे प्राणवायूचे कर्म आहे. या नंतरची क्रिया उच्छ्वास हे उदानाचे कर्म आहे. तर जृंभा वेगाचे वेळी येणारी गतिमानता ही व्यानवायूमुळे येते. म्हणून जृंभाचा विचार करतांना प्राण, उदान, व्यान यांचा विचार करावा. पैकी प्राण प्रस्पंद निर्माण करतात व प्राणाचा अधिक संबंध वेगाशी असतो. म्हणून प्राण स्थानात विकृती लक्षणे दिसतात. यात नेत्रादी इंद्रियांचे विषयग्रहण सामर्थ्य नष्ट होते, मन्यास्तंभ, अर्दित, इ. प्राणाच्या प्रकोपाने होणारे व्याधी होतात. (सं. – आ.प. जाने. ८६; जृंभा वेगविचार)

**मन संदर्भात :**

- ✳ मनाच्या स्थानाबद्दल अनेक वाद आहेत. त्याबद्दल नानल आपले मत मांडतात, की मनाचे विचरण स्थान संपूर्ण शारीर, आश्रयस्थान हृदय व **जागृतावस्थेतील केंद्रस्थान उत्तमांग आहे.**
- ✳ मनाच्या वेगांच्या (लोभ, ईर्षा, व्देष, मत्सर, राग, क्रोध, भय, शोक) व्याख्या ही त्यांनी स्पष्ट केल्या आहेत. मन:संताप या शब्दाने 'उष्णता' अपेक्षित नाही तर वैचित्यभरतिग्लानिर्मनसस्तापलक्षणम् । असे चरकाचा संदर्भ देऊन स्पष्ट करतात. तसेच प्रत्येक मानसवेगाने होणाऱ्या मन:संतापाची तरतमता भिन्न असते म्हणून शरीरावरील परीणामही भिन्न असतात हे सोदाहरण स्पष्ट केले आहे.
- ✳ मन:संताप हा विविध स्त्रोतसांवर, इंद्रियांवर आपला प्रभाव दाखवतो जो प्रत्यक्ष/अनुमानगम्य असतो.
- ✳ मन व त्रिदोषांचा संबंध त्यांनी संदर्भ देऊन अतिशय उत्तम रितीने स्पष्ट केला आहे. त्याच प्रमाणे ओज व मनाचा संबंधही ते स्पष्ट करतात.
- ✳ स्वास्थ्याच्या चतु:सूत्रीमध्ये दिनचर्या, ऋतुचर्या, वेगविधारण करणे व मानसवेग धारण यांचा विचार केला जातो.
- ✳ सदाचार म्हणजेच मनाची मशागत असे ते म्हणतात. सदाचार बद्दल तसेच मन:संतापाने व्याधीनिर्मिती कशी होते, याचे विवेचन त्यांनी केले आहे. (सं. - आ.प. १७ फेब्रु. ७१; मन:संताप)
- ✳ मनाची विकृती समजण्यासाठी प्रथम मनाची प्राकृत कर्मे जाणून घेणे आवश्यक आहे. असे ते म्हणतात.
- ✒ प्रतिलोम राजयक्ष्मा-अतिव्यवायामुळे होणारा धातूक्षय यात केवळ शुक्रक्षयाची व वातनाशक चिकित्सा न करता, मैथुनप्रवृत्तीचा अतियोग यावर मनाची चिकित्साही करावी असे र.म.नानल म्हणतात.
- ✒ कामाच्या अतिरेकाने किंवा सतत मानसिक तणाव यामुळे होणाऱ्या आजारांत कार्यबाहुल्यामुळे होणाऱ्या वेगावरोधाचा विचारही करावा असे मत त्यांनी येथे मांडले आहे, याची संप्राप्तीही त्यांनी मांडली आहे- वेगनिर्मिती वायू व मनामुळे होते, तर निष्क्रमण वायूमुळे होते. मन व्यग्र असल्यास वेगनिर्मितच बंद होते. अशावेळी अनुलोमन औषधासह वेगधारण न करण्याचा सल्ला व मनोवह स्त्रोतसावर शमन कार्यकर द्रव्ये दयावी असा नवीन विचार येथे मांडला आहे.

**स्वास्थ्य संकल्पना संदर्भात :**

स्वास्थ्य म्हणजे नेमके काय ? स्वास्थ्य संकल्पनेतील फोलपणा आणि स्वास्थ्य परिक्षणाचे मुद्दे त्यांनी स्पष्ट केले आहेत. सुश्रुतांची स्वास्थाची व्याख्या, ''समदोष ... बद्दल नानल नवीन विचार मांडतात की यातील 'समदोष' हा एकच शब्द स्वास्थ्यदर्शक आहे. इतर सर्व भाग म्हणजे समदोष या स्थितीचे विशदीकरण आहे.

WHO ने स्वास्थ्याच्या व्याख्येत बदल केला, तसेच ''इ.स.२००० पर्यंत सर्वांना स्वास्थ्य'' ही घोषणा केली. त्यावर टीकात्मक असा लेख लिहीला आहे. केवळ व्याख्येत बदल करून काही स्वास्थ्य मिळत नाही आणि घोषणा या अतिरंजित, फोल आहेत, असे म्हणतात. नेमके स्वास्थ्य म्हणजे काय ? या विषयीही त्यांनी विचार मंथन केले आहे.

आयुर्वेदाच्या 'स्वस्थ' व्याख्येचा गर्भितार्थ ही ते स्पष्ट करतात, आणि ही गोष्ट भयानक आहे परंतु

वास्तव आहे असे म्हणतात. व्याख्येतील परिभाषेचा नेमका अर्थ उलगडतात. उदा. समदोष: समाग्निश्च ... स्वस्थं इति अभिधीयते। येथे 'अभि' म्हणजे सार्वमत आणि 'धीयते' म्हणजे कल्पना किंवा विचार मांडला आहे. म्हणजे 'स्वास्थ्य' ही कल्पना आहे. स्वस्थ हा कसा असतो हे न सांगता स्वस्थ कसा असू शकेल हे या व्याख्येत सांगितले आहे असा नवीन विचार ते येथे मांडतात.

स्वास्थ्याला हानीकारक अशा जल, वायू प्रदूषणाचा विचार, लोकांची बदललेली Life Style, विरूध्दाहार, मानसिक ताण या सगळ्या गोष्टींचे विवेचन करून स्वास्थ्य कसे मिळणार ? असा सवालही मांडला आहे. (सं. – आ.प. ... अशा करता स्वास्थयाची)

आरोग्य म्हणजे काय ? आपण आरोग्यपूर्ण आहोत हे कळण्यासाठी सध्या केल्या जाणाऱ्या तपासण्या व त्यातील फोलपणा उदाहरण पूर्वक स्पष्ट केला आहे.

या विषयासंदर्भात केवळ प्रश्न निर्माण करून ते थांबले नाहीत तर त्यावर पर्यायी पध्दतही त्यांनी सांगितली आहे हे विशेष. याबद्दल र.म.नानल म्हणतात की केवळ नव्या गोष्टींना विरोध हा हेतू नसून वाचकांना सावध करणे हा प्रामाणिक हेतू आहे. याबरोबरच 'अस्ति पक्षी विचार' मांडण्याची नैतिक जबाबदारी माझ्यावर आहे आणि ती मी आनंदाने पार पाडणार आहे.

चरकातील पुढील सूत्र – ''कार्य धातुसाम्यं तस्यं लक्षणं विकारोपशम: परीक्षा तु अस्य रूक् उपशमन स्वरवर्ण योग: शरीरोपचय: बलवृध्दी: अथ्यवहार्य अभिलाषो रूचि: आहारकाले अभ्यवहतस्मचाहतस्य आहारस्य सम्यक् जरणं निद्रा यथाकालं...''

मनोबुध्दी इंद्रियाणांच अव्यापत्ति: इति ॥ याच्या आधारे हा विषय स्पष्ट केला आहे. यातील लक्षणे जर युक्तीपूर्वक तपासली तर कोणता रोग संभवतो किंवा रोग नाही याची चाचणी होते. आणि ही चाचणी स्वत:ची स्वत: करता येते. यातील प्रत्येक लक्षणाचे विस्तारपूर्वक विवेचन केले आहे.

आपले स्वत:चे निदान आपण करावे हा हेतू यामागे नसून आपण निरोगी आहोत की नाही हे प्राथमिक रूपात कळावे एवढे यात अपेक्षित आहे असे ते म्हणतात. (सं. आ.प. ऑगस्ट व सप्टें. १५; आरोग्यचाचणी: विनामूल्य, सुलभ व निर्धोक पध्दत)

Mar. - 97 मद्रास ऍक्शन प्लॅन– १७ र.म.नानलांकडे सूचनांसाठी आला होता. त्यावेळी हा विषय सुचून त्यावर सविस्तर लेखन केले आहे.

प्राचीन परंपरेचा परिचय करवणे आणि महत्त्व समजण्यासाठी प्रस्तुत विषयाचे लेखन केले आहे.

## देश विचार संदर्भात :

आयुर्वेदीय दृष्टीने देशविचार मांडतांना पांचभौतिकत्व, रचना वैशिष्टय, भौगोलिकता यात दिशा, संघटना, भौगोलीय रचना, जनपदधारक घटक– वातावरण, जलावरण, देशावरण, कालावरण, सजीव सापेक्षता या दृष्टीने विचार केला आहे.

आयुर्वेदानुसार देशाचे प्रकार सौम्य, आग्नेय, जांगल, आनूप, साधारण, इ. प्रकार वर्णन केले आहे.

देशाचे विवेचन पांचभौतिक विचार, जलविचार, वायूविचार, स्थानविचार, प्राणीपक्षीवर्ग, वनस्पती

उपलब्धी, मनुष्यशरीर, विशिष्ट वनस्पती उपलब्धी असा विस्तृतपणे वर्णन केला आहे.

लुप्त जातींचे संरक्षण, वनौषधी लागवड, औषधी गुणवर्धन, संशोधनाचे दृष्टीने हा विषय महत्त्वाचा आहे असे ते म्हणतात. (सं. – आ.प. जुलै १९९७; प्राचीन भारतीय देशविचार आयुर्वेदीय दृष्टीकोन)

**काही शंका –** वैद्य र. म. नानल यांनी ग्रंथांतील काही सूत्रांवर आयुर्वेद पत्रिकेच्या माध्यमातून काही शंका सर्व आयुर्वेदीयांसमोर मांडल्या आहेत. यावरून ग्रंथातील प्रत्येक सूत्राचा सूक्ष्म विचार करून सतत त्याचे चिंतन करणे. न समजलेल्या गोष्टी इतर वैद्यांसमोर मांडून शंकांचे समाधान करून घेण्याची वृत्ती दिसते. या लेखात प्रमुख ४ शंका त्यांनी उपस्थित केलेल्या आहेत.

१. चरक सूत्रस्थान इंद्रियोपक्रमणीय अध्याय –
न परूषितम् अन्यत्र ....... मांस हरितक वर्गातील पदार्थ वाळवलेल्या भाज्या व फळे याशिवाय इतर शिळे अन्न खाऊ नये. याठिकाणी – १. शिळे म्हणजे किती वेळेचे २. मांस या गटामधये कसे टाकले आहे कारण मांस तर लवकर खराब होणारे आहे. ३. शुष्क शाक त्यासाठी चरक सूत्रस्थान ५/१० यामध्ये न्यवोपयोजेत असा स्पष्ट उल्लेख आहे. हा विरोध आहे का ?

२. चरक सूत्रस्थान ८/२० – ना शेष भृक् ....... दही, मद्य, मीठ, सातूचा पातळ पदार्थ, पाणी व तूप याशिवाय कोणतेही अन्य नि:शेष खाऊ नये. म्हणजेच उरलेले सर्व पदार्थ थोडे उरवावे. असे का ?

३. चरक सूत्रस्थान १३/७४ – जेव्हा केवल पित्तप्रकोप असेल तेव्हा व विशेषत: सामता असेल तेव्हा केवळ तूप घेऊ नये. पण केवळ पित्तप्रकोपात तूप का देऊ नये ?

४. चरक सूत्रस्थान २५/३७ – यामध्ये फाणित आणि शमीधान्यानाम् ही दोन द्रव्ये प्रकृतित: अहितकर आहेत तरीही ४ सूत्रात ओळीने फाणिताचा उपयोग (च.सूत्र १३/८५–८६, ८७, ८८) दिला आहे. तसेच सूत्र ८९ मध्ये उडीदाचा उपयोग. त्यातही उडीद हा पदार्थ दूधासह विरूध्द आहे चरक सूत्र २६/८७. (सं. – आ.प. डिसें. ८६; अभ्यासकाच्या शंका)

## प्रबोधन

वैद्य भा.पु.नानल यांनी त्यांच्या लेखनातून व भाषणातून आयुर्वेदाची तत्कालीन स्थिती तसेच आयुर्वेदाच्या उन्न्तीसाठी काय करावे या बद्दलची मते मांडली आहे. पंजाबमध्ये पतियाळा येथे पहिले आंतरराष्ट्रीय आयुर्वेद महासंमेलन संमेलन भरले होते. त्याचा वृत्तांत भा.पु.नानल यांनी लिहीला आहे. या लेखामुळे त्या काळातील आयुर्वेदाची स्थिती व इतिहास समजतो. सदर संमेलन पंडित शिवशर्मा यांच्या स्फूर्तिने घडून आले होते. या काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर आयुर्वेदाचा विशेष विचार होऊ लागला होता. जपानमध्ये विशेष करून आयुर्वेदाला प्रतिष्ठा मिळू लागली होती.

सदर संमेलनास ऑस्ट्रेलिया येथील अखिल जीवशास्त्र प्रतिष्ठान, पतियाळा येथील आयुर्वेद संधान मंडळ आणि आयुर्वेद महामंडळ मुंबई हे आयोजक होते. सुमारे ३०० सदस्य यासाठी उपस्थित होते. पैकी २५ जपानी प्राध्यापक वैद्य, २ ऑस्ट्रेलियन, ३ अमेरिकन, २ रशियन आणि १ तिबेटीयन.

सदर संमेलनास राजकीय सहाय्यही लाभले होते असे दिसते. कारण याचा सर्व खर्च सुमारे दिड लाख रूपये पंजाब सरकारने केला होता. स्वत: मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री आणि इतरही अनेक मंत्री यासाठी उपस्थित होते. पंजाब सरकारने आयुर्वेदाचे स्वतंत्र मंत्रालयही या निमित्ताने सुरू केले.

सदर संमेलनात ३५ शास्त्रीय शोधपर निबंधांचे वाचन झाले. जपानमधील आयुर्वेदाच्या कार्याचा आढावाही यात आढळतो. १९७१ मध्ये सुश्रुताची २ भाषांतरे प्रस्तुत झाल्याचा यात उल्लेख आहे. व त्यानंतर आयुर्वेद प्रचाराचे कार्य जपानमध्ये जोराने सुरू झाले. प्रो.हिरोशी मारूगामा यांनी ओकासा विद्यापीठात आयुर्वेद मंडळ स्थापन केले. केवळ ६ वर्षात त्यांची सदस्य संख्या ३० वरून ४०० च्या वर गेली. मेडिकल जर्नल्स म्हधूनही आयुर्वेदावरचे निबंध छापले गेले. पंडित शिवशर्मा व व्ही.व्ही.गोखले यांनीही जपानमध्ये व्याख्याने दिल्याचा यात उल्लेख आहे.

न्युयार्कमधील प्रो.चार्ल्स लेस्ली यांनीही निबंध पाठविला होता. यात ते म्हणतात की नवीन वैद्यकाला परंपरागत वैद्यकाचे महत्व कळलेले नाही हो मोठा दोष आहे.

येथे वाचल्या गेलेल्या निबंधांची यादीही सदर लेखात त्यांनी मांडलेली आहे. आयुर्वेदाची आंतरराष्ट्रीय स्थिती समजण्यासाठी हा लेख निश्चितच सहाय्यभूत आहे. (सं. – आ.प. १५ जून १९७५; पहिले आंतरराष्ट्रीय महासंमेलन)

महाराष्ट्र आयुर्वेद संघाच्या अधिवेशनाचे भा.पू.नानल अध्यरक्ष होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी आयुर्वेदाच्या उन्नतीसाठी कोणते प्रयत्न करावेत याचा सखोल विचार मांडला आहे.

आयुर्वेदाच्या प्रत्येक घटकाबद्दल काय करणे आवश्यक आहे याचे विवेचन त्यांनी केले आहे. उदा.

१. परिभाषा – आयुर्वेदीय परिभाषा जतन कराव्यात.

२. औषधे – काळानुसार प्रभावी आणि सद्यफलदायी औषधांची निर्मिती व्हावी.

३. विद्यार्थी कसा असावा ?

४. अध्यापकांनी नेमके काय कार्य करावे ?

५. संस्थांनी अध्यपकांची काळजी कशी घ्यावी ? त्यांच्या हिताचा विचार कसा करावा ?

६. नवीन पदार्थांची रस, विपाक, वीर्य, निश्चिती.

७. संशोधन नेमके कसे करावे ?

८. ग्रंथनिर्मिती कशी व्हावी ?

९. रूग्णालये कशी असावी ?

१०. जागतिक आयुर्वेदीय संघटनेत आयुर्वेदीयांचा समावेश कुठे असू शकतो ?

इ.गोष्टींचा उहापोह त्यांनी आपल्या भाषणातून मांडला आहे.

याबरोबरच सामाजिक आरोग्यात आयुर्वेदाचे महत्व याविषयी काही नवीन विचार त्यांनी मांडले आहेत. उदा.वेग विचार, रोगकारणांनमध्ये वेगावरोध महत्वाचे कारण आहे. पण समाजातील अनेक घटकांना त्याचे महत्व माहिती नाही. त्यासाठी शासकीय स्तरावर वेगवेगळया माध्यमातून उदा.आकाशवाणी, दूरदर्शन, शैक्षणिक चित्रपट, व्याख्याने, चर्चासत्रे, आरोग्य सप्ताह इ.माध्यमांतून याची माहिती पुरवावी.

परदेशात होणाऱ्या आयुर्वेदाच्या प्रचार प्रसाराबद्दल नानल म्हणतात की शासकीय स्तरावर आणि नियोजन पूर्वक आयुर्वेदाचे अध्यापन विदेशात होणे आवश्यक आहे. (सं. - आ.प. १७ ऐप्रिल ८२; आध्यक्षीय भाषण)

वैद्य रमेश नानल यांनी परंपरा, आयुर्वेदाची अभ्यास पद्धती, आयुर्वेदाची वैशिष्ट्ये तसेच आयुर्वेदाचा प्रचार-प्रसार या संबंधी प्रबोधन केले आहे.

## परंपरा :

परंपरांबद्दल नानलांना विशेष आदर आणि जवळीक आहे. परंपरेची व्याख्या त्यांचे महत्त्व तसेच प्रचलित वैद्यक परंपरा याबद्दल त्यांनी लेखन केले आहे.

परंपरेमुळे शास्त्रीयत्वास अनुभवांच्या पिढयान्पिढया सातत्याचे वजन येते, शालीन भारदस्तपणा येतो, शेकडो वर्षांच्या सामाजिक घडामोडीनंतर थोडासा इतिहास घडतो व शेकडो वर्षांच्या इतिहासातून छोटीशी परंपरा जन्म घेते असे ते म्हणतात. निरीक्षण, परिक्षण, अनुभवसातत्य, अनुकरण व अनुभवांची देवाण-घेवाण या रूढ पदार्थांची एक प्रणाली होते व सांस्कृतिक वारसा एका नव्या पिढीकडून नव्या पिढीकडे संक्रमित होते हीच परंपरा असे ते म्हणतात.

पूर्वीच्या काळी भारतामध्ये अलुते-बलुते ही परंपरागत व्यवस्था सुरू होती. या पैकीच वैदू ही जमात ग्रामीण रोग्यांची चिकित्सा करणारी होती. स्वास्थ्य विषयक रूढ आचार विचारांचे वारसा पद्धतीने होणारे संक्रमण म्हणजेच स्वास्थ्य परंपरा अशी व्याख्या नानलांनी येथे केली आहे. येथे ते परंपरेच्या मुद्याबाबत ही विवेचन करतात. उदा. परंपरेतील व्यक्तीत काही अनुवंशिक गुण असतात, काही संपादीत, तर काही नवीन असतात. परंपरेचे २ प्रकारही त्यांनी सांगितलेले आहेत.

१) स्थिर परंपरा, २) बदलणारी परंपरा.

स्वास्थ्य परंपरा या दोन्ही प्रकारात बसणारी आहे असे ते म्हणतात.

आयुर्वेद आणि वैदू परंपरा यातील परिभाषा समान आहेत असे निरिक्षण ते येथे नोंदवितात. दुर्दैवाने आज प्राचीन स्वास्थ्य परंपरांना अनुपयुक्त ठरवून नष्ट करण्याचे काम सुरू आहे. या परंपरा नष्ट करणे म्हणजे त्या त्या समाजाच्या आरोग्याशी खेळणे आहे असे ते म्हणतात या साठी काय करता येईल याचे विवेचनही त्यांनी सदर लेखात केलेले आहे उदा.

१) अशा परंपरांचे परिक्षण करूण त्यांना उत्तेजन देणे, वाढविणे.

२) स्वास्थ्य परंपरा कोश तयार करणे. हा कोश कसा असावा, या कोशाची रचना कशी करावी या बद्दलही विस्तृत विवेचन त्यांनी येथे केलेले आहे. या परंपरांच्या रक्षणासाठी प्रयत्न करणाऱ्या संस्थांबद्दलची ही माहिती सदर लेखात मिळते.

१) पारंपारीक आशियाटिक स्वास्थ्य परिषद, भारत (IAS TMA India)

२) लोकस्वास्थ्य परंपरा संवर्धन समिती, भारत

३) Academy Development Science, Maharashtra (सं. - आ.प. मार्च ०१; वैद्यक परंपरा अभ्यास)

परंपरांचे अजून काही प्रकार त्यांनी सांगितले आहे. उदा. धार्मिक सामाजिक, सांस्कृतिक, वैद्यकीय इ.

परंतु २ प्रकार मुख्य आहेत. असे ते म्हणतात.

१) लोक परंपरा – प्राकृत

२) शिष्ट परंपरा – संस्कृत

यापैकी प्राकृत परंपरा दुर्लक्षामुळे तसेच न्युनगंडामुळे क्षीण होत गेली. परंतु संस्कृत परंपरेची प्रगती होत गेली असे दिसते. प्राकृत आणि संस्कृत भाषांमध्ये संबंधही त्यांनी ग्रंथातील दाखले देऊन स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रातील विविध परंपरा, त्यांची आजची स्थिती, भाषा परंपरा यांचे विवेचनही त्यांनी केले आहे.

राजकीय लोकांनी परंपरा संरक्षणासाठी भाषणे केली मात्र कार्य काहीच केले नाही अशी टिका ते येथे करतात.

परंपरा टिकाऊ होण्यासाठी या दोन्ही परंपरांमध्ये समन्वय होणे आवश्यक आहे असे ते म्हणतात. त्याचप्रमाणे यातील वैद्यकीय परिभाषा पद्धतीची मांडणी प्रमेयात्मक किंवा समिकरणात्मक रूपात करावी. हा मोठा संशोधन विषय आहे असे ते म्हणतात. वैद्यक परंपरांना जागे करणे व सामर्थ्याची जाणीव करून देणे हे कार्य चांगल्या पद्धतीने टिकवले आहे असे ते म्हणतात.

येथे त्यांचा विविध लोकपरंपरांचा वैदू, सुईण, गारूडी यांचा अभ्यास दिसून येतो. यासंदर्भात त्यांनी ''लोकस्वास्थ्य परंपरा'' या पुस्तकाचेही लेखन केलेले आहे. (सं. – आ.प. मार्च २००१; वैद्यक परंपरा)

## आयुर्वेदाची अभ्यास पद्धती संदर्भात :

आयुर्वेदाला चांगले स्थान मिळवून घ्यायचे असेल तर उत्तम विद्यार्थी तयार होणे व त्यासाठी आध्यापन पध्दती चांगली असणे आवश्यक आहे. हे आध्यापन नेमके कसे असावे याविषयी प्रत्येक मुद्यांवर नानलांनी खूपच सूक्ष्म विचार मांडला आहे.

नानल म्हणतात की आयुर्वेदाला ॲन्शंट म्हटले जाते पण आयुर्वेद ॲन्शंट नसून नवा आहे. कारण ते एक ज्ञान आहे. ज्ञान कधीही जुने किंवा नवीन होऊ शकत नाही. ते नष्ट होत नाही म्हणूनच ते शाश्वत आहे, काल, स्थल निरपेक्ष आहे.

आयुर्वेदाचा अभ्यास करताना केवळ आयुर्वेदाचाच अभ्यास करून शास्त्रदष्टी मिळवावी. असे ते चरकाचा संदर्भ देऊन सांगतात. Under graduate अभ्यासक्रमापर्यंत आयुर्वेदाचेच आणि त्याच परिभाषेत शिकवावे. पदव्युत्तर शिक्षणकमात इतर ऐच्छिक वैद्यक त्या त्या विषयातील तज्ज्ञांमार्फ त शिकवावे. डॉक्टरेट, किंवा अतिविशिष्ट अभ्यासक्रमात तौलनिक अभ्यास, विषय, प्रयोग इ. शिकवावे. पण हे करताना आयुर्वेदाच्या मूल तत्वांशी कोणतीही तडजोड न करता, त्यांची मोडतोड न करता शिकवावे. (सं. – आ.प. मे ते सप्टें २००२; आयुर्वेदीय अध्यापन पद्धती)

आयुर्वेदातील संहिता संस्कृत मध्ये आहेत. त्यामुळे विषयार्थ नीट समजण्यासाठी संस्कृतचे ज्ञान आवश्यक आहे. केवळ भाषांतरावर आयुर्वेद शिकू नये.

अभ्यासासाठी अध्ययनासाठी असणाऱ्या ६ वेदांगांचा अभ्यास आवश्यक आहे कारण आयुर्वेद हा अथर्ववेदाचा उपवेद आहे. ही षडंगे १) शिक्षा-वर्णोच्चार विषयक शास्त्र, २) कल्प – धर्मविधी शिक्षण, ३)

व्याकरण - शब्दानुशासन आणि शब्दशास्त्र, ४) निरूक्त-वैद्यक शब्द, विवरण ग्रंथ ५) छंद - काव्यवृत्त शास्त्र ६) ज्योतिष

या षडांगांच्या अभ्यासाने संधी विग्रह करणे, शब्दांचा अर्थ समजणे, सूत्रे पाठ होणे या गोष्टी सुलभ होतात

अध्यापक कसा असावा याचेही विवेचन ते करतात.

सदर लेखात त्यांनी अध्यापकाचे प्रकार सांगितले आहे.

१. १) वैदीक - केवळ मंत्रोच्चार करणारे

२) मिमांसक - शब्द व अर्थ दोहोंचे विवरण करणारे

२. विष्णुस्मृतीनुसार

१) आचार्य - षडांगाच्या सहाय्याने वेद शिकवण्याची क्षमता असणारे

२) उपाध्याय - केवळ विषयाचे अध्यापन करणारे.

संपूर्ण महाराष्ट्रात एकसूत्रता येण्यासाठी आध्यापनाची समान पद्धती ठेवावी. यासाठी चरकोक्त अध्यापन शैली वापरावी असे ते म्हणतात. पाठ्यपुस्तकांची रचना कशी असावी या संदर्भातही त्यांनी मार्गदर्शन केलेले आढळते.

विषय शिकवताना १) शब्दश: २) अर्थत: ३) अर्थ अवयवत: अशा पद्धतीने शिकवावे. अध्यापन साधनांचा वापरही अध्यापकांनी करावा असे ते म्हणतात. उद्धा. प्रात्याक्षिक, चित्र तत्वे, आलेख, आकृत्या प्रतिकृती इ. आधुनिक साधनांचा वापर करण्यास हरकत नसावी. उद्धा. दृक्श्राव्य, श्राव्य, संगणक इ.

महाराष्ट्रात काही वैद्यांनी केलेल्या प्रयोगांचा उल्लेखही ते येथे करतात. पण असे प्रयत्न जर विद्यापीठ स्तरावर झाले तर अनेक विद्यार्थ्यांना याचा लाभ सतत मिळत राहील अशी सूचनाही त्यांनी येथे केली आहे.

अध्यापन हा विषय स्वत:चे पांडीत्य दाखविण्यासाठी नाही तर भावी पिढ्यामध्ये ज्ञानसक्रमण, प्रेरणा, आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासात रूची उत्पन्न होईल व ज्ञान अधिक सुस्पष्ट होईल अशा पद्धतीने अध्यापन करावे. या सहच अध्यापकांच्या समस्याही सोडवल्या गेल्या पाहिजे. त्यांचा दर्जा उंचावला जावा यासाठी त्यांच्या संपर्कबैठका, कार्यशाळा यांचे आयोजन करावे. (सं. - आ.प. सप्टें. ८१; परिभाषा निश्चिती एक प्राथमिक आवश्यकता)

## परिभाषा संदर्भात :

सध्याची परिभाषा खूपच भोंगळ किंवा कुरूप झाली आहे अशी टिका ते येथे करतात. परिभाषा शिकताना पूर्ण आयुर्वेदीय शास्त्राने, व्याकरण निरूक्त शब्दकोश, शिक्षा, भाषाशास्त्रीय नियम, तंत्रयुक्ती या पध्दतींनी अभ्यासावे. येथे त्यांनी व्याधीसमत्व या परिभाषेचे उदाहरण दिले आहे. सध्या व्याधीक्षमत्व म्हणजे व्याधी प्रतिकार प्रदर्शक किंवा immunity या संदर्भात वापरला जातो. परंतु शास्त्राच्या आधाराने शोधले तर याचा अर्थ व्याधी सहन करण्याचे सामर्थ्य असा येतो. (Immunity) आध्यापनासाठी स्वत: अध्ययन करणे हे गरजेचे आहे आणि मुक्त शिक्षकाला आयुर्वेद येणे आवश्यक आहे.

शास्त्रात एकाच अर्थाचे अनेक शब्द तसेच अनेक अर्थदर्शक एकच शब्द मिळतील तसेच शब्दाचे अर्थ, भाषा व्याकरण इ. देश आनुषंगाने बदलतात पण स्वतंत्र सिद्धांताप्रमाणे या शब्दांचा विचार करसे आवश्यक आहे. असे मत त्यांनी मांडलेले आहे. परिभाषेच्या विकृत ज्ञानामुळे असंख्य दुष्परिणाम होऊ शकतात कारण परिभाषा ज्ञान हे शास्त्रज्ञानाचे आत्मलक्षण आहे. (सं. – आ.प. मे २००२ ते सप्टे. २००२; आयुर्वेदीय अभ्यासपद्धती)

## आयुर्वेद विद्यापीठ संदर्भात :

याच्या स्थापने बाबत ते म्हणतात की, या बातमीने आनंद व चिंता दोन्ही निर्माण झाले आहे असे येथे ते म्हणतात. शासनाचे पाठबळ किंवा आशिर्वाद मिळाल्यास अनेक चांगल्या योजना किंवा बदल घडू शकतात म्हणून आनंद वाटतो. परंतु सध्या अस्तित्वात असलेल्या बनारस हिंदु युनिवर्सीटी, गुजरात आयुर्वेद युनिवर्सिटी, मुंबई, पुणे, जयपूर इ. ठिकाणच्या विद्यापीठांची आजची अवस्था पाहून चिंता वाटते असे ते म्हणतात. या निमित्ताने काही अपेक्षाही त्यांनी व्यक्त केल्या आहेत. उदा.

१. आयुर्वेद, होमियोपॅथी, सिध्द इ.साठी स्वयंपूर्ण विभाग असावा.

२. अध्यापकांनी अध्यापन करसे करावे ही कला शिकवावी.

३. शैक्षणिक साधनेची निर्मिती व्हावी. राजकारण व विद्यापीठ यांचा संबंध नसावा. (सं. – आ.प. एप्रिल १८; आयुर्वेद विद्यापीठा बाबत आमच्या अपेक्षा)

## आयुर्वेदातील वैशिष्ट्यपूर्ण सिद्धांत संदर्भात :

या बाबत ते म्हणतात की आयुर्वेद हे उत्पत्ती कालाच्या संदर्भात जरी प्राचीन असले तरी उपयोगीतेच्या बाबतीत नवीन आहे. संशोधक कसा असावा, त्याचे निकष कोणते असावे याबाबत आयुर्वेदाने पूर्ण मार्गदर्शन केले आहे. आजच्या संशोधकांना काही आयुर्वेदीय सिध्दांत नवे वाटणार त्याचेच विवेचन त्यांनी या लेखात लिहिले आहे. उदा. –

१. काही विशिष्ट गोष्टींच्या सापेक्षतेने शरिर घटकांचे गुणधर्म बदलतात. वय सापेक्ष, तसेच दिवस रात्र इ आणि भोजन काल सापेक्ष त्रिदोष विचार. हा विचार इतर कोणत्याही शास्त्राने मांडला नाही.

२. औषधीकाल सिध्दांत – विशिष्ट कालात दिले जाणारे औषध विशिष्ट भागांवर परिणाम करते. तसेच कोणत्या अवयवांचे कार्य कोणत्या वेळी जास्त किंवा कमी असते हा विचार आयुर्वेदानेच केला आहे.

३. प्रतिशरीर पदार्थ कसे वापरावे हा विचार प्रत्येक पदार्थ हा शरीर सापेक्षतेने वापरला जाणे हा अनिवार्य आहे. उदा.पाणी घेताना – १. प्रकृती कोणती २. धातुसारता ३. अग्नि ४. ऋतु ५. दिवस–रात्रीपैकी कोणती वेळ ६. बल ७. वजन ८. आहार ९. सवय १०. रोगी / निरोगी या १० गोष्टी माहिती असल्याशिवाय निर्णय घेऊ नये.

४. संस्कारांनी गुण बदलतात – औषध, आहार, व्यायाम, क्रिडा, प्रकाररूपी संस्कार इ. गुणांनी शरीराचे गुण बदलतात.

५. प्रदुषणाचे विचार – एअर पोल्युशन किंव वॉटर पोल्यूशनच्या पुढे जाऊन प्रदेश व काल यांचेही प्रदुषण सुरू झालेले आहे.

६. मासानुमासिक गर्भवृध्दी मानसभाव – (शरीराची गर्भनिर्मिती गर्भावस्थेत कशी होते ही प्रक्रिया आजच्या शास्त्रज्ञांना माहित आहे. परंतु) मानस भावांची निर्मिती कोणत्या क्रमाने होते हे आयुर्वेदाने दिले आहे. चौथ्या महिन्यात मन, पाचव्यात प्रव्यक्ततर, सहाव्यात बुध्दी प्रकट होते.

७. शरीर घटकांच्या वाढीशी, स्वास्थ्याचा मनाशी जवळचा संबंध असतो. उदा.मांसधातू उत्तम दर्जाचा असेल तर मन क्षमाशील असते.

८. आहार व मनाचा संबंध – आपण घेत असलेल्या आहाराचा मनावर परिणाम होतो हे प्रत्यक्ष रितीने मोजता येते.

९. वेगांचे धारण – उदीरण करू नये. १३ वेगांच्या रोखण्याने अनेक रोग उत्पन्न होतात, हा विचार आधुनिकांना संपूर्णतः नवा आहे.

१०. बुभुक्षित पारद – बुभुक्षित म्हणजे भुकेलेला. पा–यावर विशिष्ठ संस्कार केले व त्यात सोने घालून खल केले तर सुवर्ण नष्ट होते व पारा तेवढाच शिल्लक राहातो. त्याचे वजन वाढत नाही. हा नवा भाग सांगितला आहे.

११. धातूंवर संस्कार केल्याने त्याचे स्वरूप बदलते परंतु रसायनशास्त्रदृष्टया मात्र फरक पडत नाही. उदा.तांब्याच्या कडक पत्र्यावर संस्कार केल्यावर ते हाताने फोडू शकतो पण रसायनशास्त्र दृष्टया काहीही फरक पडत नाही.

१२. वनस्पती व पारा – काही वनस्पतींवर पा–याचे विशिष्ठ संस्कार केले तर त्या वनस्पतींचे गुणधर्म उत्कट होतात, वाढ दुप्पट होते, उपयोगितेत खूप वाढ होते.

१३. द्रावण संस्कार (द्रुति) – अभ्रक, गंधक, हिरा इ. वस्तूंवर विशिष्ट संस्कार करून त्यांची द्रुति बनविणे व त्यांना द्रव करणे व सदर द्रव कोणत्याही तपमानास द्रवच राहाणे हा विशिष्ठ भाग नवाच आहे.

अशी जवळपास डझनभर उदाहरणे त्यांनी दिलेली आहेत. या प्रकारचे सिध्दांत वैचारिक मंथनासाठी आवश्यक आहेत असे ते म्हणतात. (सं. – आ.प. ऑक्टोबर १९८८; आयुर्वेदातील नवा प्रवाह)

**प्रतिक्रीया –** आयुर्वेदावरील आरोपाला त्वरीत व परखड देण्याची वृत्ती आणि आयुर्वेदाभिमान त्यांच्या लेखनात दिसतो. १५ डिसेंबरच्या अंकात वैद्य श्री. वारे यांच्या आयुर्वेद संशोधन या लेखावर काही परखड प्रतिक्रिया प्रश्नांच्या स्वरूपात मांडल्या आहेत. आयुर्वेदीय संशोधन म्हणजे शास्त्रीय स्तर उंचावण्यासाठी केलेली मिमांसा या वारे यांच्या वक्तव्यावर नानल म्हणतात की याचा अर्थ आयुर्वेद शास्त्रहीन स्तराचे आहे का ? मिमांसा म्हणजे नेमके काय म्हणायचे आहे ? लिहिलेल्या प्रत्येक शब्दाची योजना आवश्यक असल्यासच करावी. भाषा अलंकारीक करण्यासाठी उगीच शब्द वापरू नये असे ते म्हणतात. त्यांच्या अनेक विधानांचे त्यांनी खंडण केलेले आहे. आयुर्वेदाला कमी दर्जाचे, हिन, अपूर्ण असे शब्द त्यांना मान्य नाही यातून त्यांची आयुर्वेदाबद्दलची जाज्वल्य आयुर्वेद निष्ठा दिसून येते. (सं. – आ.प. ऑक्टोबर ८५; संशोधकांना अनावृत्त प्रश्न)

## आयुर्वेद प्रचार–प्रसार आणि नियतकालिकांची भुमिका संदर्भात :

आयुर्वेद जर जनमानसांपर्यंत तळागाळापर्यंत पोहवायचा असेल तर त्याचे संस्कार शालेय जीवनातच

होणे आवश्यक आहे. शालेय शिक्षणात याचा अंतर्भाव कसा करावा व त्याचे महत्व सांगीतले आहे.

सध्याच्या पाठयपुस्तकांमध्ये आयुर्वेद शास्त्राचा विचार अजिबात केला गेला नाही याची बोच ते व्यक्त करतात.

शालेय शिक्षणात आयुर्वेदाचा अंतर्भाव केल्याने खेडयातील लोकांनाही स्वास्थसेवेचे ज्ञान सोप्या भाषेत मिळेल. रोगाचे प्राथमिक निदान व चिकित्सेसाठी स्वावलंबीत्व मिळेल. यासाठी प्रयोगशाळा, साहित्याच्या वाढीव खर्चाची पण आवश्यकता नाही. तसेच स्थानिक औषधांच्या सहाय्याने कौटूंबिक स्वास्थ ही कल्पना पूर्णत्वास येऊ शकते. हींच मुले पुढे प्राथमिक आरोग्य केंद्र चालवू शकतील, अध्यापकांना मदत करू शकतील. आयुर्वेद म्हणजे केवळ चिकित्सापध्दती नाही तर जीवनपध्दती प्रणाली आहे. त्यामुळे याचेही संस्कार मुलांवर घडतील.

शालेय शिक्षणात आयुर्वेदाचे शिक्षण कशा पध्दतीने व्हावे याविषयी सूक्ष्म विचार त्यांनी येथे केलेला दिसतो. उदा.आयुर्वेदाचे सिध्दांत इयत्ता तिसरी ते पाचवीपर्यंत सोपे नियम व वाक्याच्या स्वरूपात शिकवावे. व वरच्या वर्गामध्ये हेच सिध्दांत विस्तृत रूपात शिकवावे. उदा.पांचभौतिक सिध्दांत, द्रव्य गुण विचार, आहारविधी, सोप्या औषधींचे निर्माण उदा.स्वरसादी, दिनचर्या, दोष-धातू-मल विज्ञान, विशिष्ट आहार द्रव्य भात इ.ची माहिती, कढण, पेज यांची कृती, स्नान, निद्रा अभ्यंग विचार, सद्‌वृत ऋतुचर्या, दिनचर्या इ.

शालेय शिक्षण संपन्न करण्यासाठी आयुर्वेद सिध्द आहे असे ते येथे म्हणतात. राष्ट्रीय शिक्षण धोरण ठरविणा-यांनी याचा अधिक विचार करावा. अशी इच्छा ते व्यक्त करतात. (सं. - आ.प. फेब्रुवारी १९९६ शालेय अभ्यास क्रमांत आयुर्वेद)

एकंदर आयुर्वेदाबद्दलची तळमळ व त्यादृष्टीने केलेले चिंतन व मनन या लेखमालेत आढळते.

सदर लेखात आयुर्वेदाचा प्रसार कसा होऊ शकतो म्हणजे देश, विदेश, प्रदेश, व्यवहारात तसेच नियतकालिकांच्या भूमिकेचा विचार करतांना लेख, लेखक, लेखन वैशिष्ट्य, संपादन, लेख नियंत्रण इ. मुद्यांचे विवेचन केले आहे.

प्रत्येक विश्वविद्यालय, महाविद्यालय, संस्था किंवा वैयक्तीक स्तरावर नियतकालिके काढली गेली पाहिजे आणि ते एकमेव आयुर्वेद ज्ञानाने भरलेली व भारलेली असली पाहिजे अशी इच्छा ते येथे व्यक्त करतात.

परंतु विविध वृत्तपत्रातून आयुर्वेदावर होणाऱ्या टिकेला सडेतोड उत्तर या लेखाच्या माध्यमातून दिलेले आहे. संबंधित वृत्तपत्र मालक किंवा संपादकांना असल्या प्रसिध्दीसाठी ही माध्यमे वापरण्याची बुध्दी न होवो असे उपहासाने ते येथे म्हणतात. क्षुद्र बुध्दीचे लेखक किंवा स्वतात प्रसिध्दीसाठी हे केले जात आहे. ही आयुर्वेदाची बदनामी तर आहेच तसेच त्याच्या स्वातंत्र्यावर आक्रमण आहे असे ते म्हणतात. आणि आपल्या शास्त्राचे स्वातंत्र्य त्याच्या अभ्यासकांनीच जपले पाहिजे असे ते म्हणतात. (सं. - आ.प. जानेवारी २००२; आयुर्वेदाला स्वांतत्र्य हवेच)

नानलांची आरोग्य विषयक बातम्यांचा वेध घेण्याची प्रवृत्ती आढळते. तसेच त्याचा आयुर्वेदाशी संबंध लावणे व त्याचा सतत चिंतन, मनन करण्याची वृत्तीही आढळते. ब्रिटीश मानस शास्त्रज्ञाने मेंदूच्या कार्या विषयी केलेल्या परिक्षणाची बातमी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली होती. त्यावर आपलेमत त्यांनी मांडले आहे. मेंदूचे

दोन्ही भाग आपापल्या परिने कोणत्याही पद्धतीने स्वंतत्र काम करण्यास कार्यक्षम असतात असे त्यांनी दाखविले आहे. येथे नानल म्हणतात की शरिराचे नियंत्रण करणारा वायू आहे, मेंदू नव्हे. त्यामुळे मेंदूच्या कार्यात जरी बिघाड झाला किंवा त्यातला काही भाग काढून टाकला तरी जोपर्यंत वायु सम आहे तोवर सर्व क्रिया प्राकृत होणार. त्यामुळे हा सिद्धांत आयुर्वेदाच्या दृष्टीने नवीन नाही. मेंदू येथे फक्त आश्रयदाता आहे कर्ता नाही. आयुर्वेदीय दोष, धातू विकल्पना जर स्पष्ट असेल तर आयुर्वेदाचा अभिमान नक्कीच वाढू शकतो हेही यातून स्पष्ट होते. पाश्चात्य वैद्यकाची अभ्यासाची पद्धत मात्र योग्य आहे असे ते म्हणतात. म्हणून त्यांची अभ्यासपद्धती व आयुर्वेदाचे ज्ञान असा समन्वय करून अभ्यास करावा आणि त्यांच्या नोंदी प्रत्येक वैद्याने ठेवाव्या. म्हणजे आयुर्वेदाला शास्त्र नाही म्हणून होणाऱ्या मताचे किंवा आरोपाचे खंडण निश्चितच करता येईल. (सं. – आ.प. ऑक्टोबर १९८२; वाचा व विचार करा)

## आयुर्वेद पत्रिका आणि नानल

पत्रिका आणि नानल यांचा संबंध खूप जुना आहे. आयुर्वेद पत्रिकेमुळेच मी लेखक बनलो असे अनेक ठिकाणी त्यांनी उद्धृतही केले आहे. पत्रिकेच्या माध्यमातून त्यांचा पत्रव्यवहार, प्रतिक्रिया, मनोगत, आणि इतर वैद्यांना केलेले आवाहन या स्वरूपात लेखन आढळते. आयुर्वेद पत्रिकेचे हितचिंतक अशी त्यांची प्रतिमा यातून आढळते ऑगस्ट १९८६ मध्ये जुलै १९८६ च्या अंकाची प्रतिक्रिया ''वाचकांच्या प्रतिक्रिया'' या सदराखाली आली आहे. सदर लेखात त्यांनी सदर अंकांचे वैविध्यपूर्ण आणि वाचनीय अंक म्हणून तत्परतेने प्रतिक्रिया वाढविलेली आढळते. यातील प्रत्येक लेखावर, लेखकावर, प्रत्येक लेखकाच्या लेखाचे विवेचन त्यांनी केलेले आढळते. यासहच स्वत:चे काही अनुभवही त्यांनी सांगितले आहेत. उदा. अण्णा करमरकरांच्या स्वेद या लेखासंबंधी लिहितांना तळहात आणि पायावर जास्त घाम येत असेल तर बोरीच्या पानांचा लेप रात्री मेंदीप्रमाणे लावून ठेवावा.

सूवर्णमहोत्सवा निमित्त मनोगत त्यांनी व्यक्त केलेले आहे. येथे ते आयुर्वेद पत्रिका ही आयुर्वेद आणि पत्रकारीता याचा सजीव पुरावा आहे असा गौरव करतात. त्यांच्या स्वत:च्या संग्रहात १९७०,७१ पासूनचे अंक संकलित आहेत अशी माहितीही ते देतात. आयुर्वेद पत्रिकेच्या इतिहासाचा आढावाही त्यांनी येथे घेतला आहे. तसेच आयुर्वेद पत्रिकेतील ऐतिहासीक घटनांची महत्त्वपूर्ण नोंद असल्याने इतिहासकारांच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे कारण त्यामुळे तत्कालीन इतिहासाचे ज्ञान होते. तसेच त्याकाळच्या आणि आजच्या समस्यांचाही तुलनात्मक अभ्यास करता येतो.

वैद्य वि. म. गोगटे, वैद्य करमरकर, वैद्य पंडित आणि वैद्य कुलकर्णी या संपादकांबद्दल आणि त्यांच्या वैशिष्ट्याबद्दलही त्यांनी विवेचन केले आहे. पत्रिकेकडून विविध अपेक्षाही ते व्यक्त करतात. उदा. नवीन लेखक तयार करणे, वैद्यकीय परंपरांचा परिचय करून देणे, संशोधनासाठी व्यासपीठ उपलब्ध करणे इ.

## आयुर्वेद आणि योग संदर्भात :

आयुर्वेद आणि योग यांच्या एकत्रीकरणाच्या संदर्भात ठिकठिकाणी येणारे लेख तसेच मुख्यत: आयुर्वेदीय अभ्यासक्रमात अनिवार्य विषय म्हणून केलेल्या योगाचा समावेश याला विरोध करणारे अभ्यासपूर्ण लेख त्यांनी लिहिले आहेत.

पहिल्या लेखात ते आजकाल प्रचलित असलेल्या योग पद्धतीवर टिका करतात. उदा. रोगानुसार आसनांचा कोर्स देणे. यासाठी ग्रांथिक संदर्भ आहे का ? याची विचारणाही ते करतात. यासाठी त्यांनी काही प्रश्नही मांडले आहेत. उदा.

१) योग आणि आयुर्वेद प्रणालीत काही साम्य किंवा वैष्यम्य आहे का ?

२) योगासने कशा पद्धतीने रोग बरे करतात ?

३) योगाने संप्राप्ती भेद कसा होतो ?

४) दोष, धातू, मल, उपधातू इ. वर किंवा त्यांच्या वृद्धी क्षयात्मक अवल्योवर काय प्रभाव करतात ?

या प्रश्नांची उत्तरे अनिवार्य आहेत. अन्यथा विद्यार्थ्यांच्या मनात कायम अज्ञान राहील जे योग्य नाही.

फेब्रुवारी १९८६ मध्ये त्यांनी योग आणि आयुर्वेद यातील विरोधाभास दाखविणारी तत्वे, उदाहरणे व स्पष्टीकरण देऊन मांडली आहे. विश्वास मंडलीक यांच्या ''योग परिचय'' या पुस्तकावरील काही विधानांवर तसेच त्यातील करंबळेकरांची प्रस्तावना यावर कडाडून टिका केलेली आहे. उदा.

१) निद्रा – योगात निरोधन करण्यासाठी चित्ताची वृत्ती आहे तर आयुर्वेदात निद्रा हा अधारनीय वेग आहे.

२) इच्छा, द्वेष, राग टाकले पाहिजेत असे योग म्हणतो. परंतु चिकित्सेच्या दृष्टीने इच्छा आणि राग या महत्त्वाच्या आहेत.

३) प्राणापानामध्ये श्वसनाचे उदीरण व धारण केले जाते. या गोष्टी शरिरास विकृत करतात.

४) दाहायमांपैकी ब्रह्मचर्य योगामध्ये अपेक्षीत आहे परंतु आयुर्वेदाला पूर्ण ब्रह्मचर्य मान्य नाही.

५) आयुर्वेदात न पिडेदिनद्रियानी.... पण योगामध्ये त्राटक आणि मूलबंध हा त्या त्या इंद्रीयांचा मिथ्यायोग आहे. खरतर इतर शास्त्रांचा अभ्यास करण्यापूर्वी आपले शास्त्र पूर्ण अभ्यासणे आवश्यक आहे. समकालीन शास्त्राचा अभ्यास हा जर उद्देश असेल तर संगीत, अश्व आयुर्वेद, वृक्ष आयुर्वेद, गज आयुर्वेद यांचा समावेश का करू नये ? असा खडा सवाल ते करतात.

सदर प्रश्नांविषयी मे १९८६ च्या अंकात वैद्य भा. वि. साठ्ये, वैद्य काळे, वैद्य जायदे यांनी उत्तरे दिलेली आहेत. या लेखांना उत्तर म्हणून जुलै १९८६ मध्ये त्यांनी लेख लिहीला आहे. वरिल वैद्यांच्या उत्तरांनी माझे समाधान झालेले नाही असे ते स्पष्टपणे ते येथे नमुद करतात.

१) अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यासाठी केवळ प्राचीनत्व हा निकष असू शकत नाही.

२) शिक्षणकालामध्ये आयुर्वेदावरील श्रद्धा दृढ होईल व त्याबद्दल अनादर निर्माण करणाऱ्या गोष्टी त्यात घालू नयेत.

३) आयुर्वेदाची बैठक योग आणि सांख्य यावर बसविलेली आहे या काळे यांच्या विधानावरही ते टिका करतात.

या वैद्यत्रयिबद्दल मनात पूर्ण आदर असून ''वादेवादे जायते तत्व बोधा'' या नियमाप्रमाणे मी माझे मतभेद मांडले आहेत अशी भावनाही ते शेवटी व्यक्त करतात.

**व्यक्ती विशेष लेखन :**

वैद्य भा. पू. नानल यांनी नवीनच आयुर्वेदीय व्यवसाय करणाऱ्यांनसाठी वैद्यराज बागेवाडीकर यांच्या वरील लेख लिहिला आहे.

सदर लेखात त्यांनी बागेवाडीकरांची वैशिष्ट्ये उदा. चिकाटी, शास्त्रावरील निष्ठा, अपार परिश्रमी अशी वेशिष्ट्ये सांगितली आहेत. ''माझी चिकित्सा'' या शास्त्रींच्या पुस्तकाचा उल्लेखही त्यांनी येथे केला आहे. त्यांच्या मुलांना घटसर्प झाल्यावर इतर औषधे न वापरता गंधक द्रुति सारख्या कल्पाचा उपयोग केल्याचे ते नमुद करतात. रसायन कल्पांवर व स्वत: औषधे बनविण्यावर त्यांचा भर असल्याचे ते नमूद करतात.

सप्टेंबर १९८७ मध्ये अण्णा गोगटे यांच्या निधनानंतर ''मला समजलेले कै. वि. म. उर्फ अण्णासाहेब गोगटे'' हा लेख र.म. नानलांनी लिहिला आहे. लेखाची सुरूवात श्लोका ने केलेली आढळते. वि. म. गोगटेंशी त्यांचा परिचय कसा झाला ?, त्यांच्या लेखनातील वैशिष्ट्ये, व्यक्ती विशेष, त्यांनी यात वर्णन केले आहे. त्यांच्या लेखनात शाब्दीक कोट्या, अर्थबोधक दृष्टांत, सारांश मांडणे, मूळ विषयाला बाधा न आणता नवीन कल्पना मांडणे, मूळ विषयाला बाधा न आणता नवीन कल्पना मांडणे, उत्कृष्ट संकलन, इ. वैशिष्ट्ये होती असे ते म्हणतात. उत्तम रितीने काम करण्याची वृत्ती, पद्धतशीरपणा, अफाट वाचन, मैत्रीपरत्व अतिथ्यशील, आणि दुसऱ्यांना प्रेरणा देणे ही व्यक्ती वैशिष्ट्ये ते सांगतात. ते प्रात:स्मरणीय असल्याचा उल्लेखही ते आवर्जून करतात.

मार्च १९९१ मध्ये ''माझे लेले मास्तर'' हा लेख आहे. सदर लेखाची सुरूवातही श्लोकाने केली असून मधे-मधे ओवींचा वापर केला आहे. त्यांच्याकडे प्रत्यक्ष त्यांनी शिक्षण घेतले नसले तरी त्यांच्या सहवासात खूप शिकलो असे ते म्हणतात. त्यांच्या बरोबर आलेल्या अनुभवांचे वर्णन त्यांनी येथे केलेले आहे. त्यांची मुद्दे मांडण्याची शैली, मतमतांतरे व्यक्त करण्याचीही स्वयंपूर्ण पद्धती, नम्रता, सहकार्य करण्याची वृत्ती या वैशिष्टयाचा उल्लेखही ते करतात. लेले मास्तरही प्रात: स्मरणीय आहे असे ते म्हणतात.

जुलै १९९४ मध्ये आयुर्वेदाचार्य ''श्री. कृ. करमरकर सात्विक व्यक्तीमत्व व लेखक'' हा लेख आहे. यात अण्णांची वैशिष्ठ्ये सांगून विस्तारपूर्वक सोदाहरण विवेचन केले आहे. उदा. सात्विक गुण व त्या अनुषंगाने येणारे, निद्राप्रबोधन, प्रकाशक, शुचिता, आस्तिक्य, वेदाभ्यास, गुरूपूजन महोत्साह या गुणांचे वर्णनही ते करतात. अण्णांशी त्यांचा परिचय कसा झाला, त्यांची लेखनशैली यावरही ते भाष्य करतात. करमरकरांचे गुरू वेणी माधवशास्त्री होते हा उल्लेखही यात आढळतो.

लेखकाचे व्यक्तीमत्व त्यांच्या लेखनातून प्रकट होते असे ते म्हणतात. लेखनाच्या संदर्भात मानस प्रकृतीचां विचार अधिक महत्वाचा आहे असे दिसते.

व्यक्ती विषयक लेखन करताना नानलांची त्या व्यक्तीतील गुण विशेष शोधण्याची वृत्ती आढळते. तसेच त्यांच्याबद्दलचा आदरही व्यक्त होतो.

✲❖✲❖✲

# ५ निरिक्षणे (Observation)

## वै. वेणीमाधव शास्त्री परंपरा

✳ **लेखन वैशिष्ट्ये**

वेणीमाधव शास्त्रींच्या लेखनात अनेक विध आशयांचा, विषयांचा समावेश आढळतो.

या सर्व विषयांच्या मांडणीतही विशिष्ट तंत्र आढळते.

✳ विषय स्पष्ट करतांना, समजावून सांगतांना निसर्गातील उदाहरणे, वर्णने आढळतात. त्यांच्यातील कवित्व येथे जाणवते तसेच निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण करण्याची वृत्तीही आढळते.

✳ शास्त्रातील संदर्भ, ग्रंथांचा संदर्भ देऊन विषय स्पष्टीकरण केलेले आहे.

✳ संदर्भ ग्रंथ म्हणून चरक, सुश्रुत, वाग्भट, चक्रदत्त, अथर्ववेद, इ. चा उल्लेख आढळतो.

✳ आयुर्वेदातील अनेक अस्पष्ट किंवा घूसर कल्पना अधिक स्पष्टपणे व नेमक्या उलगडून दाखविल्या आहेत. यासाठी ठिकठिकाणी उपमा दिलेल्या आहेत.

✳ शास्त्रातील अनेक परिभाषांचा अर्थ, त्या मागील विचार अधिक स्पष्ट करून सांगितला आहे.

✳ काही नवीन परिभाषाही प्रचलित केली आहे.

✳ नवीन श्लोकांची, नवीन कविता/प्रार्थनेची रचना केली आहे.

✳ विशिष्ट विषयानुसार लेखमाला लिहली आहे.

✳ लेखाची मांडणी तक्ता स्वरूपात प्रश्नोत्तर स्वरूपात, व्याख्यान स्वरूपात, शंकाची उत्तरे या स्वरूपात आढळते.

✳ सामान्य जनांसाठी रुग्णकथा, आयुर्वेदोपदेश या शैलीत वृत्तपत्रे व मासिकातून लेखन आढळते.

✳ **चिकित्सादृष्टी**

✳ हेतूंचा विचार करतांना गुणविचाराला प्राधान्य दिले आहे.

✳ पांचभौतिक व त्रिदोष सिद्धांताला महत्त्व दिले आहे.

✳ संप्राप्तीमध्ये वायूला कारणीभूत मानले आहे.

✳ चिकित्समध्ये धातूविचाराला महत्त्व दिले आहे.

✳ अनुक्त व्याधींचे निदानपंचक कसे ठरवावे याविषयी विवेचन केले आहे.

✳ चरकोक्त चिकित्सा सूत्रांचा प्रभाव चिकित्सेत आढळतो.

✳ व्याधी स्थान विचाराला महत्त्व दिले आहे.

✳ अनेक अनुभूत चिकित्सायोग आढळतात.

✳ पंचकर्मापैकी रक्तमोक्षणावर भर आढळतो. यासाठीही व्याधीस्थानाविचार प्रामुख्याने केला आहे.

✳ बस्तिसाठी नवीन कल्पांचा वापर केलेला आढळतो.

✳ कल्पस्थानातील सूत्राचा अर्थ वेगळ्या पद्धतीने विचार करून मांडला आहे. व्याधी अवस्थांचा विचार येथे केला आहे. उदा. (तत्रोत्क्लिष्टे समुत्क्लेषे....)

✳ औषधी कालाचे सूक्ष्म विवेचन व त्याचा प्रत्यक्ष वापर चिकित्सेत आढळतो.

✳ अनुपान विचारातही वैशिष्ट्य आढळते.

## वै. शुभदाताई वटवर्धन

✳ क्रियाशारीर विचारांवर वै. वेणीमाधव शास्त्रींचा प्रभाव आढळतो.

✳ स्थानविचाराला संप्राप्ती, चिकित्सा, अनुपान यांत महत्त्व दिले आहे.

✳ चिकित्सेत शोधन नंतर शमन हा क्रम आढळतो.

✳ कॅन्सर या अनुक्त व्याधीचे सविस्तर वर्णन केले आहे.

✳ विविध स्थानातील कॅन्सरची विस्तृत चिकित्सा वर्णन केली आहे. येथे परंपरेचे बृंहण झालेले आढळते.

✳ वैद्य. शुभदाताई पटवर्धन यांच्या चिकित्सेतही रक्तमोक्षणावर भर आहे.

✳ वै.वेणीमाधव शास्त्रींच्या वापरातील अनेक कल्प त्यांच्या चिकित्सेत आढळतात.

✳ ग्रंथातील सूत्रांचा वापर चिकित्सेत करतांना दिसतो व त्याची व्यवहार्यताही स्पष्ट केली आहे.

**वैद्य नानल परंपरा**

## ब) नानलांची लेखन वैशिष्ट्ये

**वैद्य म.पु.नानल :** यांची भाषा अतिशय साधी, सोपी, सामान्यांनाही सहज समजेल अशी आहे. त्यांनी वर्णिलेल्या औषधी योगातील द्रव्यांना – गुणधर्मांना ग्रंथोक्त संदर्भ दिलेले आढळतात. योगांच्या कार्याचे विस्तार पूर्वक विवेचन केलेले आढळते. औषधीकाल, किती दिवसपर्यंत औषध घ्यावयाचे तो काल, मात्रा, अनुपान यांचा स्पष्ट उल्लेख केलेला आढळतो.

**वैद्य रमेश नानल :** यांची भाषा सहज, सोपी सामान्यांना समजेल अशी आहे.

✳ विषय स्पष्ट करतांना ठिकठिकाणी उदाहरणे देऊन, वैशिष्ट्यपूर्ण विशेषणे देऊन तो स्पष्ट केला आहे.

✳ त्यांचे अनेक लेख हिंदीत आहेत. हिंदी भाषेवरील त्यांचे प्रभूत्व व लेखाचे राष्ट्रीयत्व यातून स्पष्ट होते.

✳ त्यांच्या लेखांचे शिर्षक वैशिष्ट्यपूर्ण आढळते.

✳ लेख लिहतांना प्रथम त्या विषयातील शब्दाची फोड करून, त्याची व्याख्या सांगून, संदर्भ, परिभाषा, प्रकार, गुण, कार्य या दृष्टीने क्रमवार विषय मांडणी आढळते.

✳ अनेक ठिकाणी तक्ता स्वरूपात मांडणी आढळते.

✳ लेख झाल्यावर त्यातील निरीक्षणे पुन्हा सारांश रूपाने मुद्दे स्वरूपात मांडलेली आढळतात.
विविध उपमा – वाक्प्रचार वापरलेले आढळतात.

✳ लेखनात विषयांची विविधता आढळते.

✳ औषधी प्रयोगांचे वर्णन करतांना ठिकठिकाणी योग्य मात्रा, काल, अनुपान यांचे वर्णने केलेले दिसते.

✳ लेखनासाठी संदर्भ म्हणून अनेक ग्रंथांचे संदर्भ आढळतात.

✳ लेखनात विविध न्यायांचे संदर्भ ही आढळतात.

**चिकित्सा दृष्टी**

**वैद्य म.पु. नानल यांची चिकित्सादृष्टी :**

✳ आहार कल्पनेचा, पथ्याचा प्रभाव खूप आढळतो.

✳ दैवव्यपाश्रय चिकित्सा ही वापरीत असा अनुभव रमेश नानल सांगतात.

✳ 'नाभिप्रक्षेप' अनेक रूग्णांत वापरीत.

✳ चिकित्सेत सुगंधी अत्तरे, धूप, अगरबत्ती यांचा वापर आढळतो. त्यांच्या रूग्णतपासणी कक्षातही खसच्या अत्तराचा सुगंध असे.

**वैद्य भा.पु.नानल यांची चिकित्सादृष्टी :**

✳ अनशापोटी रूग्णपरीक्षा करीत. सविस्तर रूग्ण इतिहासपूर्वक परीक्षण करीत. जवळजवळ १ १/२ तास एका रूग्णाला लागे.

✳ प्रकृती विनिश्चय महत्त्वाचा मानीत. मानसप्रकृती ही तपासीत.

✳ दूष्य, देश या सूत्रानुसार परीक्षण करून व्याधी निश्चिती करीत.
पथ्यापथ्य अतिशय कडक असे.

✳ सारांचे वर्गिकरण उत्तमसार, मध्यमसार, हीनसार असे करीत.

✳ संप्राप्ती ठरवितांना दोष प्राधान्याला महत्त्व देत.

✳ वायूच्या गतीचा विचार करीत.

✳ चिकित्सा करतांना प्राधान्याने अग्निचिकित्सा करीत.

**वैद्य विलास नानल यांची चिकित्सा दृष्टी :**

✳ वैद्य विलास नानल यांच्या चिकित्सेत शोधन चिकित्सेचा वापर प्राधान्याने आढळतो.

✳ पंचकर्मापैकी वमन वासंतिक वमन स्वरूपात वापरले जाते.

✳ प्रत्येक रुग्णात विरेचन अनुलोमन, इ. स्वरूपात दिले जाते.

✳ संदर्भ ग्रंथ म्हणून चरक चा वापर प्राधान्याने केला जातो.

**औषधांमध्ये :**

✳ वैद्य म.पु.नानलांच्या परंपरेतील अर्क, सूक्ष्मौषधे, व इतर कल्प वापरले जातात.

✳ एकेरी औषधांचा वापर प्रामुख्याने करतात.

✳ क्षारांचा वापरही अधिक आहे. सतरा प्रकारचे क्षार वापरतात. कमलनाल क्षार तयार केला आहे. हा नवीन क्षार आहे.

✳ अनुक्त धातुंच्या भस्मांवर काम चालू

**व्याधी विशेषात –** हृद्रोग एडस् आणि संधीवातावर विशेष काम.

**वैद्य र.म. नानल यांची चिकित्सा दृष्टी :**

✳ औषधी द्रव्य आणि औषधी द्रव्य प्रयोगासाठी गुणविचार प्राधान्याने केला आहे.

* रोगनिढान करतानाही गुण विचार केला आहे.
* चरकातील संप्राप्तीविचार उच्चतम शास्त्रदृष्टीचा असल्याने त्यानुसार प्रामुख्याने विचार करतात.
* सामान्य संप्राप्ती व विकल्प संप्राप्तीचा विचार करतात.
* व्याधी कोणत्या क्रियाकालात आहे म्हणजे ढोष, धातु मलांची स्थिती काय आहे ? अधिष्ठान कोणते आहे ? उढा. स्त्रोतस किंवा अवयव आहे. आणि आहार विहारज हेतू यांचा विचार करतात.
* प्रत्येक लक्षणाच्या कारण संप्राप्तीचा विचार करतात.
* संप्राप्तीमधील अंशांश विकल्पना स्पष्ट होण्यासाठी प्रामुख्याने प्रश्न परिक्षा करतात.
* संप्राप्ती विचारात ढोषप्राधान्य, ढूष्यढोष विकल्पना, मार्ग – उत्पत्तीमार्ग व संचारमार्ग यांचा विचार केला आहे.
* औषधी द्रव्याची निवड लक्षणांची विकल्पना लक्षात घेऊन करतात.
* औषधीमध्ये बहुविध कल्पनांचा वापर करतात. उढा. स्वरस, चूर्ण, वटी, अर्क, अवलेह, द्राव, सिध्दतैल, घृत, लेप, सूक्ष्म औषधी, काढा, क्षार, इ.
* अनुक्त द्रव्यांचा अभ्यास कसा करावा. या विषयी मार्गदर्शन केले आहे.
* अनुक्त व्याधींची चिकित्सा व चिकित्सा सुत्र कसे ठरवावे या विषयी मार्गदर्शन केले आहे.
* अनेक पारंपारिक कल्प चिकित्सेत वापरतात.
* औषधी मात्रा विचार वैशिष्टयपूर्ण आढळतो. यासाठी ते ''मात्रा कालाश्रयोयुक्ती ज्ञानं भैषज्य अमृतायते'' असे सूत्र सांगतात.
* वेणीमाधवांचा वैद्य रमेश नानलांवर काही गोष्टीत प्रभाव आढळतो. उढा. सारासारत्व विचार, प्रत्येक शब्दाची फोड करून अर्थ स्पष्ट करणे, सृष्टी निरीक्षण, त्या संदर्भातील ज्ञानाचे योग, सूक्ष्म विकल्पना पध्दती, अर्थ निर्णय पध्ढती, आलेल्या अनुभवाला शास्त्राचे रूप ढेणे – दृष्टान्त ढेणे इ.

## एका दृष्टी क्षेपात :

**निदान :**

| | |
|---|---|
| वैद्य म.पु. नानल | – ढोषप्रधान विचाराने निढान निश्चिती. उढा. वातज, कफज, इ. |
| वैद्य भा.पु. नानल | – ढोषप्रधान विचार. |
| वैद्य विलास नानल | – ढोषविकल्पना, संप्राप्ती सूक्ष्मविकल्पना, याप्रमाणे |
| वैद्य र.म. नानल | – आवृतत्व, गतत्व, धातूविचार, अवयवविचार करून निढान निश्चिती.<br>उढा. अग्निमांद्य – यकृतमांद्यज/ग्रहणीढौर्बल्यज. |

**संदर्भ ग्रंथ :**

वैद्य मधुसुदन नानल – भा.प्र. मा. नि.,शोढल निंघटू, गढनिग्रह.

वैद्य रमेश म. नानल – गढनिग्रह, भावप्रकाश.

कॉलेज अभ्यासाठी फक्त वाग्भट तर प्रॅक्टीस मध्ये फक्त चरक इतर नाही असे रमेश नानल म्हणतात.

वैद्य विलास नानल – चरक

**रूग्णपरिक्षा :**

| | |
|---|---|
| वैद्य भा.पू. नानल | – अनशापोटी रूग्णपरीक्षा, नाडीपरीक्षा व दूष्यं, देश, इतरे आधुनिकपरिक्षा नाही. |
| वैद्य म.पु. नानल | – नाडीवरून प्रश्नपरीक्षा आधुनिक परीक्षा नाही. |
| वैद्य र.म. नानल | – दशविध, अष्टविध परिक्षा. आवश्यक वाटल्यास आधुनिक तपासणी. |

✲❖✲❖✲

# ६ उपलब्धी (Result)

सदर अभ्यासामुळे पुढील गोष्टींची उपलब्धी झाली.

१) दोन्ही परंपरामधील वैद्यांच्या लेखनाची सूची तयार झाली.

२) त्या लेखाचे विविध विषयांनुसार वर्गिकरण करता आले.

३) यामुळे विविध विषयांत या परंपरांनी योगदान, त्यांनी केलेले शास्त्राचे बृंहण व नवीन विचार समजले.

## परंपरांचे योगदान

## अ) वेणीमाधव शास्त्रीं परंपरा

### औषधी विज्ञाना संदर्भात :

वनस्पतींच्या संदर्भात वेणीमाधवशास्त्रींनी अनेक मूलभूत विचार, नवीन संकल्पना मांडल्या आहेत तसेच शास्त्रीय परिभाषांचा गर्भितार्थ अनेक ठिकाणी सविस्तार स्पष्ट केला आहे.

१) एखाद्या द्रव्याचे घटक महाभूत कसे ओळखावे याचे मार्गदर्शन त्यांनी केले आहे. (सं. - आ.प. जाने. फेब्रु. ५६; गुणधर्म)

२) रस, वीर्य, विपाकासंबंधीची संकल्पना त्यांनी अधिक स्पष्ट करून मांडली आहे. याबद्दल काही नवीन विचारही त्यांनी मांडले आहेत.

## अ) रसविचार

१) वनस्पतीच्या रसाचा विचार करतांना बीज, मूल, त्वक्, पत्र, पुष्प, कोय या प्रत्येकाच्या रसाचा विचार करून त्यानुसार त्यांचे दोषकार्य, वीर्य, विपाक, यांचा विचार केला आहे. (सं. - आ.प. ७८; आंबा)

२) हरितकी पंचरसात्मक असली तरी ते रस शरीरास विरुध्द किंवा त्रासदायक होत नाहीत कारण त्या रसांचा जो कारक, तो त्या झाडाचा आहाररस एकच असतो. म्हणून ते परस्परांना सहकार्य करून मर्यादित कार्य करतात. (सं. - आ.प. डिसें. ७५; अभयाहरितकी)

३) हे ज्ञान पुढील पिढीला मार्गदर्शक ठरणार आहे.

## ब) विपाक विचार

द्रव्याचा विपाक, धातूगामित्व, प्रभाव या विषयीचे विवेचनात नवीन विचार मांडला आहे, उदा. १) विपाकाचे कार्य ग्रहणीनंतर पक्काशयापासून सुरु होते.

आम्लरस व आम्लविपाक या पैकी आम्लरसावर संस्कार होऊन झालेल्या आम्लविपाकाचे आम्लत्व आम्लरसापेक्षा उच्च प्रतीचे असते. कारण विपाकानंतर त्याची रासायनिक घटना बदललेली असते शरीरानुरूप घटना येथे झोलली असते. (सं. - आ.प. १९७८; आंबा)

## क) वीर्यविचार :

द्रव्याच्या वीर्याच्या बाबत अष्टविधवीर्याचा पुरस्कार ते करतात.

३) वनस्पतीचा अभ्यास करतांना कोणत्या मुद्यांचा विचार करावा यासंबधी काही नवीन कल्पना मांडल्या आहेत.

अ) झाडाची उत्त्पत्ती होतांना ऋतु, बीज, वातावरण, भूमि, यांच्या महाभूताचा आणि प्रत्ययारब्धाचा विचार करावा. (सं. – शो.प्र. २.१.१)

ब) वनस्पतीच्या सप्तधातूंचा विचार करावा.

उदा. फळाचीसाल म्हणजे त्वचा; गर म्हणजे रस, रक्त, मांस; बीज म्हणजे आस्थि, तर बीच्या आत मज्जा. (सं. – आ.प. २ ऑगस्ट ५६; द्राक्षा)

क) वनस्पतीचे फळ व त्वचादी अवयव मानवी अवयवांशी समान गुणी किंवा विपरीत गुणी आहेत का हे बघावे. (सं. आ.प. १ फेब्रु. ५६; वनस्पती गुणकर्म; शो.प्र. २.१.१.)

४) वनस्पतीचे धातुगामित्व बघावे. उदा. हरितकी मांसगामी आहे कारण हरितकीचे जे अंग वापरतो ते मांसप्रधान आहे. (सं. – आ.प. डिसें. ७५; अभयाहरीतकी)

४) वनस्पतीच्या ग्रंथोक्त गुणधर्मांचा विस्तार केलेला आहे. उदा.

   १) द्राक्षा वृष्य आहे. येथे खलेकपोत न्यायाने म्हणजे धातूंची जननशक्ती वाढवून वृष्य कार्य करते.

   २) द्राक्षा वात शामक आहे. शीत असूनही वातशामक आहे. कारण द्राक्षा शीत व स्निग्ध असल्याने अवयवांना बल देऊन वातशमन करते.

   ३) द्राक्षा स्वरभेदात उपयुक्त आहे. येथे अतिश्रमजन्य स्वरभेदात ती उपयुक्त आहे. मेदोवृद्धीजन्य स्वरभेदात नाही (सं. – आ.प. ५६; पिंपली...)

२) समान प्रत्ययारब्ध व विचित्रप्रत्ययारब्ध यांचे उत्तम स्पष्टीकरण केले आहे. (सं. – आ.प. ७५; अभयाहरितकी...)

३) बालफल दोषवर्धक का होतात. याचे स्पष्टीकरण करतांना नवीन विचार मांडला आहे. (सं. – आ.प. १९७८; आंबा; शो.प्र. २.१.१ पान नं.)

४) वनस्पती तसेच खनिज द्रव्य, औषधीसंदर्भात संशाधन कसे व्हावे या संदर्भात अनेक नवीन विचारांचे विश्लेषण केले आहे. (सं. – आ.प. सप्टें. ५६; आयुर्वेदीय संशोधन या क्रमाने व्हावे)

५) औषधी द्रव्यांचा विचार करतांना मूळ घटकाचे गुण, भावना द्रव्यांचे गुण आणि त्यांचे कार्यक्षेत्र म्हणजे कोणत्या धातूवर, कोणत्या व्याधीत कार्य होते हा विचार आढळतो.

६) अव्यक्त वनस्पतीचे गुणधर्म ठरवितांना पिंडी ते ब्रह्मांडी या सिध्दांतानुसार विवेचन आढळते.

७) वाग्भटांनी वमनासाठी मदनफळ व पिंपली इ. द्रव्यांचे वर्णन केले आहे. 'तत्रोत्कलीष्टे समुत्क्लेषे... या संदर्भात वेणीमाधवशास्त्री स्पष्टीकरण करतात की ही सर्व पर्यायी द्रव्ये नसून अवस्थेनुसार मदन फळासह वापरावयाची द्रव्ये आहेत. (सं. – आ.प. ; शो.प्र.)

८) त्यांचे गुरू वायवारू यांची 'ज्वरपंचक कषाय' ही संकल्पना ही त्यांनी व्यवहारात उत्तम वापरली याचे विस्तृत विवेचन व प्रचार प्रसारही केला.

उदा. ज्वरपंचक कषाय हे अग्निदीपन, दोषपाचन व मलशोधक असल्याने धातुदुष्टीची लक्षणे असतांना वापरता येतात.

लक्षणांनुसार पंचक कषायातील द्रव्यांचे प्रमाण ठरवावे. असा विचार मांडला आहे. (सं. - आ.प. जुलै ०३; ज्वरपंचक कषाय)

## सिध्दांत संदर्भात :

**१) धातूविचार :** दोषांइतकेच धातूंनाही त्यांनी महत्त्व दिले. धातू संकल्पना - सारासारत्व आणि धातुदुष्टी हा विचार त्यांनी चिकित्सेत वापरला. त्यांचे गुरू वायवारू यांची ही संकल्पना, त्यांनी अधिक स्पष्टपणे मांडली व तिचा प्रसार केला.

१) प्रत्येक धातूला स्वत:चे अस्तित्व आणि वैशिष्ट्य असले तरी तो सप्तधातूघटितच असतो. (सं.- आ.प. नोव्हे ७१; स्थूल धातूचे सूक्ष्मत्व)

२) तो धातू सार्वदेहिक असला तरी स्थानभेदाने त्यात इतर धातूंचा प्रभाव आढळतो.

३) क्षेत्रभेदाने धातूंची मलेही भिन्न असतात. मलांबाबत हस्तपादतलाचे स्नायू व अस्थिबध्द मांसाचे पचन, विभजन, सात्मीकरणाव्दारे तयार होणारे मल कानावाटे बाहेर पडतात.

ब) मुखातील मल असा सामान्य विचार असला, तरी यातील प्रत्येक अवयवाचे मल भिन्न-भिन्न धातूंचे आहेत हा विशेष विचार मांडला आहे. उदा.

दंतमल - अस्थिचा, जिव्हामल - रक्तघटित मांसाचा, हिरड्यांचा मल - मांसाचा, अस्थिमल - रसमल

क) प्राणवायू रक्तासह शरीरभर फिरतांना येणारे मलही 'ख' मल आहेत.

४) रूग्णतपासणीत धातूंचे सारासारत्व परीक्षण प्रामुख्याने करीत. धातूपरीक्षणावरून वैद्याने रूग्णतपासणीस प्रारंभ करावा असे ते म्हणत.

५) व्याधीलक्षणांचा विचार करतांना कोणत्या धातूच्या दुष्टीमुळे निर्माण झाले असा विचार करीत. उदा.- वारंवार पडसे येत असेल तर मांसधातू दूषित असतो किंवा मांसाग्नि दुर्बल असतो.

६) दोष फसवे आहेत धातू फसवे नाहीत असा वारंवार उल्लेख करीत.

७) धातूक्षीणता म्हणजे सूक्ष्मघटक आकाराने कमी होणे किंवा संख्येने कमी होणे.

अ) यांपैकी रसक्षीणतेत धातू आकाराने तर शुक्रक्षीणतेत संख्या कमी होते.

ब) शुक्रक्षीणता आणि शुक्र अव्यक्त होणे या परिभाषेचे स्पष्टीकरण केले आहे.

क) शुक्रबाहुल्य म्हणजे बलबाहुल्य असा अर्थ घ्यावा असे ते म्हणतात.

८) औषधी द्रव्यांकडेही धातूंच्याच दृष्टीने बघत. उदा. प्रवाळ, शंख,कमळ,उस, वाळा ही मांससमान द्रव्ये. चारोळी पिस्ता ही मज्जासमान द्रव्ये.

९) चिकित्सा करतांना धातूसम होण्यासाठी प्रकृती स्थापनी चिकित्सा करावी. यामुळे धातूसम होतात पण उत्तम सार होत नाहीत. म्हणून यासाठी रसायन चिकित्सा करावी.

१०) रसायन चिकित्सेने केवळ भौतिक अंशच नाहीत तर अभौतिक अंश मेधा, स्मृती, बल, वाक्सिध्दी हे अंशही वाढतात.

## धातूसारत्व आणि मानसभाव :

१) शरीराचा प्रत्येक धातू जितका सारवान असेल तितके त्या धातूला अनुरूप मानसभाव ही बलवान असतात.

२) मानसभावांच्या योग्य विश्लेषणाने धातूंचे सारासारत्व, दोषांची वृध्दीक्षयादी तसेच धातूंची वृध्दीक्षयादी अवस्था ही ठरवता येते व नेमकी चिकित्सा करता येते.

३) प्रत्येक मानव दुसऱ्या मानवापासून त्याच्या मानसभावांमुळे भिन्न आहे.

४) प्रिती, वात्सल्य, स्तन्य प्रिती या मानसभावांचे स्पष्टीकरण विस्तृतपणे केले आहे.

५) शुक्रप्रिती व्याधी चिकित्सेत महत्त्वाची कशी हा विचार मांडला आहे.

६) स्तन्यप्रिती म्हणजेच वात्सल्य. पुरूषांमध्ये स्तन्य नसले तरी रसधातूमुळे वात्सल्य येते.

## धातू व शारीर :

१) शरीराच्या अंग प्रत्यंगाचे शारीर, धातुघटत्व त्याच्या विशिष्ट कार्याच्या दृष्टीने इतरांपासून भिन्न असते. उदा. डोळा यातील पापणी, पापणीचे केस, अश्रुग्रंथी यांचे धातुघटत्व भिन्न आहे. प्रत्येक पटलाचे धातूघटत्व भिन्न आहे.

२) नेत्ररोगात चिकित्सा करतांना प्रथम मज्जाधातू पचन, विभजन, वृध्दी, क्षय, व्यापद यानुसार लक्षणे बघावीत आणि चिकित्सा देतांना ज्या पटलाची विकृती असेल त्या धातूला पोषक आणि पटलदोष विपरीत चिकित्सा करावी.

३) सर्व शरीराची त्वचा एकच असली तरी स्थानानुसार त्याचे धातुघटत्व बदलते. उदा. संधीवरील त्वचा अस्थिप्रधान,...

४) पोटाचे स्नायू आधुनिक शास्त्राने जरी स्नायू किंवा मसल्स म्हंटले असले तरी सुश्रुताने त्यास 'मांसधरा त्वचा' म्हंटले आहे. ही त्वचा मांसाप्रमाणे दिसत असली तरी त्यात त्वचाघटक अधिक आहेत असे स्पष्टीकरण केले आहे.

५) चिकित्सेमध्ये शारीररचना शास्त्र विचार महत्त्वाचा आहे. शारीराची माहिती दोन प्रकारे देता येते.
१) कार्यानुसार २) चिकित्सादृष्टीने.
उदा. नासा. – १) कार्यानुसार – नाकाव्दारे हवा आत बाहेर टाकली जाते.
२) चिकित्सादृष्टीने – नासाही शिरसोव्दारं.

२) सुप्रजा : वेणीमाधव शास्त्रींनी प्रथम 'सुप्रजा'ही कल्पना मांडली.
सुप्रजा या संकल्पनेचे विस्तृत विवेचन त्यांनी केले आहे.

यात गर्भधारणेपूर्वी प्रथम रज:दोषहर व नंतर शुक्रशोधक उपचार करावेत असा विचार मांडला.

'रज' हे गर्भजननासाठी आवश्यक नसून पोषणासाठी आवश्यक आहे म्हणून गर्भधारणेचे वेळी त्याचे प्रमाण जितके कमी तितके गर्भोत्पादन चांगले होते.

'पुंसवन' चिकित्सेत द्रव्य कारणीभूत नसून 'स्थान' महत्त्वाचे असते. कारण येथे द्रव्य एकच असते परंतु स्थान बदलते. उजवी किंवा डावी नाकपुडी.

गर्भ प्रकृति, गर्भप्रकृतिस्थापनी चिकित्सा याचे विवेचन केले आहे. (सं. – आ.प. जुलै ७१; सुप्रजोत्पादनकांन कसे)

३) प्रकृती परीक्षणाच्या संदर्भात दीर्घायुषी व अलौकिक कर्तृत्ववान व्यक्तींचे परीक्षण करतांना प्रकृती परीक्षणाचे अनेक नवीन मुद्दे मांडले आहेत.

४) प्रकृतीस्थापनी चिकित्सा हा विचार मांडला आहे. स्वस्थ व्यक्तीची दोषानुसार प्रकृती, धातूंचे सारासारत्व व त्यानुसार आवश्यक पदार्थांची योजना असे विवेचन केले आहे.

## निदान व चिकित्सा विचार :

**१) हेतू –** व्याधी निदान करतांना हेतूंना विशेष महत्त्व दिलेआहे.

हेतू बघतांना देशविचार केलेला आहे. यात व्याधीदेश व रूग्णदेश असा दोन्हींचा विचार केला आहे.
माशांचा गंध हा हृद्रोगाचा रोगोत्पादक हेतू सांगितला आहे.
टायफॉईड ज्वरात 'जंतू' व्याधीचे हेतू म्हणून सांगितले आहे व या जंतूंची प्रकृती सांगितली आहे.

उदा. Basilli – वातपित्तप्रकृतीचे
Cocci – कफपित्तवात प्रकृती
Spiral basilli – वातप्रकृती.

हेतू विचार मांडताना वैद्य शुभदाताई पटवर्धनांनी पुढील विचार मांडला. मधुर रस योग्य प्रमाणात घेऊन पचला तर तो कफधातू निर्माण करतो व अतिप्रमाणात घेऊन तो पचला नाही तर कफदोष निर्माण करतो.

**२) संप्राप्ती –** याबद्दल विशेष विचार मांडले आहेत.

दोषविचारांसह दूष्यविचाराला संप्राप्तीत महत्त्व दिले.

संप्राप्तीचा विचार करतांना व्याधी स्थान विचार सर्वांत महत्त्वाचा धरला. त्या स्थानाचे कार्य, संबंधित धातू, त्याचा धात्वग्नि असा विचार केला आहे.

म्हणजे

अ) रोगोत्पादक दोषांची सुरूवात प्रथम कोठून झाली ? उदा. व्यायामाने थकवा. यात स्नायूपासून सुरूवात तर अपचनात सुरूवात आंत्रापासून,

ब) जो अवयव प्रथम दूषित झाला त्या अवयवाचे पूर्ण ज्ञान करणे. उदा. त्याची प्रकृती, कार्य, इतर अवयवांशी किंवा शरीरघटकांशी कला, इ. संबंध बघावा.

क) नंतर ग्रंथातील चिन्हांचा क्रम ठरवावा. संप्राप्ती कोठे सुरू झाली व कशी व्यापक होत गेली हे बघावे.

ड) रचनाशारीरदृष्ट्या व गुणधर्म शारीरदृष्ट्या काही बदल झाला आहे का हे बघावे.

स्थानविचार करतांना दोषधातूंच्या अंशांश कल्पनेचा विचार आढळतो. उदा. शिर हे वायूच्या दृष्टीने प्राणाचे, धातूच्या दृष्टीने रक्त, मज्जेचे स्थान.

**लक्षणे :**

- व्याधीतील चिन्हांना शरीराची सांकेतिक भाषा किंवा रोगमार्गातील कंदिल म्हंटले आहे. व्याधीतील लक्षणे नैसर्गिक असतात व चिकित्सेसाठी मार्गदर्शक असतात. म्हणून शरीराच्या नैसर्गिक मागणीकडे लक्ष द्यावे, असे मत मांडले आहे.
- रोग चिन्हांचे दोषचिन्हे, धातूचिन्हे, उपधातूचिन्हे, अवयवचिन्हे, मलचिन्हे अशा पध्दतीने परीक्षण केले आहे. ज्वरातील लक्षणांची व्याप्ती स्पष्ट केली आहे. (सं. – आ.प. ऑगस्ट ६३; ज्वर)

  टायफॉईडच्या लक्षणांचे दोषचिन्हे, धातूचिन्हे, मलचिन्हे असे वर्गिकरण केले आहे.
- व्याधीच्या रूपावस्थेत होणारी लक्षणे दोन प्रकारची असतात.

१) आक्रमकाची चिन्हे

२) अंतरात्म्याची प्रतिकाराची चिन्हे.

यांचे विश्लेषण करून चिकित्सा करावी, असा विचार मांडला आहे.

व्याधी लक्षणानुसार आहारीय चिकित्सा दिलेली आढळते.

**वर्गिकरण** – व्याधींच्या वर्गिकरणाची नवीन दृष्टी मांडली आहे.

१) शोधनात्मक २) संचयात्मक ३) सर्व शरीरव्यापी.

ज्वराचे वर्गीकरण नवीन पद्धतीने केले आहे. (सं. – आ.प. ऑगस्ट ६३; ज्वर)

**चिकित्सा :**

१) कोणत्या प्रकारची चिकित्सा देतांना, कोणत्या पुरूषाचा विचार करावा हे स्पष्ट केले आहे.

२) चिकित्सा देण्यापूर्वी व्याधी स्थानिक आहे की सार्वदेहिक, व्याधी अवस्था आहे की नाही हा विचार केला आहे.

३) चिकित्सेमध्ये स्थान विचाराला महत्त्व दिले आहे. पथ्य व अनुपान, औषधकाल यासाठीही स्थानविचार प्राधान्याने केला आहे.

४) पंचकर्मातही स्थान विचार प्राधान्याने केला आहे. उदा. रक्तमोक्षणात दूषितस्थानातून रक्तमोक्षण केले आहे.

५) आवृतवायूच्या चिकित्सेत प्रथम आवरकाची व नंतर स्थान चिकित्सा करावी असे म्हणतात.

६) चिकित्साक्रम पुढील प्रमाणे आढळतो –

१) स्त्रोतोशोधन ३) धातूपोषण २) दोषपाचन ४) रसायन.

७) पंचकर्मे करतांनाही प्रथम शोधन व नंतर पोषण असा विचार करून चिकित्सा केली आहे.

८) शोधन चिकित्सेवर अधिक भर आढळतो. शोधन चिकित्सा हीच खरी चिकित्सा असे मत होते.

९) रक्तमोक्षण विशेषत: जलौकेने रक्तमोक्षणावर अधिक भर दिसतो.

१०) कोणताही उपचार करून व्याधी बरा होत नाही तेव्हा रक्तधातूची चिकित्सा किंवा रक्तमोक्षण करावे, असे मत मांडतात.

११) पंचकर्मापूर्वी आशय, धातू व प्रकृतीचा विचार करीत.

१२) चिकित्सा करतांना प्रथम असार धातूंचे पचन सुधारावे, असे मत मांडतात.

१३) ३५ वर्षानंतर वृष्य औषधे दयावी व दुर्बल अवयवांना बल देणारी व पोषक औषधे द्यावीत. हा विचार केला आहे.

१४) मर्म चिकित्सेचा वापर चिकित्सेत आढळतो.

१५) ग्रंथातील वचनांचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आढळतो. उदा. गंडमाळेत पिंढरीत छेद घेऊन अंड्यासारख्या जाळीचे दहनकर्म केले.

१६) ज्वर चिकित्सा सांगतांना आगंतु ज्वर असल्यास धातू चिकित्सा तर निजज्वरात दोषप्रधान चिकित्सा करावी असे म्हणतात.

१७) श्वित्रात बाह्यलेप टाळावेत. याने विकार वाढतो किंवा क्षुब्ध होतो असे मत मांडतात. Tube ने आमाशय धावनाचा उल्लेख आढळतो.

१८) चिकित्सेने शरीरदोष वैषम्य नष्ट होते, पण मानस दोषवैषम्य मात्र तसेच राहते. असा विचार मांडला आहे.

१९) घर्षण चिकित्सा या नवीन चिकित्सा पध्दतीचा शोध लावला. या पध्दतीचे सविस्तर, सचित्र वर्णन केले आहे.

## औषध संदर्भात योगदान –

## वेणीमाधवशास्त्रींचे अनुभूत योग :

- धुम्रपानासाठी नवसागराचा प्रयोग आढळतो.
- खगेश्वर रस खल्वीपध्दतीने न करता कुपीपक्व पध्दतीने करीत असत. यात गलस्थ रससिंदूर व तलस्थ कासिस तयार होते. (या कासिसाने मळमळत नाही.) वरिल दोन्ही एकत्र खलून वर्धमान प्रयोगाने श्वित्रामध्ये गुणकारी आहेत, असा अनुभव ते सांगतात.
- तीळतैल + दालचिनी + ओवातेलाची दुग्धशर्करा गरम पाण्यात मिसळून बस्ती – अपान दुष्टीसाठी
- मज्जायोग– कसिस भस्म १ भाग + मुस्ता ४ भाग + आमलकी ४भाग + गुळवेलसत्व ४ भाग
- तंतूपाषाण भस्म – आस्थिपोषक, मज्जादोषनाशक
- पानफुटी – हृद्बल्य
- दारू + काळे मीठ – मूत्रमार्गातील पीडानाशक.
- अर्णशुक्ती रक्तधराकलेवर कार्यकारी.
- पलाशमषी

- प्रलाप आणि रक्तस्त्राव याची अनुभूत चिकित्सा विस्तृतपणे सांगितली आहे. (संदर्भ आ.प. ५१ टायफॉईड)

## शिक्षणक्षेत्रासंबंधी योगदान

आयुर्वेदाचे शिक्षण अधिक चांगल्या पध्दतीने व्हावे, विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण मिळावे त्यासाठी उत्तम शिक्षक निर्माण व्हावेत यासाठीची तळमळ त्यांच्या लेखनात आढळते.

- शिक्षक कसा असावा याचे विस्तृत विवेचन त्यांनी रक्तात केले आहे.
- आयुर्वेदीय अध्यापन कसे असावे याबद्दलचे त्यांचे विचार तर काळाच्याही पुढे आहेत. उदा. Audio पध्दतीने अध्यापन व्हावे. विविध विषयाच्या Recordings विद्यार्थ्यांना ऐकवाव्या इ.
- सुरूवातीला मिश्र शिक्षणाचे पुरस्कर्ते असणारे, ते नंतर मात्र शुध्द आयुर्वेदाचे पुरस्कर्ते बनले. ॲलोपॅथिक डॉक्टरांना आयुर्वेद शिकवू नये या मताचे ते होते. कारण या लोकांची मूळची मते बदलत नाहीत.

ॲलोपॅथी डॉक्टरांनी आयुर्वेदाची औषधे वापरू नये असे त्यांचे मत होते. प्रथम रस, वीर्य विपाकादींचा अभ्यास करून मग ही औषधे वापरावी असे ते म्हणत.

- ते स्वतः नियमितपणे विद्यार्थ्यांना पहाटे ५-६ आयुर्वेद शिकवीत. ठिकठिकाणी विद्यार्थी व वैद्यांसाठी व्याख्याने घेत. शंकांचे निरसन करीत.

## सामाजिक योगदान

- वेणीमाधवशास्त्री स्वतः महाराष्ट्र वैद्य प्रांत मंडळाचे अध्यक्ष होते. त्या माध्यमातून वैद्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लढत. उदा. औषधांवरील बंदी, आयुर्वेदीय शिक्षण, इ.
- आयुर्वेदीय विद्यार्थ्यांना MBBS डॉक्टरांच्या समान अधिकार मिळवण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री व वेणीमाधवशास्त्रींचे रूग्ण वैद्य. अंतुले यांना सांगून तो अधिकार मिळवून दिला.
- पुरस्कार म्हणून मिळालेली १०,००० ची देणगी आयुर्वेद संशोधन ट्रस्ट निर्माण करण्यासाठी दिली.

### औषधीकाल संदर्भात विचार -

१) औषधी द्रव्याचे कार्यक्षेत्र पांचभौतिक घटनेनुसार असते. उदा. अग्नि, वायू प्रधान उर्ध्वगामी, तर पृथ्वी व आप प्रधान अधोगामी.

२) पण आहार द्रव्यांच्या गती नेमक्या उलट असतात. म्हणजे पृथ्वी आपप्रधान उर्ध्वभागी जातात तर अग्नि वात प्रधान अधोभागी. या अर्थाच्या श्लोकाची रचनाही केली आहे.

''द्रव्यं उर्ध्वगमम् भुक्तं भूमीतोय गुणाधिकम् ।
अधोगामिच भूयिष्ठं प्रायोदग्नि पवनोत्कटम् ॥''

३) जेव्हा आहाराशी संबध्द औषधे दिली जातात तेव्हा त्यांच्या गती पुन्हा भिन्न होतात. हे दशविधकालाचे वैशिष्टय स्पष्ट केले आहे.

४) आजार कोणत्याही दोषाचे असले तरी ज्या वायूच्या क्षेत्रात असतात त्या वायूच्या काळांत औषधे दयावे. - कारण प्राकृत स्थितीत स्थानिक दोष त्या स्थानाचा रक्षक असतो. स्थानिक दोष विकृत झाला तरच इतर स्थानाचे दोष तेथे विकार निर्माण करतात.

५) दशविध कालांच्या वेळी शरीरांतर्गत नेमकी काय स्थिती असते याचे विस्तृत विवेचन केले आहे. उदा. स्वप्नकाली दिलेले औषध अधिक कार्यकारी होते. कारण तेव्हा विश्रांतीची स्थिती असते.

६) विविध कालांत औषध दिल्यावर अन्न व औषध यांच्या नेमक्या स्थितीचे स्पष्टीकरण केले आहे.

७) औषधीकालांचा विचार करतांना सुश्रुतोक्त औषधीकाल आणि वाग्भटोक्त स्वप्नकाल यांचा विचार मांडला आहे.

८) स्वप्नकालात इंद्रिय कार्यात खर्च होणारे ओज मेंदूच्या पोकळ्यांमध्ये भरले जाते. ओजाची चिकित्सा करतांनाही स्वप्नकाली औषध दयावे.

९) सग्रास औषध शुक्रधातूवर कार्य करते. म्हणून सुश्रुताने वाजीकर औषधे स्वप्नकाली सांगितली आहेत असे स्पष्टीकरण वेणीमाधवशास्त्रींनी दिले आहे.

१०) व्याधीलक्षणे आणि स्थानानुसार औषधीकाल योजना आढळते. त्यांच्या व्यवसायातही हा विचार आढळतो.

११) स्नेहपान व कालविचार याचे उत्तम विश्लेषण केले आहे.

त्यांचे हे विविध क्षेत्रातील योगदान त्यांची कन्या वै.शुभदाताई तसेच त्यांचे शिष्य वै. कृ. करमरकर, वै. कोल्हटकर, वै. कानिटकर, इ. नी पुढे नेले. वै. शुभदाताई, वै. करमरकरांच्या लेखनात वै. वैणीमाधवशास्त्रींचे अनेक विचार आढळतात. पुढे त्यांचे शिष्य व इतर वैद्यांच्या शिष्यांमध्येही या विचारांचा प्रसार झाला आणि परंपरा बहरत गेलेली आढळते.

## ब) नानल परंपरेचे योगदान :

नानलांपैकी वै. पु.ग.नानल, वै. म.पु.नानल, वै. भा.पु.नानल, वै. रमेश नानल, वै. विलास नानल यासर्वांचेच आयुर्वेद क्षेत्रासाठी मोठे योगदान केले आहे.

प्रस्तुत शोधप्रबंध आयुर्वेद पत्रिका संदर्भाने असल्याने त्यात प्रामुख्याने वैद्य रमेश नानल यांचे लेखन असल्याने येथे त्यांच्या संदर्भातील योगदान सांगितले आहे.

### द्रव्यगुण संदर्भात :

१) औषधी द्रव्य उपयोगासाठी 'गुणविचार' प्राधान्याने केलेला आढळतो. गुणविचार विकल्पना म्हणजे गुणाचे कार्यात दुसऱ्या गुणाच्या सापेक्षतेने कसे परिवर्तन होते. (सं. – आ.प. फेब्रु. ९०; गुणचिंतन)

२) 'गंध' या गुणाचे पांचभौतिकत्व, प्राकृत विकृतगंध, चिकित्सेतील त्याचे महत्त्व, गंधग्रहणाची प्रक्रिया, त्याचे प्रकार इ. द्वारे स्पष्टीकरण केले आहे. (सं. – आ.प. डिसे. ८१; गंधविचार व शो.प्र. ३.२.१)

३) द्रव्यांवरील संस्कार सांगतांना जलसंस्कार व अग्निसंस्कार असे वर्गीकरण केले आहे. (सं. – आ.प. सप्टें. ८८, पानकोबी)

४) ग्रंथातील परिभाषेचे – कार्मुकसंज्ञांचे आणि सूत्राचे स्पष्टीकरण केले आहे. क्लिष्ट शब्द सोप्या भाषेत मांडला आहे. उदा.

१. प्रमाथी (सं. आ.प. जाने. ८४ कार्मुकसंज्ञांचा विचार; शो.प्र ३.२.१)

२. गुणधर्म : गुण = कार्य शक्ती, धर्म = कार्यस्वभाव.

पित्ताचे ठिकाणी तीक्ष्ण हा गुण व दाह करणे हा धर्म आहे.

३. विदाही (सं. – आ.प. मार्च एप्रिल १५; शो.प्र. ३.२.१)

५) पंचीकरण सिद्धांताचे स्पष्टीकरण व व्यवहार्यता विशद केली आहे. (सं. – आ.प. मे १६, पंचीकरणविचार; शो.प्र. ३.२.१)

६) अनुक्त द्रव्य : अनेक अनुक्त द्रव्यांचा अभ्यास कसा करावा त्यांचे गुणकर्म या विषयी शास्त्रीय विवेचन केले आहे. उदा. पानफुटी, पानकोबी, तंबाखू

## स्वस्थवृत्त संदर्भात :

१) गर्भिणीपरिचर्ये मध्ये परिचर्या कालाची विभागणी, पुढील प्रमाणे केली आहे.

१) गर्भधारणेपूर्वी २ महिने २) ऋतुमतीचर्या ३) गर्भावस्थेतील परिचर्या

(सं. – आ.प. जाने. १०, गर्भोपघातकर भाव)

२) 'वेग' संकल्पनेचे विशेष चिंतन केले आहे.

१. वेगाची अतिशय साधी, सोपी व्याख्या मांडली आहे. उदा. – शरीराच्या नैसर्गिक प्रवृत्ती पूर्णत: व सहजरूपाने प्रवृत्त होणे म्हणजे वेग.

२. वेगोत्पत्तीची प्रक्रिया पाणिनीच्या शब्दोत्पत्तीच्या प्रक्रिये वरून अनुमान करून मांडली आहे. (सं. – आ.प. मे ८४; हस्तमैथुन)

३. तसेच प्रत्येक वेगाच्या निर्मिती प्रक्रियेतील घटकांचा अभ्यास करून निदान करावे. आणि

४. वेगकालात होणाऱ्या शरीरक्रियांचा अभ्यास दोषधातू–मलांच्या परिभाषेत करावा. यामुळे वेगाची प्रकृती आणि विधारण व उदीरण यां विकृतीच्या कल्पनाही समजतात.

५. प्रत्येक वेग वायूमुळे निर्माण होत असला तरी काही वेग धातू प्रधान तर काही दोषप्रधान संप्राप्ती दाखवतात. (सं. – आ.प. मे ८४; हस्तमैथुन–शुक्रवेगादीरण) असे मत मंडले आहे.

मानसवेगांचे विवेचन विचार नवीन आहे.

मनाचे विचरणस्थान संपूर्ण शरीर, आश्रयस्थान हृदय आणि जागृतावस्थेतील केंद्रस्थान उत्तमांग मानले आहे. (सं. – आ.प. फेब्रु ७१; मन:संताप) चिकित्सेत मानसवेगांचा विचार कसा करावा हे प्रतिलोम राजयक्ष्माचे उदाहरण देउन दाखविले आहे.

समदोष : समाग्निश्च ..... या सुश्रुतोक्त व्याख्येचा विशेष अर्थ स्पष्ट केला आहे. यात केवळ 'समदोष' हा शब्द स्वास्थ्यदर्शक असून इतर भाग म्हणजे 'समदोष' परिस्थितीचे विशदीकरण आहे. (सं. – आ.प. फेब्रु. ८१; मन:संताप) तसेच येथे 'अभिधीयते' असे म्हटले आहे. 'अभि' म्हणजे सार्वमत तर 'धीयते' म्हणजे कल्पना. म्हणजे स्वस्थ ही कल्पना आहे. स्वस्थ कसा असू शकेल हे येथे सांगितले आहे. (सं. – आ.प. एप्रिल ८१; आशा करता स्वास्थ्याची) आरोग्य तपासणीचे आयुर्वेदीय दृष्टीने परीक्षणाचे काही नवीनमुद्दे मांडले आहेत. (सं. – आ.प. ऑगस्ट

व सप्टें. १५; आरोग्यचाचणी विनामूल्य व निर्धोक पद्धत)

## हेतू संदर्भात :

हेतूंचा विचार करतांना द्रव्याचा रस, विपाक गुण, कार्य या स्तरावर विचार केला आहे. (सं. – आ.प. मार्च, एप्रिल १५; शो.प्र. – ३.२.१)

* हेतूज्ञानासाठी प्राधान्याने प्रश्नपरीक्षा केली आहे.
* आहारीय हेतूंचे वर्गिकरण त्यांनी पुढील प्रमाणे केले आहे.

  ● विरूद्ध आहार ● विदाही आहार ● वातकर आहार

  ● रसरक्तदुष्टीकर आहार ● कफकर आहार (सं. – आ.प. डिसें. ८२; अस्थिमज्जागत आमावृत...)
* आम्लपित्ताचे अनेक नवीन हेतू वर्णिले आहेत. (सं. –आ.प. मार्च व एप्रिल १५; आम्लपित्त शो.प्र. ३.२.१.) त्याच प्रमाणे नवीन हेतूंचा विशेषत: व्यवसायज हेतूंचा समावेश केला आहे. (सं. – आ.प. ८१ राजयक्ष्मा) संप्राप्ती शो.प्र. ३.२.१ ब)
* अजीर्णभोजी याचा विशेष अर्थ ही स्पष्ट केला आहे. (सं. – कृमि संप्राप्ती आ.प. जून ७१)

## संप्राप्ती संदर्भात :

* प्रत्येक लक्षणाच्या कारण संप्राप्तीचा विचार केला आहे. उदा. कटीशूल – प्रकुपितवातज् पृष्ठकटीशूल – रक्तदुष्टीजन्य, इ.
* प्रत्येक हेतूमुळे संमूर्च्छना कशी घडते याचे विवेचन करावे हा विचार मांडला आहे. (सं. – आ.प. डिसें. ८२ अस्थिमज्जागत...)
* आम्लपित्ताची संप्राप्ती तीन पद्धतीने कशी घडते याचे सूत्रांच्या आधारे स्पष्टीकरण केले आहे. (सं. – आ.प. मार्च एप्रिल १५; शो.प्र. ३.२.१)
* कृमि संप्राप्तीतील क्लेद व काल यांची विकृती कशी घडते हा विचार मांडला आहे. (सं. आ.प. जून ७१ कृमि... / शो.प्र. ३,२,१)
* वातज शोथ सामान्य संप्राप्ती विचाराचे स्पष्टीकरणात (सं. – आ.प. जुलै ७८; संधीवात वात)

मार्गावरोध म्हणजे आवरण असे स्पष्टीकरण केले आहे. तसचे आवरण/आवृतत्वात आम विचाराला महत्त्व दिले आहे. आवृतत्वात प्रथम कफ विचार करावा. आणि इतर देहभावांपैकी आमविचार प्राधान्याने करावा. कारण दोषांप्रमाणे आमालाही रोगात्पादकता असते म्हणून दोषांखालो खाल आमाला महत्त्व द्यावे हा विचार नवीन आहे. आणि आमवाताच्या संप्राप्तीत आमोत्पत्ती व दोष प्रकोप या दोन्ही गोष्टी एकाच वेळी पण स्वतंत्रपणे होतात. (सं. – आ.प. नोव्हे. ७८; आमवात)

* हृत् शूलातही कफपित्तादी दोषांसह आमविचार करावा कारण आमानुबंधाने तीव्र आणि आशुकारी वेदना दिसते.
* हृद्रोगात अवलंबक कफाचा विचार प्राधान्याने करावा कारण तोच हृदयाचे पोषण धारण करतो.
* संधीवाताच्या पित्तावृत वात आणि रक्तावृत वात अशा अवस्था सांगून त्यातही पित्तरक्तावृत्त क्षीण व्यान

आणि पित्तरक्तावृत प्रकुपित व्यान अशा अवस्था सांगितल्या आहेत. (संदर्भ अल्प. जून ८२ संधीगत वात व जलौकावचरण)

✳ जृंभाची संप्राप्ती सांगितली आहे. (सं. – आ.प. शो.प्र. ३.२.१)

## लक्षण संदर्भात :

✳ व्याधी लक्षणांचा विचार करतांना महाभूतविचार, तद्जन्य गुणांचा विचार करून गुणानुरूप कर्म आणि कर्मविशेष असा विचार केला आहे. (सं. – आ.प. मार्च २; कफजहृद्रोग)

✳ हृत्शूलाच्या लक्षणात प्राण, अन्नादी स्त्रोतसांच्या लक्षणांसह आमज लक्षणांचा विचार केला आहे. (सं. – आ.प. सप्टें. ८१; हृत् शूल)

✳ ग्रंथात वर्णित नसलेल्या परंतु व्यवहारात आढळणाऱ्या लक्षणांचे वर्णन आहे. उदा. हलीमक (स. – आ.प. ऑगस्ट ७७; हनीमक राजयक्ष्मा आ.प. सप्टें. ८१)

रक्ताची अशुद्धता असतांना किंवा रक्ताचे व्याधी होण्यापूर्वी मुखदुर्गंधी हे लक्षण असते. (सं. – आ.प. नोव्हे. ०१; 'मुखविस्त्रता')

✳ ग्रंथोक्त लक्षणांचा अर्थ अधिक स्पष्ट केला आहे. उदा.

१) हलीमकातील क्षय हे लक्षण म्हणजे मांस मेदक्षय, ओजक्षय, बलक्षय असा अर्थ घ्यावा तर दाह म्हणजे सर्वांगदाह किंवा उदरदाह होय.

२) माधव निदानात संधीगत वातात 'आटोप' हे लक्षण दिले आहे. येथे आटोप म्हणजे संधीस्थानात आटोप उत्पन्न होणे असा अर्थ ते स्पष्ट करतात.

## व्याधी संदर्भात :

✳ व्याधींचे वर्गीकरण स्त्रोतसाप्रमाणे केले आहे (सं. – आ. प. फेब्रु. ०१; रोगांचे आयु. वर्गिकरण)

✳ व्याधी निदान करतांना प्रश्नपरिक्षेत प्रामुख्याने उपशय अनुपशयाचा वापर कसा करावा हे सोदाहरण सांगितले आहे. येथे प्रश्न सूचक नसावोत निष्पक्ष असावे असा विचार मांडला आहे. (सं. – आ.प. कफज हृद्रोग उपशय-अनुपशय)

✳ नवीन/अनुक्त व्याधीचा विचार कसा करावा याचे मार्गदर्शन सोदाहरण केले आहे. (सं. – आ.प. मार्च १४; नवीन रोगोंका विचार आणि फेब्रु. १८; कॅन्सर)

✳ अनुक्त व्याधीचे वातज, पित्तज, कफज, संसर्गज, सन्निपातज आणि रक्तज अशी परीक्षणे करून चिकित्सासूत्रे ठरवावी असा विचार मांडला आहे. (सं. – आ.प. फेब्रु. १८; कॅन्सर)

## चिकित्सा संदर्भात :

✳ या संदर्भातील परिभाषांचेही स्पष्टीकरण केले आहे. उदा. अनुलोमन म्हणजे केवळ वाताचे नसून दोष, दूष्य, मल या तिन्हींचा विचार करावा. (सं. – आ.प. मार्च ७८; आत्यायिक चिकि.)

✳ वेगावरोधज व्याधींमध्ये वातानुलोमन औषधांसह मनोवह स्त्रोतसांवर शमन चिकित्सा करावी. प्रतिलोम

राजयक्ष्म्याच्या उदाहरणाने विषय स्पष्ट केलेला आहे.

- ✳ वृक्काश्मरीच्या रुग्णात अपानकाली अवगाह दिला आहे. तत्पूर्वी बस्ती प्रदेशी बला तेलाचा अभ्यंग व मूत्रमार्गात बला तेल सोडले आहे.
- ✳ केवळ तीन औषधे वापरून 'कामला चिकित्सा शिबीर घेतले. (सं. – जून. ८०; कामला चिकि. शिबीर)
- ✳ आमवातात अग्निदीपनासाठी आम्लरस उपयुक्त आला तरी तो स्निग्ध व अभिष्यंदकर असल्याने आमवातातील ज्वराचे पुनरावर्तन होऊ शकते. कटू तिक्त रसाची द्रव्ये वापरतांना आसवारिष्ट स्वरूपात न वापरता सिद्धजल, तक्र या स्वरूपात वापरावी.
- ✳ **आवृतत्व :** आवृतवातात चिकित्सा करतांना प्रथम आवरकाची चिकित्सा पण वात प्रकोप होणार नाही अशी चिकित्सा देऊन नंतर आश्रयस्थानाची चिकित्सा केली आहे.

  आवृतवाताच्या चिकित्सेत पुढील विचार दिसतो.

  १) सामता, २) आवृतत्व, ३) आवृतत्वाचे शोधन, ४) आत्ययिक चिकित्सा
- ✳ कफावृतत्त्वामुळे वाताचे चलत्व कमी होते ते वाढवण्यासाठी सर गुणाची पिंपळी व गोदुग्ध वापरले आहे.

**आत्ययिक चिकित्सा :**

- ✳ व्याधी विनिश्चय किंवा नामकरणात वेळ न घालवता दोषप्रकोप व अधिष्ठान यांचा विचार करून चिकित्सा दिली आहे.
- ✳ यात दोषबंध, स्थानविचार यासह हेतूविशेषही लक्षात घेतला आहे.
- ✳ व्याधी आत्ययिक होऊ नये म्हणून स्थानचिकित्सा, प्राण, उदान रक्षक चिकित्सा व आश्वासन चिकित्सा दिली आहे.
- ✳ वाग्भटोक्त अग्न्य संग्रहातील औषधे आत्ययिक अवस्थेत वापरावीत, असे सांगितले आहे.

### पथ्यापथ्य संदर्भात :

- ✳ यात आहारीय द्रव्यांचे विवेचन केले आहे. विशिष्ट आजारात आहार योजना करताना समान रोगघ्नतेची मित्र द्रव्ये वापरावीत. उदा. हृद्रोगात हृद्य द्रव्ये, अनेक व्याधीत पथ्यापथ्य हे आहारीय उपचार स्वरूपात वर्णिलेले आढळते. याच संदर्भात र.म.नानलांनी आहाराने रोग हरा हे पुस्तकही प्रकाशित केले आहे.
- ✳ प्रमेहावर लक्षणांनुसार विशेष असे पथ्यापथ्य सांगितलेले आहे.
- ✳ आहारीय पदार्थांचे अनेक सोपे उपायही वर्णन केलेले आहे. त्याचप्रमाणे प्रमेहातील भृष्ट धान्य कल्पना; त्यासंदर्भातील पारंपारिक योग, त्यांच्या परंपरेतील भाजणीचे वर्णनही केले आहे. जवाचे विविध पदार्थ, धान्यांचे विविध पदार्थ, न्याहारीचे पदार्थ यांचे वर्णन केले आहे. (सं.– आ.प. ऑगस्ट ०३; प्रमेह वभृष्टधान्य)
- ✳ आम्लपित्तासाठीही अनेक घरगुती आहारीय उपायांचे वर्णन त्यानुसार केलेले आहे. (सं. – आ.प. मार्च १२; आम्लपित्त, शो.प्र.३.२.३ ब)

* परिणामशूलातील वेगकालीन व अवेगावस्थेतील सोपे उपाय दिले आहेत. (आ.प. ऑक्टो. ८१ परिणामशूल, शा.प्र. ३.२.१ ब)
* कफज आणि आमज आवरणात कांदा उपयुक्त असल्याचे सांगितले आहे.

**औषधी मात्रा :**

* कुटकीची ग्रंथोक्त मात्रा १ ते ३ मासे आहे. नानलांनी १ ते ५ गुंजा वापरली आहे. (सं. – आ.प. जून ८०; कामला शिबिर)
* आसवारिष्टांचीही प्रधान मात्रा वापरली आहे. उदा. हृदशूल मध्ये अर्जूनारीष्टा १५० एमएल + द्राक्षासव ५० एमएल (सं. आ.प. सप्टें. ८१; हृतशूल)

**पंचकर्म संदर्भात :**

* हृदशूलाच्या रुग्णात आमशयगतज लक्षणे असल्याने वमन केलेले आढळते. वमनानंतर ६ तास निराहार ठेवून आहार योजनेतील सूप आणि द्राक्षासव + वेलची दिलेली आहे.
* गंधनस्य हा नवीन विचार सांगितला आहे.
* सद्योवमनाचा सोपा योग सांगितला आहे. (सं. – आ.प. सप्टें. ९१; वमन सोपा पण प्रभावी उपाय)
* बस्ती संदर्भात बस्ती दिवसा द्यावा कारण स्त्रोतसे मोकळी असतात व अग्नि अन्न रसयुक्त असतो. असे मत ते मांडतात. निरुह व अनुवासन बस्तींचे अनुभविक योग सांगितले आहे. (सं. – ऑक्टो. ९२ बस्ती चिकित्सानुभव)

**औषधी कल्प संदर्भात** :

* वैशिष्टयपूर्ण औषधी कल्पना हे नानल परंपरेचे वैशिष्टय. अनेक ग्रंथोक्त कल्पही वेगळ्या पद्धतीने किंवा ग्रंथात वर्णिल्यापेक्षा वेगळ्या व्याधींमध्ये वापरलेले आढळतात. त्याचप्रमाणे अनेक नवीन कल्पही त्यांच्या परंपरेत आढळतात.
* नवीन औषधांची निर्मितीही कशी करावी याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केलेले आहे.
  औषधातील घटक द्रव्यांचा रस, वीर्य, विपाक, प्रभाव, गुणधर्म दोष धातू मलावरील कार्य इ. विचार करून औषधी निर्माण करावे असे ते म्हणतात.
* वैद्य. पु.ग.नानल यांनी अनेक ग्रंथोक्त कल्पांचे विविध गुणधर्म विस्तृतपणे मांडले आहेत. यासंदर्भातील रसौषधी निर्माण या विषयाचे अप्रकाशित हस्तलिखित उपलब्ध आहे. (सं. – ३.१.४ पु.ग. नानल यांचे अनुभविक योग पुरूषोत्तमोपनिषद)

५) वैद्य भा.पु. नानल यांच्या वापरातही वैशिष्टयपूर्ण औषधे आढळतात. ग्रंथोक्त औषधे विशिष्ट अवस्थेनुसार कशी वापरावी याची उदाहरणे दिली आहेत. त्याचप्रमाणे काही नवीन औषधांची निर्मितीही आढळते.

६) म.पु. नानल यांनी औषधांमध्ये विलक्षण कल्पना वापरून अनेको ओषधी कल्पांची निर्मिती केली आहे. (सं. – शो.प्र. ३.१.४)

७) वैद्य रमेश नानल यांनी अनेक वैविध्यपूर्ण कल्प, त्यांचे अवस्थानुसार उपयोग सांगितले आहे. ढाडिमासव चा नवीन योग केला आहे. (सं. – शो.प्र. ३.१.४)

## आयुर्वेद शिक्षण संदर्भात :

- **वैद्य भा.पु.नानल :** यांनी आयुर्वेदाचे शिक्षण कसे व्हावे या संदर्भात मार्गदर्शन केले आहे.
- आयुर्वेदीय परिभाषेचे जतन करावे. त्याचाच वापर प्रचलित व्हावा.
- आयुर्वेदाचे शिक्षण घेणारा विद्यार्थी कसा असावा अध्यापक कसे असावे, संस्थांनी अध्यापकांची काळजी कशी घ्यावी या विषयी विस्तृत विवेचन केले आहे.
- आयुर्वेद वृद्धीगत होण्यासाठी नवीन ग्रंथनिर्मिती व्हावी. नवीन द्रव्यांचे शास्त्रीय विवेचन करून निघंटू निर्माण व्हावेत. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष रुग्णानुभव मिळावा यासाठी आयुर्वेदीय रुग्णालये व्हावे. काळानुसार प्रभावी व सद्य: फलदायी औषधनिर्मिती व्हावी.
- परदेशात आयुर्वेद शिक्षण देण्यासंदर्भात सरकारने काही धोरणे निश्चित करावी.
- **वैद्य रमेश नानल :** यांनीही या विषयी विस्तृत उहापोह केला आहे.
- आयुर्वेद अध्यापन पद्धती या विषयांवर त्यांनी सहा लेखांची लेखमाला लिहली आहे. त्यात अनेक मुद्दे त्यांनी मांडले आहेत.
- आयुर्वेद विद्यार्थ्यांना प्रथम केवळ आयुर्वेदाचेच शिक्षण द्यावे. ते पूर्ण झाल्यावर पदव्युत्तर अभ्यास क्रमाचे वेळी इतर शास्त्र शिकवावे.
- एकसूत्रतेसाठी संपूर्ण महाराष्ट्रात एकसमान अभ्यासक्रम व अध्यापन शैली असावी.
- आयुर्वेदाच्या अभ्यासासाठी संस्कृतचे उत्तम ज्ञान व्याकरण तंत्रयुक्ती, भाषाशास्त्रीय नियम, इ. हवे. भाषांतरावर आयुर्वेद शिकू नये.

## आयुर्वेद अभ्यासक्रम आणि योग :

- आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमात योगाचा समावेश करण्यास तीव्र विरोध नोंदविला आहे.
- आजच्या प्रचलित योग पद्धतीवर ते टीका करतात.
- केवळ रोगानुसार आसने न देता त्या मागील कार्यकारण भाव, संप्राप्ती भेदात त्यांचे कार्य यांचे संपूर्ण ज्ञान आवश्यक आहे.
- योग व आयुर्वेद यांचे मूळ सिद्धांतही भिन्न आहेत. उदा. योगात चित्तवृत्तीनिरोध आवश्यक आहे. तर आयुर्वेदात वेगांचे चिकित्सेच्या दृष्टीने महत्त्व आहे. (सं. – आ.प. फेब्रु. ८६; आयु.अभ्यासक्रमात योगाचा समावेश)

## आयुर्वेदाच्या प्रचार प्रसार संबंधात :

- आयुर्वेदाचा प्रचार तळागाळापर्यंत व जनसामान्यांमध्ये होण्यासाठी शालेय शिक्षणातच आयुर्वेदाचा अंतर्भाव व्हावा असे ते म्हणतात. कोणते विषय शिकवावे, कोणत्या वर्गात शिकवावे याबद्दलही त्यांनी मार्गदर्शन केले आहे.
- विविध नियतकालिके प्रसार माध्यमे यांची काय भूमिका असावी हे ही ते सांगतात. पण याचबरोबर वैद्यक स्वातंत्र्यावर गदा येऊ नये असा ईशाराही ते देतात.
- विविध परंपरा या प्रचार प्रसाराचे मोठे साधन असून त्यांचे जतन करावे, परंपरामध्ये समन्वय असावा.

✳ स्वास्थ्य परंपरा कोश तयार करावा.

## आयुर्वेद पत्रिका संदर्भात :

✳ पत्रिकेत त्यांनी केलेले लेखन हेच आयुर्वेद शास्त्राच्या दृष्टीने मोठे योगदान आहे.

✳ अनेक वैद्य, विद्यार्थी, शिक्षक, व्यवसायी यांच्यापर्यंत हे विचार त्यामुळे पोहोचले आहेत.

✳ तसेच यामुळे अनेक नवीन विषय, कल्पना यांना चालना मिळाली आहे.

✳ लेखन, प्रत्यक्षचर्चा, पत्रव्यवहार यामाध्यमातून त्यांनी वेळावेळी मार्गदर्शनही केले आहे. जसे नवीन लेखक तयार करणे, वैद्यकीय परंपरांचा परीचय करून देणे.

✳ संशोधनासाठी व्यासपीठ उपलब्ध करणे.

नानल परंपरेत वैशिष्टयपूर्ण औषधे हे वैशिष्टय आढळते. पुढे पुढे या परंपरेवर वैद्य भा.वि.गोखले, वेणीमाधवशास्त्री यांचा प्रभाव आढळतो तसेच नंतर रमेश नानलांची स्वत:ची विचार पद्धती ही आढळते. अशा पद्धतीने परंपरेत भर पडत जाऊन शास्त्राचेही पूरण झालेले आहे.

पुढे त्यांच्या मुलांमध्ये आणि अनेकानेक शिष्यांमध्ये या विचारांचे संक्रमण झालेले दिसते.

✲❖✲❖✲

# ७ चर्चा (Discussion)

## अ) वेणीमाधव शास्त्री परंपरा

वेणीमाधव शास्त्रींच्या लेखनात लेखनात अनेक विध आशयांचा, विषयांचा समावेश आढळतो. उदा. वनस्पती विज्ञान, औषधी, रसकल्प, संशोधन, निदान चिकित्सा, व्याधीवर्णन, नवीनसिद्धांत, अनुभूत कल्प, आयुर्वेदाचे शिक्षण – अध्यापक, विद्यार्थी, आयुर्वेदीयांचे हक्क, त्यांनी काय करावे ? इ.

* त्यांच्या लेखनात ठिकठिकाणी उपमा दिलेल्या आहेत. उदा. निदान म्हणजे रोग्याचे शरीर वाचणे तर लक्षणे म्हणजे रोगमार्गातील कंदील ! व्याधी चिन्हांना शरीराची सांकेतिक भाषा म्हटले आहे.
  नाकाला आर्द्रतामापक यंत्राची उपमा दिली आहे. तसेच त्याला मलद्धारही म्हटले आहे.
* काही नवीन परिभाषाही प्रचलित केली आहे. उदा. गुणदोषांचा परिपोष, परंपरेने कार्य होणे. इ.
* नवीन श्लोकांची, नवीन कविता/प्रार्थनेची रचना केली आहे. (सं. – आ.प. जाने. ७७; औषधीकाल; आ.प. जाने. ८२ भोजनापूर्वी....)
* विशिष्ट विषयानुसार लेखमाला लिहली आहे.
  उदा. अभयाहरितकी (सं. – आ.प. डिसें. ७५, जाने. ७६)
  आंबा (सं. – आ.प. जाने. ७८ ते जुलै ७८; आंबा)
  घर्षण चिकित्सा (सं. – आ.प. एप्रिल ते ऑगस्ट ८२)

### चिकित्सा दृष्टी

* पांचभौतीक व त्रिदोष सिंद्धाताचे महत्त्व सांगतांना, शरीराची भाषा समजण्यासाठी पंचमहाभूते व त्रिदोष पुरेसे आहेत. जसे मूळाक्षरे २६ च पण त्यापासून भाषा व महानग्रंथ निर्माण होतात, असे मत मांडले आहे.
* प्रत्येक संप्राप्ती वायूमुळे घडते, व्यान व अपान संरक्षक आहेत. तसेच प्रत्येक वेळी व्यान प्रकोप इतर वायूसह असतो. सर्वे एव प्रमेहास्तू व्यानापान प्रकोपजः।
* अनुक्तव्याधीची चिकित्सा सांगतांना व्याधीचा प्रथम आत्मदोष लक्षात घ्यावा, त्यानुसार प्रश्न विचारावेत, व स्थान निश्चित करावे, त्या स्थानाची धातू चिकित्सा करावी.
* कॅन्सर विषयी मत मांडतांना कॅन्सर दोषासारखा नाही. दोष काढून टाकता येतात. पण कॅन्सर स्वतः वर्धन पावणारा–शुक्रजातीय आहे. म्हणून हिरक/गुळवेल सारखी वर्धन पावणारी औषधे उपयोगी पडतात.
* धातु विचार दोषांइतकेच धातुंना महत्व दिले आहे. धातुसारासारात्व व धातु दुष्टी ही संकल्पना चिकित्सेत वापरली आहे. प्रत्येक धातु हा तक्त धातु घटीत असून स्थान भेदाने त्यात इतर धातुंचा प्रभाव असतो. दोष फसवे आहेत धातू फसवे नाहीत असा वारंवार उल्लेख करीत.

धातूक्षीणता म्हणजे सूक्ष्मघटक आकाराने कमी होणे किंवा संख्येने कमी होणे.

यांपैकी रसक्षीणतेत धातू आकाराने तर शुक्रक्षीणतेत संख्या कमी होते.

शुक्रक्षीणता आणि शुक्र अव्यक्त होणे या परिभाषेचे स्पष्टीकरण केले आहे.

शुक्रबाहुल्य म्हणजे बलबाहुल्य असा अर्थ घ्यावा असे ते म्हणतात.

औषधी द्रव्यांकडेही धातूंच्याच दृष्टीने बघत. उदा. प्रवाळ, शंख,कमळ,उस, वाळा ही मांससमान द्रव्ये. चारोळी पिस्ता ही मज्जासमान द्रव्ये.

चिकित्सा करतांना धातूसम होण्यासाठी प्रकृती स्थापनी चिकित्सा करावी. यामुळे धातूसम होतात पण उत्तम सार होत नाहीत. म्हणून यासाठी रसायन चिकित्सा करावी. असा विचार मांडला आहे.

## चिकित्सा संदर्भात :

चिकित्सा तत्वे चरकाची उत्तम आहे, असे वैद्य वेणीमाधव शास्त्री म्हणतात. चिकित्सा यशस्वी होण्यासाठी काही सूत्रे व अनुभुत योग त्यांनी सांगितलेले आहेत – उदा.

✳ शोधन कल्प म्हणून आरोग्य वर्धिनी द्यावी.

✳ स्त्रियांसाठी – वराबोळ – आर्तव शुध्दीसाठी द्यावा.

✳ लहानमुलांमध्ये – सुमावसंत वापरावा.

✳ ३५ वर्षाचे पुढे – वृष्ययोग द्यावा.

✳ Antibiotics चा वापर अधिक झालेल्या ––– रूग्णात – सुवर्ण / ताम्र विषनाशक म्हणून वापरावे

✳ प्रथम असार धातू चिकित्सा करावी.

✳ शिर:शूलात रक्तधातूचा विचार करावा रक्तगंत ज्वराचा काढा वापरावा.

✳ निद्रानाश व भ्रम यांत – मज्जायोग द्यावा.

✳ मुतखडा यावर जवरवार व नृत्यकुडलणी (नाचणी द्यावी)

## पंचकर्म

पंचकर्मांपैकी वेणीमाधवशास्त्रींचा रक्तमोक्षणावर भर असे. इतर कर्मे केल्याचा फार कमी उल्लेख आढळतो. पण शुभदाताई, वेणीमाधवांच्या कन्या सांगतात की, रक्तमोक्षण त्यांनी हजारो रूग्णांवर केले. त्यासाठी जळूचा वापर करीत. रक्तमोक्षणावर वेणीमाधव शास्त्रींनी लेखनही केले आहे.

पंचकर्मांचा बोलबाला त्यावेळी विशेष नव्हता. तेव्हा वेणीमाधवांनी सांगितलेले आहे की, शोधन चिकित्सा व रसायन चिकित्सा यांचा अवलंब जर वैद्यांनी केला तर इतर पॅथीला असाध्य रोग आयुर्वेदाला साध्य करता येतील.

रक्तमोक्षणाचे अनुभव. यात विविध प्रकारच्या व्याधींवर रक्तमोक्षण केलेले आढळते. एकंदर ही सर्व उदाहरणे बघितल्यास साक्षात व्याधी स्थानी रक्तमोक्षण केलेले आढळते. उदा. जीभ, टाळू इ. अशा भिन्नभिन्न स्थानी मुख्यत: जळूने रक्तमोक्षण केले आहे व उपशय मिळवला आहे.

(सं. – आ.प. ऑगस्ट ७२; रक्तमोक्षण काही रुग्ण)

एकंदर पाहता व्याधीस्थान हे चिकित्सेचे किंवा रक्तमोक्षणाचे प्रमुख स्थान म्हणून ते निवडतात. आणि ग्रंथात उल्लेख नसलेल्या अशा कल्पनातीत स्थानात रक्तमोक्षण करतात व उपशय मिळवून देतात हे आढळते.

तसेच शरीरात कोठे ही शूल किंवा दाह असेल तेव्हा रक्तमोक्षण करावे असे ते सांगतात.

वेणीमाधवांच्या प्रमाणे शुभदाताईंच्या प्रॅक्टिसमध्ये रक्तमोक्षणाचा वापर अधिक आढळतो. त्याही जळवांचा वापर अधिक करतात. म्हणजे रक्तमोक्षणाची परंपरा त्यांनी पुढे तशीच चालू ठेवलेली आहे. रक्तमोक्षणाची मिमांसा शुभदाताईंनी सप्टें. ११ च्या लेखात अधिक सुस्पष्ट केलेली आढळते.

शुभदाताई म्हणतात की इतर धातूंची दुष्टी आणि रक्ताची दुष्टी यांत अंतर आहे. रक्तदुष्टी अधिक लवकर शरीरात दृढ होते. कारण

१) उत्तरोत्तर धातू अधिकाधिक बलवान व प्रतिकारी असतात, त्यामानाने रक्तधातू हा दुसराच धातू असल्याने प्रतिकाराला इतका बलवान नसतो.

२) रक्ताचे दोष सर्व शरीर व्यापी असतात.

३) अनेकदा रक्तदुष्टी होऊनही लक्षणे व्यक्त होत नाही, कारण ज्या धातूच्या आधाराने लक्षणे व्यक्त व्हायला हवी तो धातू बलवान असेल तर लक्षणे दिसत नाही आणि दोषदूष्य मूर्च्छन मात्र वाढत राहते.

रूक्ष, स्निग्ध, तीक्ष्ण, मृदु असा कोणताही उपचार करून जेव्हा व्याधी बरा होत नाही तेव्हा रक्तधातूची चिकित्सा करावी, विशेषत: रक्तस्त्रुती करावी असे त्या म्हणतात. (सं. - आ.प. सप्टें. ११; रक्तमोक्षण अनुभव)

गुदगत कॅन्सरचा व्रण, गालाचा कॅन्सर, पार्किन्सन, कोंडा या रूग्णांचे अनुभव वर्णन केले आहेत. तसेच योनी कंडू, व्रण, नागिण, टाचदुखी, नखुर्डे, वातरक्त, याही रूग्णांचे वर्णन आहे.

वेणीमाधवांची रक्तमोक्षणाची परंपरा शुभदाताईकडेही तशीच चालू आहे असे आढळते. तीव्र वेदना व दाह असेल तेथे प्रथम रक्तमोक्षणाचा विचार त्याही करतात. पण यासहच पथ्यापथ्य व ग्रंथोक्त रक्तमोक्षणाच्या नियमांचा वापर त्यांच्या प्रॅक्टिस मध्ये आढळतो. उदा. भोजनोत्तर रक्तमोक्षण करीत नाहीत. रक्तमोक्षणानंतर दोन तासांनी लघु, स्निग्ध, ताजे, कोमट, द्रवान्न देतात.

## इतर कर्मांचा वापर :

वेणीमाधवशास्त्री वमन रुग्णास पाणी पिऊन वमन करण्यास सांगत.

सद्य: स्नेहन केलेले आढळते.

तसेच बस्ति चिकित्साही त्यांच्या वापरात आढळते. आणि त्यातही अनेक प्रयोग केलेले आढळतात. उदा. दालचिनी, लवंग यांच्या शर्करेचा वापर, इ. याचा कार्यकारणभाव मात्र समजला नाही.

वमन द्रव्य निवडतांना अवस्था विशेषानुसार द्रव्ये निवडावी असे ते म्हणतात. यासाठी वाग्भटाच्या सूत्राचा अर्थ अधिक स्पष्ट केला आहे.

## अवस्था विशेषनुसार चिकित्सा :

वाग्भटाच्या ज्वरारंभी-वमन या सूत्राचा नवीन अर्थ त्यांनी सांगितला आहे.

वाग्भटाने वमनासाठी मदनफळ व त्यासह पिंपळी इ. द्रव्ये देण्यास सांगितली आहेत. (वाग्भटातील, तत्रोत्क्लिष्टे समुत्क्लेषे) त्याचे विवेचन करतांना इतर द्रव्ये ही पर्यायी द्रव्ये नसून अवस्थेनुसार मदनफळासह वापरावयाची द्रव्ये आहेत असे वेणीमाधवशास्त्री म्हणतात. कारण या द्रव्यांचे गुणधर्म परस्पर विपरीत आहेत. जसे.

लवण – अभिष्यंदकर म्हणून कफ पातळ करेल. वेत्रपत्रोदक, कडुनिंब ही कफ शुष्क करतील. उत्क्लेषात कफाची जी अवस्था असेल त्याला अनुसरून द्रव्याची योजना करावी. कफ हवा तितका सुटा नसेल तर सैंधव, पिंपळी, यष्टी वापरावे. कफ अधिक पातळ असेल तर इंद्रजव, मध, कडुनिंब, वेत्रपत्रोदक वापरावे.

या दोन अवस्थांच्या सूक्ष्म अवस्था कल्पून त्यानुसार पिंपळी, यष्टी, तसेच इंद्रजव इ. च्या गुणधर्माप्रमाणे वापराव्या.

धातूदृष्ट्या सुध्दा अवस्था बघाव्या –

**बलक्षीण रोगी –** अन्नाचे पातळ तर्पण करून त्यासह गेळफळ दयावे.

**रसक्षीण रोगी –** वमनासाठी उसाचा रस वापरावा. रक्तादी धातूंच्या क्षीणतेत याप्रमाणे विचार करावा. (सं. – आ.प. ऑक्टो. ६०; ग्रंथ व ग्रंथांश)

वै. शुभदाताईंशी झालेल्या चर्चेत त्यांनी वेणीमाधवशास्त्रीच्या अनेक चिकित्सा पैलूंवर प्रकाश टाकला. **औषधीकाला**बद्दल त्यांनी विशेष माहिती दिली.

- सकाळी नाश्त्यापूर्वी हा ही ते 'अपानकाल' समजत. तसेच न्याहारीनंतर व्यानकाल. विरेचक औषध रात्रीच्या अपानकाली देत आणि उदान काल रात्री जेवणानंतर.
- सोरियासिस मध्ये व्यान व स्वप्नकाली औषध देत. कारण स्वप्नकाल हा प्राणावरही कार्यकारी. त्वचा हे स्पर्शनेंद्रिय प्राणाचे कार्यक्षेत्र.
- थायरॉईड मध्ये व्यान व उदान काली तुळस व ज्येष्ठमध देत.
- त्रिफळा स्वप्न काली पाण्यासह वर्ज्य मानीत. तर अपानकाली तूप+मीठ+मनुकासह देत.
- हृद्रोग्यांना व्यानकाली औषध देत. रसदुष्टी असतांना– व्यानकाली– आलेरस+तूपगूळ किंवा आलेरस + मधासह औषधे देत.
- कफवातात सामुदग म्हणजे अपान, व्यान व उदान काली औषधे देत.
- रूग्णाचे आवडते अन्न कोणते ते पाहून त्यासह औषधे देत कारण ते लवकर सात्म्य होते आणि प्राणाची तृप्ती करणे हा चिकित्सेचा एक भाग होय.
- उदानकाली रसायन औषधे देत–बल,वर्ण,स्मृतीकर म्हणून.
- वसंतकल्प फक्त उदान काली देत.
- sperm count कमी असतांना, शुक्रधातूसाठी सग्रास औषध देत. तसेच मुहुर्मुहु ही देत. यात विशेषतः फलत + ताजे घृताचा वापर करीत.
- ovulation साठी वृष्यवटी समानकाली वापरीत.
- गंधक रसायन प्रमेहात समानकाली दिले आहे कारण तेथे अग्निवर कार्य अपेक्षित आहे.
- पर्पटी रसायन कार्य करणारी म्हणून अनशापोटी दिली आहे.
- उचकीसाठी सामुद्गकाली औषध वापरीत.
- दूध कफकालात घेऊ नये असे ते म्हणत.
- स्त्री रूग्णांमध्ये रसधातूची चिकित्सा प्राधान्याने करीत. यात लंघन–द्रवाहार विशेषतः मनुकासूप व नंतर

घन आहार असे पथ्य ठेवीत.

**अनुपानाबद्दलही** शुभदाताईंनी विशेष माहिती सांगितली.

✳ चंद्रप्रभा/गुग्गूळ पाण्यांत भिजवून घोटून पिण्यास सांगत. वरून मनुका सूप अनुपान सांगत.

✳ डोळे व केसांसाठी मोरावळा अनुपान व स्वप्नकाली औषध देत.

✳ सर्दी, खोकला, दमा, अतिसार यासाठी दाडिमावलेह अनुपान असे.

✳ कफकाली औषध दिल्यास अनुपानात कफशामक औषधे असत.

वे.मा. शा. स्वतः वृष्यवटी दह्याच्या सायीसह घेत.

**औषधांची मात्रा –**

✳ मात्रा कमी असे. खलून कुटून अनुपानासह देत.

✳ गुग्गुळ १ किंवा २ गोळी अपानकाली देत.

## वैद्य शुभदाताई पटवर्धनांचा चिकित्सा विचार :

✳ शास्त्रीजीं प्रमाणेच **विविध स्थानाची त्वचा विविध धातू घटीत आहे हा विचार** शुभदाताईंच्या लेखनातही आढळतो.

✳ चिकित्सेमध्ये शोधन व नंतर शमन चिकित्सा हा क्रम आढळतो.

✳ संप्राप्ती भंगासाठी आरोग्यवर्धिनी काळ्यामनुका थेंबभर तूप, मीठ यासह सूप वापरतात.

✳ शुक्रधातू सारवान होण्यासाठी वृष्यवटी. काही अवस्थांत शुक्रशोधक द्रव्यांचाही वापर केलेला आढळतो.

✳ व्याधी स्थान विचार करून, तेथील धातूघटक सारवान करणारी चिकित्सा, व स्थानानुसारच अनुपान व औषध काल विचार केलेला आढळतो.

✳ आहार व औषध विचार करतांना प्रामुख्याने कफदोष वर्धन होणार नाही पण कफधातू वर्धक रसायन द्रव्यांचा वापर करावा, असा विचार मांडला आहे.

✳ जांगल देशात गुण लवकर येईल असाही उल्लेख त्या करतात. (सं. – आ.प. डिसे. १४; कॅन्सर विशेषजन्य)

✳ हेतू वर्णन करतांना एक नवीन विचार त्यांनी मांडला आहे की आहारात मधुर रस जर योग्यप्रमाणात घेतला, तो पचला तर कफधातू निमार्ण करतो आणि अती मधुररस, जर पचला नाही तर कफदोष निर्माण करतो. (सं. – आ.प. मार्च १६; कॅन्सर आयुर्वेदीय विचार)

वृषणाच्या कॅन्सर मध्ये, जननेंद्रियांच्या स्नायूंना बल्य म्हणून वंग भस्म – व्यान उदान काली आणि कोथनाशक व शुक्रवर्धक – रौप्यभस्म वापरले आहे.

कफधातू वाढवणारे, वृष्य, वृषणावर कार्यकारी – सुवर्णभस्म तर उत्कृष्ट रसायन – वसंतकुसुमाकर वापरले आहे. म्हणजे स्थानविचार करून चिकित्साद्रव्य निश्चिती केलेली दिसते.

गुदगत कॅन्सरमध्ये इतर चिकित्सा सह स्थानावर कार्यकारी चिकित्सा म्हणून महातिक्त घृत, भगंदर नाशक म्हणून अभयाचूर्ण + प्राणवल्लभ + वंगभस्म + सुवर्णभस्म वापरले आहे.

ब्लड कॅन्सर मध्ये रसधातू, रक्तधातू,रक्तधराकला हा स्थानविचार करून चिकित्सा दिलेली आढळते. उदा.

* यकृत प्लीहेतील संचित मल काढणारी समुद्र शुक्ती (रक्तवर्णी) भस्म.
* यकृत प्लीहावृध्दी वर उपयुक्त – ताम्रभस्म
* रक्तवर्धक, रसरक्तदुष्टीत उपयुक्त – नवायसलोह
* विषघ्न, रक्तप्रसादक – सुवर्णभस्म
* रसायन म्हणून – वसंतकुसुमाकर (सं. – आ.प. जून १६; ब्लड कॅन्सर)

ग्रंथातील सूत्रांचा वापर अनेकदा चिकित्सेत केलेला आढळतो. हे करतांना रुग्ण प्रकृती, व्याधी स्थान यानुसार त्या सूत्राची व्यवहार्यता ते स्पष्ट करतात वाग्भटांनी सूत्रस्थान अ. ४ मध्ये मूत्रावरोधात अवपीडक स्नेह सांगितला आहे. याचा वापर वृक्कर्निहरणाचा सल्ला दिलेला रुग्णात केलेला आढळतो.

सदर रूग्णात तेलाऐवजी तूप देणे योग्य होते. कारण तेल पुरीषबध्द करणारे व मूत्र अल्प करणारे आहे. याच्या कालविचाराचे विश्लषण ही त्यांनी उत्तम केले आहे की सकाळी भूक लागण्यापूर्वीच जर तूप दिले तर ते स्नेहन योग्यतेचे होते. बस्तिच्या सर्व भागांचे स्नेहन करून दोष स्निग्ध होऊन अवयवापासून वेगळे होतात.

पण भूक लागल्यानंतर जर घृत दिले तर ते दोषांचे शमन करते.

भोजनासह दिलेले घृत दोषशमन करून शरीरभावास प्राप्त होते. विषय स्पष्ट करण्याची पद्धतीवर वै.वेणीमाधव शास्त्रींचा प्रभाव आढळतो.

याच रूग्णेत वृष्यवटी ही वापरली आहे. शुक्रक्षेत्राशी संबध्द अवयव विकृती म्हणून वृष्यवटी दिली. तसेच ३५ वर्षानंतरच्या प्रत्येक स्त्री / पुरूष रूग्णास त्या वृष्टी वापरत असा संदर्भ ही आढळतो. वृष्यवटीसह शुक्रधातू बलवान होण्यासाठी अभ्यंगही दिले आहे. इतर औषधांची निवड करतांना बस्तिचे शरीरघटक विशुध्द सारवान व्हावे. म्हणून रसायन चूर्ण तर मूत्रोत्पत्ती अधिक व्हावी यासाठी दगडीबेर, वापरला आहे.

स्थानावर कार्यकारी म्हणून चंद्रप्रभा वापरली आहे. स्त्रोतसांतील विकारकर दोषांना अभिसरणात आणण्यासाठी घर्षण चिकित्सा ही केली आहे. (सं. – आ.प. एप्रिल ८४; बस्ति निष्कासनीय चिकि.)

याचबरोबर शास्त्रीजींप्रमाणेच **औषधीकाल विचार, जलौकेने रक्तस्त्रुती, हेतू विपरीत चिकित्सा** या गोष्टी आढळतात. स्थानाचा विचार करून दिलेली चिकित्सा व अनुपान विचार हे वैशिष्ट्य ही त्यांच्या चिकित्सेत आढळते. शास्त्रीजींची परंपरा तशीच आढळते.

घटसर्पाच्या रूग्णात त्यांनी हिरडा + यष्टीमधू + मीठ+हळद यांचे स्थानिक प्रतिसारण केले आहे. तसेच जलौकांनी स्थानिक रक्तमोक्षण केले आहे.

- कंठ रोगांमध्ये भोजनोत्तर जलसेवन करू नये असे त्या सांगतात. कारण यामुळे कंठ व ३२ स्थानातील श्वासमार्ग व अन्नमार्ग यातील आहाराचा स्निग्धांश धुतला जाऊन घशाचे बल कमी होते. हे अंश प्रमाणत: कमी असले तरी श्रेष्ठ दर्जाचे असतात. हा स्नेह स्वराला ही हितकर असतो.

  योग्य, विस्तृत पथ्यापथ्य व नंतर रसायन चिकित्सा असा क्रमही आढळतो.

पथ्यापथ्यात आहारीय पदार्थांवर भर अधिक आढळतो. उदा. भाजलेल्या तांदळाचा भात, भाताची खीर, कणकेची खीर, लाह्यांची खीर, इ. मूग, मसूर, कुळीय कढण, मनुकांचे सूप, भोजनोत्तर यष्टीमधू, वेलची, खडीसाखर चघळणे, इ. (सं. – आ.प. जुलै १५; घटसर्प एक अनुभव)

योनीकंडूच्या रुग्णात व्याधीस्थान योनी म्हणून योनीच्या बाह्य ओष्ठ स्थानी जलौकांनी रक्तमोक्षण केलेले आहे. तसेच रसपाचक, रक्तपाचक काढ्यांचा वापर आहे.

✍ येथे त्वचाविकार म्हणून औषधे काढ्याच्या स्वरूपात दिली. कारण त्वचा हे रसधातूचे स्थान आहे व काढा रसाला जवळचा आहे ही विशेष दृष्टी आढळते.

आहार योजनेतही रसधातूचे पोषण हा हेतू ठेऊन भात तूप, मीठाने संस्कार करून दिले. अन्यथा कफ वात शामक पेज देता आली असती असे त्या म्हणतात. ही दृष्टीपण विशेष आहे.

काळ्या मनुका मृदुविरेचक, मांसाचे बृंहणकर व वृष्य आहेत. योनी हे शुक्रस्थान आहे. म्हणजे **आहार विचारातही स्थानविचार** प्रामुख्याने आढळतो. (सं. - आ.प. ऑक्टो १५; योनीकंडू)

वै. वायवारू, वै. वेणीमाधवशास्त्री, वै. शुभदाताई अशी **धातूपाचक काढे वापरण्याची** परंपरा येथे आढळते. **शास्त्रींप्रमाणेच शुक्रवर्धक रसायनांचा वापरही** दिसतो.

## वैद्य नानल परंपरा

✳ त्यांच्या लेखांचे शिर्षक वैशिष्ट्यपूर्ण आढळते. उदा. अहिरावण-महिरावण, लसूण-लिंबू या शत्रूंना असे मित्र करा, वाचा आणि विचार करा, संशोधन : आयुर्वेदाचे की आयुर्वेदीयांचे, व्यथा उदर शूलाची कथा चिकित्सेची, इ. अनेक ठिकाणी त्यांची भाषा उपहासात्मक होते. उदा. वेगांचे रोगकर्तृत्व इ.

✳ विविध उपमा - वाक्प्रचार वापरलेले आढळतात. उदा. आयुर्वेदाच्या ज्ञानगंगेच्या तीरावर बसून परकीय विहीरिच्या पाण्याची इच्छा करणारे वैद्य केवळ दुर्मती किंवा दुर्गती असू शकतात.

✳ लेखाबद्दल काही शंका असल्यास संपर्क करण्याची नम्रविनंती अनेक लेखांमध्ये आढळते. यातून आपल्याकडे असलेले -ज्ञान दुसऱ्यांना देणे व तद्विद्यसंभाषेची वृत्ती आढळते. नानलांची शैली शास्त्रीय लेखांमध्ये निबंध स्वरूपात विवेचन करणरी आढळते. तर आयुर्वेदाच्या तत्वावर घाला घातल्यास त्यावर सडेतोड टीका करणारी, तर अनेकदा अभ्यासक म्हणून नम्र झालेली आणि 'नवैद्य प्रभुरायुषः' सारख्या लेखात त्रयस्थ होऊन आत्मपरीक्षण करणारी आढळते.

✳ लेखनात विषयांची विविधता आढळते. उदा. आयुर्वेदीय सिद्धांतांचा गर्भितार्थ सोप्या भाषेत स्पष्ट करणे, परीभाषा, संहिता, संहितासूत्रे यांचे स्पष्टीकरण करणे त्या विषयी आपले वेगळे मत असल्यस ते ससंदर्भ मांडणे. काही शंका असल्यास त्या सर्वांसमोर मांडणे, व्याधी संदर्भातील आपले अनुभव सर्वांसमोर मांडणे. आपल्या परंपरेतील औषधांची विस्तृत माहिती देणे. आयुर्वेदीय शिक्षण पद्धतीचे चिंतन करून ते मांडणे. आयुर्वेदाच्या प्रचार प्रसारासाठीचे मार्गदर्शन करणे, अनुक्त द्रव्यांचे शास्त्रीय विश्लेषण करणे. इ.

✳ लेखनासाठी संदर्भ म्हणून अनेक ग्रंथांचे संदर्भ आढळतात. चरक, सुश्रुत, वाग्भट, भावप्रकाश, काश्यपसंहिता शारंधर संहिता, गदनिग्रह, धन्वंतरी निघंटू, राजनिघंटू, चक्रपाणि, डल्हण, पदार्थचंद्रिका, हेमाद्री, महर्षि पाराशर कृत कृपिसंग्रह, वराहमिहीरांची बृहद्संहिता, उपवनविनोद, वृक्षायुर्वेद, अमरसिंहांचे अमरकोष, मधुकोष टीका, श्रीमद् तिसटाचार्य, आयुर्वेदीय शब्दकोश, म.पु.नानल आयुर्वेदीय शब्दकोश, म.पु. नानल यांचे हस्तलिखित, यावरून त्यांचे बहुवाचनत्वही दिसते.

*  लेखनात विविध न्यायांचे संदर्भ ही आढळतात. इतर शास्त्रातील संशोधनांचा आयुर्वेदीय दृष्टीने विचार करण्याची वृत्ती आढळते. (उदा. मद्यपान..., वाचा आणि विचार करा). शास्त्रीय माहिती सांगतानाच अनुषंगिक माहिती ही दिलेली आढळते. यासाठी साहित्य, कविता, अभंग, म्हणी, श्लोक यांचा वापर केलेला आढळतो. यावरून त्यांचे अवांतर वाचनही भरपूर असल्याचे आणि ते वापरण्याची हातोटी आढळते. अनेक लेखांमधून राष्ट्रीयत्वाचा विचारही आढळतो.

**चिकित्सा दृष्टी**

**वै.म.पु.नानल**

१) दैव व्यपाश्रय चिकित्सा करीत त्यासाठी भाकरीत तीळ + तिखट + तेल उतरवून रस्त्यावर टाकणे, रूईचे पान + हळद + तेल, उतवरवणे हे उपाय वापरीत.

२) नाभीप्रक्षेपासाठी प्रामुख्याने गंधद्राव, किंवा तिळतेल, बलातेल २० मिली प्रमाणात वापरीत. रूग्णास तसेच झोपवून नंतर संवाहनाने ते तेल उदरावर जिरवीत. अग्निमांद्य, अपानवरोध, ज्वर, आक्षेप, इ. व्याधीत विशेषत: नाभीप्रक्षेपकर्म करीत.

**वैद्य भा.पु.नानल**

*  मनोवह स्त्रोतस परीक्षा प्रामुख्याने प्रश्न परीक्षेने म्हणजे आवड–निवड इ. वरून तसेच आकलन शक्तीवरून करीत.
*  आजार/रोगी कोणताही असो. रूग्णपरीक्षण महत्त्वाचा मानीत.
*  आधुनिक तपासणींचा वापर करीत नसत.

चिकित्सेत १) प्रामुख्याति अग्पिखिकित्यस कारीत.

अग्निसाठी – ७ प्रकारची शमन चिकित्सा, स्नेहन स्वेदनही पूर्वकर्मे यांचा वापर बेकरीत.

२) वायूच्या गतीसाठी पंचशोधने.

३) ओजचिकित्सा आढळते.

**वैद्य विलास नानल**

*  यांनी हृद्रोगावर विशेषत्वाने काम केले १९८१ मध्ये 'वातिक हृद्रोग व आयुर्वेदीय मॅनेजमेंट' या दृष्टीने काम सुरू केले.
*  जनकल्याण समितीच्या सहयोगाने एडस् बाधित रुग्णांवर काम केले.
*  संधीवाताच्या विशेष अवस्थेत भारती विद्यापीठासह काम केले.

**वैद्य रमेश नानल**

*  गुणविचार प्राधान्याने केलेला दिसतो.

गंध या गुणाचे सविस्तर विवेचन, करून दाखवले आहे. उदा. गंधाचे पांचभौतिकत्व, प्राकृत गंध, विकृत गंध, चिकित्सतील महत्व गंधग्रहण प्रक्रिया, त्याचे प्रकार, इ. गुणांचा विचार किती सूक्ष्मतेने करता येतो हे इथे स्पष्ट होते.

*  ग्रंथातील कार्मुकसंज्ञा/क्लिष्ट शब्द सोपे करून मांडले आहे. उदा. प्रमाथी. चरकात एका ठिकाणी प्रमाथीचा

अर्थ अनुलोमन असा आहे (सं.च.सू ७/१) तर उदर चिकित्सेत क्षोभकारी असा आहे. (च.चि. १३/१८०) पैकी क्षोभकारी अर्थ अधिक योग्य असल्याचे मत मांडले आहे. या प्रमाथी द्रव्यांचा ही गुणविचार उष्ण, सूक्ष्म, इ. करून चिकित्सेत वापरावे असे ते म्हणतात.

संज्ञाच्या अर्थ निश्चितीसाठी चरकातील अर्थाला विशेष महत्व दिले आहे.

✳ अनुक्त द्रव्यांच्या अभ्यास कसा करावा ? हे आयुर्वेदातील सिद्धांत वापरून सोदाहरण स्पष्ट केले आहे. उदा. पानफुटी, पानकोबी, तंबाखू.

तंबाखूचे वर्णन करतांना तिच्या व्यवायी, विकासी गुणांमुळे ती'विष' असल्याचे अप्रत्यक्षपणे सूचित केले आहे. ''नास्तिमूलंअनौषधम्'' सिद्धांताचा वापरही येथे केला आहे. कारण तंबाखूच्या औषधी प्रयोगांचे वर्णनही आढळते.

✳ वेग संकल्पना मांडतांना पाणिनीच्या शब्दोत्पत्तीच्या प्रक्रियेवरून मांडली आहे.

✳ संप्राप्ती-कृमि संप्राप्तीचे विश्लेषण करतांना संप्राप्तीतील घटक क्लेद व काल यांची विकृती भिन्न-भिन्न हेतूंमुळे कशी घडत जाते हे स्पष्ट केले आहे. यामुळे संप्राप्तीच्या अंशांश विकल्पना स्पष्ट होण्यास मदत होते. त्यावरून नेमकी चिकित्सा- औषधयोजना करता येते. उदा. आम्लपित्त संप्राप्तीत मिरचीच्या उष्णतीक्ष्ण गुणामुळे वृद्धी असल्यास स्निग्ध गुणात्मक घृत योजना करावी पण द्रवगुण वृद्धी असल्यास घृताने अनुपशय मिळेल त्याऐवजी आमलकीमषी वापरावी.

✳ आत्ययिक चिकित्सा करतांना दोषप्रकोप व व्याधी अधिष्ठान आणि विशेष हेतू लक्षात घेऊन चिकित्सा केली आहे.

✳ वाग्भटोक्त अग्र्य संग्रहातील औषधे चिकित्सेसाठी वापरली आहेत. तसेच इतर व्याधी आत्ययिक होउ नये यासाठी प्राण व उदान रक्षक चिकित्सा दिली आहे.

✳ आवृतत्व व्याधीत प्रथम आवरकाची चिकित्सा दिली आहे. परंतु हे करतांना वातप्रकोप होणार नाही अशी चिकित्सा देऊन आश्रयस्थानाची चिकित्सा केली आहे. उदा. कफावृत्तत्व असेल तर वाताचा चल गुण कमी होतो. म्हणून सर गुणाची कफनाशक पिंपळी व गोदुग्ध वापरले आहे. येथे द्रव्यांचा गुणविचार करून चिकित्सा योजना केलेली आढळते.

✳ अनुक्त व्याधी संदर्भात विचार कसा करावा हे सांगतांना त्याचे वातज, पित्तज, कफज, संसर्गज, सान्निपातज रक्तज परीक्षणे करून चिकित्सासूत्र ठरवावे. येथे चरकांच्या सूत्रानुसार हा विचार स्पष्ट केला आहे.

✳ पथ्यापथ्य सांगतांना अनेक आहारीय पदार्थांचे सोपे उपाय सांगितलेले दिसतात. उदा. प्रमेहात भृष्ट धान्य, जवाचे पदार्थ, धान्यांचे पदार्थ, आम्लपित्त, परिणामशूल यातही अनेक सोपे उपाय सांगितले आहे. वै.म.पु. नानलांचा प्रभाव येथे आढळतो. सहज सोपे, घरगुती करण्यासारखे परंतु व्याधीवर कार्यकारी हे उपाय आहेत.

✳ अनेक नवनवीन कल्प नानल परंपरेत आढळतात. नवीन कल्पाची निर्मिती करतांना शास्त्रीय विचार कसा करावा याचे मार्गदर्शनही येथे आढळते बहुविध कल्पनांचा वापर ही येथे आढळतो. पुढील पिढीतही नवनवीन कल्प निर्मितीची परंपरा चालू असल्याच आढळते.

# ८ निष्कर्ष (Conclusion)

**निष्कर्ष :**

**१) वै.वेणीमाधव शास्त्री जोशी यांच्या अनेक नवीन विचारांनी शास्त्राचे पूरण झाले आहे.**

✳ त्यांच्या अभ्यास व चिंतन मननातून चिकित्सेमध्ये धातूंचा विचार ही नवीन चिकित्सा शैली निर्माण केली.

✳ अनेक औषधांच्या निर्मितीत ग्रंथात वर्णित प्रक्रियेपेक्षा बदल केला. तर काही नवीन औषधाची निर्मिती केली आहे.

✳ औषधी कालाचे सविस्तर विवेचन करून व्यवहारात त्याचा वापर केला आहे.

✳ अनुक्त व्याधींचे निदानपंचक संदर्भात मार्गदर्शन केले आहे.

✳ अनुक्त द्रव्यांच्या अभ्यास-गुणकर्म निश्चितीबाबत मार्गदर्शन केले आहे.

✳ घर्षण चिकित्सा ही नवीन चिकित्सा शैली निर्माण केली.

**२) ज्ञानसंक्रमणासाठी ही परंपरा साधन ठरली आहे.**

✳ वै. वेणीमाधव शास्त्रींवर त्यांचे गुरू वै. गोपाळराव वायवारू यांच्या विचारांचा यांचा प्रभाव आहे. त्यांनी अभ्यासाने त्यात भर घालून ही विशिष्ट परंपरा निर्माण केली. त्यांची कन्या वै. शुभदाताई पटवर्धन तसेच त्यांचे अनेकशिष्य वै.अण्णाशास्त्री करमरकर, वै. कानिटकर, वै.पाध्येगुर्जर, वै. भा.द.गोडबोले यांच्यावर या परंपरेचा प्रभाव आढळतो.

**३) वै. नानल परंपरेतील वैद्यांच्या नवीन विचारांनी आयुर्वेद शास्त्राचे पूरण झाले आहे.**

✳ त्यांनी औषधांच्या बहुविध कल्पनांमध्ये अनेक नवीन औषधांची निर्मिती केली आहे. उदा. अर्क, अवलेह, वटी, कल्प, तैले, सूक्ष्मौषधे, गुग्गुळ, आसव, भस्मे, क्षार, इ.

✳ अनेक नवीन प्राणिज औषधे निर्माण केली आहेत.

✳ ग्रंथोक्त औषधे विशिष्ट अवस्थेनुसार वापरण्याचा विचार प्रचलित केला आहे.

✳ अनेक नवीन अनुभूत योगांचे वर्णन केले आहे.

✳ अनुक्त द्रव्यांचा अभ्यास कसा करावा. त्यांच्या गुणकर्मांची निश्चिती कशी करावी हे सोदाहरण सांगितले आहे. उदा. पानकोबी, तंबाखू, पानफूटी.

✳ अनुक्त व्याधी विचार, त्यांचे चिकित्सासूत्र कसे ठरवावे हे कॅन्सर व्याधीचे उदाहरणाने सांगितले आहे.

✳ वचासुवर्ण, ताम्रकुमारी हे विशेष संशोधन या परंपरेत आढळते. अनेक ग्रंथाचे लेखन या परंपरेत आढळते

**४) नानल परंपरा ज्ञानसंक्रमणाचे साधन ठरली आहे.**

वै. पु.ग.नानल यांच्या पासून सुरू झालेली परंपरा पुढे वै. म.पु.नानल, वै.भा.पु.नानल, वै. विलास नानल, वै. रमेश नानल ते वै. सत्यव्रत व आशुतोष नानल अशी अजूनही चालू आहे. यांतील प्रत्येकाने या परंपरेत काही नवीन विचारांची भर घातली आहे. पुढे पुढे या परंपरेत दुसऱ्या परंपरांचा समन्वयही आढळतो. वरील वैद्यावरांच्या शिष्यवर्गातही या परंपरेतील विचारांचा प्रभाव आढळतो.

# ९ संदर्भ साहित्य (Reference and Bibliograbhy)

**संदर्भ साधनांची सूची**

**अ) आयुर्वेद पत्रिका अंक व विशेषांक**

- वेणीमाधवशास्त्री परंपरेतील लेखांची सूची
- नानल परंपरेतील लेखांची सूची

**ब) सर्वसाधारण संदर्भ :**


१) वेणीमाधवशास्त्री विशेषांक – वै. खडिवाले संशोधन संस्था प्रकाशित

२) 'सुप्रजा' – लेखक वेणीमाधवशास्त्री

३) वेणीमाधवशास्त्री विशेषांक – मधुजीवन

४) पु.ग.नानल विशेषांक – प्रकाशक टि.म.वि.

५) गौरवग्रंथ – पुरुषोत्तमोपनिषद – प्रकाशक माधवी

६) म.पु.नानल विशेषांक – मधुजीवन

७) शोधप्रबंधांचा–शोध व बोध – लेखक – ढु.का.संत

८) गीतारहस्य – लेखक – लोकमान्य टिळक

९) मराठी विश्वकोष – संपादक – लक्ष्मणशास्त्री जोशी

१०) इतिहास म्हणजे काय – लेखक – प्रा. वि.गो.लेले


**मुलाखती :**

१. वैद्य रमेश नानल

२. वैद्य शुभदा पटवर्धन

३. वैद्य मा.भा.करंबळेकर

४. वैद्य घाटणेकर

## लेखांची सूची :

आयुर्वेद पत्रिकेतील वेणीमाधवशास्त्री परंपरेतील लेखकांचे लेख.

| | | |
|---|---|---|
| १ | वैद्य वेणीमाधवशास्त्रींचे लेख | |
| २ | वारंवार होणारे पडसे व उपचार | १६ मार्च १९४८ |
| ३ | पांढरे कोड | १६ ऑक्टोबर १९४८ |
| ४ | पांढरे कोड | १ नोव्हेंबर १९४८ |
| ५ | आयुर्वेदी औषधी संशोधन | १६ डिसेंबर १९४८ |
| ६ | आयुर्वेदीय औषधी संशोधन – लेखांक २ रा | १ जानेवारी १९४८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | आयुर्वेदीय संशोधन या क्रमाने व्हावे | १६ सप्टेंबर १९४८ |
| ८ | आक्षेप आणि उत्तरे – २ | १ ऑक्टोबर १९४८ |
| ९ | वैयक्तिक विधानांचा समाचार | १ नोव्हेंबर १९४८ |
| १० | शक्तीदायक हिवाळा व पुरक अन्ने | १६ डिसेंबर १९४८ |
| ११ | आपला व्यवसाय अभ्यासाचा आहे | १ फेब्रुवारी १९५० |
| १२ | भाजलेल्या पांढऱ्या मातीचे गुणधर्म | १६ ऑक्टोबर १९५० |
| १३ | अशास्त्रीय व बेजबाबदार विधाने – | १ सप्टेंबर १९५१ |
| १४ | अशास्त्रीय विधाने – मीठ | १६ नोव्हेंबर १९५१ |
| १५ | टायफॉइडचे निदान व चिकित्सा | १ नोव्हेंबर १९५१ |
| १६ | टायफॉइडचे निदान व चिकित्सा | १६ नोव्हेंबर १९५१ |
| १७ | टायफॉईडची आयुर्वेदीय चिकित्सा | १ डिसेंबर १९५१ |
| १८ | आयुर्वेद संशोधन हे वैद्याचे कार्यक्षेत्र आहे | १ मार्च १९५३ |
| १९ | आजकाल आयुर्वेदीय चिकित्साच होत नाही | १ एप्रिल १९५३ |
| २० | ही नीलज्योती आहे | १ डिसेंबर १९५३ |
| २१ | बोटे रुग्णालय व तृष्णा रोगी | १ जुन १९५३ |
| २२ | आयुर्वेदातील अमोल पारदौषधीचे संशोधन | १ ऑक्टोबर १९५५ |
| २३ | वनस्पती गुणकर्म विज्ञानाचे मुद्दे | १६ जानेवारी १९५३ |
| २४ | वनस्पती गुणकर्म विज्ञानाचे मुद्दे | १ फेब्रुवारी १९५६ |
| २५ | आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद | १ ऑगस्ट १९५६ |
| २६ | द्राक्षा द्रव्याच्या गुणधर्मांचा अभ्यास, आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद | १ ऑगस्ट १९५६ |
| २७ | पिंपळीचे गुणधर्म | १ ऑगस्ट १९५६ |
| २८ | रसपर्पटी व गंधकरसायन | १ ऑगस्ट १९५६ |
| २९ | आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद (स्वस्थवृत्त) | १६ सप्टेंबर १९५६ |
| ३० | आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद (रोगनिदान) | १ ऑक्टोबर १९५६ |
| ३१ | अध्यापक चर्चा –प्रसूति तंत्र प्रश्नोत्तरे | १६ जानेवरी १९५६ |
| ३२ | चिकित्साधिष्ठान पुरुष, चिकित्सा व व्याधी लक्षणे | १ फेब्रुवारी १९५९ |
| ३३ | आयुर्वेद व आयुर्वेदीय औषधे यांच्या व्याख्या | १६ एप्रिल १९५९ |
| ३४ | मला झालेले डॉ. भाऊसाहेब यांचे दर्शन | १६ एप्रिल १९५९३ |
| ३५ | मला भेटलेले श्रेष्ठ वैद्य कै. वेणीमाधवशास्त्री जोशी | १६ जुलै १९६१ |
| ३६ | आशुकारी व्याधि – लक्षणे व आयुर्वेद | १६ मे १९६३ |
| ३७ | ज्वर निदान | ऑगस्ट १९६३ |

| | | |
|---|---|---|
| २८ | ज्वर प्रकार | सप्टेंबर १९६३ |
| २९ | ज्वर संप्राप्तिभेट | ऑक्टोबर १९६३ |
| ३० | ज्वर प्रकारांची लक्षणे | नोव्हेंबर १६३६३ |
| ३१ | ज्वराची पूर्वरूपे | डिसेंबर १९६३ |
| ३२ | ज्वर पूर्वरूपे (लेखांक ६ वा) | फेब्रुवारी १९६४ |
| ३३ | मिर्चीच्या अतिसेवनाचा अनिष्ट परिणाम - आक्षेपक | मार्च १९६४ |
| ३४ | ज्वरपूर्वरूपे | एप्रिल १९६४ |
| ३५ | ज्वरनिदान - चरक व सुश्रुतोक्त ज्वर - पूर्वलक्षणे | जुन १९६४ |
| ३६ | ज्वर निदान विचार | ऑक्टोबर १९६४ |
| ३७ | ज्वर - निदान - विचार (चालु) | जानेवारी १९६४ |
| ३८ | आमचे अण्णा | जुलै १९६७ |
| ३९ | काही आयुर्वेदीय शिक्षण संस्था | ऑगस्ट १९६७ |
| ४० | महात्मा गांधी, स्वास्थ्य व वैद्यक | नोव्हेंबर १९६८ |
| ४१ | निदान परिसंवाद मार्गदर्शन | एप्रिल १९७० |
| ४२ | रक्तमोक्षण - काही रुग्ण | ऑगस्ट १९७२ |
| ४३ | अभया - हरितकी | डिसेंबर १९७५ |
| ४४ | अभया - हरितकी | जानेवारी १९७६ |
| ४५ | वातजकफप्रसेक | एप्रिल १९७६ |
| ४६ | वैद्य बिंदुमाधव शास्त्री यांची वैशिष्ठ्ये | जुलै १९७६ |
| ४७ | नित्यं सर्वरसाभ्यास: | ऑगस्ट १९७६ |
| ४८ | जीवोत्तमा मानवी युवती | सप्टेंबर १९७६ |
| ४९ | आयुर्वेदाच्या मिश्र अभ्यासक्रमाचा इतिहास व आयुर्वेदाचे भवितव्य | डिसेंबर १९७६ |
| ५० | औषधीकाल | जानेवारी १९७७ |
| ५१ | ॲक्युपंक्चरच्या निमित्ताने आयुर्वेदीय शोधांचा शोध | एप्रिल १९७७ |
| ५२ | गोपाळरावांची महत्ता | जुलै १९७७ |
| ५३ | आंबा | जानेवारी १९७८ |
| ५४ | आंबा | फेब्रुवारी १९७८ |
| ५५ | रान आंबा | मार्च १९७८ |
| ५६ | पक्काम्र | एप्रिल १९७८ |
| ५७ | आंबा | एप्रिल १९७८ |
| ५८ | आंबा | जुलै १९७८ |

| | | |
|---|---|---|
| ५९ | सुप्रजोत्पादन का व कसे ? | जुलै १९७९ |
| ६० | प्रीति | ऑगस्ट १९७९ |
| ६१ | प्रीति | सप्टेंबर १९७९ |
| ६२ | आसवारिष्ट कल्पना हा क्रांतिकारक शोध | सप्टेंबर १९७९ |
| ६३ | 'स्तन्य-प्रीति' (वात्सल्य) | ऑक्टोबर १९७९ |
| ६४ | प्रत्येक स्थूलधातूचे सूक्ष्म-सप्तधातुघटकत्व | नोव्हेंबर १९७९ |
| ६५ | हृदय शारीर व हृद्रोग | मार्च १९८० |
| ६६ | असाध्य हृद्रोगी आयुर्वेदीय चिकित्सेने पूर्ण साध्य | मार्च १९८० |
| ६७ | हृद्रोगाच्या आणखीन काही रुग्णांच्या चिकित्सा | मार्च १९८० |
| ६८ | प्रत्येक स्थूलधातूंचे सूक्ष्मधातूघटकत्व | ऑगस्ट १९८० |
| ६९ | प्रत्येक स्थूलधातूंचे सूक्ष्मधातूघटकत्व | सप्टेंबर १९८० |
| ७० | गर्भोत्पादनातील रजाचा वाटा | ऑक्टोबर १९८० |
| ७१ | रक्तावृत्त प्राणोदान प्रकोपज शिर:शुल | सप्टेंबर १९८१ |
| ७२ | संप्राप्ती | ऑक्टोबर १९८१ |
| ७३ | वातजकास चिकित्सा | डिसेंबर १९८१ |
| ७४ | भोजनापूर्वी आयुर्वेदीयांनी या प्रार्थना कराव्यात | जानेवारी १९८२ |
| ७५ | घर्षण चिकित्सा | एप्रिल १९८२ |
| ७६ | घर्षण चिकित्सा | मे १९८२ |
| ७७ | घर्षण चिकित्सा | जुन १९८२ |
| ७८ | घर्षण चिकित्सा | जुलै १९८२ |
| ७९ | घर्षण चिकित्सा | ऑगस्ट १९८२ |
| ८० | रक्तमोक्षणाच्या प्रभावाची कारण मिंमासा | ऑक्टोबर १९८२ |
| ८१ | असाध्यावस्थेतील रोगाची आयुर्वेदीय सफलचिकित्सा | जुलै १९८३ |
| ८२ | आवृत वात निदान चिकित्सा | मे १९८४ |
| ८३ | आवृत वायूंच्या ग्रंथोक्त लक्षणावर काही शंका व त्यांचे निरसन | मे १९८४ |
| ८४ | वात्सल्य | मे १९८४ |
| ८५ | जन्मत: उत्पन्न झालेला हृद्रोग | सप्टेंबर १९८४ |
| ८६ | ज्वरपंचककषाय | जुलै २००३ |

**२) वैद्य शुभदाताई पटवर्धनांचे लेख**

| | | |
|---|---|---|
| १ | स्वर भेद (वातज रोहिनी अनु.) | २८ जुलै ९५ |
| २ | योनीकंडू | २८ ऑक्टो. ९५ |

| | | |
|---|---|---|
| ३ | कॅन्सर आयु. विचार व चिकित्सा | डिसे. ९५ |
| ४ | वृषणाचा कॅन्सर | मार्च ९६ |
| ५ | गुदगत कॅन्सर | मे ९६ |
| ६ | ब्लड कॅन्सर | जून ९६ |
| ७ | सुवर्ण कल्प रूग्णानुभव | ऑक्टो. ९७ |
| ८ | अनुभविक चिकित्सा शिर:शूल | डिसे. ९७ |
| ९ | रक्तमोक्षण प्रॅक्टीस मधील काही अनुभव | सप्टें. ९९ |
| १० | रक्तमोक्षण प्रॅक्टीस मधील काही अनुभव | ऑक्टो. ९९ |
| ११ | रजोनिवृत्तीकाल | एप्रिल ९९ |

**आयुर्वेद पत्रिकेतील नानल परंपरेतील लेखकांची सूची**

**१) वैद्य भा.पु.नानल**

| | | |
|---|---|---|
| १ | पहिले आंतरराष्ट्रीय आयुर्वेद महासंमेलन | जून ७५ |
| २ | महाराष्ट्र आयुर्वेद संमेलन तिसरे अधिवेशनात अध्यक्षीय भाषण | एप्रिल ८२ |
| ३ | वातघ्न तेलांचा युक्तीकृत उपयोग | एप्रिल ८९ |
| ४ | वातघ्न तेलांचा युक्तीकृत उपयोग | मे ८९ |

**२) वैद्य म.पु.नानल –**

| | | |
|---|---|---|
| १ | अनुभविक चिकित्सा | जुलै ६१ |
| २ | अनुभविक चिकित्सा | ऑगस्ट ६१ |
| ३ | अनुभविक चिकित्सा | सप्टेंबर ६१ |
| ४ | अनुभविक चिकित्सा | ऑक्टोबर ६१ |
| ५ | अनुभविक चिकित्सा | नोव्हेंबर ६१ |
| ६ | अनुभविक चिकित्सा | डिसेंबर ६१ |
| ७ | अनुभविक चिकित्सा | जानेवारी ६२ |
| ८ | अनुभविक चिकित्सा | फेब्रुवारी ६२ |
| ९ | अनुभविक चिकित्सा | मार्च ६२ |
| १० | अनुभविक चिकित्सा | एप्रिल ६२ |

**३) वैद्य विलास नानल –**

| | | |
|---|---|---|
| १ | यकृदाल्यूदर एकरुग्ण पत्रिका | १५ मे ७९ |

**४) वैद्य रमेश नानल**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभावी औषधे व आत्यायिक चिकित्सा | जानेवारी १९७७ |
| २ | प्रभावी औषधे व आत्यायिक चिकित्सा | फेब्रुवारी १९७७ |

| | | |
|---|---|---|
| ३ | हलीमक | ऑगस्ट १९७७ |
| ४ | आत्यायिक चिकित्सा | मार्च १९७८ |
| ५ | द्राक्षा | एप्रिल १९७८ |
| ६ | कलिंगड | मे १९७८ |
| ७ | जंबुफळ | जून १९७८ |
| ८ | संधोगतवात | जुलै १९७८ |
| ९ | मद्यपान – सुपरिणाम व दुष्परिणाम | ऑगस्ट १९७८ |
| १० | आमवात | नोव्हेंबर १९७८ |
| ११ | मन:संताप | फेब्रुवारी १९७९ |
| १२ | कृमिसंप्राप्ती व क्लेद विचार | जून १९७९ |
| १३ | विविध बालरोग व एकच गंधद्रव | जुलै १९७९ |
| १४ | अहिरावण महीरावण | डिसेंबर १९७९ |
| १५ | अश्मरी व अवगाहन एक अनुभव | मे १९७९ |
| १६ | कामला चिकित्सा शिबिर एक अनुभव | जून १९७९ |
| १७ | आयुर्वेदाने अपंगोध्दार | मार्च १९८१ |
| १८ | कर्दम विसर्प | जून १९८१ |
| १९ | साम कफावृत मस्तिष्कगत वात | जून १९८१ |
| २० | हृत्शूल | सप्टेंबर १९८१ |
| २१ | संधिगत वात व जलोकावचरण – चिंतन | जून १९८२ |
| २२ | अम्लं हृद्यानां एक अध्ययन | जुलै १९८२ |
| २३ | वाचा व विचार करा | ऑक्टोबर १९८२ |
| २४ | अस्थिमज्जागत आमावृत प्रकुपित वात | डिसेंबर १९८२ |
| २५ | आत्ययिक चिकित्सानुभव | फेब्रुवारी १९८३ |
| २६ | न वैद्यो प्रभुरायुष: | फेब्रुवारी १९८३ |
| २७ | क्षयजकास | मार्च १९८३ |
| २८ | अश्मरी एक चिकित्सानुभव काही प्रश्न | ऑक्टोबर १९८३ |
| २९ | सूक्ष्म सूतशेखर व परिणाम शूल | जानेवारी १९८४ |
| ३० | हस्त मैथून अर्थात शुक्रवेगोदिरण | मे १९८४ |
| ३१ | अभ्यासकाची शंका | सप्टेंबर १९८४ |
| ३२ | संशोधन आयुर्वेदाचे का आयुर्वेदार्यांचे ? | नोव्हेंबर १९८४ |
| ३३ | कार्मुक संज्ञाचा विचार प्रमाथि | जानेवारी १९८५ |

| | | |
|---|---|---|
| ३४ | क्षीर घृताभ्यासो रसायनानाम् | फेब्रुवारी १९८५ |
| ३५ | आशा करता स्वास्थ्याची | एप्रिल १९८५ |
| ३६ | श्रीखंड एक सोपा रसायन प्रयोग | जून १९८५ |
| ३७ | कफावृत्त प्राणोद्दान | जुलै १९८५ |
| ३८ | आयुर्वेदज्ञ योगाभ्यासकांकडून आमच्या अपेक्षा | ऑगस्ट १९८५ |
| ३९ | संशोधकांना अनावृत्त प्रश्न | ऑक्टोबर १९८५ |
| ४० | जृम्भा (जांभई) वेग विचार | जानेवारी १९८६ |
| ४१ | आयुर्वेदाभ्यासक्रमात योगाचा समावेश का ? | फेब्रुवारी १९८६ |
| ४२ | लसूण व लिंबू या आहारातील शत्रूंना असे मित्र करा | जून १९८६ |
| ४३ | योगविषयक चर्चा उत्तर | जुलै १९८६ |
| ४४ | वाचकांच्य प्रतिक्रिया | सप्टेंबर १९८६ |
| ४५ | अरिष्ट लक्षण अनुभव | ऑक्टोबर १९८६ |
| ४६ | अभ्यासकांच्या शंका | डिसेंबर १९८६ |
| ४७ | प्रमेहरोग | फेब्रुवारी १९८७ |
| ४८ | तमाखू | एप्रिल १९८७ |
| ४९ | मला समजलेले अण्णासाहेब गोगटे | सप्टेंबर १९८७ |
| ५० | लोकस्वास्थ्य परंपरा एक उपयुक्त परंपरा | डिसेंबर १९८७ |
| ५१ | प्रमेह व भृष्ट धान्य प्रयोग | मे १९८८ |
| ५२ | पानकोबी – आयुर्वेदीय विचार | सप्टेंबर १९८८ |
| ५३ | आयुर्वेदातील नवे प्रवाह | ऑक्टोबर १९८८ |
| ५४ | मिश्रशिक्षित वैद्यांना आवाहन | डिसेंबर १९८८ |
| ५५ | परिभाषा निश्चिती – एक प्राथमिक आवश्यकता | सप्टेंबर १९८९ |
| ५६ | गर्भउपघातकरभाव | जानेवारी १९९० |
| ५७ | गुणचिंतन | फेब्रुवारी १९९० |
| ५८ | वर्षाऋतु लंघन क्यों और कैसे ? | जुलै १९९० |
| ५९ | परिणाम शूल-हेतू लक्षण एवं सुलभ उपचार | ऑक्टोबर १९९० |
| ६० | माझे लेले मास्तर | मार्च १९९१ |
| ६१ | अस्थिमज्जागत आमवृतवात | जून १९९१ |
| ६२ | वमन सोपा पण प्रभावी उपाय | सप्टेंबर १९९१ |
| ६३ | आम्लपित्त व आयुर्वेदाचे वैशिष्टय | मार्च १९९२ |
| ६४ | व्यथा उदरशूलाची कथा आयुर्वेद चिकित्सेची | मार्च १९९२ |

| | | |
|---|---|---|
| ६५ | बस्ति चिकित्सा काही अनुभव | ऑक्टोबर १९९२ |
| ६६ | संहिता सूत्रांचा व्यवहार | जानेवारी १९९३ |
| ६७ | नवीन रोगोंका विचार | मार्च १९९४ |
| ६८ | नवीन रोगोंका विचार | एप्रिल १९९४ |
| ६९ | सात्विक व्यक्तिमत्त्व व लेखन | जुलै १९९४ |
| ७० | अंडे प्राचीन एवं आधुनिक विचार | जानेवारी १९९५ |
| ७१ | आम्लपित्त हेतुस्कंध विचार | फेब्रुवारी १९९५ |
| ७२ | आम्लपित्त हेतुस्कंध विचार विमर्श | मार्च १९९५ |
| ७३ | अम्लपित्त हेतुस्कंध विचार | एप्रिल १९९५ |
| ७४ | आरोग्य चाचणी विनामुल्य, सुलभ, निर्धोक पद्धती | ऑगस्ट १९९५ |
| ७५ | आरोग्य चाचणी विनामुल्य, सुलभ, निर्धोक पद्धती | सप्टेंबर १९९५ |
| ७६ | शालेय अभ्यासक्रमात आयुर्वेद प्रयोजन विचार | फेब्रुवारी १९९६ |
| ७७ | शालेय शिक्षण आयुर्वेद विषय | फेब्रुवारी १९९६ |
| ७८ | अग्निदीपन व स्नेह | एप्रिल १९९६ |
| ७९ | पंचीकरण विचार व त्याची व्यवहार्यता | मे १९९६ |
| ८० | नवीन वनस्पतिज औषधी निर्माण - आयुर्वेदीय दृष्टिकोन | डिसेंबर १९९६ |
| ८१ | हलीमक | एप्रिल १९९७ |
| ८२ | प्राचीन भारतीय देश विचार आयुर्वेद दृष्टिकोन | जुलै १९९७ |
| ८३ | सुवर्णचिकित्सा अनुभव | ऑक्टोबर १९९७ |
| ८४ | व्याधी-कॅन्सर-आयुर्वेदीय विचार | फेब्रुवारी १९९८ |
| ८५ | आरोग्य विज्ञान विद्यापीठ | एप्रिल १९९८ |
| ८६ | हृद्रोगाची अनुभूत औषधे | जुलै १९९८ |
| ८७ | आयुर्वेद प्रसारार्थ आयुर्वेदीय नियतकालिकांची भूमिका काय असावी ? | ऑगस्ट १९९८ |
| ८८ | आयुर्वेद पत्रिका सुवर्ण महोत्सवानिमित्त - प्रातिनिधिक मनोगत | ऑक्टोबर १९९८ |
| ८९ | स्त्रीरोग, बालरोग अनुभूत चिकित्सा | ऑगस्ट १९९८ |
| ९० | रोगांचे आयुर्वेदीय वर्गीकरण | फेब्रुवारी १९९८ |
| ९१ | वैद्यक परंपरा अभ्यास | मार्च २००१ |
| ९२ | श्वास मुख विस्त्रता | नोव्हेंबर २००१ |
| ९३ | आयुर्वेदाला स्वातंत्र्य हवेच | जानेवारी २००२ |
| ९४ | कफज हृद्रोग विचार | मार्च २००२ |
| ९५ | आयुर्वेदीय अध्यापन पद्धती एक मुक्त विचार | मे २००२ |

| | | |
|---|---|---|
| ९६ | आयुर्वेदीय अध्यापन पद्धती एक मुक्त विचार | जुन २००२ |
| ९७ | आयुर्वेदीय अध्यापन पद्धती एक मुक्त विचार | जुलै २००२ |
| ९८ | आयुर्वेदीय अध्यापन पद्धती एक मुक्त विचार | ऑगस्ट २००२ |
| ९९ | आयुर्वेदीय अध्यापन पद्धती एक मुक्त विचार | सप्टेंबर २००२ |
| १०० | आयुर्वेदीय अध्यापन पद्धती एक मुक्त विचार | ऑक्टोबर २००२ |
| १०१ | कफज हृदरोग उपशय - अनुपशय | डिसेंबर २००२ |
| १०२ | मधुमेह व भर्जित धान्य | ऑगस्ट २००३ |
| १०३ | कै. मो.य.लेले स्मृती लेख - नवीन वनस्पतिज औषधि निर्माण आयुर्वेदीय दृष्टीकोन भाग - १ | डिसेंबर २००३ |

---

**'संक्षिप्त' परिभाषा** : आ.प. - आयुर्वेद पत्रिका; शो.प्र. - शोध प्रबंध

---

☼❖☼❖☼

# १० परिशिष्ट (Annexure)

**परंपरा व परिचय :**



**वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी**

१.३.१ वेणीमाधवशास्त्री जोशी परंपरा

- अ. वेणीमाधवशास्त्री जोशी वंशवेल
- ब. वेणीमाधवशास्त्री जोशी शिष्य परंपरा
- क. परिचय

१.३.२ नानल परंपरा

- अ. नानल परंपरा वंशवेल
- ब. नानल शिष्य परंपरा
- क. परिचय

## १.३.१ अ. वेणीमाधवशास्त्री जोशी वंशवेल

वैद्य वेणीमाधव

| वैद्य सुनंदा (समुद्र) | डॉ. अशोक | वैद्य शुभदा (पटवर्धन) |
|---|---|---|
| अमेरिकेत स्थायिक | संशोधक<br>अमेरिकेत स्वत:ची कंपनी | |

## वेणी माधव शास्त्री शिष्य परंपरा

वैद्य श्री.कृ.करमरकर, वैद्य कोल्हटकर, वैद्य स.दि.कामत, वैद्य अण्णा कामत, वैद्य पाध्येगुर्जर, वैद्य कृ.के. कानिटकर

**वैद्य शुभदाताई पटवर्धन यांचे शिष्य –** वैद्य स्वाती पवार, वैद्य माणिक लोणकर, वैद्य अर्चना मुळे व वैद्य गौतमी शिरवाईकर

## परीचय :

## वैद्य श्री वेणीमाधवशास्त्री बाळाजी जोशी

| | | |
|---|---|---|
| जन्म | : | ३ जुलै १८९६ |
| जन्मस्थळ | : | पिंपळनेर-धुळे जिल्हा |
| १९१५ | | शिक्षक व्यवसाय. नंतर असहकार चळवळीत महात्माजींचे आदेशावरून नोकरी सोडली. |
| १९२९-३० | | सातारा आ. महाविद्यालयाचे अध्यापक. |
| १९३२-३६ | | सर्व महाराष्ट्रात आयुर्वेद व्यवसाय व शिक्षण पहाण्यासाठी प्रवास. |
| | | १९३७ ते ४३ प्राचार्य - आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय सातारा. |
| | | अर्कशाला डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष - व. पहिले विश्वस्त. |
| | | आयुर्वेद मीमांसाचे प्रधान संपादक. |
| १९४० | | महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन अहमदनगरचे अध्यक्ष |
| १९४२-४४ | | आयुर्वेद व युनानी सिस्टिम्स् ऑफ मेडिसिन बोर्ड फॅकल्टीचे सभासद |
| १९४३-४४ | | मुंबईत फणसवाडीत वैद्यक व्यवसाय - पंचकर्म चिकित्सा |
| १९५३-५८ | | नागपूर-युनिव्हर्सिटी-पारद संस्कार योजना (प्रमुख-आयुर्वेद विभाग) रीडर |
| १९५५-५६ | | आयुर्वेद सेवासंघ नाशिक, अध्यक्ष |
| १९५८ | | महाराष्ट्र संशोधन बोर्ड सभासद |
| | | गणेशपुरी - कायाकल्प - प्रयोग, मुख्य सल्लागार |

- **आयुर्वेद भवन निर्मिती –** बाह्यरुग्ण विभाग - प्रधान चिकित्सक
- **आयुर्वेदीय शब्दकोश –** निर्मितीची जबाबदारी. विश्वकोशे - आयुर्वेद विभागीय संपादक मुंबई वैद्य सभा अध्यक्ष १९७० ते ७७
- **आयुर्वेद विज्ञान मंडळ –** मुंबईचे अध्यक्ष १९६२ ते १९८४
- **पुस्तके –** १. सुलभ आयुर्वेदीय औषध योजना, २. आयुर्वेद सायन्स ऑफ लाईफ, ३. सुप्रजा
- महाराष्ट्र आयुर्वेद महाविद्यालयात २ वर्षे स्वतंत्र वर्गामध्ये अध्यापन १९३९-४० शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीचे सभासद व आयुर्वेद प्रवीण अभ्यासक्रमाची निर्मिती.
- निखिल भारतीय विद्यापीठाचे व मुंबई विद्यापीठ आयुर्वेद विभागीय व परीक्षांचे परीक्षक. मुंबई विद्यापीठातील आयुर्वेद : विभागात विविध समित्यांचे सदस्य, अध्यक्ष
- **संशोधन –** नागपूर येथे पारद संशोधन योजनेचे रीडर, म्हणून काम केले.

१९८५ महर्षि अण्णासाहेब पटवर्धन वेद्यकीय पुरस्कार.

## इतरांच्या नजरेतून :

जून १९५३ च्या अंकात वेणीमाधवशास्त्रींचा परिचय आला आहे. यात त्यांच्या गुरूंचा उल्लेख आढळतो.

सातारा येथे असतांना डॉ. मोरोपंत आगाशे नंतर अहमदनगर येथे वैद्य वायवारू आणि गुणेशास्त्री.

वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांनी आयुर्वेद शिक्षणास प्रारंभ केला होता. ४ वर्षांचा अभ्यासक्रम २वर्षातच पूरा केल्याचा उल्लेख आढळतो. बडोद्याहून आयुर्वेदरत्न व नंतर आयुर्वेदाचार्य म्हणून पदवी मिळवली.

त्यांनी ॲलोपॅथी, बायोकेमिक, होमिओपॅथी, नॅचरोपॅथी, क्रोमोपॅथी, हायड्रोपॅथी, कायरोप्रॅक्टिसची मूलतत्त्वे यांचा अभ्यास केल्याचा उल्लेख आढळतो.

दोषविचारासोबत दूष्यविचार किंवा अधिक महत्त्वपूर्ण दूष्यविचार करून निदान करणे, ही त्यांची वैशिष्ट्ये होती असे मत आढळते.

त्यांच्या षष्ठयब्दीपूर्ती निमित्त त्यांचे अभिष्टचिंतन करणारा लेख आहे. यातही गुरू वै. वायवारू यांच्या पासून घेतलेले ज्ञान व त्याचा पुढे केलेला प्रसार याचा उल्लेख आढळतो.

त्या काळातील राजकीय घडामोडींचा उल्लेखही यात आढळतो. उदा. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, मराठी भाषिकांचे एकत्रीकरण, इ. महाराष्ट्रात आयुर्वेदाचे विद्यापीठ निर्माण होऊन तेथे संशोधनाचे, अभ्यासाचे कार्य व्हावे, अशी ईच्छाही आढळते. (सं. - आ.प. १ जुलै १९५६)

वेणीमाधवशास्त्री जोशी यांना डिसें. ८५ मध्ये महर्षि अण्णासाहेब पटवर्धन पुरस्काराचे मानकरी वै. वेणीमाधवशास्त्री यांच्या पुरस्कार कार्यक्रमाची वार्ता आहे. यात श्रीराम शर्मा आपल्या भाषणात म्हणतात की - वेणीमाधवशास्त्रींचे आयुर्वेद शिक्षण, संशोधन, औषधी निर्माण, संघटनात्मक कार्य चालू आहे. (या वयातही), त्यांचेकडे आयुर्वेदाचे विद्यार्थी तसेच इतरही तज्ञ डॉक्टर शिकण्यास जातात, आणि त्यांचे कार्य अनुसंधाना विरहीत होत नाही. वेणीमाधवशास्त्री औषधोपचार सांगण्यात गुप्तता पाळत नाहीत.

पुरस्काराला उत्तर देतांना वेणीमाधवशास्त्री म्हणतात की, डॉ. मोरोपंत आगाशे माझे गुरू त्यांचेकडून मी ॲलोपथी शिकलो. नंतर आयुर्वेद शिकण्यासाठी ते वेणीमाधवशास्त्रींचे शिष्य झाले. त्याचप्रमाणे डॉ. अ. वि. केतकर हे त्यांचे ॲलोपॅथीचे गुरू पुढे आयुर्वेद शिकण्यासाठी त्यांचे शिष्य झाले.

म्हणजे 'गुरूंचेही गुरू' हे वाक्य त्यांना खऱ्या अर्थानेही लागू पडते.

वैद्य धामणकरांच्या रसशास्त्रावरील ग्रंथालाच गुरू मानून रसशास्त्राचा अभ्यास केल्याचा उल्लेखही ते करतात.

त्यांना मिळालेल्या १०,०००/- रू. च्या देणगीतून आयुर्वेद संशोधनासाठी ट्रस्ट उभारण्याचा मनोदय ही येथे आढळतो.

डिसें. ८५ च्याच अंकात वै. वि.म.गोगटे यांचा वेणीमाधवशास्त्री बद्दल लेख आहे. यात वै. गोगटे व वेणीमाधव एकाच वर्गात नगर येथे शिकत होते. हा उल्लेख आढळतो. त्यांचे शिक्षक म्हणून वै.गुणे, वै. वायवारू, वै. एकतारे, वै. पुणतांबेकर, डॉ. केतकर होते. तसेच वै. गोपालशास्त्री वायवारू यांचेशी सतत वेणीमाधवशास्त्री चर्चा करीत हा उल्लेख आढळतो.

वर्गात मोडी लिपीत नोट्स काढीत, पहाटे उठून चरक, सुश्रुतादी ग्रंथांचे वाचन करीत असे ही आढळते. वै. वायवारूंचे न्यायसांख्य मिमांसासाठी, शास्त्राधिष्ठित आयुर्वेद शिकण्यासाठी ते नगरला आले होते असा

उल्लेखही आढळते.

वैद्य वायवारूंपासून वै. वेणीमाधवशास्त्रींनी हा बोध घेतला की आयुर्वेदाचा विचार केवळ दोष विचाराने सिमित नसून धातूमलांच्या अंशांश कल्पने शिवाय त्याला पूर्णत्व नाही. आयुर्वेदातील प्रत्येक सूत्र मग ते शारीर, द्रव्यगुण, निदान वा चिकित्सेचे असो, याच निकषावर पडताळले पाहिजे हा उल्लेख आढळतो.

वेणीमाधवशास्त्री प्रयोगशील होते. अनेक रसायनांचे कठीण प्रयोग ते करीत/करवून घेत. जिवंत विषारी सापाच्या तोंडात औषध ठेऊन त्याचा शिरच्छेद करून त्याचे संपूट लावून नेत्रांजन केल्याचा उल्लेख यात आहे.

पारदाचा वनस्पतींवर प्रभाव ही वायवारूंची कल्पनाही त्यांनी पुढे नेली.

वेणीमाधवशास्त्री कट्टर आयुर्वेदाचे पुरस्कर्ते असल्याचा उल्लेख वै. गोगटे करतात. वेणीमाधवांना मिळालेल्या यशामागे आयुर्वेदीय उपदेशांचा आदर आणि राष्ट्रीय भावना असल्याचेही वै. गोगटे नमूद करतात.

डॉ. आगाशे यांनी दिलेले ॲलोपथीचे ज्ञान यामुळे आजच्या बुध्दीवंतांना आयुर्वेद त्यांना शिकविता येतो, पटवता येतो आणि वै. गोपाळराव वायवारूंच्या विचारसरणीचे वृक्षरूप करण्यात ही वेणीमाधवांचे योगदान मोठे आहे असेही ते म्हणतात. ही एक विशेष विचारप्रणाली असल्याचेही ते या ठिकाणी नमूद करतात.

१२ सप्टें १९८७ रोजी त्यांच्या निधनानंतर ऑक्टो. १९८७ मध्ये वै. गो.आ. फडके यांनी ''गुरूवर्यांची धातुचिकित्सा'' म्हणून लेख लिहिला आहे.

वेणीमाधवशास्त्री आयुर्वेदाकडे आले तोपर्यंत रोगाकडे केवळ दोषविचारानेच बघितले जात होते. पण हा खूप स्थूल विचार होतो. दूष्यं, देशं, बलं, कालं याप्रमाणे केलेली चिकित्सा अधिक सूक्ष्म व यशस्वी होते. म्हणून त्यांनी अखेरपर्यंत धातूवादाचा पुरस्कार केला असा उल्लेख आढळतो.

शरीरातील सप्तधातू व मलांवरून दोषाचे अनुमान काढावे. धातूपरीक्षणावरूनच वैद्याच्या प्रत्यक्ष रूग्ण तपासणीस प्रांरभ होतो. धातूंचे सारासारत्व हा सर्वात महत्त्वाचा मूद्दा ते मानीत असे वै. फडके लिहितात.

- ✳ लक्षणांचा विचार करतांना ते कोणत्या धातूच्या दुष्टी मुळे निर्माण झाले असा विचार वेणीमाधवशास्त्री करीत व त्यानुसार औषध योजना करीत. उदा.ज्वरी रूग्णात डोके दुखी, भ्रम हे लक्षण असेल तर ही मज्जादुष्टीची लक्षणे आहेत म्हणून त्यावर मज्जागत काढा देत.
- ✳ औषधी द्रव्याकडेही वेणीमाधवशास्त्री धातूंच्याच दृष्टीने बघत. उदा. प्रवाळ, शंख, मौक्तिक, कमळ, ऊस, वाळा ही मांस समान द्रव्ये तर चारोळी, पिस्ते, बदाम ही मज्जासमान द्रव्ये.
- ✳ दोष फसवे आहेत. धातू फसवे नाहीत असा वारंवार ते उल्लेख करीत असे गो. आ. फडके म्हणतात.

वै. ठोंबरे अतुल वेणीमाधवांचे शिष्य होते ते आठवण सांगतात की बॅरिस्टर अंतुले वे. मा. शा. चे रूग्ण होते. अंतुलेंचा अवबाहुक त्यांनी बरा केला होता. अंतुले मुख्यमंत्री असतांना त्यांनी आयुर्वेदाला मान्यता दिली. डॉ. बळीराम हिरे, तत्कालीन आरोग्यमंत्रीचा याला विरोध होता, परंतु अंतुलेंनी हा विषय लावून धरला.



## वैद्य सौ. शुभदाताई पटवर्धन

जन्म – ३० एप्रिल १९४७

शिक्षण – आयुर्वेदाचार्य (मुंबई), एम.डी. (जामनगर)

विषय – मेदोवह स्त्रोतस दृष्टी लक्षणे, चिकित्सा.

पुर्नवसु आयुर्वेद महाविद्यालय – व्याख्याता.

सेमिनारस् मधून व्याख्याने व मार्गदर्शन.

वैद्य वेणीमाधवशास्त्री यांचे सह १४ वर्षे वैद्यकीय व्यवसाय (१९७३ – ८७).

मुंबईत दादर व माटुंगा येथे स्वतंत्र वैद्यकीय व्यवसाय.

**लेखन –**
- मराठी विश्वकोश साठी काही लेखन.
- वैद्यकीय व इतर मासिकांतून लेखन.

**पुस्तके –**
- आयुर्वेद अमृतकुंभ अर्थात घर्षणाचिकित्सा.
- सुप्रजा.
- आरोग्यसंपन्न आधुनिक जीवनासाठी आयुर्वेद.

### १.३.२ नानल परंपरा

महाराष्ट्रातील भारतातील अनेक नामवंत, श्रेष्ठ परंपरांपैकी एक परंपरा म्हणजे नानल परंपरा. आयुर्वेदाच्या क्षेत्रात एक भरीव कार्य केलेली, आपला ठसा उमटविणारी परंपरा


नानल हे मूळचे कर्नाटकातले. कोयना खोऱ्यातील हेळवाकपासून दीड मैलावर असलेल्या नानल गावचे. नानल हे कऱ्हाडे ब्राह्मण. यांचे एक घराणे पुण्यात स्थायिक झाले. या घराण्यातील मूळ पुरुष रावजी भिकाजी हे दुसऱ्या बाजीरावासह ब्रह्मावर्ताला गेले. नंतर पुण्यात येउन स्थायिक झाले. त्यांचे सुपुत्र श्री. गणेश शास्त्री होत.

गणेशशास्त्री विद्धान संस्कृत पंडित होते. काव्य, नाटक, व्याकरण यांचा गाढा अभ्यास होता. संस्कृतच्या प्रेमापोटी त्यांनी 'गिर्वाण वाग्वर्धिनी' सभेची स्थापना केली.

त्यांची अपत्ये अकाली मृत्युमुखी पडत. म्हणून त्यांनी अग्निची उपासना तसेच श्री गणेशाची उपासना सुरू केली. रोज पार्थिव गणेशाची मूर्ति करून तिची षोडशोपचारे पूजा, नैवेद्य व नंतर विसर्जन करीत. नंतर त्यांना दोन अपत्ये झाली.

पुरुषोत्तमशास्त्री व दुसरे शंकर

## १.३.२ अ. नानल वंश वेल




## १.३.२ ब) शिष्यपरंपरा

| | | | |
|---|---|---|---|
| **वैद्य पु.ग.नानल** | वैद्य. भा. वि. गोखले | वैद्य राशि मराठे | वैद्य शि.गो.जोशी |
| | वैद्य अ.दा.आठवले | वैद्य निर्मला राजवाडे | वैद्य दत्तात्रय जळूकर |
| | वैद्य निर्मला जोशी | वैद्य ग.वि.पुरोहित | |
| **वैद्य म.पु.नानल** | वै. इंदुभूषण बढे | वै. माधव करंबळेकर | डॉ. व्ही. बी. आठवले |
| **वैद्य भा.पु.नानल** | वै. प्रशांत यवतकर | वै. नरेंद्र पेंडसे, | वै. विश्वास घाटणेकर |
| | वै. ज्योती शिरोडकर | | |
| **वैद्य विलास नानल** | वै. मंजुषा देसाई | वै. राजेंद्र हुपरीकर | वै. मिलिंद कुलकर्णी |
| **वैद्य रमेश नानल** | वै. राजेश गुप्ता | वै. विनय डोंगरे | वै. सुहास नायडू |
| | वै. एस.बी. सिंग | वै. मनोज नेसरी | वै. सरीता धुरी |
| | वै. पुष्पा सिंग | वै. श्रीप्रसाद बावडेकर | वै. प्रमोद कुलकर्णी |
| | वै. चैतन्य प्रकाश संगीत | | |



## कै. आयुर्वेदाचार्य पुरुषोत्तम गणेश नानल

जन्म – १५ जुलै १८९३ मृत्यु – ९ फेब्रु. १९४४

**अध्ययन :**

१) वे.शा.सं. चिंतूशास्त्री दीक्षित यांचेकडून वेदाध्ययन.

२) 'अग्निहोत्री गणेशशास्त्री नानल, यांचेकडून संस्कृताध्ययन.

३) आयुर्वेदाचार्य बाळशास्त्री लावगनकर यांचेकडून आयुर्वेदाध्ययन.

४) पंडित वासुदेवशास्त्री डेग्वेकर यांचेकडून व्युत्पत्ति-निरुक्ती.

५) वयाच्या २१ व्या वर्षी बडोद्याची 'वैद्यभूषण' पदवी घेतली. नंतर निखिल भारतीय विद्यापीठाच्या 'विशारद' 'आयुर्वेदाचार्य' या पदव्या संपादन केल्या.

६) अर्वाचीन डॉक्टरांकडे जाऊन अर्वाचीन ज्ञानाची माहिती घेतली.

**अध्यापन :**

१) टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या आयुर्वेद विभागात अध्यापन प्रारंभ केले. २) लावगनकर आयुर्वेद विद्यालयात अध्यापन. ३) आयुर्वेद महाविद्यालय (मेहेंदळेवाडा) येथे स्थापना करून अध्यापन कार्य. ४) वयाच्या अखेरपर्यंत घरी 'गुरुकुल' पद्धतीने अध्यापन.

**विशिष्ट कार्य :**

१) १९२५ साली 'धर्मार्थ रुग्णालय' सुरू केले. २) १९३० साली त्याचे 'शेठ ताराचंद हॉस्पिटल' केले. ३) १९२४ 'रसशाळा' प्राथमिक रूपात सुरू केली. ४) १९३३ आयुर्वेद महाविद्यालय-मेहेंदळे वाड्यात सुरू केले. ५) याचेच रूपांतर 'टिळक आयुर्वेद महाविद्यालय' १९३५ साली केले. सदर संस्था आज खूप वाढली आहे. ६) 'आरोग्य' नावाचे मासिक दीड वर्षपर्यंत चालवले. ७) १९३८ 'पहिल्या सरकारी आयुर्वेद बोर्डाचे सदस्य' म्हणून काम केले. (३ वर्षपर्यंत) ८) खेडेगांवातील जनतेपर्यंत आयुर्वेदाची औषधे पोचविण्याची योजना केली. त्यात शाळामास्तरांसाठी सुलभ औषधी पेटी तयार केली. त्या पेटीत १६ औषधे, त्यांचे उपयोग, माहिती पत्रक होते. ९) १९१९ साली 'एन्फ्ल्यूएंझा' साठी शिबीर भरवले. त्यात आयुर्वेदीय औषधांचा यशस्वी वापर केला. १०) आयुर्वेद महाविद्यालय, रसशाळा, रुग्णालयाची स्थापना केली व अखेरपर्यंत विनामूल्य काम केले. पदरचे धन खर्च करून संस्था वाढविल्या. ११) भावप्रकाशाचे मराठी भाषांतर, विषतंत्र (प्रसिद्ध ग्रंथ), रसशास्त्र (अप्रकाशित), मानसशास्त्र, द्रव्यगुण यांच टिपणे तयार. आरोग्य मासिकाचे संपादन, आयुर्विद्या प्रकाशनात सहभाग. १२) सुश्रुतोक्त शस्त्रांचा कारखाना काढण्याचे मनात होते. त्याचप्रमाणे दुर्मिळ वनस्पतींची लागवड व रसशाळेसाठी काचकारखाना काढावयाचा होता.

●●●



## कै. वैद्य मधुसूदन पुरुषोत्तम नानल

जन्म : १९-१०-१९१४ निर्वाण : १०-२-१९७९

शिक्षण : आयुर्विद्याविशारद.

व्यवसाय : सल्लागार वैद्य (मुंबई)

अध्यापन : टिळक आयुर्वेद महाविद्यालय रसशास्त्र विभाग.

विशेष कार्य : १) 'मर्दन शास्त्र' व 'स्वास्थ्य आणि मालिश' दोन मराठी पुस्ते. २) 'आयुर्विद्या' शास्त्रीय लेख. ३) विविध आयुर्वेद महाविद्यालयात व्याख्याने. ४) संशोधन : 'गंधकद्रुति' सफल संशोधन, वचार सुवर्ण सफल संशोधन, 'वज्रमधु' प्लॅटिनम भस्म' अपूर्ण संशाधन, विविध अर्क, नवीन औषधे, उपचार (भारसंवाहन) यांचे संशोधन

•••



## वैद्य भालचंद्र पुरुषोत्तम नानल

जन्म : २९-११-१९२५

शिक्षण : आयुर्विद्या विशारद, डी.ए.एस.एफ., आयुर्विद्या पारंगत.

व्यवसाय : १९४६ पासून आजपर्यंत सल्लागार वैद्य.

अध्यापन : १) टिळक आयुर्वेद महाविद्यालयात १९५६ ते १९८३ – कायचिकित्सा विभाग (प्रमुख १९६७ ते १९८३). २) पदव्युत्तर मार्गदर्शक – प्राध्यापक, पुणे विद्यापीठ – आयुर्वेद विभाग. ३) संशोधन विभाग प्रमुख – आयुर्वेद विभाग. ताराचंद रामनाथ रुग्णालय, शतावरी व पुनर्नवा –विशेष संशोधन अहवाल केले. ''श्वित्र व काकोदुंबर''

**विशेष कार्य :** १) अधिष्ठाता, आयुर्वेद विभाग – टिळक आयुर्वेद महाविद्यालय. २) परीक्षक : भारतभरातील सर्व स्तरांवरील परीक्षांसाठी. ३) सदस्य : अ) IASTAM-INDIA (मुंबई) ब) शास्त्रीय सल्लागार समिती – जामनगर क) शिक्षण समिती C.C.I.M. (दिल्ली) ड) सल्लागार समिती F.R.L.H.T. (बंगलोर). ४) शास्त्रीय परिषदातून सक्रिय सहभाग. भारतभरातील संस्थांमध्ये शास्त्र-चर्चा-परिषदातून अध्यक्ष, वक्ता, मार्गदर्शक, शिक्षणतज्ज्ञ म्हणून सहभाग. ५) विदेशातील आयुर्वेद प्रचारकार्य. अनेक वार विदेशात व्याख्याने, कार्यशाळा, अभ्यासक्रमादिंचे वारंवार सफल नियोजन.



## वैद्य. विलास नानल परिचय

जन्म : ७-१-१९५०

शिक्षण : आयुर्विद्या पारंगत (पुणे) आयुर्वेदाचार्य (मुंबई)

अध्यापन : १) अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, पुणे.

२) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ-योग-आयुर्वेद

**विशेष कार्य :**

१) शास्त्रीय परिषद सहभाग (भारतातील).

२) दूरदर्शन व आकाशवाणीद्धारा व्याख्याने.

३) विविध शिबिरे, कार्यशाळांतून सक्रिय सहभाग.

**आजीव सदस्यत्व :**

१) भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था (पुणे).

२) महाराष्ट्र प्रान्तिक वैद्यक मंडळ, पुणे

३) शास्त्रज्ञ परिषद - दिल्ली

४) लोक स्वास्थ्य परंपरा संवर्धन समिती (कांईबतूर)

५) माधव प्रकल्प - सल्लागार सदस्य.

६) चित्रकूट - ग्रामोदय विश्वविद्यालय-सतना, म.प्र.

७) मौलिक सिद्धान्त अभ्यास समिती, पुणे विद्यापीठ

**लेखन :**

१) तुलसी व अतिसार - ही पुस्तके, (वैद्य र.म. नानल सहकार्याने), मुंबई

२) शास्त्रीय लेखन - मधुजीवन, आयुर्विद्या इत्यादि नियतकालिकातून अनेक शास्त्रीय लेख

३) (इंग्रजी पुस्तक वैद्य र.म. नानल सहकार्याने), मद्रास

- **लेखन - मर्मविज्ञान -** Joint affliction & their ayurvedic management, cardiotonic herbs, insight to ayurveda **नाडी विज्ञानावर लिखाण चालू.**

●●●



**वैद्य रमेश मधुसूदन नानल**

**जन्म** : १-४-५१९५२

**शिक्षण** : आयुर्वेद प्रवीण, (मुंबई) आयुर्विद्या पारंगत (पुणे)

**व्यवसाय** : आयुर्वेदीय सल्लगार वैद्य - मुंबई - पुणे - नाशिक (२० वर्षे)

**विशेष कार्य :** १) संस्थापक - संपादक : मधुजीवन आयुर्वेदीय द्वैमासिक (मुंबई) २) सल्लागार संपादक : १) जीवनीय, २) आरोग्यप्रभा ३) द्रोणागिरी, पारंपारिक वैद्यक ४) Iastam India, News Letter Ex-editor

३) **सदस्यत्व :** १) Iastam India, Life member, Ex-Jt. Executory (Bombay) २) लोक स्वास्थ्यपरंपरा संवर्धन समिती - काईंबतूर L.S.P.S.S. - संस्थापक - सदस्य. ३) Foundation for Revitalization of Local Health Traditions - Bangalore संस्थापक सदस्य, कार्यकारिणी सदस्य.

४) **शास्त्रीय सल्लागार :** १) A.D.S. कशेळे, कर्जत, २) L.S.P.S.S. - Combatore. ३) F.R.L.H.T. - Bangalore. ४) Chetna - Ahmedabad. ५) I.I.T. (Bombay) P.P.S.T. Foundation (Madras) Congress on Traditional Sciences and Technologies of India - Health Section. ६) आयुर्वेद अध्ययन केंद्र K.E.M. Hospital Bombay ७) वरुण फार्मास्युटिकल्स - मुंबई

५) **अध्यापन - कार्यशाळा - शिबिरे :**

१) आदिवासीवैदू शिक्षण प्रकल्प - कर्जत A.D.S. २) आयुर्वेदीय आहार - पोषणविचार - कालडी - कोचीन. कार्यशाळा - समन्वयक. L.S.P.S.S. ३) Concept of Immunity Workshop - Ahmedabad. ४) Mother and child care-workshop - ahmedabad / Delhi ५) ज्ञानप्रबोधिनी नवीनरोग विचार

६) संशाधन : १) धातू संस्कारित वनस्पतीची वाढ व उपयोग यावर काम सुरु आहे. वैद्य वि.म. नानल यांचे सहकार्य आहे. २) रोगविषयक संशोधन : १) कामला, २) परिणामशूल, ३) आम्लपित्त, ४) अर्श, ५) गुदगत रक्तस्त्राव व बीजपर्ण ६) राष्ट्रीय समस्यारूप असलेल्या सहा रोगांपैकी रोमान्तिका, अतिसार, कास, गर्भिणी पाण्डु या रोगांवर काम सुरू आहे. पारंपारिक उपाय - वैदूंचे तोडगे - संशोधनात्मक मूल्यमापन गेली अनेक वर्षे सुरू आहे.

**लेखन -** १) आहाराने रोग हरा, २) आहार रहस्य - मालिका, ३) ऋतुचक्र आणि आहार, १) कामला (मराठी-हिंदी), २) अतिसार, ३) तुलसी, पाकनिदान चिकित्सा, स्वास्थ्य विचार, आवरणविचार, ऋतुचर्या, आयुर्वेदतून मल विचार यावर लेखन चालू

३) शास्त्रीय लेख - मधुजीवन, आयुर्वेदपत्रिका, जीवक, आयुर्विद्या, महास्म्मेलन पत्रिका, जीवनीय (हिंदी) इत्यादि आयुर्वेदीय, वैद्यकीय नियतकालिकातून तसेच स्थानिक वर्तमानपत्रे, 'सृजन' मासिक यातून विविधांगी लेखन.

**इतर :** १) दूरदर्शनवरून कार्यक्रमाद्धारे लोकशिक्षण, २) विविध विद्यालयातून विद्यापीठातून व्याख्याने, ३) 'वैद्य बापुराव पटवर्धन चिकित्सा पुरस्कार, ४) मुंबई विद्यापीठ संशोधन चर्चासत्रात एका सत्राचे अध्यक्षपद.

●●●




## वैद्य सत्यव्रत रमेश नानल

आयुर्वेदाचार्य, (पुणे)

- स्वतंत्र व्यवसाय, नाशिक पुणे येथेही व्यवसाय
- माधवी प्रकाशनची जबाबदारी.
- कार्यकारी संपादक – मधुजीवन

●●●



## चिंतामणी रमेश नानल

- निसर्गोपचार तज्ञ
- पंचकर्मज्ञ म्हणून व्यवसाय
- थायमसाज तज्ञ
- लेखन – शिवमुद्रांकन, वैद्यराज व्हीजन, इ. मासिकांमध्ये




## वैद्य आशुतोष विलास नानल

- वैद्यांसाठी सॉफ्टवेअर निर्मिती.
- औषधी निर्माणात विशेष कार्य चालू.
- यात विविध धातूंची भस्मे मँगेनीज, वज्र भस्म, बद्धपारद यावर काम चालू.
- औषध द्रव्यपरीक्षा, इ. वर म.पु.नानलांचा प्रभाव.
- आयुर्वेदीक सौंदर्य प्रसाधनांची निर्मिती.

●●●

### वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी - लेखांचे वर्गीकरण




### वैद्य नानल - लेखांचे वर्गीकरण

